तूज सगूण म्हणू की
डॉ. स्मिता वराडे

“तूज सगूण म्हणू की”

सर्व हक्क @ लेखकाधीन

प्रथमा आवृत्ती,
१मे २०२६

स्मिता वराडे

smitarvarade@gmail.com

या पुस्तकाचे मुखपृष्ठ लेखिकेने स्वतः तयार केले आहे.

प्रस्तावना

“मनातले मनाकडे” हे दोन कविता संग्रह प्रकाशित केले. ”स्वतची ओळख :- प्रकाशाची ओळख” भाग १ आणि भाग २ ही २ पुस्तके लिहिली. लेखन सुरूच असते. या पुस्तकात जे समजत होते, ते लिहित गेले. आपण लेखन करू, पुस्तके लिहू असे स्वप्न, विचार काहीच नव्हते. पण थोडं वाचन आणि जमेल ते लिखाण हा जगण्याचा एक भाग झाले असे समजले. जी पुस्तके वाचली, त्या सर्व लेखकांची भेट नाही झाली. मग समजले विचार भेटत राहतात, प्रथितयश लोक नाही भेटले तरी. प्रथितयश लेखक व्हावे हे माझे स्वप नाही. पण मी जे काही लिखाण केले आहे त्यामुळे इतरांचे काही क्षण मजेत जावे, इतकेच. तेच आपले निर्गुण स्वरूपात भेटणे. हे काही आध्यात्मिक पुस्तक नाही. पण नाव मात्र “**तुज सगुण म्हणू की निर्गुण** “ असे योजले. **समर्थ रामदास स्वामी म्हणतात, जे जे आपणास ठावे, ते**

सर्वांस सांगावे, शहाणे करून सोडावे, सकळास". मोठी, अनूभवी माणसे जे सांगतात, ते खरे असते. माझ्या लेखनाने शहाणपण येईल की नाही हे नाही सांगता येत. पण निश्चित बरे वाटेल. लेखनामागची प्रेरणा काय? तर समजलेले आणि सुचलेले आपण लिहून काढावे. गौतम बुध्दांनी नियमांचे महत्व सांगितलेले आहे. बरीच अनुभवी माणसे/जीवन समजलेली माणसे नियमांचे महत्व सांगतात, काही जगतात. एखाद्या दिवशी ४/५ विषय सुचले, समजले तरी हळूहळू लिखाण करावे हा नियम लावून घेतला. स्वतःची ओळख भाग १ आणि २ असेच पूर्ण केले. अजून मी देखील ते पूर्णपणे जगले नाही. त्यातील थोडा भाग म्हणजे मराठी लेखन, इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये काही वर्ष अध्यापन, कधीतरी गायन. ही माझी मला असलेली ओळख. अत्यंत अनिर्बंध आयुष्य जगून काही माणसे फार अप्रतिम कामे करतात, कधी नाही करू शकत. तसेच नियमबद्ध जगण्याबाबत पण आहे. ही बाब आपली आपण शोधायची. हा स्व ओळखीचा एक प्रवास. तसे हे **"तूज सगुण म्हणू की "** हे पुस्तक. जरूर वाचा.

१ मे महाराष्ट्र दिन

१ मे हा दिवस महाराष्ट्र दिन आणि कर्मचारी दिन म्हणून देखील सर्वत्र साजरा होतो. भाषिक, सांस्कृतिक आणि लोकसंख्येच्या समायोजनासाठी वेगळी राज्ये या दिवशी अस्तित्वात आली. मी जन्मतः महाराष्ट्रीयन. पण अभ्यासाच्या निमित्ताने मला गुजरात राज्यातील सुरत शहर बघायला मिळाले. गुजराथी भाषेचा अल्प परिचय झाला. भारत माझा देश आहे, आणि सर्व भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा घेणाऱ्या आपल्या सर्वांना राज्यातील विविधता समजेल, भेद नाही. ज्या मातीत माणूस जन्म घेतो, तिचा अभिमान, आनंद असतो. महाराष्ट्रीयन असल्याचा तो मलादेखील आहे. १ मेला कर्मचारी दिन पण साजरा होतो. महाराष्ट्र दिन आणि कर्मचारी दिनाच्या निमित्ताने मी हे पुस्तक प्रकाशित करत आहे. यावर्षी बुद्ध पौर्णिमा देखील याच दिवशी आहे. बुध्दांच्या तत्वज्ञानाचा आदर व्यक्त करून त्यांना मानवंदना देण्याचा आजचा दिवस. महाराष्ट्र दिनाच्या, कर्मचारी दिनाच्या आणि बुद्ध पौर्णिमेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. छोटे गाव ते राज्य, देश आणि वैश्विक एकात्मतेसाठी देखील आजच्या दिनाचे औचित्य साधून ईश्वरचरणी प्रार्थना.

आभार:- माझे लेखन सुरू असते. या प्रवासात आपली माणसे सतत समजून घेतात. माझे पालक, बहिण, माझं कुटुंब, मला ओळखत असलेले मित्र मैत्रिणी, फेसबुक वरील विद्यार्थी आणि अन्य परिवार, कालेजमध्ये काम करतांना मैत्री झालेले सहकारी, शाळा, कालेजातील शिक्षकवृंद यांची मदत असतेच.

परिवारातील सर्वांची प्रत्यक्ष, तर इतरांच्या शुभेच्छा. मी याबद्दल सर्वांचे जाहीर आभार मानते.

अनुक्रमणिका

अ.क्र. विषय

०१. बेस्ट सेलर आणि चाहता वर्ग

०२. दुःख झाले नसते

०३. कोणते क्षेत्र : का आणि कसे ठरवू

०४. आनंदी जबाबदार आयुष्य

०५.एकत्रित करण्याची क्षमता

०६. एक गाव, एक स्वप्न

०७. सरस मी

०८. कालांतराने

०९. फरक कुठे पडला?

१०. प्रश्न

११. कारणे आणि तक्रारी

१२. कोणाबरोबर कसे वागलो?

१३.आपली उपस्थिती प्रार्थनीय

१४. मकरसंक्रांत

१५. आत्मचिंतन

१६.मुले कशी घडतात?

१७. आपल्या प्रेमात

१८.चघळण्याच्या गोष्टी

१९. पार्लर आणि शिवणकाम

२०.आत्मसाक्षात्काराचे क्षण

२१.आलेख ते सारीपाट

२२.प्रसारमाध्यमे आणि आपण

२३. उकडा ते उकाडा

२४. पुढे काय झाले?

२५. या सर्कलमध्ये

२६. एका आफिसची गोष्ट

२७. एक दिवस

२८. वेलीचं जगणं

२९.कर्मफलाचा सिध्दांत

३०. समय के साथ

३१. रस्सीखीच आणि भूमिकांची एकात्मता

३२. असे का घडले?

३३. कामचुकारपणा

३४.सांगा कसे जगायचे?

३५. काय झाले?

३६. आभास

३७. शीडी

३८. आनंदाचा कोश

३९. आमची मर्जी

४०. मस्काचस्काची गोष्ट

४१. पुढाकार घेणे

४२. कामातील चोखता आणि उत्तरदायित्व

४३. थाट बाट

४४. संगीत

४५. प्रेमाचा दिवस

४६. विद्वेषाची आग

४७.सहजीवनाची ऐशीतैशी

४८. जिज्ञासेचा प्रवास

४९. सगळं ऑनलाईन

५०. संकल्पना

५१. आस्था

५२. चूकवू नये असे काही

५३. अढळ पद

५४. कठीण गोष्ट

५५.मुलांचे वाढदिवस

५६.सर्व प्रकारचे कोशंट

५७.कोणत्या दिशेने?

५८. मेलोड्रामा आणि मेलोडी

५९. एका क्षणात परके

६०.मानसिकता बिघडण्याची कारणे

६१. सतत स्वतःला

६२.नोकरी जाण्याची कारणे

६३. स्वभाव नावाचं ठिकाण

६४. तरंग

६५. मागोवा

६६. स्वयंशिस्त

६७. जगण्यातली सुसंबद्धता

६८.पार्टीचा कार्यकर्ता

६९. आने वाला पल

७०.आनंदाची निर्मिती

७१.आत्मगौरव आणि श्रेष्ठत्वाची भावना

७२.सामाजिक संस्थांची गरज

७३.आत्मगौरव आणि श्रेष्ठत्वाची भावना

७४. प्रथा

७५. पैसे गोळा करायचा धंदा

७६.परिस्थिती आणि ओळख

७७. दृष्टिकोन

७८. परवड

७९.कामांची प्रतिष्ठा

८०.ब्रह्माची संकल्पना

८१. चालून जाईल

८२.वेळ कसा

घालवायचा?

८३. एवढे दिवस

८४. फजितीची गोष्ट

८५.सामाजिक मदत

८६.धुडगूस ते स्वयंशिस्त

८७. सुर्योदय आणि सुर्यास्त

८८. ध्यायतो विषय

८९. जगण्याचा सूर

९०. किरकरेपणा

९१. भ्रांत मन

९२. सन्मान

९३. टोकन

९४. वावटळ

९५. केवळ ऐतखाऊ

९६. स्वातंत्र्याची चव

९७.मुलांचे व्यक्तिमत्त्व

९८. आपण जीवन कधी जगणार?

९९. हे जीवन आहे का?

१००. खीळ

१०१.तूज सगुण म्हणू..

Date:- ०१/०१/२६

Best seller आणि चाहता वर्ग

लहानपणापासून पुस्तक वाचते. आधी शाळेचंच. अवांतर वाचन तसं कमी होतं. ते जरा वाढले ते स्पर्धा परीक्षेदरम्यान आणि इंजिनिअरिंग करतांना. तेव्हा मोठं मोठी पुस्तके आणि पुस्तके. किती तरी जण लिहित असतात, आपापल्या क्षेत्रात. हे bestseller काय प्रकार असतो? खरंतर माझी मातृभाषा मराठी. इंग्रजीची सुरूवात ५व्या इयत्तेत! (आजची मुले खुदूखूदू हसतील). मग एका मित्राने भर टाकली author या शब्दाची. तेव्हा म्हटलं.....बरं शिकूया english! तर गाडी आली bestseller वर. वेगवेगळे मार्ग अवलंबून चाहते मिळवणे आणि चाहता असणं, होणं हा लांबचा प्रवास आहे. Normally आपण सगळेच सगळ्याच बाबतीत short cuts वापरतो. पण काही बाबतीत ते मूळीच शक्य नसते. तसा हा bestseller भाग. वर्षोनूवर्ष एकाच ठिकाणी फळांची, भाजीची गाडी लावलेले मावशी, काका बघितले, की कोणीतरी ओळखीचे आहे, म्हणून ब....रं वाटायचे. नंतर स्वतःला कधी कोणत्या गोष्टीचा कंटाळा आला तर वाटायचे, ही माणसे फक्त पोटासाठी इथे बसून आहेत की कोणी दटावल्यामुळे की स्वेच्छेने, एक कर्तव्य म्हणून? याच्याही पुढची गोष्ट, ते तिथे आहेत, हे काही मनातून जायचे नाही. याचा bestseller शी काय संबंध? Bestseller क्वचितच एक दिवसात bestseller झाले असतील. स्पर्धा परीक्षेदरम्यान आणि इंजिनिअरिंग करतांना वाट्टेल ते वाचले. पण

सतत जाणवले, त्यांची मूलभूत आवड, कोणती तरी परिस्थिती, सततचे लिखाण तिथपर्यंत पोहचवते. स्वयंपाक म्हणा की गाणं की आणि काही कोणती पण बाब. दाद मिळेलच असे नसते. Bestseller प्रकार पण यातलाच. स्वतः केले तरी स्वतःला आवडेलच असे नसते, तर दुसरा खाईलच किंवा खाऊन दाद देईलच असे नसते. याउपर या प्रकारांनी स्वभावाला आलेले कंगोरे, तो एक वेगळाच विषय. चाहता वर्ग सतत चाहता राहत नाही. आणि ते स्वाभाविक आहे. पण सतत एका ठिकाणी एका प्रकारचे, मग कोणी आवडते म्हणून तर कोणी दटावल्यामुळे जे काम करतात, तिथूनच कर्मयोग वगैरे प्रकार थोडा लक्षात आला. भन्नाट सुचलं आणि ते कोणत्याही मार्गाने विकता आलं, तो भाग निराळा. पण जेव्हा काही मराठी, हिंदी अजरामर गाणी ऐकते, ती पण अतिशय अर्थपूर्ण तेव्हा मला bestseller चा अर्थ थोडासा समजला एवढंच वाटतं. चाहत्यांचे काय? रोज सोन्या म्हणणारी आईसुद्धा रूसते. ते तर चाहते आहेत. आजचा लेख- निवडलेल्या वाटांवरून चालता येईल का? हा स्वतःला विचारलेला प्रश्न होता. त्याचा एक प्रयत्न. आपण एखाद्या शाळेमध्ये, कालेजमध्ये पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ शिक्षक असतो. पण आपण फक्त आपल्याच लेक्चरच्या प्रेमात असतो. भाषा किंवा कोणताही विषय किती अर्थपूर्ण असतो. आपण लगेच कसे कंटाळतो? कांदे, बटाटे आणि भाज्या रोज विकणारे काका मावशी माझ्यासाठी bestseller आहेत. कारण त्यांना नियम पाळता आला. अनेक जण नियम पाळतात. त्यांची आपली कारणे असतात. काही bestseller वेगळं जग दाखवतात. माझे लेखन bestseller व्हावे किंवा मी सतत लिहू शकेल हे स्वप्न पाहिलेच नव्हते कधी. ती एक प्रेरणा होती.....एक भेटवस्तू मिळाल्यानंतरची. तो प्रवास आजपर्यंत सुरू आहे. कदाचित अनेकांचा असाच सुरू झाला असतो. त्या सर्वांना खूप शुभेच्छा, हाती घेतलेले काम मनाजोगे झाले असेच नेहमी वाटावे म्हणून. Bestseller आणि चाहतावर्ग हा शब्द सुद्धा खूप अनोळखी होता, तो प्रवास सुरु करुन मला ३० वर्ष झाली. जीवनाची वळणे खूप छान असतात, फक्त कर्ममार्गाचे पालन करता आले तर. आपापल्या जीवनप्रवासाला खूप शुभेच्छा.

Date :-०२/०१/२६

दुःख झाले नसते

लहानाचे मोठे होतो, ते दुसर्याचा आधार घेऊनच. आधार दाता आपल्याला खूप बळ देतात. त्यांच्याकडे जे काही आहे ते देतच असतात. मग आपल्याला फक्त घेण्याची सवय होते आणि त्यांना देण्याची. मोठी माणसे मनात प्रचंड निराश असतीलही. कारण त्यांना सततच काम करावे लागते. नसले प्रत्यक्ष तरी व्हावे

बहुतांचा आधार असे बनावे लागते. मग त्यांना पण ती सवय लागते. या प्रकियेचा विशेष हा आहे की दोन्ही भाग आनंदी आणि जबाबदार होण्याऐवजी दु:खी आणि कमी जास्त जबाबदार असतात. मला लहानपणापासून आठवते, बरेच काही मिळत असे, समजले ते काम केले. पण तरी मी दु:खी असायचे. कधी कधी काळ दु:खात जायचा. आणि त्याचे कारण मला स्वतः:ची ओळख नव्हती. शिक्षण म्हणजे दुसर्याने सांगणे आणि आपण करणे इतकेच नसते. ती तर शिक्षणाची प्राथमिक पायरी आहे. जबाबदार वर्तनाचा तो एक भाग आहे. पण खरे शिक्षण आत्मशोध, आत्मभान आहे. मी लहानपणापासून देवाला मानते. पण कोणत्या तरी विशिष्ट मंदिरात नियमित जाणे वगैरे मी केले नाही. पण ती माझी आवड आहे हे मला अनेक वर्षांनी समजले. अशा अनेक गोष्टी सांगता येतील. असे आत्मशोध घेत रिकामे बसून कसे चालेल? असे कोणीही म्हणेल. आणि ते खरंच आहे. पण आपले नेमलेले किंवा शोधलेले काम कितीही अडचणी आल्या तरी दु:ख न करता केले तर नवे रस्ते नक्की सापडतात. कवी म्हणतात, "हे ची दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा" फक्त दु:ख झाले की आई, बाप, पालक, देव नातेवाईक सर्व आठवतात. सुखात आणि सर्व काळ त्यांची आठवण आणि जमेल ते कर्तव्य आपल्याला नवे रस्ते दाखवते. आनंदी, जबाबदार नागरिक हे पहिले स्वप्न असावे. जबाबदारीचे खूप प्रकार आहेत. त्यावर कधी तरी लिहेल. पण आनंदी असणं, राहणं हा स्थायीभाव असला तर खूप उत्तम कामगिरी देव आपल्याकडून करवून घेतो असा माझा विश्वास आहे. याचा अर्थ दु:खद भावना येणारच नाही का? तर येते. पण त्याचे पण प्रकार आहे. खूप वेळ तर दुसऱ्याकडे बघण्यात जातो. आपण जीवनात स्पर्धा शिकतो. ती पण दुसऱ्याचे हिरावून स्वतः पुढे जाण्याची. त्याशिवाय जीवन जगू शकत नाही हा अलिखित धडा आपण शिकतो. शाळेतील स्पर्धा या कौशल्य वाढावे यासाठी असतात. जी मुले मुळातच धाडसी असतात, ती लवकर कौशल्ये शिकतात. शाळेतल्या स्पर्धेत जिंकतात, हळूहळू आयुष्यात पुढेच जातात. इतर मुले नाराज राहतात. याचे कारण ते घरात अभ्यास करत नाही. आणि त्याचे कारण त्यांचे पालक त्यांची तुलना इतरांशी करतात. याने जगण्याऐवजी प्रत्येक क्षणाला मूल मरतच असते. म्हणून शिक्षण हे स्वतःचे असते आणि ते आत्मशोधाने येते. तो पर्यंत दु:ख न कवटाळता काम करायचे, एक तर दिलेले किंवा समजलेले. अनेकदा अनेक माणसे आपल्याला कामावरून कमी करतात. मी त्यावरही लिहीणार आहे. पण इथे इतकेच नमूद करायचे आहे की वाईट वाटण्याच्या काळात आपण किती वेळ घालवतो आणि त्यातून काय मिळवतो? आणि मिळविण्याचीच वृत्ती झाली की काय देतो? तेव्हा फक्त तिच इच्छा राहते. म्हणून दैनंदिन नियमाला महत्व आहे. जे आनंदी, जबाबदार जीवन शिकवते.

एकदा दु:खी राहायची सवय जडली, किंवा सुखे प्राप्त झाली की आपण फक्त त्याच चक्रात अडकतो. त्यापलिकडे जीवन समजतच नाही. आपल्याकडे साधने नसतात. म्हणून आपण रडतो. पण मग साधनांची निर्मिती होऊ शकते का ही खटपट करावी लागते. साधे नाहीच आहे ते. साधे आहे दु:खी किंवा आनंदी होणं किंवा कुठेतरी अडकून पडणं (प्रेमात नाही हं, प्रेम फक्त शिकवत) वेळ कुरकुरत घालवण्यापेक्षा प्रयत्नात घालवावा. तुकोबा म्हणतात सुख जवापाडे, दु:ख पर्वताएवढे. पण मला वाटते दु:ख करण्याची वृत्ती पर्वताएवढी असते. सुख तर येतच असते, जन्मापासून. म्हणून आनंदी राहूया.

Date :- ०३/०१/२६

कसे शक्य आहे?

मागची पिढी आणि पुढची पिढी हा संघर्ष की मदत आणि सन्मान ही शिकवण आपण समजू या. पुढच्या पिढीला कळकळीने जे सांगत असतो, ते तेव्हाच जेव्हा कोणी तरी कुठे तरी काही तरी करायला चूकलेले असतात. अनेकदा अनेकांचे असेही होते, आम्हाला मिळाले होते का, आमचे झाले होते का, आमच्या वेळी अमूक होते, आमच्या वेळी तमूक होते. काही वेळा तो अनूभव फक्त नोंदवायचा असतो. काही वेळा खूप दुःख असते, त्यामूळे मनाची गाडी कुठेतरी सैरावैरा जाते. यात कुठे फायदा तर कुठे तोटा होतो. आपली संस्कृती ही महान आहे. ती आठवण देते, **"देवा सगळ्यांना सुखी ठेव, सर्वांना तेजोमय बनव, कोणी कोणा विषयी चूकीचा विचार करेल असे होऊ देऊ नको"** शिक्षणाद्वारे साध्य होणारी गोष्ट म्हणजे ही बाब. शिक्षण केवळ पुस्तकी नाही. रोज नियमाने कोणतेही/नेमलेले काम करणे, जबाबदारीने वागणे ही बाब पण शिक्षणच आहे. दुसऱ्याबरोबर तूलना, स्पर्धा करणे, किंवा आपले दुःख आठवून खूप वाईट वाटणे आणि कलेष होणे यात खूप अंतर आहे. ज्या गोष्टीने अत्यंत क्लेश होतात, ती बाब, त्यांची कारणे समजली तर कदाचित दुःख होईल पण ते निदान सहन करण्याची शक्ती असते. कोणत्याच मानवी मनाला क्लेष सहन होत नाही. दुःखी व्यक्ती दुसऱ्याबाबत क्षमाशील होऊन दुसर्यांचे यश साजरे करु शकते. पण क्लेष असणारी व्यक्ती कधीच नाही. ती फक्त स्वतःलाच यश कसे मिळेल यात अधिक गुंतत जाते. दुसऱ्याचा विचार नाहीच. तत्वज्ञानातील तत्वे जीवनात उतरवणे कसे शक्य आहे.....? आपल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे एकाच जन्मात मिळणे कसे शक्य आहे.....? प्रश्न संपण्याच्या आत नवनवीन प्रश्न उपस्थित होतात.....हे संपणं कसे शक्य आहेत? होते कोणा कोणाच्या बाबत असे.....

Date – ०४/०१/२६

आनंदी जबाबदार आयुष्य

किती स्वार्थी आहे तो/ती? लगेच मदत केली त्यांनी. थोडेसे ही विचारले नाही त्यांनी. थोडेसे ही सांगितले नाही. आपण म्हणत जातो. जबाबदारी कशी पार पाडावी हे जिथे अजिबात समजत नाही त्या प्रत्येक वेळी मदत हवी असते. या प्रकारात हळूहळू आनंद मावळत जाऊन प्रचंड दुःख निर्माण होते. याचे कारण एकच. आपल्याला रोज दुःखाचे गाठोडे गोळा करण्याची सवय असते. तर काहींना रोज आनंदाचेच गाठोडे जमा करण्याची सवय असते. यातूनच वृत्ती तयार होते. मला काहीही झाले तरी आनंदी राहायचे आहे, असे लक्षात घेणारी व्यक्ती कोणत्याही मार्गाचा अवलंब करुन ते प्राप्त करते. यातून लहान मुले जे दिसतं तेच शिकतात. रोजचा स्वतः ठरवलेला किंवा शिक्षकांनी ठरवून दिलेला दिनक्रम तुम्हाला खूप शहाणं आणि जबाबदार बनवतो. मोठे झालो, हातात थोडे पैसे आले किंवा त्यात काही गोंधळ झाला किंवा दिसला की अनेक माणसे खूप दुःखी होतात. पैसा हातात पडल्यावर जितक्या प्रचंड प्रमाणात आनंद होतो, तेवढेच प्रचंड दुःख तो दिसला नाही की होतं. आणि समजते शांत राहणे, आनंदी राहणे, जबाबदार असणे ही पण वृत्ती आहे. आणि ती एक दिवसात निर्माण होत नाही. तर ती अनेक दिवसांची मेहनत असते. आई झाल्यावर कोणत्याच आईला मुले दुःखी असावे असे वाटत नाही. तिचे मातापण सर्वांना आनंदी, सुखी, जबाबदार बनवण्यात ती व्यतीत करते. मुलांना समजले तर ठिक. नाही तर तिला स्वतःला दुःखी रहावे लागते. समाजाचा तोल का बिघडतो आहे, असे ज्याला जिथे जिथे वाटत असेल, तर अति दुःख किंवा अति आनंद हा प्रकार आहे. हे ज्ञान प्राप्त झाले की हे दोन्ही प्रकार संपुष्टात येतात.

Date:- ०५/०१/२६

Collaboration ability- एकत्रित करण्याची क्षमता

लहान मूल आणि झाड सारखंच असतं. त्यांच्याकडे बघितले की वाटते मला वाढायचे आहे, जगायचे आहे म्हणून ते कसोशीने प्रयत्न करतात. दोन झाडं अगदी जवळ वाढतांना बघितले आहे कधी? वेल असेल तर ती एकमेकांत गुंफत जाते. झाडाच्या फांद्या एकमेकांत घुसतात. माणसे म्हणतात, याची अडचण होते आहे. हे झाड नीट वाढणार नाही. मग त्याच्या फांद्या आपण कापून काढतो. आपल्याला बरे वाटते. सोसाट्याचा वारा आला तरच त्या फांद्या तुटतील आणि एकट्या झाडाच्या फांद्या सुध्दा सोसाट्याच्या वाऱ्याने तुटतातच. असते ते मातीशी जुळवून

घेण्याचे प्रयत्न. म्हणूनच मातीत फारसे मूलद्रव्ये नसले तरी त्यातही पीक येत. माणसांचे याहून वेगळे काय आहे? Organizational behavior चा माझा अभ्यास नाही. पण एखाद्या कंपनीत रुजू होण्यापूर्वी आजकाल training देतात. ते खरंच खूप स्तुत्य आहे. तो कालावधी कमी जास्त असेल, विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार. पण तिथूनच मुले collaboration ability हा प्रकार शिकतात. पण ते झाले कामकाजाचे क्षेत्र. ही बाब आपण जिथे निवारा शोधतो किंवा जिथे आपला निवास असतो, तिथे त्याची याहूनही अधिक गरज असते. कामाच्या ठिकाणी ठरवून दिलेली कामे असतात. निवासाच्या ठिकाणी ठरवले तरी ढकलाढकली असते आणि त्यातून येणारी नाराजी. संप्पन नसलेली मानवी नाती. कामाच्या ठिकाणी पण हे होते. निवासाच्या ठिकाणी जास्त काम असणाऱ्या व्यक्तींना किंवा कामाच्या ठिकाणी जास्त काम असणाऱ्यांना सुट्टी adjust कशी करावी कधीच कळत नाही. बरे आपले कामाचे profile वेगळे, दुसऱ्याचे वेगळे. मग यात कंपनीचे नुकसान तर होतेच. कंपनीचे झाले की आपले जास्त नुकसान होते. शाळा ही संस्था देखील याला अपवाद नाही. कोणत्याही विषयाच्या शिक्षकांची सततची रजा म्हणजे मुलांना शिक्षा किंवा अति मजा. कारण प्रत्येक शिक्षकांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे target ठरलेले असतातच. मग आपण म्हणतो, चालायचेच हो. तुम्ही अति गंभीर आहात. म्हणून सार्वजनिक सुट्ट्या शक्यतो सारख्या असल्या तर बरेच गंभीर माणसे हसू लागतील. त्याचबरोबर collaboration ability पण आपोआपच वाढेल. कारण माझे ठाम मत आहे माणसे प्रामाणिक असतात. नसते ती अनुकूल परिस्थिती. मग एकदा का आलेख घसरला की विचारायचेच नाही. Collaboration ability प्रत्येकाची कमी जास्त असेल. पण ती विकसित करण्याच्या प्रयत्नाने आपला आधी फायदा, असे म्हणायचे. नंतर व्यवसायाचा किंवा समाजाचा. व्यवसायिकांना प्रश्न पडतो, यांना किती दिवस training द्यायचे? कारण training दरम्यान पूर्वी फार काही देता येत नसे. कारण उपलब्धीच नसायची, वातावरण अनुकूल नसायचे, दळणवळणाची साधने नव्हती. माणसे जगवायला, संपन्न करायला इतके सोपे नसते. कोणत्याही व्यवसायात शिरण्यापूर्वी त्या व्यवसायाची खरी आवड collaboration ability आपोआपच वाढवते. मला मुळातच civil engineering आवडतं होते, अन्य शाखा नाही. त्यात जेव्हा college ला मला सर्व विषय शिकविण्याची जबाबदारी दिली तेव्हा मलाही नाराजी आली होती. कारण माझा आवडता विषय water resources आहे. पण मी माझी जबाबदारी पार पाडली कारण मूळात मला civil engineering आवडते. हेच मला अन्य जमले नसते. म्हणून १०/१२ वीच्या शिक्षणाला खूप महत्त्व द्यावे, आत्मभान जोपासावे. आजकाल management या विषयाला आलेले महत्व मला चकीत करते.

कोणतीच परिपक्वता नसलेली मुले फक्त काम करून घ्यायचे एवढाच धडा शिकलेली असतात. तो विषय अजून वेगळा आहे. पण सामान्यत: लहान वयापासून आत्मभान जोपासत जुळवून घेण्याची क्षमता जोपासली तर खूप वेगळे चित्र दिसेल. याचा अर्थ maladjustments नक्कीच नाही. उदा. ज्या घरात तुम्ही स्वयंपाकी म्हणून रूजू असाल आणि ३/४ पदार्थ करणे त्यांची रितं असेल तर ते सांगणे व करणे, ज्या कंपनीत वेळा पाळणे यापेक्षा कामाच्या दर्जाचे महत्व आहे ते सांगणे, अशी अनेक उदाहरणे देता येतील. याने एक चांगले work culture तर निर्माण होतेच, पण परस्पर सहकार्याने किती कामे उत्तम होतात हे लक्षात येईल. कामे उत्तम होते हा एक प्रकार, माणसे घडणे हा एक प्रकार आणि work culture टिकणे हा एक प्रकार. अनेकदा dressing style हा प्रकार पण work culture मध्ये येतो. पण suitable काय आहे, कोणत्या प्रकारचे काम कोण करते आहे, वगैरे पण यात येते. या प्रकारामुळे कामावरचा Focus उडून अन्य गोष्टींवर Focus येतो. मुलगी कामाला आली तर तिच्या कामाच्या क्षमतेपेक्षा कपड्यांकडे, चेहर्याकडेच सहज नजर जाते. चार उत्तम कामे समोर न येण्याचे कारण हेच आहे. एखादा आफिसला उशिरा येतो. दळणवळण व्यवस्थेवरचा ताण सर्वांना माहीत असतो. इतरांचे व्यवसायिक क्षेत्र जूळवून घेण्याच्या क्षमतेलासुध्दा खूप कारणीभूत असते.

Date :- ०६/०१/२६

एक गाव एक स्वप्न

स्वप्न पाहून जगणाऱ्या व्यक्तीला इतरांची काळजी घेत (काळजी करत नाही) जगणं हा कठीण अभ्यासक्रम असतो. एक गाव एक स्वप्न हा प्रकार जे दिसले ते बघून मनातले विचार कागदावर उतरले.

एक दिवस मनात आले गाव कसे उभे राहत असेल? मी ज्या गावात लहानाचे मोठे झाले त्याचा aerial view कसा आहे? ते एक बर्यापैकी सुटसुटीत गाव आहे. त्या गावाच्या उभारणीत अनेकांचा सहभाग आहे. पण मला नेहमी वाटतं आले शिक्षण आणि जगणं समांतर नसलेल्या ठिकाणी प्रचंड जबाबदाऱ्या आहेत. नवी गावे, नवी शहरे, नव्या सोसायटी निर्माण करणे हे काम civil engineers association चे असतेच. पण ते करतांना जगण्याच्या सर्व व्यवस्था नीट लक्षात घेतल्या जातात का? **मागची कामे हा अभ्यासक्रम असावा. तिचं पायाभरणी असेल**. " building design and drawing शिकतांना गावाचा अभ्यास पण गरजेचाच आहे. एका गावानंतर दुसरे गाव या पध्दतीने उभे राहतांना आधी पाण्याची व्यवस्था

असावी, कनल, शेत तळे, उभे रहावे, शेत उभे व्हावे, दळणवळण व्यवस्थेचा विचार हवा. या गावाचा specific aerial view ,हवा. जर आपण विचार केला अष्टकोनी गाव, तर आठ टोकांवर आठ offices हवेत, जिथे वेगवेगळे विभाग कार्यरत असतील, त्यात पाणी विभाग, कृषी, वन व परिसर निरीक्षण विभाग (बि-बियाणे, अन्न धान्य नोंदणी ration), दळणवळण विभाग, ग्रंथ व पत्रकारिता विभाग, कापड, ज्वेलरी विभाग, जनगणना विभाग, engineers and medical sector, इ जीवनावश्यक आठ विभाग असावेत. हे सर्व विभाग नगरपालिकेच्या प्रमुखाधिकाऱ्यकडे सर्व रितसर नोंदणी सादर करण्यास पाईक राहतील. परिसरातील मुले यात सहभागी असतील तर आपण सामाजिक ऋण पूर्ण केले हे पण यात आले. तसे असणे हे अनिवार्य नाही. पण माणसांची वणवण भटकंती आणि नैसर्गीक साधनसंपत्तीवरील ताण कमी करून निसर्गाची रक्षा करायची असल्यास परिसरातील प्रत्येक शाळा चालक, पालक यांची चर्चा झाल्यास नवे गाव हे एक सुंदर स्वप्न असेल. ही गावे ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालीकेशी संलग्न असतील. सर्व नागरिकांना, व्यवसायिकांना नोंदणी गावातच करावी लागेल. गावातील अधिकारी ग्रामपंचायत व तत्सम अधिकाऱ्यांना नोंद पुढे पाठवतील. सर्व अधिकाऱ्यांच्या महानगरपालिकेला मासिक बैठका होतील. त्यांचे अहवाल असतील. यात शाळांचा सहभाग का? परिसरातील प्रत्येक मूल कोणत्या तरी शाळेत असेल याची ग्वाही, ते मूल परिसरातील गाव उभारणीत सहभागी असेल, इकडे तिकडे नुसतेच भटकण्याऐवजी ते विधायक कामात मग्न असेल. या गावातील मंदिरे, घरे, मशीदी, शाळा वगैरे सर्व शाळेतील मुलांच्या संख्येनुसार design व्हावेत. आधी शेती, पाणी आणि दळणवळणाची रचना, त्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यालये. प्रशासकीय अधिकाऱ्यांची शाळा कालेजामारफत निवड आणि प्रत्यक्ष काम. परिसर निरिक्षण विभागासाठी शाळा कालेजात जाहिर मुलाखत घेऊन त्यांची निवड आणि त्यांना इतरांची मदत. या उपक्रमामुळे कशीतरी वाढणाऱ्या गावांची संख्या कमी होईल. व जागेचा सुयोग्य वापर होईल. गाव म्हटले की सरकारी, निमसरकारी वा खाजगी वाहनतळ हवे म्हणजे हवे. ते प्रत्येक सोसायटीच्या जवळपास हवे. वयस्कर माणसांचे पाय दुखून येतात पण वाहन मिळत नाही. कशी वाटते, एक गाव एक संकल्पना?

Date:- ०७/०१/२६

सरस मी

लहानपणापासून आपण सहजच अनुकरण शिकतो. हे अनुकरण कमी जास्त असते. म्हणजे पालकांना आपण सतत बघून त्यातून शिकतो. आईचा पोषाख,

खानपान, वर्तन, नातेवाईक,परिवाराप्रमाणे वागणं वगैरे. यातल्या काही गोष्टी आपण नकळत घेतो. तर काही गोष्टी जबरदस्तीने. पालक म्हणतात, तुम्हाला हे केलेच पाहिजे. नाही तर लोक हसतील. त्याहून अधिक कोणी मदत करणार नाही. एकटे पडाल वगैरे. आपण आतून अस्वस्थ असल्याने आपण इतरांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यात अपयशी ठरतो. आपल्या एका अस्वस्थतेची कारणे अनेक असतात. मी त्यावरही लिहिणार आहे. पण बरेचदा विशिष्ट इच्छा आणि अपेक्षा पूर्ण होत नाही म्हणून अस्वस्थता असते. इच्छा स्वतःच्या असतात. अपेक्षा मला हे हवेच ही बाब असते. या बाबी प्रत्येक व्यक्ती व्यक्तीं अंतर्गत असतात. ते कसे प्राप्त करावे हे न समजल्यामुळे आपण अस्वस्थ असतो. या सगळ्यावर मात म्हणजे आत्मचिंतन. आपण आत शोध घेण्याऐवजी बाहेर शोध घेतो. सरस मी म्हणजे माझी होणारी वाढ. पण ही करतांना मला इतरांचे कोणत्याही प्रकारचे शत्रू होता कामा नये. त्याचबरोबर अनेकदा अनेक गोष्टी आपण फक्त दुसर्याकडे बघून क्षणिक आवडले म्हणून करतो. खासकरून वस्तू घेणे. ते चूक असते. हे आपल्याला नुकसान झाल्यावर कळते. काही नुकसान असे असतात ज्यांची भरपाई येनकेन प्रकारेण होऊच शकते. पण काही नुकसान अशी असतात जिथे खंत करणे, हुरहुर वाटत राहते यापलीकडे हातात काहीच नसते. सरस मी हे केवळ आत्मचिंतनाने येते. मग काय 12/24 तास ध्यान लावून बसायचे? तर नाही. काम करता करता आत्मचिंतन सुरू ठेवावे. कारण हाताला काम नसेल तर डोके आपले डोके वर करते. ते कुठे घेऊन जाईल सांगता येत नाही. जिथे जायचे नसते, तिथे पण ते नेते. दरवेळेला नाही. पण बरेचदा. मग काय लहान बाळासारखं नुसतं बसून राहायचे? तर बघा, आपण त्याच्याकडे का जास्त आकर्षित होतो? कारण ते निर्मळ आनंद देतं. मग आपली आतली स्थिती तशी करणं (आणि वरून व्यवसाय सांभाळणं, कठीण नक्की आहे, पण करायचे असेल तर) हे मला "**सरस मी"** कडे घेऊन जाते. हा वेडेपणा नसून अनेक वर्षांची मेहनत असते. ज्याला तपश्चर्या वगैरे शब्दांची थट्टा वाटत असेल, ते सोडून. १ गोष्ट नीट पूर्णपणे समजली हे समजायला पण खूप वेळ लागतो. आपल्याला आपण स्वतः समजतं नाही तर दुसरे काय समजणार? हा प्रवास सुरू असतांनाच काय फलित असेल माहिती नाही. पण तो खूपच आनंददायी आहे. सरस मी सशक्त मी असेल की दुर्बल ते माहीत नाही. पण तो जो आतला प्रकाश असतो तो जास्त guide करतो. याचा अर्थ दुसरा guide करतो तो हितचिंतक नसतो का? तर जरुर असतो. पण ते पण कळायला लागतं! दिसणारं डोकं तर असतं पण चालणारं डोकं? तर सरस मी हा प्रवास करण्यासाठी....हा प्रप्रंच.

Date:- ०८/०१/२६

कालांतराने

आयुष्याचा मोठा landscape ज्याने बघितला आहे, त्याच्या तोंडांत ही बाब फार येते. खूप काळ गेला. आता असे राहिले नाही. याचे कारण काय? माणसे जे काही करतात, प्रत्येक क्षणाला प्रत्येक जण काही तरी अनूभवत असतो. ही प्रत्येकाची अनूभवाची पातळी वेगळी असते. पण काही झाले तरी ते आपल्या परीने घडतच असते. मग होते काय? नवीन व्यवस्था आल्या म्हणजे त्यांचा अंगिकार करणं त्यांना सोपं असतं का? नसतं आणि मग सतत त्यांच्याकडून हे वाक्य येतं, आमच्या वेळी असे नव्हते. मग नवी पिढी याला प्रचंड कंटाळते. काय बुवा? यांचे करायचे तरी काय? कुठे तरी हळूच सोडून देऊ. कारण ते जास्त सोपे ना. सतत हे कर, असे नको करू वगैरे या बाबी असतात. आम्हाला एवढी कामे असतात, नाही वेळ असं ऐकायला. कालांतराने काय काय घडतं. संशोधन ही एक मजा, एक जबाबदारी, एक मदत. मला नेहमीच प्रश्न पडतो. या मदतीचा वापर कसा, कोणी, केव्हा, कशाकरता हे प्रश्न किती असतात. प्रश्न पडणाऱ्या व्यकतीला एक वेळ अशी येते की काहीच विचारायचे नाही, करायचे नाही, तर आपण पण हळूहळू याच व्यवस्थेचा भाग बनायचे. ही आपली संवेदनशीलता हळूहळू आपण इतरांच्या मदतीने घालवायची की टिकवायची? घालवणे किती सहज आणि सोपे आहे. चार तशी माणसे सोबत मिळाली की खूप छान. तसेच होणार. फरक काय पडतो? कित्येक माणसे अशी बनवणे किंवा बनले की खूप छान उद्दिष्टे आपल्यासमोर येतात. संवेदनशीलता जपणे काही कोणत्या बाजारात अजून तरी उपलब्ध नाही. आमचं दुकान नाही हो, असं म्हणत आपण दुकान लावतो. कोणी असं म्हटले की आपण अजून दुखावतो. तुमची जपली का हो संवेदनशीलता कोणी? कालांतराने सगळ्या गोष्टी बदलू शकतात. शोधूयात का बदलणाऱ्या गोष्टी? काय उपयोग या न बदलणाऱ्या गोष्टींचा? तुम्ही अनूभवातात, तेव्हा तुम्हाला कळते, सतत बदलती गोष्ट कोणासाठी उपकारक नसते. सरसकट एक व्यवस्था सर्वांसाठी लागू करणे आणि ती जमतं नसलेल्यांना नोकरी सोडावी लागणे, या बाबी घडतात. याऐवजी नवीन व्यवस्था येताना जून्या व्यवस्थेतील उत्तम बाबींचा आणि त्रुटींचा अभ्यास जितका महत्त्वाचा तितकेच माणसांना कमी करतांना त्यांनी इतके वर्ष कमावलेले कौशल्य कुठे कशासाठी वापरु शकतील यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. मग माणसांना कालाय तस्मै नमः म्हणावे लागणार नाही. प्रदीर्घ काळ काम एखाद्या ठिकाणी केल्यानंतर त्यांवर आधारित कोणता अभ्यासक्रम आपण निर्माण करु शकतो का याचा देखील विचार करावा.

Date :- ०९/०१/२६

फरक कुठे पडला?

एका निवासात किंवा एका ऑफिस मध्ये काम करतांना कंटाळा आणि थकवा यापलीकडे सुटी घेण्याची कारणे कधी कोणती सामाजिक कामे असतात, असे मला वाटते. निवास असो किंवा ऑफिस कोणत्या तरी जबाबदाऱ्या आपल्यावर असतात. म्हणजे तसा आपण विचार केला तर. अनेक ऑफिसमध्ये काम करतांना सुटी घेतली म्हणजे मला नेहमी प्रश्न पडला, हे काम त्याच पध्दतीने कोणं करते? जर शाळा आणि कॉलेज यांचे उदाहरण घेतले तर आपल्या तासाला दुसरा नेमके काय करतो ही चर्चा जबाबदारी सोपवण्यापूर्वी विचारात घेतली पाहिजे. कारण मुले खूप कंटाळतात. त्यांना येणे हा नियम आहे. त्यांची सुटी आणि शिक्षकांची सुटी कधीच coordinate नसते. त्यामुळे शिक्षक नसले तरी ते येत असतात. या बाबी नियोजित करणे खूप आवश्यक आहे. ही बाब इतर कार्यालयांसाठी देखील आहे. रोज कार्यालयात जाणे परवडणारे नाही, काही कामच नसते, ही भूमिका सर्व घेतात. अशा वेळी कोणाला काही काम असले तर तिथे संबंधित व्यक्ती नसतेच. हे कार्यसंस्कृतीला शोभत नाही. मूळात अशा ठिकाणी कार्यसंस्कृतीच नाही. ही टिका नसून एक चर्चात्मक लेख आहे. अनेक कामे आणि जबाबदाऱ्या घेऊन, पार पाडून दमलेली व्यक्ती सुटीची अपेक्षा करते. प्रत्येक कार्यालयात सुटीचे नियम प्रत्येक व्यक्तीच्या नेमणूकीनंतर त्यांच्या कार्यपद्धतीनुसार ठरणे की सरधोपट नियम लागू करणे हे लक्षात घेणे किती आवश्यक आहे. इतरांना सुटी का आणि मला का नाही, याचा माझ्याबद्दलचा एक इमेल, किंवा लेखी नोटीस उत्तम संस्कृती दर्शवते. काही workshops, seminars असतात, कोणी, का, किती, केव्हा, कुठे जावे याची आपापल्या विभागात चर्चासत्र होणे आवश्यक ठरते का? अशा चर्चांनी काय होईल याचे प्रात्यक्षिक करुन मग ठरवणे जास्त उचित नाही का? अनेक लोकांना संधीच दिली जात नाही. काही माणसे अनेक कार्यशाळांना उपस्थित असतात. ही विभाग प्रमुखांची जबाबदारी आहे. प्रत्येक ऑफिसच्या विभाग प्रमुखांनी नियमित आठवडा आणि काही दिवसांनी पाक्षिक मिटिंग घेणे आणि तिचा अहवाल असणे गरजेचे नाही का? मग ते कार्यालय शासकीय असेल किंवा खाजगी, ती तुमची कार्यसंस्कृती दर्शवते. जगणे lumsum आहे हो, भाजी, डाळ, तांदूळ पदरी पडले, जगणे सुरेख झाले! जीवनावश्यक गरजांसाठीच धावणारा समाज, कार्यसंस्कृतीसाठी झटू शकेल का? कारण या सवयी बालवयातच लागलेल्या असतात. लहान मुलांनी बालवयापासून जबाबदारी केवळ पैसे कमविणे किंवा लहान मुलांना सांभाळणे हेच शिकवले जाते. जबाबदारीचे प्रकार आहेत.

व्यक्तीगत जबाबदारी ते अनेक जबाबदाऱ्या. आपल्याला या बाबी अजून खूप शिकायच्या आहेत. अनेक रिकामी, मोकळी ऑफिसेस बघितली की मला प्रश्न पडतो इतकं जीवन यांत्रिक झाले आहे का? की नियोजन कसे करावे हे लक्षात येतं नाही? ही ऑफिसेस थाटण्यासाठी झालेला खर्च जर योग्य आहे असे वाटते तर मग ती ऑफिसेस रिकामी का असतात? एका वेळी अनेक प्रश्न निर्माण होतात. कारण प्रत्येकाला वाटते आमचे नियोजन योग्य आहे. कोणत्याही देशाच्या नियोजन आयोगाचा माझा अभ्यास नाही. पण आपला निवास हे एक छोटे नियोजन आयोगच असते. ते नीट चालत राहिले, तर कोणताही आयोग एक पेपर वरचे काम निश्चितच राहणार नाही. अनेक तास चर्चा करुन निर्माण केलेल्या योजना केवळ कागदावरच असतात. कारण त्या कार्यान्वित करायला काय अडचणी येतील याचा कोणताच अभ्यास नसतांना कधी वेगवेगळ्या पध्दतीने योजना कार्यान्वित असतात. जबाबदाऱ्या मोजण्याचे साधन अजून तरी आले नाही. अनेक ठिकाणी खूप चांगल्या कार्यपद्धती असून केवळ जबाबदार व्यक्तीचा अहंकार किंवा भावना दुखावल्या म्हणून बऱ्याच मिटिंगमध्ये उपस्थितच नसणे हा भाग जागोजागी दिसतो. काय होणार आहे हे माहितच आहे, इतकी परिस्थिती असते. यामुळे बरेचदा जे नवोदित लोक आहेत ते परस्पर कामे सुरू करतात, ज्याचा कुठेच कोणताच अहवाल नसतो. जबाबदार व्यक्ती कोणत्याही कारणास्तव उपस्थित नसली तरी त्यांना कोणताच अहवाल दिला जात नाही. ते वेगवेगळी कामे करत राहतात. जिथे संबंधित असतात तिथल्या अनेक बाबींची unauthetically, माहिती त्यांना असते. हे नव्या पिढीला शोभत नाही. कामाचे ठरलेले तास, ठरलेल्या/नियोजित सुट्या, रोजची ठरलेली/ न ठरलेली कामे, नियोजित ठिकाणी नियोजित वेळेत मिटिंग, त्याचे अहवाल, विभाग प्रमुखांना त्याचे सादरीकरण, अहवालावरील चर्चा, कार्यशाळांचे/ सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन (त्याची वारंवारिता, ठिकाणे, त्याचे अहवाल आपापल्या विभागात) ही झाली कोणत्याही क्षेत्राची कामकाजाची पद्धत. फरक नाही पडणार?

Date :- १०/०१/२६

प्रश्न

तास सुरू होता. वय लहान आहे की मोठे याची कोणतीच जाणीव नसल्यामुळे मी विद्यार्थी आणि समोरचे शिक्षक ही जाणीव होती. आता तिथे शिकवण होती, प्रश्न! मुलांना प्रश्न पडले पाहिजे असे शिक्षकांना वाटणे हे मास्तर आहेत, याची सुखद जाणीव देणारे. कारण मुळात मुलांना प्रश्न असतातच. असतो भाग हा की ते कुठे, कोणाजवळ, कसे, कशासाठी व्यक्त करायचे? आता या वाक्यातच किती प्रश्न

आहेत हे लक्षात येते, नाही? लहान मुलांचे प्रश्न दाबून टाकून सांगतो ते करा, हे आणि प्रश्नांना उत्तरे देऊन सांगतो ते करा, काय वाटते? लहान मुले ही देवाघरची फुले, म्हणतो आपण. पण, मुलांपेक्षाही फुलेच जास्त जपली जातात, नाही वाटत? गुलाबाची वाटली जाणारी फुलं, जपली पण जातात. पण गुलाबासारखी मुलं वाटण्याची पध्दत खूप अजब वाटेल. त्यांहूनही ते वाटलेली मुलं खरंच गुलाब आहेत, हे? तर प्रश्न. पडतात मुलांना, सर्वांना. गप बसरे किंवा गप बस हे तर उत्तर नव्हतेच. त्यांपेक्षा बघून सांगतो, नंतर बघू हे जास्त ठिक. तोपर्यंत तू तुझा अभ्यास चालू ठेव, करायचा असेल तर.... हे याहून उत्तम. थोडे शिक्षण क्षेत्रात काम केल्यानंतर कितीही टिंगल झाली, तरी विचारला प्रश्न तर येत असेल तर उत्तर देणं हे कर्तव्य हे शिकत मोठे झालेली संस्कृती. मुद्दाम शिक्षकांना प्रश्न विचारून त्यांनाच त्रास देणे आणि प्रत्यक्षात काही कामच न करणे हे काय? मुले वात्रट, टवाळ असणे हे मुले जीवंत असल्याचे लक्षण, आणि खूप आनंद. पण जिथे कोणते काम दिसते आणि ते करुया असे लक्षात येतं तिथे ही मर्यादा असते, या जाणीवा शिक्षण क्षेत्रात विकसित होणे हे महत्त्वाचे आहे की नाही हा मला पडलेला प्रश्न. आपले प्रश्न कितीतरी मुले आपल्यापर्यंत मर्यादित ठेवून जगतात की जगणं थांबवून जगतात, हे कुठे कोणाला माहिती आहे? एकात्मिक शिक्षण व्यवस्थेतील प्रमुख भाग म्हणजे एकच पुस्तक, जी देते संधी, प्रश्न, विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे, किंवा उत्तरे शोधण्यासाठी प्रवृत्त करणं आणि जगणं सुरू करणं- आनंदी आणि जबाबदार. पण त्यासाठी शिक्षण, पुस्तक, संधी, प्रश्न, उत्तर त्यासाठी प्रयत्न..... मोठा प्रवास आहे ना? तुम्ही करा, आम्ही जमलं तर गंमत बघू, गरज पडली तर लोटू किंवा ढकलू, त्यात पडलो तर ट्रिटमेंट करू, कशी जपली जाईल गुलाबाची फुलं? आणि वाटतं का प्रत्येकाला हे माझं गुलाबाचं फुल? कोणत्या अर्थाने? असतात काही जण ज्यांना फक्त प्रश्न असतात, असंख्य...त्या सर्वांसाठी प्रश्न सोडवायची असतात, सोडायचे नसतात.

Date :- ११/०१/२६

कारणे आणि तक्रारी

लहान वय म्हणजे एक tissue पेपर असते. काही झालं की आधी शोषते, मग विचारात पडते. ज्या प्रौढांनी लहानपण जिज्ञासेच्या स्वरुपात जपले असेल त्यांना हे मान्य असेल. अनेक गोष्टी ते बघतात, ऐकतात, मिळेल त्याची चव घेऊन बघतात, ज्याचा स्पर्श झाला तो अनुभव घेतात. त्यातून काय, का, केव्हा, कशासाठी, कोणासाठी, केव्हा, किती, कसे, असे अनेक प्रश्न मुलांना पडतात. एका वेळी एकाच विषयाचा अभ्यास करणारी आणि असे प्रश्न सतत विचारणारी मुले एका

वेळी अनेक गोष्टींचा अभ्यास करणाऱ्या मुलांपेक्षा स्वतःबद्दल खात्री बाळगू शकतात. विविध पदार्थ, कपडे, मित्र मैत्रिणी (आवडीचे) भेटले की काय नेमके घ्यावे हे लक्षात येतं नाही. कारण central processing unit थोडे थांबलेले असते, jam झालेले असते. ज्या मुला मुलींना एका वेळी अनेक विषय अभ्यासाला आवडतात, आणि ते ते करून बघतात, त्यांचा cpu खूपच jam असतो. आता जो jam झालेला cpu विशेष साधनांशिवाय मोकळा करत असतो, तो कारणे आणि तक्रारी आपल्या जवळ ठेवतो. यामुळे कामाच्या ठिकाणी दर्जा सुधारतो. शरीरावर effect होतो, पण दुसऱ्याला जाणून दुखावले नाही एवढे समजते. ते काही झाले की तात्पुरते का होईना दुसऱ्यावर भडकतात, आणि तक्रारी पण करतात. हे एका विषयाचा अभ्यास करणाऱ्याबाबत पण होतेच. म्हणून feedback system खूप चांगली आहे. शाळेत शिक्षकांना feedback देण्याची हिंमत कोणी करेल का? तर तेजस्वीना विधी तमस्तु, मा विदविषा वहे हे तत्व अंगिकारले त्या ठिकाणी होऊ शकते. मात्र याचा अर्थ असा होत नाही की मी तुमच्या पेक्षा सरस झाले म्हणजे आता मी महान. कोणत्या तज्ञाच्या सहवासाच्या उबेत आपण फुललो, हे विसरता कामा नये. लहान मुलांचे प्रश्न हे आपण कारणे आणि तक्रारी म्हणून घेता कामा नये. मला वडील नेहमी सांगायचे मुलं किती सरस असतात आपल्यापेक्षा. ते प्रतीकूल परिस्थितीतून शिकत होते. समजले नाही तरी पुस्तकांचे वाचन करत आणि समजले ते पटकन सांगून टाकत असत. माझ्या प्रत्येक प्रश्नाला त्यांनी कधी म्हटले नाही विचारू नको किंवा गप्प बैस. आपण शाळेत दंगा करणाऱ्या मुलांना class out of control जातो किंवा शिस्त लागावी म्हणून छड्या मारतो ओरडतो. तुम्ही लिहू नका नुसते, वर्ग चालवून दाखवा. असे कोणी म्हणेल. पण घरातले २ मुलं – मुलगा आणि मुलगी नजरेसमोर सतत बघतांना मला जाणवत राहते, मुलांना आधी जगायचं असतं मनसोक्त, जमलं तर शिकायचं असतं. किंबहुना शिकायचं नसतं. घरातून दमदाटी करून शाळेत, तिथून आफिस, मग व्यक्तीगत आयुष्य. इथे आपल्याच आयुष्यातून निर्माण झालेले concern आपण मुलांवर अक्षरशः लादतो. सुरक्षितता यातूनच निर्माण होते, असे आपल्याला सांगायचे असते. वाघ, सिंह नसणाऱ्या युगात सुरक्षाही बदलली. याचा अर्थ मुलांनी असुरक्षित, असंस्कृत जगावे असे नाही. पण आनंदी जबाबदार आयुष्यासाठी त्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत. जर प्रश्न पडले तर. नाही पडले तर सांगितले ते ऐकले हा खात्रीचा प्रवास आहेच. पण ही/ हा ऐकत नाही, ऐकत नाही असे कानीकपाळी ओरडू नका. आणि न ऐकणाऱ्या मुलांना आधी स्वतःची जबाबदारी घ्यायला लावा. तुम्हाला त्यांचे संगोपन परवडत नाही हे त्यांना स्पष्ट सांगा. ते स्वतःचे संगोपन करून घेतील. निदान काही तरी नवीन करतील. स्वतःचे संगोपन स्वतः करणाऱ्या मुलांना ओळखा,

त्यांच्याकडे विचित्र नजरेने बघू नका. असे नमूने किती असतील माहित नाही. पण समाजात उघड्या डोळ्यांनी जगणाऱ्यांनी मुलांना बिथरवू नका. आजही जेव्हा मला माझी मुलगी सांगते मला छडी मारली. तू का हा प्रश्न टिचरला विचारले का? कारण शिस्त लावणे हे शिक्षकांचे जसे काम आहे, तसे कोणता विद्यार्थी त्यासाठी किती वेळ आणि का घेतो याचे निरीक्षण आणि त्याला तसे विचारणे पुस्तकी अभ्यासाइतकेच महत्वाचे आहे. सामाजिक शिस्तीत प्रत्येकाला बसवून काही मिळवायचे असेल तर आधी विद्यार्थ्यांचे मन मिळवावे लागेल. अनेक शाळांमध्ये प्रचंड class work, home work असतो. जे करतील त्यांना स्वेच्छेने करू द्या. त्यांना अजून इतर जबाबदाऱ्या दया जर ते इच्छूक असतील तर. इतर मुलांना तर केवळ जगण्याची व्यवस्था हवी आहे. ती निर्माण करणं ही पण जबाबदारीच आहे. त्यांचा पण विकास त्यांच्याच गतीने होईलच. मुले मुली अनेक प्रश्न विचारतात. त्यांना ते सोडवता आले पाहिजे. खूप चांगले चित्र निर्माण होईल. कारण मी आशावादी आहे. शाळेत कधी तरी प्रशनोत्तरांचा तास ठेवावा. मुलांना सांगायचे पण असते, नुसतेच ऐकायचे नसते. ते कारणे आणि तक्रारींच्या पलिकडे जातील. कारण मला स्वतःला अनेक प्रश्न होते आणि प्रत्येकाला असतात. Cpu jam झाल्याने ते समजतं नाही. म्हणून आपण इतरांना कळत नकळत दुखावतो. अन्यथा ती मानवी प्रवृत्ती नाही. लहानपणापासून मला शिकून घ्यायला खूप आवडायचे. मला समजले जगण्याला वेग परिस्थितीने कितीही आणला, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी आतला आवाज समजला तर तुम्ही खूप आनंदी रहाल. थोडीशी प्रतिकूलता आपल्याला नकोशी वाटते. पण मला वाटते असलेल्या परिस्थितीतही आतला आवाज ज्याला ऐकता येतो तो स्वतः तर चांगली निर्मिती करतोच, पण आपोआपच बहुतांचा आधार होतो. त्या व्यक्तीचा दुस्वास करणं आपलीच हानी असते. लहान मुलांचे प्रश्न, कारणे, तक्रारी ऐकूया, त्यांना तसेच नाही बनवायचे. तर तिथून स्वतःच्या जबाबदारीचे पाऊले टाकायला सबल बनवायचे. नाहीतर आपण फक्त तसेच बनतो. एकतर दुसरयाची कारणे, तक्रारीच ऐकतो, किंवा सांगतो. ऐकतच राहणाऱ्या शिक्षकांचे, राजकीय लोकांचे वगैरे जगणे राहूनच जाते. तसे नको व्हायला. म्हणून शाळा व निवास या दोन्ही platform वर चांगले काम झाले तर जास्त छान असेल. लहान मुले प्रत्येक गोष्टीला पहिल्यांदा प्रश्न विचारतात का? मोठ्यांना उत्तर द्यायचे नसले तर ते सांगितले तेवढे करा असे सांगितले जाते. खरे तर मुलांना हे कधीच पटत नाही. मुलांच्या मानसिकतेचा बरा अभ्यास असलेले त्यांना समजणार तर नाही पण निदान काही वेळ पटेल असे काहीसे सांगतात. निदान तेवढा वेळची भूणभूण संपते. असे काही मुलांच्या बाबतीत घडते. पण काही मुले सत्यशोधक समाजाची असतात. त्यांचे आपले काम

सुरू असते. तक्रार करणे हा अनेक कां चे उत्तर मिळतं नाही मग सुरू होते. जीवनाचे सर्व ऋतू बरे पाहिलेल्यांचे होते असे की तक्रार कोणाची, कोणाकडे, कशासाठी, केव्हा करायची हे सगळंच संपून जातं. काही लहान मुलांना प्रचंड दबावाखाली आणून प्रचंड ज्ञान मिळविण्याचा आग्रह ठेवला जातो. मला प्रश्न पडतो का असे? ही मुलं तरुण वयात हेच लक्षात ठेवून असेच वागणार नाही का? ज्याने प्रचंड आनंदी वातावरणात ज्ञानाचे एक दोन क्षण मिळवले त्याला वाटते हे का? असे का? लहान मुलांचे का संपवणं हे त्यांना संपवणे असतंच. बरीच मुले यामुळे बोलणेच टाळतात, काही मुले काहीही बोलतात, किंवा कुठेही बोलतात. समाजात तक्रारी आणि तक्रार केंद्र जास्त, कावळ्याच्या छत्रीसारखे असणे म्हणजे समाज किती विकेंद्रित आणि सडलेला आहे. अजिबात कोणतीच तक्रारीला सोय नसणे म्हणजे समाजात किती केंद्रीकरण आहे आणि समाज किती गुपचूप जगतो आहे हे लक्षात येते. आणि या सगळ्याचे कारण जीवनाच्या संकल्पना, नसलेले ज्ञान/(मिळालेले/मिळवलेले), हाताला/डोक्याला नसलेले काम, संपलेला मानवी स्पर्श किती गोष्टी आहे. काहीच वाचता न येणारी माणसे शिदोरीत असलेले जसे असेल तसे अन्न प्रेमाने देतात हे रेल्वेच्या प्रवासात अनूभवतांना वाटते यांचे कोणती ही संस्कृती? पुन्हा भेट होईलच याची कोणतीच शाश्वती नसतांना ते जे दिसते त्यावरुन काही कृती करतात. त्यांना कोणतेच पद्म कधीच मिळत नाही. तर कृतज्ञता हरवत अन्न ओर बाडणाऱ्याची पण टोळी असेल का ही साशंकता मन कासाविस करते. खरी तक्रार निवारण केंद्र पूवी नाती असत. आजी माजी की कोणाची हे माहितही नसतांना ती प्रेमाने भरवते, हे कळायला बरेच ऋतू जातात. ज्याची नोकर ही संस्कृती आहे त्याला ही तक्रार निवारण केंद्र आकलनाच्या पलिकडे आहेत. संस्कृतीचे अनेक पैलू काहींनी फार सोयीस्करपणे केले आहे. पण रोजचे जीवन अत्यंत साधेपणाने जगणारी माणसे बरंच काही खरंकाम करणारी माणसे त्यांच्या प्रेमाच्या माणसांनी तरी विभूषीत असावी, त्यांच्या कळत/नकळत. बर्याच माणसांना तक्रार करणे ही सवयच जडते. कारण त्यांच्या तक्रारी पण सतत ऐकून घेतल्या जातात. अनेक बुध्दीमान माणसे इतरांना फसवत जगतात पण त्यांची तक्रार कुठेच नसते. समृध्द नाती ही सुंदर समाजाचे पहिले लक्षण आहे. विचार करुया तक्रारी आणि आपण.....

Date:- १२/०१/२६

कोणाबरोबर कसे वागलो?

बसमध्ये चढण्यासाठी प्रयत्न केला. अनेकांना समजते, नाही चढू शकत, पण आपण एक थोडा धक्का देतो, स्त्री की पुरुष? सुरुवातीला तसे काही नाही. आपण

सीट घेऊया. म.....ग कळतं, अरे! बाई होत्या. हं. थोडं थोडं धैर्य वाढत जातं. लहान मुले बघत असतात. O.....k, मग बरी दिसणारी मुलगी, तिला जाणून हळूच धक्का. (पाठवतात बाहेर कशाला, ३० वर्ष झाली, अजून उजवली नाही, ती का? तिचं बरंय की कसं? कोणाची? कोणत्या स्तरातली?) बसमध्ये लागतातच हो धक्के. रस्ते कसे हे? कोणीतरी चिमटा. बस चालली आहे. अजून चढण्याची गोष्ट पूर्ण झाली नाही. तुम्हालाच चढायचे का? आम्हाला नाही? मग कडेवरचं लेकरू, एक उपकाराची भावना. बसा ना, बसा, जागा नसतांना न उठता, शेजारी बसवून घ्यायचे. चढतांना काही झाले तरी, मूळीच रांग पकडायचीच नाही. आणि यावरचा उपाय ४ चाक्यांचे खप! नाही, माझे कोणत्याही कंपनीशी वैर नाही. मुद्दा हा की बस काढण्याचा उद्देश कधी समजला का? त्यांचा नीट वापर कोणाच्या हाती आहे? आणि बसमध्ये जाणारी ६०% माणसे नक्की शाळेत एकदा तरी गेली असतील. शाळेत नाही शिकलो? आपलं अपूर्ण जेवण असेल, तर आपण दुसऱ्यांच्या ताटाकडे बघतो. सतत सूचणारे विनोदाची दिशा तिचं असते. आणि नंतर तो मी / ती मी नव्हेच. याचा आपण अभ्यास करू. सीट पकडणारी व्यक्ती बाईच पकडते! हे सगळीकडे. अपवाद असेल तर काय माहित. अनेक ठिकाणे आहेत, जिथे प्रश्न पडतो, वारंवार काय चूकलं? मी श्रेष्ठ असावे ही भावना कुठल्या कुठे पोहचवते. सामाजिक प्रश्न कोणते, ते कसे निर्माण होतात, कोणी कसे, कशा पद्धतीने सोडवायचे, अभ्यास करावा लागतो. स्टंट करणे आणि पुढचा भाग मी सांगणार नाही, आपला आपण शोधायचा. .प्रेमाचा कधीच स्टंट नसतो. ज्याला जमते त्यावर आज नाही बोलणार. पण साधे जीवन जगताना लक्षात घेऊ स्वतःला स्वतःसाठी आधी ओळखतो. कोणाशी काय बोललो? काय वागलो? का? कसे? कुठे.... पश्चात्ताप ज्याला होतो, त्याचे होते काय? बदलेल्या परिस्थितीत मरणारं झाड मरेल किंवा जगेलही. परिस्थिती कोणती ते पाहू.

Date :- १३/०१/२६

आपली उपस्थिती प्रार्थनीय

एक आटपाट नगर होतं. त्या नगरात प्रेम, आदर, शांतता, सहकार्य याचबरोबर समजेल त्याला कानपिचक्या हा प्रकार नांदत होता. त्या नगरात एखाद्या कार्यक्रमात आपली उपस्थिती प्रार्थनीय असतं असे. कालाय तस्मै नमः. कलियुग आहे. असे म्हणत ही ब्याद इथे कशाला? हा प्रकार अस्तित्वात आला. अनेक शाळा, कॉलेजेस, कामकाजाच्या ठिकाणी एखादी नावाजलेली व्यक्ती येणार म्हणजे फार आगत स्वागताची तयारी असते. असते एकेकाची रितं. तो विषय इथे मांडायचा नाही. पण मजा अशी की या नावाजलेल्या व्यक्तीची कामकाजाची

पद्धत माहित नसली म्हणजे आपली उपस्थिती प्रार्थनीय ते अरे ही आफत इथे कशाला? असे बिरूद मागे लागते. याचे कारण त्या व्यक्तीचा सहवासाचा अभाव. माणसे एकतर बूजून जातात, नाहीतर सलगी करतात, खूप अंतर ठेवतात, यातलं काहीही केलं तरी बोलत राहतात. नियमित तास घेणारे सर, बाई इतक्या बोअर वाटतात की कधीतरी तर सुटी द्या असे मुलं म्हणतात. तासांची उपस्थिती बघितली तर absentee कमीच असते. All are marked असे सहज म्हटले जाते. (आता मुलं बाई / सर बघायला येतात, मजा घयायला येतात की शिकायला असा प्रश्न मनात यायला बाई/ सरांना पण डोकं किंवा हदय यापैकी काही असलं तर ठिक) मनात खूप असते, देऊ यांना सुटी आज. पण खुर्चीत बसल्यावर ते unsolved problems करतील का घरी/hostel ला असे चालू असते. काहीजण सांगत, या मुलांचे jobs fix आहेत, तुम्ही कशाला दिवसभर मेहनत करतात? परीक्षा पास होण्याआधीच job fix असणे म्हणजे बी पेरले म्हणजे फळे/उत्पादनाचा अमूक अमूक अंदाज निश्चित करण्याइतपत मुलांना logical बनवायचे का? हातात कागद पडेपर्यंत सुकलेले ओठ आठवतात – कोणत्या विषयात खाली बसलो असू का? जोर का झटका धीरे से लगा म्हटल्यासारखे होते दिवस. खरया परीक्षा आपल्याला सबल बनवतात. एखाद्यावर सूड उगवणे वगैरे मी कधी विचारच केला नाही. जर परीक्षाच नसेल तर? खरंच सांगते तुम्हाला वरवरचे आनंद मिळतील. उपस्थिती प्रार्थनीय ते नको यायला हवे होते इथे यांनी अशी बाब बरीच माणसे अनुभवतात. मिळालेल्या शाली, बुके, फुलांचे हार अजून काही gifts हे मिळत असतांनाच. का आले आज सर/बाई? अनेक ठिकाणी झालेली वाहवा आणि कामाच्या ठिकाणचे पडसाद विरोधी असले की वाटते, नेमकं कुठे चूकलं असेल? एखादं घर असतं जिथे कुटुंब प्रमुखाला किंवा स्त्रीला घराचं कुलुप बरोबर लागले आहे ना? वारवार पडताळण्यासाठी सवय असते. काही माणसे अशी घडून जातात की पैशासाठी जसा हात वारंवार खिशाकडे जातो तसे काही चूकलं असेल का? वारंवार मनात येतं. माणसे चूकीची असतात असे मला कधी वाटतंच नाही. कारण कोणत्या परिस्थितीने त्यांना घडवलं हे महत्त्वाचे असते. आपली उपस्थिती प्रार्थनीय ते बरी गेली ब्याद, हा अनूभव अनेकांचा असेल, काहींचा नसेलही.

Date :- १४/०१/२६

मकरसंक्रांत

तीळ गूळ वाटून नात्यातला स्नेह आणि बंध कायम ठेवायचा असं शिकवणारा सण, असे समजतच लहानाचे मोठे झाले. या दिवशी स्त्रिया एकमेकांना घरी बोलावतात, काही भेटवस्तू देतात. गप्पा गोष्टी करतात. एक नवीन ऊर्जा घेऊन परत आपले

काम सुरु करावे, अशा या काही परंपरा. घरात, ऑफिस मध्ये असणारे मतमतांतरे अशा कार्यक्रमातून कमी होऊन एक मोकळे आणि चांगले सांस्कृतिक वातावरण निर्माण होण्याचाच हा एक प्रयत्न आहे. मनाला सततच काही हवे असते. ती वस्तूंचं हवी असेल असे नाही. पण या हव्यासापोटी अनेक कर्तव्यांना कशी तिलांजली दिली जाते हे मी स्वतः वरुनच अनूभवत लिहिले आहे. स्त्री म्हणजे भावनांचे एक मोठे दालन. या भावनांना नीट वळण दिले तर ठिक, नाहीतर नदी जशी रौद्ररूप धारण करते तसे काहीसे घडते. स्वतःला सांभाळत कर्तव्यदक्ष राहणे ही जीवनातील फार मोठी कसोटी असते. तसे करतांना मीच कसे कर्तव्य पार पाडते ही बाब कधी अ़ंगचटीला येते कळत सुद्धा नाही. कर्तव्यदक्ष असूनही अशा भावनांचा मनाला स्पर्श सुध्दा होऊ न देणे म्हणजे कर्मयोगाचे थोडेसे पालन करतो, असे म्हणू शकतो. भारतीय संस्कृतीतला प्रत्येक सण माझा अत्यंत आवडीचा आहे. कारण त्या प्रत्येक सणाला विचार आणि भावनांचे कोंदण आहे. मकरसंक्रांत हा सण असाच. या दिवसापासून प्रत्येक स्त्रीने आपल्या भावनांना वळण लावायची पहिली शपथ घ्यावी. ती सुरुवात आणि प्रयत्न मी माझ्यापासून करणार आहे. वाण देणं हे काही संपत्तीचे प्रदर्शन नाही. वाण ही एक आठवण असते. एकमेकांकडे जाऊन भेटलो आणि नवे संकल्प केले तरी सण साजराच होतो. आज सरकार मायबापाच्या कृपेने सण साजरा करण्याची शक्ती सर्वांमध्ये आहेच. आपली संस्कृती टिकून आणि वृद्धिंगत करण्यासाठी जीवनशैली आणि कार्यसंस्कृतीला हातात हात घेऊन दिमाखदारपणे मिरवता आले तर आपण जिंकलो ही भावना असेल. भारतीय व्यक्तीला वावडे कशाचे नाहीच. तसा हा सण आनंदात साजरा व्हावा ही सदिच्छा.

Date :- १५/०१/२६

आत्मचिंतन

सतत एखाद्या विषयावर किंवा घडलेल्या गोष्टीवर सहसा चर्चा करण्याची सवय असते. यात बरेच मुद्दे असतात. कधी चूक समजावी असे वाटते, कधी ती कबूल करावी असे वाटते, कधी योग्य काय, अयोग्य काय हे मुलांना समजावे असे वाटते, कधी उगाच चर्चा चालतच राहते. बोलायला विषय उरला नाही की सुध्दा असे घडते हे लक्षातच येत नाही. इतके आपण सर्व बोलके असतो. मुलांनी अमूक एक करु नये अशी अपेक्षा बाळगता नेमकी त्याच प्रकारची चूक आपण स्वतःच करत असतो. आत्मचिंतनाला जागा लागत नाही. तर इच्छा लागते. मनाची खोड आणि सवय अशी असते की मला माझे त्या क्षणाला सर्व सांगून टाकते. आत्मचिंतनाने आपण खूप बदलतो. रोज नव्याने स्वतःला स्वतःची ओळख होत जाणे हा प्रकार

बालवयापासून मी अनूभवते. इतर मला हसतात, काही समजते, काही समजत नाही हे समजते. आणि हा प्रवास सुरु असतांना आपली वाट कोणती हे वाटसरुला कळलेच नाही तर भलत्याच गाडीत बसून भलत्याच वाटेने जाण्याची शक्यता जास्त असते नाही का? प्रवासाला निघालेले प्रवासी एकमेकांना चला चला म्हणून ढकला ढकल करत बसमध्ये बसतातच. कोणाला स्वतःला जायचे असते, कोणाला कोणी मार्ग दाखवलेला असतो. तसा हा आत्मचिंतनाचा प्रकार.

दुसऱ्याला वाटते आहे तसे आहे. कारण आपल्या सारखा दुसरा झाला तर बरे वाटते ही आपली सामाजिक जाणीव आणि इच्छा. पण प्रत्येकाची गाडी निघाली कुठून किंवा कोण कोणते स्टेशन घेतले हे काही समजत नाही. आत्मचिंतनासारखे सुखद आणि फुकट गाईड कोणत्याच बाजारात मिळत नाही. ते असते फुकट, पण पूर्ण किंमत वसूल करते.

Date:- १६/०१/२६

मूले कशी घडतात?

चांगल्या सवयी म्हणजे चांगले का? तर हो ती मुले घडण्याची पहिली पायरी आहे. पण आपली एक चांगली सवय दुसरीकडे चांगली नसते. मुले नाराज व संभ्रमित होतात. म्हणून मुलांना स्वतःपूरती थोडा तरी विचार करता आला पाहिजे. ज्या मुलांना सतत संरक्षण मिळते, त्यांच्या चूका त्यांना लक्षात आणून देत नाही, तर दुर्लक्ष करतात, ती मुले बरोबरीच्या मुला मुलींबरोबर दिदागीरीने वागतात. इतर मुले दबत जातात. असेच स्वभाव घडत जातात. अत्यंत दबावाखालील मुले एकतर बंडखोर, छोट्या छोट्या गोष्टींनी व्यथीत होणारे किंवा हवे ते मिळवण्यासाठी जो बाजू घेतो त्याला ती हवी ती गोष्ट मागणे यातून स्वभावाचे पैलू घडतात. सतत रडून रडून गोष्टी मिळवतात. ज्यांना लहानपणी खूप काम करावे लागेले आहे मोठेपणी त्यांना इतरांकडून काम करवून घ्यावे असेच वाटते. तसे घडले नाही की ते सतत न समजेल असे पण इतरांना दुःख होईल असे बोलतात. म्हणून लहान मुलांना घडवणे अजिबात सोपे नसते. ज्या मुलांना सतत आयते मिळते, त्यांना कोणतीच गोष्ट स्वतः करायची नसते. मुलगे असतील तर अशांचे अंथरूण पांघरूण ते उठले की तसेच असते, गादीवरच काही खाल्ले तर तसेच पडलेले असते, कोणतीच गोष्ट स्वतः करू शकत नाही, एक काम सांगितले तरी चिडचिड करतात, जे बोलायचे ते न बोलता दुसरेच बोलतात, कोणाजवळ काहीही बोलतात (मुली सुद्धा) दुसर्याची शाळेतील प्रगती आवडतं नाही. किंवा शाळेतही इतरांनी अभ्यास करून द्यावा असे त्यांना वाटते. मुलगे बहिणीला सतत डिवचतात,

(सगळे नाही) मुली असतील अशा तर त्या पण सगळं घर घाण ठेवतात, स्वयंपाक त्यांना जमत नाही, करुच दिला नाही किंवा केलाच नाही, कपडे आवरून ठेवत नाही, लहान भावंडांना नीट सांभाळत नाही, मोठ्यांना उलटे बोलतात, घराबाहेर आधार शोधतात, अभ्यास केला तर केला नाही तर लग्न होणारच आहे, बघेल तो मुलगा, असे विचार बनतात. आता खूप बदलले आहे. आता असे काही नाही. असे म्हणतील अनेक जण. पण अजूनही व्यवसायिकता आलेली नाही. व्यवसायिकता आणि माणूसकी हातात हात घातलेली पिढी दिसायची असेल, तर कोणा एका शाळेने किंवा घराने खपून नाही चालणार. सर्वांना खपावे लागेल. मुलाला, मुलीला किमान कौशल्य येऊन पुन्हा माणूसकी, मोठ्यांशी चांगले वर्तन, व्यवसायाभिमुख बनवावे लागते. नाहीतर अशी गाडाभर उदा. आहे ज्यांना येते खूप पण १ रु. कमवता येत नाही. आणि काहींना येत जात काही नाही पण मालक असतात. हा विरोधाभास मुले बघत जगतात. आणि त्यांचे माणूसपण हरवत जाते. याचा अर्थ राजघराण्यातील लोकांनी भिकेला लागावे असे नाही. पण मला वाटते मग त्यांच्यावर सामाजिक जबाबदारी अधिक आहे. इतरांना सोबत घेऊन व्यवसाय वाढवणे (लोकसंख्ये इतकेच) महत्वाचे आहे. (राजघराणे हा विषय वेगळा आहे. मला वाचूनच माहित आहे. फारशी मला त्याची जाणीव नाही.)पण नुसतेच व्यवसाय वाढले, त्यातल्या कमिशनवर घरे चालली आणि हातांना काम नसले की पिढी कशी बिघडते ते पिढी बिघडल्याने नको समजायला. म्हणून ज्याने शाळा, कालेज केले किंवा ज्याने प्रत्यक्ष अनुभवातले ज्ञान मिळवले त्याने ते शाळा, कॉलेजात प्रदान करणे, त्यांना शाळा कॉलेजांनी तसे नियमित तत्वावर बोलवून घेणे, पिढी घडवण्याचे काम आहे. मुले समाजात काय शिकतील सांगता येत नाही. एकेक कौशल्य व्यवसायाभिमुख बनणे व आंतर वर्तुळात त्यांचे आदान प्रदान असणे हे झाले पिढी घडवणे. नाहीतर मूल बिघडायला, बिथरायला किंवा सांगितली तेवढीच कामे करणे एवढेच घडेल. पुढच्या पिढीसाठी काही करण्यासाठी आपल्याला काही करावे लागेल की नाही? आयते महाल नाही. त्यांचे आनंदी, जबाबदार मन. तेच महाल,industry, शेती काही पण बनवतील. मोठी माणसे त्यांच्या सोबत, नुसती सोबत असतील तर ते कधीच बिघडणार नाही. मी सांगेन तेच खरं हे नाही आवडत काहींना. अशी मुले वेळीच ओळखून त्यांना दिशा देणे कामच आहे. कारण अशा मुलांना मुलींना सामाजिक पाठिंबा नसतो. घराचाच नाही तर समाज फार दूर बाब आहे. बरेच पालक म्हणतात रोज गिळायला लागतं, ते देत होतो ना, कुठे कमी पडलो आम्ही? इतकी लोकसंख्या आहे, किती चांगले समाजचित्र पाहिजे. का नाही. मुलांचे मनच कुठेतरी वेगळी कडे असते. आपल्याला त्याला कुठेतरी कोंबायचे असते. हे काही मुलांना अडकवायचे काम

नाही. २ मुलांची जबाबदारी पालक शिक्षकांनी मिळून घेतली तर जीवन घडेल. फार काही नाही करावं लागतं. आपली dury व्यवस्थित करावी लागते एवढेच. तास घेणे, मुलांशी, मुलींशी व्यवस्थित पण रोज बोलणे, समाजातील नवं नव्या क्षेत्रांचा अभ्यास असणे, त्याचबरोबर जूने ओझे पण सोबत असणे, मुलांचा कल ओळखून योग्य वेळी योग्य सल्ला, मागदर्शन, इतकेच. मग मुलगे, मुलगी स्वावलंबी, जबाबदार, मुल्याधिष्टीत पिढी घडणार नाही का? मला विश्वास आहे घडेल. प्रत्येक शाळेचे मुलांच्या क्षेत्राचे कॅलेंडर तयार हवे. त्यांनी ते न करणे हा त्यांचा भाग आहे. पण त्यांना काही न देणे हा शाळेचा भाग नाही. आणि यात कोणताच प्रांतवाद वगैरै नको. आपले झाले पुरे, ही भावना नको. शिस्त लावावी लागणार नाही, लागलेली असेल. शिक्षक थोडेतरी आपल्या व्यवसायात थोडी मोकळीक पण अनुभवतील. फक्त मानसन्मान बघून व्यवसाय निवडले जाणार नाही. मुले अशी घडतील. मुलांना सतत आवरावे लागणार नाही. इतका प्रचंड आत्मविश्वास आपल्याला हवा. मुलांना पण. लहान लहान मुले कोणाच्या हाती सोपवितो कधी करतो विचार? अस्तित्व जपण्याइतकेच मूल घडवणे महत्वपूर्ण आहे. ज्या मुलांची आई कोणती duty करत असेल तर तिने लहान मूलांना सोडण्यापूर्वी १०० वेळा विचार करावा. याचा अर्थ घरी बसा असे नाही. प्रशिक्षण सर्वांनाच हवे. कोण आपल्या लहान मुलाला काय शिकवते, मनात कोणता विचार देते याची खात्री पटल्यावरच मुलांना तिथे सोडा. बरीच मुले इकडे तिकडे बागडत असतात, उनाड वासरासारखी. लक्ष असावे अशा मुलांकडे. मुलांबरोबर रोज अभ्यासाला जरुर बसवावे ४थी पर्यंत. नंतर त्यांचा weekly review घ्यावा. रोज त्यांना धारेवर धरण्याचे काम नाही.

Date:- १७/०१/२६

आपल्या प्रेमात

Prestige चं cooker असतं एवढंच माहीत होतं. त्यापलीकडे prestige नावाची गोष्ट माहितीच नव्हती. लहानपणापासून थोडे लेखन करते. कुठे आले छापून, तर फार आनंद व्हायचा. पण इतरांचे वाचले की वाटायचे, अरे! आपले तर फारच सुमार दर्जाचे लेखन आहे. घरातील माणसे, आजूबाजूची माणसे यांनी कौतुक केले की आपण सन्मानाच्या प्रेमात पडत जातो, अगदी आपल्याही नकळत. आपण काम करतच असतो. पण एक दिवस आयुष्यात येतो किंवा कोणीतरी आणतो ज्या दिवशी ही जाणीव होते, की आपली कामावरची निष्ठा, एकाग्रता, आवड पूर्ण कमी होऊन, त्या कामामुळे मिळालेल्या फायद्यांमध्ये सर्व चित्त, मन, बुध्दी गुंतून गेली आहे. आणि ही जाणीव फार उशिरा होते. तोपर्यंत खूप सुमार दर्जाची कामे किंवा

काहीच काम न करणे इथवर प्रवास आलेला असतो. ज्या दिवसापासून कामावरचे प्रेम संपते, त्या दिवसापासून ते काम तसे थांबलेलेच असते. कधी विचार केलाय, कामावरचे प्रेम या गोष्टीचा? ते असते आपल्या प्रेमात असणे. अनेकदा केलेले एकाच विषयावरचे लिखाण कधीतरी आपण स्वतः मान्य करणे इथपर्यंत हा प्रवास येतो. हे प्रत्येक क्षेत्रासाठी लागू आहे. आपण आपल्याच प्रेमात असणे हे कोणत्याही विषयांबद्दल असूच शकते. अगदी नात्यात देखील. बरेचदा आपल्याला कळतात अनेक पैलू. कामाविषयी प्रेम असणाऱ्या व्यक्तींना workoholic category त टाकले की सगळे संपते. पण तसे नसते. कामाविषयी passion का आणि कशी वाढते हा पण एक अनूभवाचाच भाग आहे. पण आपल्या कामाच्या प्रेमात असण्याला पण पैलू आहेत. सुरुवातीला कोणतीच टिका सहन न करु शकणारे आपण केवळ टिकाकारांच्या सोबत राहू शकतो. हा डोंगर चढणं म्हणजे एव्हरेस्टचा प्रवास असतो, त्याहून वेगळा. कदाचित एव्हरेस्ट चढतांना कोणी चूकून सोबत मिळतही असेल, पण कामावरील प्रेम आणि सोबत. असो. तुम्ही होणार join अशा प्रकारांना? आपल्या प्रेमात.....

Date :-१८/०१/२६

चघळण्याच्या गोष्टी

मानवी समाजात मुला मुलींची मैत्री, प्रेम, नात्यातले तणाव, कामाच्या ठिकाणांतील कधीच किंवा वर्षोनुवर्षे न सुटणारे प्रश्न किंवा सोडवायचेच नाही असे प्रश्न ही जंत्री इतकी मोठी होईल.... पृथ्वीवरच्या सुईच्या टोकावर मावणार नाही एवढा सुध्दा भाग असा नसेल, जिथे चर्चा होऊन प्रश्न त्वरित तडीस जात असतील. वर्षोनुवर्षे एकाच विषयावर चर्चा करुन कसे काय बरे वाटत असेल असे अनेक प्रश्न मला पडतात. कारणे जर नीट शोधले तर आपल्याला करण्यासारखे अनेक विषय असतात. ही जाणीव निर्माण होणे हा शिक्षणाचाच एक भाग. जे विषय चर्चेत असायला हवेत ते कुठेतरी कोपऱ्यात बसलेले असतात. नाटक हा जो प्रकार मराठी संस्कृतीत आहे तो फारच छान प्रकार आहे. पडदा उघडण्यापूर्वी नांदी होते. ती पण इतकी सुरेख आहे. मग नाटकाला सुरूवात होते. कोणत्याही महत्वपूर्ण विषयाच्या बाबतीत असे घडून निदान जीवनाचे नाटक चालवले गेले तर पिढ्या बर्या घडण्याची शक्यता जास्त आहे. नाहीतरी मोठ्यांना नेहमीच वाटते, बाळे चांगली आहेत. बाळे चांगलीच असतात, पण मडके घडवता घडवता फुटते एखादे मडके, जाते ते वाया..... तसं माणसाच्या बाळांचं घडलं तर.....ज्याचं मडकं फुटतं त्यालाच दुःख होतं नाही का? पण तोपर्यंत जे चघळायचे ते चघळलेच जाते. ती एक चूकीची सवय आहे असे वाटते? जर तसे वाटत असेल तर अशी

चूकीची सवय लागलेली असेल तर एकेक दिवसाने चंद्राची कला कमी होत जाते तशी सवय कमी होईल? दिवस बरे या प्रकारानेच जातात असे काही नाही. ज्यांना शांततेत आयुष्य जगणे म्हणजे काय ते समजले त्यांला चघळण्याचे विषय आणि चर्चेचे विषय यातला फरक समजायला लागेल. चला असे दोन्ही प्रकारचे विषय शोधून काढा.

Date :- १९/०१/२६

Beauty parlour आणि शिवणकाम

या दोन्ही बाबी आवश्यक सेवांमध्ये येतात, असे मला वाटते. अनेक महिला शिवणकाम करतात. थोडे जूजबी काम करता आले की आपण तज्ञ आहोत असे वाटते. जी पार्लर छान चालतात किंवा जिथे शिवण केंद्र उत्तम चालते, तिथे काही दिवस इतर महिलांनी त्यांच्या देखरेखीखालीच काम करावे. हे व्यवसायिक तत्वावर करावे. काही महिन्यांच्या अंतराने, आणि त्याचा छोटा मोबदला देखरेखीखाली काम केले म्हणून द्यावा. तसेच काही वेळा खूप काम येते. अशा वेळी वेळेत ते पूर्ण होत नाही. म्हणून २ समव्यवसायिकांनी एकत्र काम करुन कामाचे पैसे विभागून घेणे पण काम वेळेत करणे ही आपली कार्यसंस्कृती दर्शवते. हे पार्लर व शिवण केंद्र दोघांना लागू आहे. ठिकठिकाणी असलेले beauty parlour आणि शिवणकाम दुकाने यांची गाव पातळी किंवा विशिष्ट क्षेत्रानूरुप संघटना असणे हितावह आहे. जर जागेची उपलब्धता झाली तर या संघटनेचे आपले कार्यालय असावे. या कार्यालयाची आपली कार्यकारणी असावी. सुरुवातीला विशिष्ट कार्यालय नसेल. कारण जागेचा अभाव. पण जे पार्लर/शिवण केंद्र खूप छान चालते, तिथे ऐच्छिक तत्वावर एक दिवस सभा घेणे आवश्यक आहे. आपल्या अडचणी, आव्हाने, नवीन प्रोडक्टस, नवे डिझाईन अशा अनेक बाबींवर चर्चा घडावी. आदानप्रदान व्हावे. कोणताही व्यवसाय खूप चालतो किंवा बंद पडतो. हे घडू नये म्हणून याची कारणे आणि उपाययोजना कराव्यात. अनेक वर्ष हे काम केलेल्या व्यक्तीची पुढील पिढी हे काम करायला तयार नसते. अशा वेळी संघटनेमार्फत आपले काम नवोदित व्यक्तीला शिकवावे. आपला set up देखील कोणाला देता येतो. पार्लरचे थोडे शिक्षण घेतले, सर्टिफिकेट मिळाले की लगेच आपले काम करायला हुरूप येतो. पण सर्टिफिकेट मिळाल्यानंतर एखाद्या नावाजलेल्या स्त्रीच्या हाताखाली काम करणे किती आवश्यक असते, याची जाणीव तुम्हाला आहे का? निदान वर्षभर त्यांच्याकडे काम करायला हवे. मग तुमच्या लक्षात येईल आपले चूकते कुठे? अनेकांना कसे तरी काम करुन देणे हे योग्य नाही.

Date :- २०/०१/२६

आत्मसाक्षात्काराचे क्षण

लहानपणापासून काही तरी वाचत असे. घरात पहिल्यांदा उंदिर बघितला. रात्रभर कुतूर कूतूर आवाज येत होता. मग अधून मधून उंदिर आणि असे आवाज येतच गेले. लक्षात आले हा यांच्या जगण्याचा एक भाग आहे. आपण पण उंदिर जातीतलेच आहोत. अभ्यास आणि वाचनाला इतके असते की किती वेळ झाला कुरडतो आहे, स्वतःच्याच लक्षात येत नाही. हाच प्रकार विशूध्द प्रेमाचा आहे. जेव्हा कोणावर प्रेम करतो, कोणाची काळजी घेतो आणि कधी करतो, तर लक्षात येते, शारिरीक आकर्षणाच्या वरची ती पायरी आहे. तीळ आणि गूळ स्नेहाचे प्रतीक आहे. प्रेम हे आपल्याही नकळत वाटली जाणारी बाब आहे. चढ उताराचे अनूभव घेतले की वाटते, मनाला सुखद वाटणारी गोष्ट म्हणजे मला कोणी समजत, त्याही आधी मला माझ्याबद्दल समजायला लागतं. यालाच तर सर्वांनी आत्मसाक्षात्कार असे म्हटले आहे. प्रेमाचे नाटक, सोयीनूसार प्रेम असे कधीच नसते. समुद्राची भरती ओहटी आणि प्रचंड वेगाने येणाऱ्या लाटा बघितल्या की वाटते प्रेम आणि राग हा असाच असतो. दोघांनाही भरती आणि ओहटी असतेच. फरक हा आहे की माणसाला प्रेम व्यक्त करायला कोणी हवं असतं आणि रागवायला पण! निसर्ग असा नाही. कसं असतं त्याचं रुप. पोटात दडलेलंच नसतं काही. लहान मूल तसंच असतं. त्यांच्या स्वस्वरुपापासून आपण त्याला दूर नेत असतो. शिक्षणाचे हे उद्दिष्टच नाही. चिरंतन कालापासून सतत सांगत असलेली बाब म्हणजे स्व – ओळख. स्वतःशी प्रामाणिक असल्यापासूनचा हा प्रवास इतरांशी पण प्रामाणिक असण्यापर्यंत येऊन पोहचतो. अनेक असे क्षण असतात, जिथे आपल्याला प्रश्न पडतो, असे का घडले? असे का वागलो? कोणी असे का वागले? बोलले? अनूभवी असणे हे संपन्नतेचे लक्षण आहे. पण अनूभव कशासाठी वापरला जातो हे नीत्तीमत्तेचे लक्षण आहे. आपण स्वतःला जागी ठेवले तर लक्षात येते अशा अनेक वेळा असतात/ येतात, जिथे निसर्ग दार ठोठावत असतो. जागे करत असतो. पण जीवनातील अनेक प्रलोभने आपल्याला आत्मसाक्षात्काराच्या क्षणापासून दूर लोटत असतात. आपण ठरवायचे, शिकवायला आलेल्या प्रसंगांकडून शिकायचे की तसेच जगत राहायचे.

Date ;- २१/०१/२६

आलेख ते सारीपाट

कोणत्या तरी वर्गात असतांनाच आलेख शिकतो आपण, गणित विषयात. हा आलेखच जीवनात महत्त्वाचा ठरतो. लहानपणी भावंडांसोबत वाढतांना किंवा पालकांबरोबर वाढतांना आलेख गोष्ट समजतच असते. नातं हे linear regression आहे की multiple regression यापेक्षा मजेदार गोष्ट म्हणजे आलेख. आपापला जीवनाचा प्रवास सुरु आहे, गाडीत बसलो आहे. तरी सरळ मार्गापेक्षा कुठेतरी डोकावणे आपल्याला आवडतेच. मग होते काय? सिम्बायोसिसच्या नियमानुसार आपले बरे चालले आहे म्हणून आनंद होतो, दुसऱ्याचे काय चालले आहे? नीट नसेल तर उपदेशाचा मारा सुरु होतो, प्रसंगी वाईटही वाटते. एक दिवस भावंडं किंवा बरोबरीच्याची प्रगती ऐकली की मटकन खाली बसतो. असा हा आलेखाचा प्रवास असतो. एक दिवस होते काय? तर शहाणी व्यक्ती समजायला लागते, आपला अभ्यास किती तरी कमी असतांना आपलं दुसरीकडे डोकावणं आणि इतरांचे आलेख बघणं काही बंद होतं नाही. लहान वयात हे खूप होतं. मोठं झाल्यावर नुसतं वय वाढून भागत नाही. लहान मुलांमुळे आपोआपच डोक्याला वाढवावं लागतं. इथेही आलेख चूकत नाही. मुलगा असो की मुलगी हे जीवनाचं ज्याचं म्हणून तत्व आहे, त्यालाही तुझं याच्यावर किंवा याच्यावरच प्रेम हा आलेख कधी पूर्ण होतंच नाही. इथे regression कोणतेच नसले तरी नुसते correlation असते, असे नाही, तर स्वतःचं वाढलेलं वय स्वतः शांतपणे बघत सगळीकडे सामावण्याचा आलेख असतो. किती तरी विषयांचे बार चार्ट असतात. पण मानवी आयुष्यात किती जणांना दुखावले किंवा किती जणांना सुखी ठेवले याच्या पुढे आलेख काही जात नाही. जीवनाला प्रचंड वेग आला आहे असे म्हणतात, मानतात. पण डोकं वाढलं की कळतं, जीवन खळखळणार्या झर्यासारखे आहे. वेग फक्त मनाला आहे. तो प्रचंड प्रवाह शांत चित्ताने पाहण्याची शक्ती मिळवणे हा जीवनाचा वेगळाच आलेख असतो. आई, आई म्हणणारं, स्वतःला बिलगणारं मूल, तिच्यासाठी झुरणारं मूल कधी तोऱ्यात बार गाठतं, कधी मित्र मैत्रिणींसाठी, कधी बायकोसाठी वाद घालतं, किंवा सरळ बोलणंच टाळतं, स्वतला जरा संसाराची समज आली की आईचा संसार कुठे आणि कसा चूकला किंवा चूकतो यात मुलीला धन्यता वाटते....हे आलेख मागची पिढी बघतच असते. X आणि Y coordinate वर भरभर रेषा ओढता आल्या म्हणजे आलेख काढला, जमला म्हणता येतंच. पण जीवनाचा आलेख सारीपाटावर कधी आला किंवा येतो हे कुठे लक्षात येतं? हेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते आहे. कधी त्यांचे काम पडते किंवा पडेल हे लक्षात येते, कधी तसे काहीच लक्षात नसते, कधी खूप आदर असतो, पण तो दिसलेलाच नसतो, कधी आदरच नसतो, एखाद्या शिक्षकाला एखादा विद्यार्थी समजतच नाही, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षकच समजत नाही. हे घडतच असतं. हे शिक्षक

विद्यार्थ्यांतले आलेख असतात. खरं असते ते छान नाते. आलेख निर्माण झाले की माणसांना वाटते आता नाती घडणारच नाहीत. पण असे नसते. या आलेखांमधून जात असतांनाच प्रेम, काळजी जाणवतच असते. मनाच्या कागदावर आलेले सर्व आलेख बघायला शिकू. त्यातून खूप समजेल, स्वतःबद्दल आणि इतरांबद्दलही.

Date – २२/०१/२६

प्रसारमाध्यमे आणि आपण

ज्या दिवशी Facebook हा प्रकार समजला त्या दिवशी फारच आनंद वाटला. सर्वसामान्य पध्दतीने मी लगेच स्वतःचे खाते उघडले. हळूहळू Instagram, Whats app कळत गेलं. प्रसारमाध्यमे ही एक शक्ती आहे. आपण योग्य अन्न खाल्ले, योग्य व्यक्तींच्या सहवासात राहिलो, योग्य पुस्तकांचे वाचन केले, तत्सम अनेक योग्य गोष्टी केल्या तर आपल्यामध्ये शक्ती निर्माण होते. तिचा योग्य वापर केला तर जीवनात आनंद, सुख निर्माण होते. जर अयोग्य वापर केला तर दुःख निर्माण होते. हाच प्रकार प्रसार माध्यमांचा आहे. आपल्याला स्वतःबद्दल समजतं नाही. आपल्यात असलेल्या, निर्माण होणाऱ्या शक्तीचा वापर कसा करावा हे सर्वांनाच समजत नाही. तिथे आपण सहज उपलब्ध झालेल्या प्रसारमाध्यमांचा उपयोग करतो. तुम्ही रोज facebook, instagram, you tube twitter याचा अभ्यास करा. यातली माहिती authentic असण्यापेक्षा इतरांच्या भावनांना हात घालणारी जास्त असते. यातून किती मोठ्या प्रमाणात भावनिक शक्तीचा अपव्यय होतो, याचा कोणी कधी विचार करणार? प्रेम, काळजी, आपलेपणा यात प्रचंड ताकद आहे. कोणाविषयीची कोणतीही माहिती अशा प्रकारे सतत प्रसारमाध्यमांवर टाकणे हा याचा गैरवापर आहे. प्रत्येकाने या माध्यमांचा प्रामाणिक वापर आणि बुध्दीचा वापर करुन केला तर मला वाटते ही बाब समाजासाठी एक ताकद असेल. सतत काही तरी करावेसे वाटणे हे मोठ्या व्यक्तींमधे पण असलेले एक मूल असते. पण या वाटण्याला दिशा देणं किती महत्त्वाचे आहे. समाजातील लहान मुले, तरूण मुले ही एक पिढी आहे. ती समाजाची ताकद आहे. आपल्याला तिला घडवायचे आहे की त्यांच्या शक्तीचा दर क्षणाला होणारा अपव्यय बघायचा आहे? तुम्ही फार गंभीर आहे आणि प्रत्येक गोष्टीला त्या वळणाकडे नेतात, असा काहींवर आरोप होतो. पण वय वर्ष ३५ आणि त्या पुढील प्रत्येकाने रोज प्रसार माध्यमांचा अभ्यास सुरु करावा. वेळ नीट जावा म्हणून लावलेले पेपर, टि.व्ही, facebook इ. चाळतांना कुतूहल, त्यातली सत्यासत्यता तपासणे आणि नंतर all is blunder, म्हणत पुन्हा तेच routine चालू ठेवणे यात निसर्गाने (ईश्वराने) दिलेली शक्ती क्षणाक्षणाला आपल्या कर्माने कमी करणे नाही तर काय आहे? झालेले संशोधन

आणि त्याचे उपयोजन जगासमोर येणे, ही बुध्दीवंतांची गरज असते. कधी कधी ती त्यांच्या जगण्याच्या गरजेतून निर्माण झालेली बाब असूही शकते. (हा लेख लिहिणे ही माझी अस्तित्वाची /आविष्कृत होण्याची गरज आहे) पण तिचा वापर सर्वांना कळणार आहे का? या सवयी सर्वांना लागण्यापूर्वी आपण सर्वांना यांचे प्रशिक्षण स्वानूभवातून देणार आहे का? की रोगग्रस्त समाज हीच कोणाच्या जगण्याची गरज आहे? काही व्यवसाय नोबेल प्रोफेशन म्हणून मान्य असतांनाच ते चहा साखरेच्या/ रेशनच्या व्यवसायासारखे रोजच्या गरजेचे होणे हे मला विचारात पाडते. कारण माणूस म्हणजे ज्याला कमी किंवा अधिक प्रमाणात विचार करण्याची क्षमता असलेला प्राणी हे जरी आपण मान्य केले तर मग विचार जातो कुठे? आपला समाज (हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख वगैरे, भारतीय, रशियन, पर्शियन, चीनी, जपानी मला कोणालाच वगळायचे नाही) कुठे पोहचवायचा आहे आपल्याला? जिथे खरच गंभीर होऊन पावले उचलण्याची गरज आहे तिथे ज्यांना या गोष्टीतले गांभीर्य समजते त्यांनी पण जाऊ द्या कोणी काही ऐकत नाही, या बाबी चालूच राहणार, संपायच्या नाही असे म्हणणे हा बुध्दीचा पराभव असून मानवी उत्क्रांतवाद नाहीसा करत प्राणीवाद जोपासला जाणार नाही? आपण स्वतःसाठी आपल्या सर्व येणाऱ्या आणि असणाऱ्या पिढीसाठी माणूस म्हणून अत्यंत आनंदाने आणि सन्मानाने जगण्यासाठी सजग राहूया. जगात आलेल्या कोणत्याही संशोधनाबद्दल त्याच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाबींवर शाळा कॉलेजपासून ते वरिष्ठ संस्थांमध्ये तासनतास चर्चा करुन कोणत्याही निकषाला न येता पुन्हा जैसे थे चालणे म्हणजे सर्व सामाजिक स्वरूपाच्या संस्था केवळ एक ब्लंडर आहे हेच तरुण पिढीवर बिंबवणे नाही का?

Date :- २३/०१/२६

उकडा ते उकाडा

सकाळी दूध येतं किंवा प्रत्येकाच्या घरी कोणाला तरी पाठवलं जातं. त्यांला उकडा म्हणतात. पण या सकाळच्या सुरुवातीपासून उकाड्याची सुरूवात होते. घरात पांघरूणात छान निजलेली पोरं उठायचं नसतं तरी डोळे किलकिले करत करत नाराजीने उठतात. लहानपणापासून अंदाज घ्यायची सवय आणि सुरुवात दुधापासून असेल याचा अदमास येईल का? घरात मुकाट्याने काम करणारी आई, आजी, आत्या किंवा तत्सम एकटी बाई किंवा बुवा लागतात, नाही? लहान मुले उकडा लक्षात ठेवण्याऐवजी उकाडा लक्षात ठेवतात. हळूहळू अशांची साथ संगत बघतात. मग सगळे मिळून उकाडा या विषयावर research करतात. मी research च म्हणते, कारण मोठ्यांचे बरेच search झालेले आहेत, त्यांच्या हाती

काय आले आहे हे बघायला अजून वेळ मिळालाच नाही बघा! मला मिळाला की नक्की सांगेन तुम्हाला. पण उकाडा हा विषय आपला नसून उकडा हा विषय आपला आहे, हे माझ्या लक्षात लहानपणापासून आले. त्यामुळे आपल्याला नेमका कशा कशाचा उकडा लागेल हा विचार मी करायला लागले. लहान मुलांना आपण जपू, जपू असे म्हणतो, पण असे नाही बरे. स्वतःला पूर्णपणे घडवले आहेत याची छातीठोक शाश्वतता असणारी व्यक्तीही मुलांचे ताबे घेतच असते. कारण त्यांना वाटते आपण घडलो म्हणजे आपल्याला मुलांना घडवता येईलच किंवा तो आपला हक्क पण आहेच. पण मी १० वर्ष थोडं काम केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले स्वतः कितीही विपरीत किंवा सुस्थितीतले जीवन जगलो असलो तरी मी मुलांना उत्तम घडवून शकतो/ते असा छातीठोकपणे दावा करणे खरोखर चूक असते. २४ तास मुलांसोबत राहून, सगळे करुन मुले कोणत्या दिशेने आणि का वागतात याचा अंदाज घेता येत नाही. मूळात आपण पुढे नेमके काय आणि कसे करणार हे मुलांनाच नीट लक्षात येते किंवा आणता येणे हा बहुदा पालकत्वाचा प्रवास असावा. मला अजूनही याबाबत खात्री नाही तर एक अंदाज आहे. कारण खूप प्रामाणिक स्वाध्याय करूनही स्वतःची ओळख नव्याने होत जात असतांनाच मुलांवर स्वतः पालकांकडून सुरक्षेच्या नावाने बळाचा वापर अनेकदा होतच असतो. किती जण कबूल करतील, माहित नाही. पण २४ तास सतत प्रामाणिक काम केल्यानंतर लक्षात आले २४ तास काम करणाऱ्या व्यक्तीने उकाड्याचा अनूभव कमी दिला असेल तर मुले परिस्थितीला खूप उत्तम प्रतिसाद देतात. पण असा अनुभव कमी देणार्यां व्यक्तीचे काय? विचारवंतांचे वाक्य प्रत्येक जगण्याला आणि संशोधनाच्या प्रत्येक दिशेला बळ देतात हा आशावाद खरा आहे. Yes, प्रयत्न केले तर चांगले घडूच शकते. मला कल्पना आहे, एकाकी प्रयत्न किती विफल आणि प्रसंगी विद्रूप, इतरांच्या हास्याचे कारण असतात. पण जेव्हा शेतकरी झाड लावतो, शेती करतो, तो पाऊस येईल, पीक चांगले येईल, सगळ्यांना दाणागोटा पुरेल, हिच आशा असते, होय ना? उद्याची पिढी पोचट, पोकळ, मूळूमूळू रडणारीच झाली, तर हसवणारे कोण? बळ देणारं कोण? बुडाली नाव तर सगळे बघतात, पण ती बूडू नये म्हणून प्रयत्न करणार कोण? उबदार पांघरुणात झोपून उकाड्यापर्यंत न पोहचणे पण उकाडा असतोच हा प्रवास कसा असतो मुलांनो? संवेदनशीलता न संपवणारा, स्वैराचार न माजवणारा, तरल, धूंद, मस्त, पण नसलेले सुस्त.....उकाडा ते उकडा काय निवडणार?

Date :- २४/०१/२६

पुढे काय झाले?

सर्वच लहान मुले सारख्या वातावरणात वाढत नाही. काहींना ३/४ पिढ्यांचा वारसा असतो. काहींना एका पिढीचा पण नाही. तर काहींना फक्त आई वडील. काहींना फक्त पालक. कोणासाठी ही नवी माहिती असेल. कोणासाठी जूनीच. एक काळ होता, मुलांना समाजात १८ वर्षांनंतर देखील काम मिळत नव्हते. काही मुलांना त्याची जाणीवही नव्हती. काही मुले/ मुली फक्त अभ्यास, काही मुले / मुली फक्त मिळेल ते काम, काही जण जमेल ते काम, स्त्रीया शक्यतो घरकाम किंवा पुरुषांनी सांगितलेले काम, काही जण फक्त आराम किंवा चांगल्या सर्कलमध्ये वाद पसरवण्याचे काम. काही मुले पालकांना सोडून मित्र मैत्रिणींच्या मदतीने किंवा एकटीच चालत असतात, त्यांचे काय? अशा मुलांचे निरीक्षण, परिक्षण नकळत कोणी करते याची त्यांना जाणीव असते का? ते एका वेळी किती जणांशी चांगले नाते निर्माण करू शकतात? अशी मुले दुसऱ्याचे विचार स्विकारू शकतात का? त्यांच्या conscious level च्या पलिकडे. यासाठी प्रत्येक वेळेला मला शाळा/ कॉलेज आठवते. की निदान व्यवसायिक जीवनात ज्याला चालता आले त्याला स्वतःला स्वतःसाठी थोडी तरी सुरक्षितता निर्माण करता येईल. व्यवसायिक जीवन ऐकून घेऊन सांगितले ते काम करणाऱ्यांचे जास्त सुरक्षित. ज्याने तिथे पण आपली मते ठामपणे मांडली त्याला सांगितले ते काम नाही केले तर काम सोडावेच लागते. मग सुरक्षा कोण देतं? मुलांना फक्त शाळा/ कॉलेज सजग बनवते. पालक फक्त प्रवाहात सामील हो नाहीतर तुझे तू बघ असे सांगतात. या बाबी ठिक नाहीत. आपल्याला वाटते पण अनेक चांगले विचारवंत, राजकीय पार्श्वभूमी असलेली माणसे याबाबत चिंतातूर असतात. कारण लोकसंख्या झपाट्याने वाढतच असते. ते अपरिहार्य आहे. पण ती ताब्यात ठेवणं ही फार मोठी जबाबदारी आहे. त्यांचे शोधलेले पर्याय आणि त्यातली आव्हाने हा वेगळा विषय आहे. खरी जबाबदारी आहे मुलांना आनंदी, जबाबदार, कर्तव्यभिमुख नागरिक बनवणे. त्याला सामाजिक सुरक्षा जाणवली पाहिजे. भीती आणि अति धाडस देखील ही विकासाला पुरक कधीच नसते. याच्या मध्ये राहून मुलांना घडवणे अत्युच्च चॅलेंज आहे. म्हणून १२ वी पर्यंत प्रत्येक शाळेतील प्रत्येक मुलांचे/मुलीचे व्यवसायिक profile तयार होऊन ते त्या शाळेत/ कॉलेजला नोंदणीकृत हवे. अगदी जी स्त्री घरकाम करण्यास इच्छुक असेल तिची कामे आणि तिचे वेतन ठरवायला हवे. यात कोणतीच गडबड होणार नाही याची खात्री जिल्हा कार्यालयातील अधिकायाना असणे हे जबाबदार, कर्तव्यदक्ष अधिकारी असण्याकडील एक पाऊल आहे. हे केवळ काम आणि वेतन हा विषय नाही. तर कौशल्यांचा विकास, समाजासाठी त्याचे योगदान, त्यांची त्या व्यक्तीला जाणीव, त्यांचे त्यानुसार वेतन, त्यांची सामाजीक सुरक्षितता, त्यांची व्यवसायिक प्रगती आणि सुरक्षितता यासाठी शाळा/

कॉलेज, व्यवसायिक संस्था/ सामाजिक संस्था व पालक यांची संयुक्त जबाबदारी आहे. तुमचे कामही तुम्हाला सुरक्षितता प्रदान करते. अनेकदा जास्त प्रामाणिक माणसे एकाकी आणि असुरक्षितता अनुभवतात. कारण त्यांचे तसे असणे अनेकांना केवळ एक गंमत, मूर्खपणा वाटतो. कामात सामील असणे हे श्रेय कमविणेच आहे. अनेक जण म्हणतील we are very happy and we don't feel any kind of insecurity. असेल तसेही १००%. पण व्यवसायिक कामांच्या नोंदी त्यांच्या शाळा/ कालेजात अनूक्रमे आहेत? नुसत्या सूचना नसतात. ते ground level चे अनुभव असतात. कामे पण अशी असावीत की अनेक पिढ्यांचे भले व्हावे. कामच लावू कामे करवून घेणे हे फक्त वेळ निभावून नेणे आहे. पिढ्या घडविणे नाही. एकेक क्षेत्राची जबाबदारी वाटून घेतली तरी पिढी घडवणे काही त्रासदायक नाही. हे झाले म्हणजे मोठ्यांची हेळसांड करून आपलं धावत राहायचे नाही. त्यांची जबाबदारी पण आपली असते. त्यांचे ओझे मानू नये. आणि मोठ्यांनी पण सतत बडबड टाळावी. कारण लहान मुलांना करून दाखवायचे असते. सततच्या बडबडीने मुले मोठ्यांकडे दुर्लक्ष करतात आणि कधी कधी पर्यायाने आपले नुकसान तर होतेच. पण त्यांचा दूरावा अनूभवावा लागतो. शाळेत मुलामुलींचे असलेले कामाचे रेकॉर्ड ही शाळेसाठी अभिमानाची बाब तर आहेच, पण शाळेच्या / कॉलेजच्या विकासात्मक कामातील वाटचालीमध्ये त्यांच्या क्षमतेनुसार ते कुठे हातभार लावू शकतात हे लगेच लक्षात येते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची जीवनाचा पायाच शाळा / कॉलेजपासून सुरू झालेला असेल तर ते व्यर्थ वेळ घालवत नाही. नवनवीन ज्ञानशाखा किंवा कामाच्या पद्धती समोर येत असतात. पण त्या सर्वत्र प्रचलितच नसणे हे शैक्षणिक कामकाजात एकात्मिकता नसल्याचे पहिले लक्षण आहे. हे थांबविण्यासाठी थोडे प्रयत्न या मार्गाचा अवलंब केला तर होऊ शकेल. चला तर मग शुभस्य शीघम.

Date :- २५/०१/२६

या सर्कलमध्ये

आपण लहानाचे मोठे होतो, ते सर्वांचे ऐकत. सर्वांचे ऐकत त्यातून स्वतः काय करायचे हे ठरवावे लागते. काहींना हे जमते काहींना नाही. आज्ञापालन करतांना देखील जे काम करतो, त्यातही पुन्हा हा प्रकार येतोच. हा एक मजेशीर प्रकार आहे. हळूहळू समजतं जाते. याचा "या सर्कलमध्ये", याच्याशी काय संबंध? तर आपण मोठं झाल्यावर आपल्याला आपल्या आवडी निवडी हळूहळू समजत जातात. काही मुलांना हे फार झपाट्याने समजते. तर काही मुलांना अगदी हळूवारपणे. पण हा प्रत्येकाचा आपला प्रवास आहे. सामाजिक संबंध जोपासणे ही

बाब खूप वेगळी आहे. लहान मुलांचे मित्र, मैत्रिणी त्याचे एक लहानसे प्रतिबिंब असते. कधी कुठली गरज भासली म्हणून मैत्री होते, तर कधी सहज बोलण्याच्या ओघात संवाद घडत जातात. आपण काही ठरवून करणे ही बाबही काहींच्या बाबतीत घडते. कधी कधी असे काहीच नसते. सहजता ही व्यक्तीमत्वाची बाब असेल, तर अनेक अडचणींचा सामना करावाच लागतो. पण त्यातून फुलणारी प्रत्येक गोष्ट खूप वेगळी असते. कारण त्यात कोणते गणित मांडलेले नसते. ते आपोआप घडत जाते. एका वर्तुळाचा भाग होणं, बनणे किंवा तशी इच्छा व्यक्त करणे ही सोपी बाब नसतेच. कारण त्यातही जबाबदार्या असतातच. या जबाबदाऱ्या सतत समजावणे आणि जबाबदाऱ्या समजून घेणे, यात खूप मोठा फरक असतो. जेव्हा आपल्याला एक घटक म्हणून जगतांना जबाबदाऱ्या समजल्या तर तो खूप वेगळा भाग असतो. एखाद्या सर्कलचा भाग होण्याची धडपड आणि एक भाग म्हणून जगत जाणं ही बाब खूप वेगळी असते. आपल्याला कधी कधी काही बाबी इतक्या आपल्याशा वाटतात, पण तरीही अनेक गोष्टी आपल्याला जमत नाही. हा एक मोठा प्रवास असतो. आज्ञापालन करणे ही बाब आवश्यक आहे. पण स्वतंत्रतेने विचार करतांना आपल्याला नेहमी आपली चूक जलद लक्षात येते. म्हणून कोणत्याही बाबतीत गणिते मांडत जगायचे की सहजता जपायची हा अगदी व्यक्तीगत भाग आहे. आपल्याला काय जमते आणि आपण काय आहोत यावर या सर्व बाबी अवलंबून असतात. मैत्रीत घाई, कामात घाई हे जसे आहे तशी कामात घाई/ दिरंगाई या बाबी पण आहेत. कोणाला समजतांना आपण स्वतःला खरच समजलो आहोत का हे महत्त्वाचे असते. असे का? याचे उत्तर प्रत्येकाला आपापलेच मिळते हे खरे आहे, जर शोधले तर.

Date:- २६/०१/२६

एका ऑफिसची गोष्ट

इंजिनिअरिंग होण्याच्या मार्गावर होते. म्हणजे आता होऊ इंजिनिअर निदान पास(!) असे वाटत होते. कॉलेज COEP, सगळी बाप माणसे, आपण असे कसे? अशी सततची जाणीव कुठे तरी खोल घर करुन बसलेली आहे, याची पण जाणीवच नव्हती. काही झालं की अप्पा बळवंत चौकात जायचं, पुस्तक नाही घेतली, नाही वाचली, तरी बघून घ्यायची, नूसतीच देखणी shopping! हे पण परवडत नाही ही जाणीव होत असतांना कमी किमतीत पण पुस्तके मिळतात, समजले होते. अशाच एका मनस्थितीत अप्पा बळवंत चौकात पोहचले. चाणक्य मंडलचे मासिक नजरेला पडले. काय आहे हे? म्हणून वाचायला लागले. चांगले वाटले. तोपर्यंत अविनाश धर्माधिकारी किंवा पूर्णाताई नावे किंवा चाणक्य मंडल

ऐकीवात नव्हतेच. एकदा एक मित्र म्हणाला चल अविनाश सरांच्या सभेला जाऊ. पण मी तर औरंगाबादहून तेव्हा परत येत होते. मी त्याला म्हटले अरे, मी बसमध्ये आहे. नंतर मी विसरले, मग मासिकाची पुन्हा भेट झाली ती अप्पा बळवंत चौकात. मग विचार आला, जावूया, बघूया काय क्लास असतो स्पर्धा परीक्षांचा. कारण सगळी मुले/मुली कंपनी जॉब करणार हे दिसत होते, आपण काय करणार? बरेच मार्ग माहिती होते, दिसत होते, पण मी चाणक्य मंडलला गेले. इंजिनिअरिंग नंतर Upsc चा अभ्यास जमू शकतो पण आपण पास काही होणार नाही, याची २००% गॅरंटी होती. पण आपण MPSC चा क्लास आणि परीक्षा दिली तर आपण पास होऊ अशी खात्री वाटत होती. अशी खात्री क्लास केल्यावर निर्माण झाली. क्लास पूर्ण झाल्यावर तिथले वातावरण खूप आवडले होते, म्हणून रिझल्ट येईपर्यंत इथेच काम करु असा विचार केला. 2 महिने काम केले, खूप आनंदात. कोणावरही प्रेम असले तरी तिथे जितक्या आनंदाने मी काम करत असे तितक्या आनंदाने मी घरी काम करत असे. सगळं व्यवस्थित होतं, पण घराची काळजी मन कुरतडायची. कसे करणार? त्यांत घरभाडे सतत वाढतच होते. काही खरे नाही, नोकरी सोडणे हाच पर्याय आहे, पैसे पुरणार कसे? एकवेळ पैशांची बाब बाजूला ठेवली तरी पालकांना देणार काय? सांगणार काय? या विचारात घरी परत आले. गावाकडेच नोकरी करायला लागले. हे सगळे का? तर नोकरीच्या ठिकाणी माणसे किती कंटाळतात. याचे कारण काय असते? बरेचदा लोकांना कामच आवडतं नसते, कधी वातावरण कोणाला आवडत नाही, कधी कधी काम पण आवडत नाही, कधी कधी वातावरण पण आवडत नाही. किती गोष्टी असतात. पण तरुण मुलांना काम पण आवडत नाही हा भागच वेगळा नाही का? तुम्ही कधी ऐकले आहे, आफिस किंवा वातावरणाच्या प्रेमात? आदरात? क्लास करता करता कधी हे घडले ते लक्षातच आले नाही. वातावरण निर्मिती किती महत्त्वाची असते. आणि वातावरण निर्माण करणारे? फारसा ताण नसतांना प्रचंड अभ्यास/काम करण्याची प्रेरणा देणारे अविनाश सर, तर कितीही चूकीचे वाटले तरी कौतुक करणाऱ्या पूर्णाताई. मला वाटते ज्याने कोणी चांगल्या, खूप वेगळ्या कामकाजाच्या संस्कृतीचा अभ्यास केला असेल, तो/ती खूप चांगले वातावरण निर्माण करू शकतो. मला सांगाल कधी, कोणी आफिसच्या प्रेमात पडलं तर (व्यक्तीगत जीवनातले प्रेम पण सफल करत!)

Date :- २७/०१/२६

एक दिवस

अनिल कपूर यांनी कमालीच्या ताकदीने साकारलेला चित्रपट ,"नायक". मी फारसे चित्रपट पाहिले नाही. नायक पूर्ण आठवत नाही. पण जर संधी मिळाली तर एक दिवस बदल घडवू शकतो, असे काहीसे सांगणारा चित्रपट. मला जगतांना असे जाणवले की जीवनात बरेच काही समोर असते. आपण नीट त्याचा वापर करू शकतो का? अगदी त्याची सुरूवात आपलं स्वतःचं शरीर असतं. ते सतत काहीतरी सांगत असतं. आपण ते आवाज नीट ऐकू शकतो का? एक दिवस या विषयावरून नायक चित्रपट आठवला. जीवनात संघर्ष ज्या दिवशी स्वतःचा फक्त स्वतःसाठी सुरु करतो, त्या दिवशी थोडंसं स्वतःबद्दलच समजायची सुरूवात होते. खरंतर ती होतच असते. पण ती फार सूक्ष्म पातळीवर असते. सतत बोलणं, बाहेरचे आवाज ऐकणे, त्यांना प्रतिसाद देणे, नाही दिला तर आपण वेडे किंवा मूर्ख आहोत हे पण सतत समजून घेणे हे चालत असतांनाच पुन्हा वेगाने शरीर, मेंदू वर आवाजाच्या लाटांना समजून घेण्यासाठी तटस्थ राहणे..... हा एक खूप वेगळा डोंगर चढताना कधी वेदना तर बरेचदा खूप वेगळी अनुभूती आपण घेतो. हा एक दिवस प्रत्येकाच्या जीवनात आलेलाच असतो किंवा येतोच. फरक हा असतो त्याची कारणे वेगवेगळी असतात. हे समजून त्या ओळखीला आपण दूर सारतो आणि आपलं जहाज भरकटत भरकटत कुठेतरी वाहत असतं. कोणतं तरी कर्म करतच असतो. पण तो दिवस महत्त्वाचा असतो, ज्या दिवशी आपल्याला कर्म सूचत असतं, त्याची दिशा समजतं असते. आपण त्या दिशेने बरोबर गेलो, तर आपल्याला प्रसिद्धीसाठी निश्चितच नाही, पण तू तुझे कर्म चांगले केले याची नक्की दाद मिळते. हा भाग मानवी जीवनात विकसित होणे म्हणजे एक दिवस. अनेक मुले/मुली काहीच करत नाही अशी मोठ्यांची तक्रार असते. पण त्यांना जे आवडते त्या दिशेने त्यांच्या अमूक अमूक जबाबदाऱ्या पेलून ते सक्षमतेने चालता आहेत का? हे फारसे पाहिलेच जात नाही. पाहिले आणि ऐकले जाते. मी लहान मुलांना फार शिकवले नाही. मला त्यांचा अभ्यास नाही. पण मोठ्या मुलांच्या सहवासात मला इतकेच समजले थोडे स्वातंत्र्य आणि थोडी जबाबदारी शिकवली तर ते किती उत्साहात काम करत असतात. पण ते पण त्यातून फायदे मिळाले की आपली निवडलेली वाट पूर्ण विसरून किंवा त्यातल्या अडचणींवर मात करता येत नाही म्हणून थांबतात किंवा वाट बदलवतात. मी अशा प्रत्येक दिवसासाठी विचार करते. येणारा रोजचा दिवस कोणतं स्वप्न/कोणत्या कर्माची आठवण देतो की फक्त प्रलोभने खुणावतात? मी जेवढं जगली त्यातून समजले खुणावणारी गोष्ट म्हणजे कर्म. कधीच विसरू नका. कारण प्रलोभनाच्या दुलयीतून बाहेर पडणं हिच तर कसोटी असते. आज अमूक वाटले केले, तमूक वाटले केले. मी मागे वळून बघते तेव्हा मला समजते, मला येणारे दिवस सूचवायचे, दिशा दाखवायचे, पण कुठेतरी

ऊर्जा कमी पडते. म्हणूनच आपण चूकतो. तसे नसेल तर आपण चूकणारच नाही. जीवन जगतांना आतला आवाज ऐकतच पुढे सरकू या. समजेल एक एक दिवस प्रत्येकाचा कसा असेल. मुलांना मोठं करतांना जेव्हा त्यांना समजत नाही, पालकांना वाटते कधी समजेल? काय समजत नाही हे त्यांच्यासाठी निराळे असते आणि मुलांसाठी निराळे. हेच कामाच्या ठिकाणी, हेच अनेक नात्यात, हेच स्वतःच्या कर्मासंबंधात.....मला आशा आहे, माझ्यासकट ज्यांचे असे होते ते थांबेल, आणि अनिल कपूर फेम नायक एक दिवस.....त्यातले थोडे क्षण. समजलेले असेल स्वतःबद्दल.....

Date :- २८/०१/२६

वेलीचं जगणं.....

लहानपणी पहिला वेल पाहिला तो गिलक्याचा. त्या दिवशी समजलं एक नाजूकपण. आधार नसला तरी हळूहळू कुठेही कसही पसरत जाणारं. मग आई बाबांनी त्याला भिंतीवर चढवलं. ती नाजूक वेल तिथे पण चढली. एक दिवस सकाळी पाहिलं तर तिला कोवळा अंकूर आला होता. हे काय? लक्षात आलं, पिवळ्या जर्द फुलाचं छोटूसं गिलकं असेल हे. ते थोडं मोठं होतांना, त्यावर मोठे काळे काळे मुंगळे! बाप, रे, हे आता ते सगळं गिलकं खाऊन टाकतील, या नाराजीत मी अनेक रात्री घालवल्या. मग समजले, अरे! हे तर वाढलं. छान सुंदर गिलकं समोर आलं. माझं मन हरवत गेलं. आपल्या नाजूकपणात स्त्री हरवतच जाते. तिला टोळीने राहणं जमतच नाही. आपल्याच बहिणीकडून, आईकडून क्षणाक्षणाला दुखावते. मला स्त्री विरुद्ध पुरुष असे काही नाही मांडायचे. पण जगतांना वेलीला पण आधार मिळाला तर ती अस्ताव्यस्त दिसत नाही. आपलं फळ अलगद अंगावर घेऊन ती वर चढत जाते. होतं ना? ही संस्कृती. घनदाट जंगलांची सुंदर शहरे झालेली बघतांना, होतंय ना किंवा होईल ना, असे केले असते तर? आज हिच बाब, सिमेंटच्या ज़गलाची आहे. नुसतं बसून कंटाळणारं मन, सगळं आयतं मिळालं की होतंय ना म्हणणारं मन.... याच्या पुढे सरकताच येत नाही. कार्यसंस्कृती उभीच राहत नाही. मुलांबरोबर तासनतास गप्पा मारताना कालेजातले दिवस जातात. जगण्यासाठी आधार शोधले जातात. शिक्षणसंस्थाच्या मोठमोठ्याल्या इमारती अशाच उभ्या असतात. एकत्र मित्र मैत्रिणी - एका स्पर्धेच्या निमित्ताने बाहेर गेलो होतो. थोडे पैसे होते सोबत माझ्या जवळ. सर्वांचे तिकीट मित्राने काढले खरे, पण नंतर मित्र सर्वांना म्हणाला TTMM. टिकीट काढले आता याच्या हिशोबाप्रमाणे पैसै द्यायचे असे अजून मनात असतांनाच, तो म्हणाला TTMM. बाकी सगळे हसून हो म्हणाले. मला हे माहीत नव्हते. मी विचारले, हे

काय? तर मित्र म्हणाला, तू तुझे, मी, माझे. ही बाब तर मी करणार होते. पण ती एक शिस्त आहे, आणि ती रूजवणे सोपे नाही. मूळात मुलांना तसे छानसे मार्गच नाही. घनदाट जंगलाकडून, सिमेंटच्या ज़गलाकडून आपला प्रवास पुढे चालला आहे, त्यासाठी सगळ्यांना होतंय ना, म्हणून चालणार नाही. तर जे करता येईल ते करुया, यामध्ये पुढच्या मानवी पिढीचे भले आहे. गिलक्याच्या वेलाने आणि पालकांनी दिलेल्या आधाराने शिकवले, वर चढता येतं, एक छोट्या वेलीत ताकद असते, तिचं बाळ सांभाळण्याची. स्त्री याला अपवाद असेल? केवळ हेच नाही. पुरुषांचे पण असे होतेच. करता आहेत ना ते. सगळी शक्ती याला त्याला विनवण्यातच गेली तर कामे करायला कोणती शक्ती उरली? याच्या पलीकडे दुसरी बाब, सरळसोट व्यक्ती एक अडगळच होऊन बसली. तिच्या/त्यांच्याबाबत कोणी काहीही बोलत सुटावे. कुठे काही धरबंध राहिला नाही की कठीण होतं जाते सगळं. होतं य ना, ते बघायला हवे, काय झालं.. आपल्याला बघितलेच पाहिजे ते.....होईल ठिक.....जाऊद्या.....काय करायचे आहे.....ते थोडे बघायला हवे.....आदर आणि सन्मान याबद्दल बोलायला मी खूप लहान आहे. पण त्यातील गंमत बघतच असते. वेलीचं जगणं.....

२९/०१/२६

कर्मफलाचा सिध्दांत

अशा अनेकांवर हा समाज चाललेला आहे हे माहितच नसते. आज पसिंजरच नाही भेटले, बरेच दिवस असेच जाणारे काही रिक्षावाले रिक्षा सोडतात, दारू नाही सोडत, घरी भाजी नाही आणत. नसली भाजी तर काय? मोठ्या आवाजात काहीही कर सांगतात. पण पॅसेंजर शोधत नाही. कधी खरच मिळत नाही. कर्मफळ सिध्दांताचा तो कधीच विचार करत नाही. कारण कर्म करण्याची इच्छा असून काहींना बसून रहावे लागते. तर काहींना वेळ मिळत नाही. अशी अनेक माणसे आहेत जी खरच विज्ञान जगतात, त्यांच्याकडे intern म्हणून विद्यार्थी येतच नाही. कारण त्यांची ओळख पण नाही. अशी अनेक उदाहरणे समाजात असतात, जी कामे करतात, पण समजतं नाही. आपण शिकावं की हे मा फलेषु कदाचन असतं. मनोरंजन क्षेत्राला प्रमोशनपासून प्रसिद्धीच्या झोतात असणाऱ्यांना आयुष्य कसं चालतं? विचारणारे कोणी नाही. आपल्याला खूप करायचे आहे. जर अभ्यास करायचा असेल तर. लहान मूलाला कधी माहित असते ते जन्माला येणार आहे? आपण त्याला फळ ही गोष्ट शिकवतो. जितकी जास्त तितकी अस्वस्थता अधिक. अगदी बालवयापासून. ज्यांच्याकडे काहीच नाही, अशी माणसे थोडक्यात चांगली कामे करून दाखवतात. साधनेसुध्दा नसतात. शिक्षण म्हणजे चेंगराचेंगरी नाही.

तर नीट रांगेत चालणे. ज्या लहान मुलांनी मा फलेषु कदाचन शिकले, क्वचितच ते हक्क विचारतील. कर्तव्याला तत्पर असतील. जे हक्क आणि कर्तव्य यांचा सतत हिशोब ठेवतील, त्यांना ते मिळेल. मी काय शिकलो, का शिकलो, कोणासाठी शिकलो, ही सगळी आपली कारणे आहेत. कोण त्याचा काय फायदा घेतो, मी काय उपयोग केला ही आपली कारणे आहेत. हे सगळे अभ्यासूया. एका नवीन समाजरचनेसाठी, ज्यात शिक्षण घेतलेली व्यक्ती विनाकारण तक्रार करणार नाही. असे शिक्षण सर्वाना खुले असण्यासाठी. कोणत्याही कामकाजाच्या जागांपेक्षा तक्रारींच्या जागा जास्त असतात. कारण श्रध्दाळू मने निराश होतात. श्रध्दा म्हणजे निराशा हा धडा नाही गिरवायचा. हाताने काम, मनात श्रद्धा चला तर अभ्यास करू...

३०/०१/२६

समय के साथ

समय के साथ चालना चाहीए. कोणी माहिती देतं, आता मेडिकलला scope आहे, कोणी सांगते CA ला वगैरे. सामान्य ते सर्व स्तरातले पालक किती उंबरठे झिजवतात. बरेचदा खरच डॉक्टर होण्याची इच्छा असते पण शेवटचा नंबर येतो, सीट खाली नसते. जेव्हा समाजात खोटी कागदपत्रे तयार करणारी माणसे दिसतात, तेव्हा अशी सवय नसणाऱ्यांना कमाल वाटते. कोणतेही कॉलेज काढायचे हे सोपे निर्णय कधीच नसतात. वरपासून खालपर्यंत नावे ठेवणारा पटाईत काम काहीच करत नसतात. काही धाडसाने औपचारिक शिक्षण नसताना कामे करतात. औपचारिक शिक्षण महत्त्वाचे असते. आजच्या काळाच्या गरजेनुसार शिक्षित डॉक्टरकडे internship करणे आणि तरी आपली पुस्तके देखील मुलांना वाचायला देणे, आणि मुलांनी वाचणे, हे मुलांना वाईट वळण लागण्यापेक्षा खूप चांगले. हा कॉलेजला पर्याय नाही. शिक्षण व्यवस्थेला पर्याय आहे. अनेक नर्सला सलाईन नाही लावता येत, धाडस करतात, प्रॅक्टिकल आहे, खरे आहे, पण तज्ञांच्या हाताखाली पूर्ण तयार झाल्यावर,तो आत्मविश्वास आहे. हे एका field चे झाले. सिमेंट ब्रँड स्टील ब्रँड माहिती आहे, टेस्टिंगला, material आहे कुठे? रिपोर्ट देता येतो, छाप तो. हळूहळू स्वतःला रिपोर्ट पण देता येत नाही. स्त्री निरिक्षकाला दमदाटी करतात. अडचणी आहेतच. पण मात करणारी व्यक्ती महान बनण्यासाठी नाही, तर त्यांना मूल्यांची आस्था आहे. लहान मूलांना टोचेपयत प्रयोग करू नका. माती आहे उपलब्ध, तिचे होईल परीक्षण. न करता फेकू नका. मला माहित आहे. खूप अडचणी. पण जे शक्य त्याला अशक्य नाही करायचे. नैतिकतेच्या गप्पा करत नूसती आव्हाने नसतात द्यायची हे खरे आहे. पण समय के

साथ म्हणजे काय? सत्य हे वेळेप्रमाणे बदलत नसते. बदलते ती व्यवस्था. कोणा एकाच्या मर्जीमुळे व्यवस्था बदलत असेलही. पण शाश्वत व्यवस्थां तशा कधीच नसतात. तिथे मर्जी नसते. तर सत्य, योग्य, चांगूलपणा असतो. क्षेत्र ही जबाबदारी आहे. किती छोट्या गोष्टींची कोणाला इच्छा असते. समय के साथ सगळंच नाही बदलत.....बदलतात फक्त व्यवस्थां. साप जशी कातडी टाकतो, तशी व्यवस्था बदलते. पण माणसे घाबरतात किती न बदलणाऱ्या गोष्टींचा अभ्यास करुया.

Date :- ३१/०१/२६

रस्सीखीच आणि भूमिकांची एकात्मता

हा प्रकार बालवयात सुरू होतो. १००% खरं कुठे बोलता येतं का, असे मनात म्हणत कबूली जबाब स्वतःशीच सुरु होतात. कारण बरं त्याच्यानेच वाटतं. मूल घरात आल़ की ते सगळ्यांचेच लाडके असते. दुसरं आलं की साधारणतः वाटणी सुरू होते. लहान मोठ्याचं सगळं बघत असतं. क्वचित स्वतःची बुद्धी वापरली जाते- संधी मिळाली तर. पुढे ही मुले मोठी होतात, जमलं तर नाते समजतात. त्यांच्या जीवनात रस्सीखेच सुरु होतेच. भूमिकाच न समजल्याने अनेक जणांचे जीवन/क्षण असेच निघून जातात. पण म्हणून सावध राहूया. प्रेम करणे, प्रेम देणे हे भाग जीवनात असतील, नसतील, पण कर्म तर रोजच असते. काही तरी दिसामाजी करतच असतो. पण ते जर आपल्या आवडीचे केले, तर आपण जास्त चांगले करतो. त्याहीपेक्षा त्यामुळे समाजातील अनेकांचे हित साधणे, बरे वाटते. आवडतच नसलेले काम मिळाले की काय होते बघू? रस्सीखीच! ज्याला आवडते, जमते तो नाराज असतो, तो काही तरी चूकीचे कामे करतो आणि सर्वांना ताप होतो. त्याच बरोबर ज्ञान वाटून घेतले नाही तरी एक मोठा तापच असतो. मडक्यात जास्त वेळ पाणी राहतच नाही. म्हणून फिल्टरचा शोध लागला खरा. पण समजलेले सांगून टाकले की निदान स्वतःशी आणि इतरांशी प्रामाणिक आहोत असे वाटते. तशी ही रस्सीखेच आणि भूमिकांची एकात्मता. नाही जमत सुरुवातीला. कारण प्रलोभने असतात. ते सतत इकडे तिकडे नेतात. मला वाटायचे, मदारी माकडाला नाचवतो. पण नाही, माकडच तसे असते. आपल्या मनाला ती उपमा उगीच दिलेली नाही. पण तुम्हाला माहिती आहे? मला माकड व्हायला आवडते. ते किती आनंदी असते? बघितले आहे कधी? बघा, मग कळेल. नुसती पळापळ करता करता, त्याला स्वतःचे काही सापडते. मी स्वतःला नेहमीच माकड आणि हत्तीच्या भूमिकेत ठेवले. कारण जेव्हा एकदा मी नाशिकला पहिल्यांदा माकड बघितले गडावर, आणि एकदा हत्ती. या दोघांना बघितले की मला खूप आऩंद होतो. कारण हे दोन प्राणी मला खूप अफलातून वाटतात. आता

हे रस्सीखेच आणि भूमिकांची एकात्मता यात कसे येते? तर आपण स्वतःला ओळखले, तर आपली भूमिका समजू शकतो, जर नाही ओळखले तर कोणत्याही भूमिकेत आपण चांगले कर्म करू शकत नाही. मी तेवढाच प्रयत्न करते. तुम्ही पण केलात, तर तुम्हाला पण छान वाटेल.

Date :- ०१/०२/२६

असे का घडले?

आपल्या जीवनात अनेक घटना घडतच असतात. काही आपल्या दृष्टीने सकारात्मक तर काही नकारात्मक. यात अनेक मुद्दे आहेत. कधी कधी इतर लोकांच्या चूकीच्या सवयी, चूकीची मनोवृत्ती यामुळे आपली चूक नसताना आपल्याला चूकीचे अनूभव येतात. यामुळे होते असे की आपण खोलवर तर दुखावतोच, पण आपल्यातही अशा अनूभवांमुळे अनेक योग्य/ अयोग्य बदल होत असतात. हे फार सूक्ष्म असतात. आयुष्यात संकटे अटळ असतात की नसतात तो भाग वेगळा आहे. पण या संकटांमधून बाहेर येण्याची शक्ती ही युक्ती आणि बुध्दीमत्तेपेक्षा नीतीमत्ता आणि खूप उत्तम सवयी यातूनच मिळते. लहानवयातील चांगल्या सवयी अनेक कारणांमुळे बदलण्याची शक्यता नाकारता येतच नाही. कारण जीवनातील साथसंगत, वेगवेगळे प्रभाव आणि स्वतःला ओळखण्याची अक्षमता. कोणत्या प्रसंगात आपण का, कसे, कशासाठी, कोणासाठी वागलो/ वागतो हे अनाकलनीय असते. सतत दुसऱ्याचे ऐकणाऱ्या व्यक्तीला नक्कीच वाटते जगाच्या पाठीवर मी किती मागे आहे? पण आज्ञापालन ही संयमाची अत्युच्च पातळी आहे. अनेकांचा स्वभाव आज्ञापालनापेक्षा काही वेगळे करून बघण्याचा असतो. ही बाब करतांना आपण इतरां संदर्भात काही चूकीचे करतो आहे का, याचा खोलवर विचार करणे खूप गरजेचे असते. कारण मी बरोबर आहे ही भावना वय झाल्यानंतर वाढणे हे जितके गरजेचे असते, प्रत्येकासाठीच, तितकेच माझी चूक झाली का आणि का झाली हे पडताळणे पण तितकेच गरजेचे असते. हे तरूण मुलांसाठी जास्त. कारण नवीन कामाच्या संधी, नवी आव्हाने, त्यात व्यक्तीगत आयुष्यातली आव्हाने, हे सगळे नीट करतांना सतत जबाबदारी मी किंवा तू हे नसून आपण हा भाग खूप महत्त्वाचा ठरतो. आणि आपण म्हटले की चूकांबाबत मात्र आपण कधीच नसते. चूक ही नेहमी व्यक्तीगत असते. आनंद हा सामायिक असतो. समाजात कित्येक चूकीच्या गोष्टी घडत असतात. याचे कारण बालपणाच्या जडणघडणीत असते. कारण एकदा प्रतिष्ठा ही बाब समजली की तिच्या तावडीतून सुटका मिळवणे सोपे नसते. याचबरोबर आपण गरज म्हणून काम करतो की प्रतिष्ठा मिळते म्हणून याचा विचार निदान तरूण पिढीला

आवश्यक ठरतो. कारण सतत परिस्थिती बदलत असते. त्यातही दुसऱ्यामुळे निर्माण झालेले अडथळे, आपल्या चूकांमुळे/स्वतःला न ओळखल्यामुळे/ अक्षमतांमुळे निर्माण झालेले अडथळे याबाबी आपण लक्षातच घेत नाही. पण स्वतःला किंवा इतरांना सतत विचारतो, असे का घडले? असे का घडते? आपण स्वतःचा, परिस्थितीचा, सभोवतालच्या माणसांचा नीट विचार केला की लक्षात कधीच येणार नाही. फारसा विचार न करता दुसऱ्याला चूक ठरवणे सर्वात सोपी आणि सहज बाब असते. पण मी चूक आहे आणि परिस्थितीचा अभ्यास करता येणं ही सर्वात अवघड बाब असते. म्हणून जर स्वतःचा आणि परिस्थितीचा आपण अभ्यास करु तर लक्षात येईल पोलिस यंत्रणा जास्त सुखी होईल. कारण दुसऱ्याला अमूक एक शिक्षा देणं किंवा ते सगळे निर्णय घेणे हे सोपे आहे का? म्हणून जितकी जास्त आपण आपली चूक बघू आणि परिस्थितीचा अभ्यास करु तितके आपल्याला असे का घडले याचे उत्तर मिळतं जाते. आईचा/पालकांचा सतत पाठिंबा असणारी मुले वात्रट असण्याची शक्यता नाकारताच येत नाही. कारण कुठे, कशासाठी काय घडले हे माहीतच नसले तर आपण काय केले हे मुले कधी पडताळतील? आणि पालकांना प्रामाणिकपणे कधी सांगितलं? हिच बाब पाठिंबाच नसलेल्या मुलांबाबत देखील घडूच शकते. ते एक तर वात्रट किंवा दबलेली असूच शकतात. हे घडूच नये म्हणून लहानपणापासून मुलांनी स्वाध्याय करणे आणि तो कधीच न सोडणे खूप खूप आवश्यक असते. कारण मोठेपणी या गोष्टीची आवश्यकता नाही असे म्हणणे म्हणजे खूपच मोठी कमाई आहे. अशी कमाई आपण केलेली आहे, असे आपण खात्रीपूर्वक म्हणणे किंवा समजणे ही बाब आपली व्यक्तीगत आहे. असे प्रत्येकाबाबत घडले म्हणजे असे का घडले हा प्रश्न पडणे कमी होत जाते. ही बाब व्यक्तीगत ते सामाजिक पातळीवर घडत जाईल आणि जास्त किचकट, दुःखद गोष्टी कमी होत जातील. असे करतांना हा एक प्रवास आहे हे विसरता येत नाही. तो एकट्याचा आहे हे त्याहूनही अधिक महत्त्वाचे आहे.

Date :- ०२/०२/२६

कामचूकारपणा

काही ठिकाणी गेलो की वरिष्ठ कुरकुरत असतात. काय करणार, माणसे चांगली मिळत नाही. सांगितलेले काम करणे जमत नाही, मग न सांगता कामे करणे तर दूरच. माणसे दूरून दूरुन सगळं ऐकत असतात. आणि स्वतःला वाटेल ते वागत असतात. लहान वयात नोकरीला लागलेल्याला कोणाला काय काय हवे असते. हुरुपपेक्षा हुरळलेले असतात सगळे. थोडे पैसे हातात पडत नाही, तर काय काय

घेतात. मोठी माणसे कौतूकाने सर्वांकडेच बघतात. पण सतत त्यांना काळजी असते. कामांची. पण आपल्याला काही समजत नाही. समजून काम न करणारी माणसे कसला तरी हिशोब करत असतात. मोठी झाली, लहान लहान मुले असली की अजूनच चालू होते हे. पण मुलं ही उद्याची आशा असतात. आज करेल, उद्या करेल अशी कोणत्याही कामासाठी आपण कारणे देत असू तर त्याची पण कारणे असतात. कधी आपल्याला कामच करायचे नसते, कधी त्यामागे हिशोब असतात, कधी खरच काही कारणे असतात. आपण हे सगळे नीट तपासतो का? हे कशासाठी? तर मोठी माणसे नाराज झाली तर त्यांची उमेद कमी होते. त्यांची अशी उमेद कमी होणे चांगले नाही. कारण तेच तर मुलांना हुरुप देतात. मुले हुरळून जातात, तो भाग वेगळा. काही लहान मुले बालवयापासून जमेल ते काम करतात. काही मुले गंमत बघतात. हा एक कामचूकारपणाच असतो. कारण त्यांना समजते, पण जमेल ते काम ते करत नाही. लहान मुलांना समजणे सर्वात कठीण. कारण ते फार हुशार असतात. हळूच काम दुसऱ्याला सांगू हे ते लवकर शिकतात. कामाने आपण थकलो हा भागच वेगळा. पण कामांचा कंटाळा केला/करतो हा भाग वेगळा. कोण कोण चेक लिस्ट करणार, आपण काय काय करतो? कुठे कुठे कशासाठी कंटाळा येतो? दुसऱ्याला विनंती करण्याचा कंटाळा यावा इतकी माणसे कामाला प्राधान्य देत नाही. हे सामाजिक संस्थेसाठी चांगले का? त्याचबरोबर दुसरा आपल्यासाठी खूप महत्त्वाची व्यक्ती आहे हे खरे तर समजविण्याची कधी गरजच नसते. ते जाणवते आपल्याला. कामचूकारपणा, कंटाळा आणि थकवा हे नीट तपासले जायला हवे. सामाजिक संस्था मजबूत बनतील. कष्टांना नवे अर्थ येतील. उगाचचे गैरसमज मागे पडतील. एक व्यवस्था म्हणून आपण जिंकलेले असू. हे सोपं नसलं तरी अवघड कधीच नसते. आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या व्यक्तीच्या हाताखाली नको असलेले काम करावे लागले की प्रचंड दुःख होते. पण जर कोणतेही हेतू चांगले असले, तर हे दुःख दूर सारुन आपल्याला काम करता आले, तर जगासाठी आपण एक सामान्य व्यक्ती असू, पण कर्ममार्गावर आपण नीट चालले आहोत हे निदान स्वतःला समजेल.

Date :- ०३/०२/२६

सांगा कसे जगायचे?

मंगेश पाडगावकर कवितेत विचारतात, सांगा कसे जगायचे? काय कारण? कोणाला समजते, मला कसे जगायचे, कोणाला नाही समजत, का आणि कसे? स्वतःची ओळख कधीच कोणाला अडवत नाही. तिची वाट सरळ असते. ती कधी कोणाला विचारत नाही, सांगा कसे जगायचे? कोणती बंधने, कोणते स्वातंत्र्य यांची

उत्तरे माहित असतात, त्यांना पण फक्त बंधने दिली जातात. कारण मला काही दिसतच नसते. पाडगावकरांच्या पुढे जात नाही तर या कवितेचे उत्तर गाणे म्हणत जे त्यांनीच सांगितले आहे. खरी तळमळ उत्तर सापडवते. पण ती स्वतःची हवी. प्रत्येकाची आपली. आपलं उलट होते. आपण आपला रस्ता शोधून दुसऱ्याला गरज भासली तर मदत देऊ शकलो तर ठिक. नाही तर बरेच चालले असते. बरेचदा बर्याच लोकांना वाटते ना, सांगा कसे जगायचं? चूकीचे कुठे? घरातून वाट दिसते. मूल नाही विचारत, सांगा चालायचे कसं? चालू लागतं. मग अचानक हा अंधार जीवनात येतो कसा? कारण मी ला विसरलेले मी/विसरलेला मी. बरं वाटतं ते करु, हा आपला सर्वांचा योग्य प्रवास. पण बरे वाटण्यात पण कमी अधिक हा प्रकार असतोच ना? आतला प्रकाश किती सांगतो? पण आंधळा जीव. तळमळतो. कोणाला वाटते प्रसिद्धीसाठी काम चालले, कोणाला जीव रमत नाही म्हणून, कोणी अजून पैसा मिळवावा म्हणून.....कुठे पाहतो आपण.....कोणीतरी कळवळून विचारतं, सांगा कसं जगायचं? आपण जगत असताना नाही फुलवाट जमली तरी निदान काटेरी वाट नको.... उत्तर मिळतं सांगा कसे जगायचे? हे जिद्दीने आपलं आपण शोधायचे.....

Date :- ०४/०२/२६

काय झाले?

एक प्रश्न असतो. ज्याला अनेक बाजू आणि अर्थ असतात. काही बाबी गंभीर असतात. लहान मुलांना कोणते गांभीर्य असते? वाटते असे. थोडी समज दिली तर त्यांच्या इतकं शहाणे कोणीच नसते. काय झाले? ज्याला संवेदनशील असे आपण म्हणतो, या गोष्टी कोणाला समजल्यावर काय काय घडू शकते? लहान, थोर कोण कोणत्या काय काय चर्चा करतात? सर्वांना सर्व सांगून आपण सगळ्यांना शहाणे करून सोडतो का? चोली के पिछे गाणं, किंवा आयीये मेहरबा गाणं, छानच. पण कोण कसे घेणार? स्त्री पुरुषातील संवेदनशील नात्यावर किती परिणाम होणार? कोणती गोष्ट कशी घेतो ही समज नाही तर प्रक्षेपणच करायचे नाही, हा मार्ग सोपा का?खरे तर ज्याचा आपल्यावर खूप विपरीत परिणाम होतो हे लक्षात आल्यावर आपण ते अंगिकारूच नये. कधी एके काळी कोणती गोष्ट होते, ती का घडली, त्यातले बरे वाईट, योग्य, अयोग्य काहीही न बघता खूप चर्चा, मग यात जिथे खरी चूक होती ती बाजूला पडते. आणि अंधा कानून समोर येतो. माझ्या मते अजून तर कानून जन्माला यायचा आहे. खरा कानून तो असतो, जिथे घडलेल्या घटनेवर लोकांना समजल्यावर, योग्य ती चर्चा होऊन त्या गोष्टी तिथे बंद होतात. मुले छान घडतील का? दोन मित्र मैत्रिणीत काही घडलं, ते त्यांच्याजवळ. ते जबाबदार नव्हते, तिसरा फायदा घेईल की जबाबदारी? भांडणे संपवायची असतात. आणि सशक्त समाज घडवायचा की समाजाला सतत सलाईन? काय झाले? कशासाठी विचारतो- कोणाला प्रेम, कोणाला चौकशी, कोणाला सद्भावना, कोणाला इकडची गोष्ट तिकडे- तिकडची अजून तिकडे, कोणाला चिंता, कोणाला काळजी, कोणाला केवळ मजा..... लक्षात घेऊ काय झाले? मागे किती प्रश्न आहेत. यावरचे सहभागी जण २ जणांचे आयुष्य ठरवूच शकतात. कारण समाजबळ आणि आघात काय असतो? विचार करुया. काय झाले ते काहीही होवो. काहीही होवो हे त्यांच्यासाठी असते, ज्यांची समजच खूप कमी असते. त्यांत वाईट काहीच नसते. आपली समज आपल्याच गतीने वाढणे, हा खरा विकास. बाकी चलन फुगवटा. अनेकदा गाव कोणते, आणि बातम्या कुठपर्यंत. गोष्ट फार चांगली. पण चूकीचे, खराब जितके वेगात प्रसारित होते, तितके चांगले का नाही? विचार आणि प्रश्न.....काय झाले?

Date:- ०५/०२/२६

आभास

आभास होण्याचे वय वेगळे असते. तिथून व्यक्तिमत्व घडत जाते. स्वप्नांच्या दुनियेने कितीही खुणावले तरी परिस्थिती काय याचाच अंदाज त्याहीपेक्षा समज ज्याची जास्त असते, ती व्यक्ती कधी आभासात राहतच नाही. आभास निर्माण करु

शकते. लहान मुलांच्या तलम, हळूवार जगात आपण जागा मिळवण्यासाठी फार कष्ट घ्यावे लागतात. तिथे आभास कामाला येत नाही. काही केल्यासारखे दाखवत जगणं हे काहींना योग्य वाटते. ती त्यांची जीवनशैली बनून जाते. लहान मुले दडपणाखाली असंच काही करत असतात. मुखवटे चढवत जीवन जगावं लागतं. अशी काहींची शिकवणूक असते. त्याला कारण असते. जीवन ही शीडी आहे असा काहींचा समज आहे. पण तो एक चढ आणि नंतर एक उतार आहे हे वय समजवतं, पण आपल्याला कधीच मान्य होत नाही. अनेक शिखरं ज्याने सरासरा चढली असे जे दिसते, ते क्वचितच एकट्याचे काम असेल. लहान मूल वाढतांनाच समजले, हे एकटे वाढू शकते का? मग माणसांना आभासी दुनिया करावी तरी का लागते? जितके आपण आभासांपासून दूर असू तितके वास्तव जीवन समजायला लागते. स्वप्न हे आभास नसतात. ते उदात्त विचार असू शकतात ते साकारले जावू शकतात हा आशावाद असतो, आणि स्वप्न साकारलेच जातील हा आभास असतो. लहान मुलांनी तीव्र वास्तववाद शिकावा की आशावाद शिकावा की आभासी दुनियेत जगावं हे कोण सांगणार? फक्त हा एक शब्द किती विविध अर्थाने जगण्याचे पैलू दाखवतो, हे नेमके जगतांना समजते. रटाळ वाटणारा तास हे सुचवत असतो की शिक्षकांना तेवढे शिकवायचे नाही. कारण शिक्षकांचं तिथे मनच उपस्थित नाही. रटाळ होता सिनेमा.....रटाळ बडबड चालली आहे .....वगैरे रटाळ गोष्टी आपण तिथे उपस्थितच नसल्याचे लक्षण असते. सामाजिक सामीलकी..... किंवा बांधिलकी हे वगैरे प्रकार तरूण मुलांना फारच रटाळ वाटतात. कारण छोट्या गोष्टींमध्ये प्रचंड संघर्ष करुन काही करावे लागले की सगळ्या गोष्टी रटाळ सदरात येतात. कारण आभासी दुनियेत जगण्याची सोयच नाही ना? असा हा अनेक स्तरावरचा आभास.....जितका या एका शब्दाचा अभ्यास कराल लक्षात येईल जीवनात किती ठिकाणी भेटतो तो. करायचा अभ्यास?

०६/०२/२६

शीडी

लहानपणी नक्की कोणाला फालो केले की आपल्या मनाप्रमाणे होईल, असे बरच मुलांची गणिते निवासात चालू असतात. याचे कारण पालकांचे मुलांबाबत अभ्यास आणि एकमत नसले म्हणजे मुले आपला अभ्यास सोडून त्यांच्याबाबत गणिते मांडण्यात आयुष्य घालवतात. त्याचबरोबर त्यांना कोणीतरी आवडते. हे निवासातले समाजात पण लागूच पडते. समाजातील कोणत्या नावाजलेल्या व्यक्तीला आपण संपर्क करायचा म्हणजे आपले चांगले होईल या प्रकाराने बरेच लोक शीडी शोधतात. ही शीडी शोधण्याचे कारण म्हणजे समाजात कामा़साठी

नसलेली कोणतीही व्यवसायिकता, किंवा फक्त असलेली व्यावसायिकता. यांच्या मध्ये चालणे म्हणजे व्यवसायिक मानवता! ऐकला आहे असा कोणता शब्द? व्यावसायिकता आहे, संवेदनशीलता आहे. माणसाला जगण्यासाठी दयनीय व्हावे लागते ही बाब चांगली नसते. अशी व्यक्ती कर्मरत कधीच नसते. याचे प्रतिबिंब बालवयात दिसते. लहानपणापासून काही मिळण्यासाठी मुले पालकांच्या पाठीमागे फिरत राहिले की आपल्याला पण काही काम दिले आहे, किंवा आपले पण काही काम असू शकते हे मुलांच्या येईल लक्षात. हिच मुले पुढे मोठे होतात, हे काम सोडून मोठ्यांच्या मागे लागतात. आणि मनासारखे नाही झाले की मग राजकारण कसे वाईट असे ताशेरे ओढले जातात. लहानपणीच याच्या खुणा सापडतील. कोणते पालक चांगले? आई की वडील? कोण, केव्हा, कशासाठी कोणाची किती वेळा बाजू घेतात याची गणितेची गणिते मांडली जातात. तोंडी २७+३५ विचारले तर बोचरं तोंड दाखवतात, पण हिशोब मनात ठेवतात. आयुष्यात शीडी शोधावी लागावी याच्याइतके सामाजिक दुर्दैव नाही. तसेच निवासात कोण माझी बाजू घेईल याचा हिशोब करण्यात क्षण न क्षण जावा यापेक्षा वाईट दुसरे काहीच नाही. तुम्ही मोठे समाजसुधारक वाया चालले आहे. असे काहीबाही ऐकत आपण चार भिंतींचा आसरा घेऊन परखडपणे विचार मांडणे याच्यापेक्षा छान सामाजिक सुरक्षितता दुसरी नाही. गोष्ट शीडीची आहे. शीडीपेक्षा आपली वर्तुळे बरी. ती लहान मुलांना नाही समजली तरी एकातून दुसऱ्यात काही विशिष्ट कारणासाठी जाण्याची सोय हवी. नाही का? शीडी ही संकल्पना शिकू नका. सीधे राहणं जीवनात खूप आनंद, यश मिळवून देतं. विचार करूया व्यवसायिक संवेदनशीलता जपता येईल का याची?

Date :- ०७/०२/२६

आनंदाचा कोष

लहान मुलांना बघितले की लक्षात येतं किती प्रतिकूल परिस्थितीत पण ते आनंदी राहतात. कसे काय? एक एक आनंदाचे मार्ग दिसले तरी त्यांच्यात निरागसता का असते? याचे कारण म्हणजे व्यवहाराचा स्पर्श त्यांना झालेला नसतो. मोठ्या वयात अजिबात नाती जपता येत नाही अशी जिथे परिस्थिती निर्माण होते, तिथे एक तर सामाजिक जबाबदार्या आपल्याकडेच आपण फार ठेवून घेतल्या, अनेक वर्षात अनेक जण भेटले, पण शिकवणूक कोणाला दिली नाही किंवा कोणी तसं सापडलंच नाही, किंवा जीवनात व्यवहारच फक्त नीट शिकलो. व्यवहार ज्याला जमले नाही त्याला पण नाती नसतातच. कारण कुठे कमी दिलं गेलं, कुठे जास्त, कुठे काहीच दिले नाही हे कुठे कळते त्यांना? काही माणसे यातून खूप दुखावून

नंतर व्यवहार शिकायला जातात. नातं गोष्टच ही शिवणकामासारखी आहे. एक एक धागा घातला की वस्त्र विणलं जातं, कशिदा काम पूर्ण होतं. नाते काय याहून वेगळे असतात? कधी कुठे फक्त वेळ द्यावा इतकी साधी अपेक्षा असते, कुठे आपण अमूक घेतलं होतं, अमूक मिळायला हवं होतं, कुठे निदान तुमच्या गाण्याचा कार्यक्रम कळायला हवा होता, कुठे एक दिवस तरी घरी या, कधी बाळ म्हणतं तेव्हाच तोच खाऊ बनवणं, किती गोष्टी आहेत? नाती अशी जपली जातात, ज्या दिवशी अपेक्षा, इच्छा समजतात, जपल्या जातात. पण अशी पण काही कुटुंबे असतात/परिवार असतात, जे फक्त भेटीची आशा ठेवतात. का बरं? जीवनाचा वेग, जबाबदाऱ्या, जवळ असणारा, नसणारा पैसा या गोष्टी ते समजतात. याहीपेक्षा अनेकांजवळ भरपूर आहे, भरपूर मिळतं पण प्रेम जाणवत नाही हे पण लक्षात येतं. कारण ती एक बाब अशी आहे की मागून मिळत नाही. जितकी मागू तितकी ती आपल्यापासून दूर जाते. मग आपला आनंदाचा कोष निर्माण करायचा तरी कसा? तुम्हाला खोटं वाटेल, पण आपल्या कामातली समरसता खूप आनंदी ठेवते आपल्याला. सुखाचा शोध घेऊन माणूस थकला की त्याला/तिला तत्वज्ञान थोडं बरं वाटतं. तत्वज्ञान म्हणजे काही केवळ त्याग नव्हे. तर काही अनूभवातून निर्माण झालेले अनेकांना मान्य असलेले जीवनसत्त्य. जोपर्यंत आपल्या जीवनात अशी माणसे येत नाही, किंवा ते सत्य समजले पण अनूभवले नाही तोपर्यंत आपल्याला या गोष्टी खूप जड/बोजड किंवा अवघड वाटतात. पण जेव्हा ते समजते तेव्हा आपला आनंदाचा कोष तयार होतो. स्वतःची काळजीच न घेणं किंवा स्वतःला पण विसरुन जाणं ही बाब पण घडते त्यात. कसल्या तरी विचारात/शोधात इतके स्वतःला विसरलो पण आनंदी होतो, कारण काहीतरी शाश्वत शोधत होतो. सतत बदलणाऱ्या गोष्टी माणसाला असुरक्षिततेची जाणीव देतात. मग सुरक्षितता येते कुठून? काही जीवनमूल्यातून. ती शोधावी लागतात. लहान मुलांना कुठे समजते हे सगळे? म्हणून आपल्या परिस्थितीप्रमाणे त्यांना अतिशय आनंदी ठेवणं, आपल्या सुखासाठी त्यांचा वापर न करणे, त्यांना चांगली शिकवणूक देणे एवढेच करु शकतो आपण. पण एवढे करुनही ती मुले खूप जबाबदार आणि आनंदी राहतात. याचा अर्थ अडथळे नकोच का जीवनात? तर ते येतातच. पण आपण निर्माण करणार नाही , तर जे होईल ते उत्तमाकडे नेईल एवढी दक्षता घ्यायला हवी. अशा परिस्थिती आपण सतत निर्माण केली तर आपण आनंदी राहतो आणि इतरांना पण ठेवतो- परिस्थिती निरपेक्ष.चला आपापले आनंदाचे कोष तपासूया.

Date :- ०८/०२/२६

आमची मर्जी

सतत दुसऱ्याच्या मर्जीने वागावे लागते हे काहींचे, अनेकाचे जीवन असते. तुला काही कळत नाही, तुला काही जमत नाही, तुझे अमके चांगले, तमके चांगले नाही इ निवासात, तर आफिसमध्ये एवढी साधी गोष्ट तुम्हाला जमत नाही, किती तरी वेळा सांगावे लागते, तुमच्या कामाच्या दिवसांइतक्या तुमच्या सुट्या असतात, अशी अनेक बोलणी अनेक दिवस कामाच्या ठिकाणी गुपचूप ऐकून घेऊन काही माणसे तरी इमाने इतबारे काम करतात. जाणीव ठेवणारे ठेवतात. म्हणून अशा व्यक्तींच्या सामाजिक संघटनेचे, कामाचे बाल बाकी होऊ शकते का? आमची मर्जी म्हणजे काय? बुध्दीमत्ता चौफेर दिशेने एखाद्याची बहरतच नाही, तरी बॉस आहे तुमचा ही बाब काही डोक्यातून जात नाही. किती बोलतो आपण समोरच्याला हे लक्षात काही येतच नाही. लक्षात ठेवा, जेव्हा जेव्हा आपण निरपेक्षतेने बोलत नाही तेव्हा प्रत्येक वेळेला आपली शक्ती/उर्जा कमी झालेली असते. पेनात रिफील टाकतो ना? तशी आमची मर्जी दुसऱ्याला दाखवण्यापेक्षा लो एनर्जी कबूल करून स्वतःचे रिफील मार्ग शोधावे, अत्यंत सोपे, स्वस्त, परवडणारे, दुसऱ्याला त्रास न देणारे. सामाजिक संस्थेत काम करणाऱ्यांनी नीट लक्षात ठेवावे, टरब्यूलन्स निर्माण होतो म्हणजे गाडी हाकता येत नाही, जी माणसे इमानेइतबारे कामे करता आहेत, त्यांना खूप गृहित धरले जाते आहे, ज्या माणसांना वाजवीपेक्षा जास्त आणि वेळेआधीच सर्व मिळत आहे तिथे आमची मर्जी हेच तर झाले, नाही का? एखादे पद मिळाले की आपल्याला फार आनंद वाटतो, पण क्वचितच जबाबदारी वाटते. तर काहींना आनंदच वाटत नाही, नूसतीच जबाबदारी वाटते. सामाजिक संस्था चालवताना आमची मर्जी करु नका. माणसांना पदाच्या नावाखाली कधीच दुखवू नका. कारण केवळ संस्थांची, प्रमुखांची नावे ऐकून ती वर्षोनुवर्षे कामासाठी आस ठेवून मग कामाला आलेली असतात. अशाच माणसांना आपले म्हणून रागवायचे हे ते पण मान्य करतात, पण त्यांच्या कामावर परिणाम होतोच होतो. कारण प्रत्येकालाच law Of conservation of energy जीवनात आणायचा कसा माहित नसते. अशी काही माणसे प्रचंड दुखावलेली असल्याने त्यांचे काम सतत सुमार दर्जाचे पुढे येते. काही माणसे सरळ काम सोडून जातात. मिळवलेले ज्ञान, त्यांच्या उपयोजना, त्यातून सामाजिक काम, त्यात संघभावना हे प्रेमाचा गुलकंद खाण्या इतकेच कठीण आहे. काय वाटते आमची मर्जी बद्दल?

Date :- ०९/०२/२६

मस्काचस्क्याची गोष्ट

लहान वयात जर जास्त दबावतंत्राचा वापर केला तर मुलांना दोन वाईट सवयी लागतात, एक वेळ प्रसंग बघून थापा मारणे आणि दुसरे सतत लाडीगोडी लावणे.

एखाद्याला दिला जाणारा आदर, एखाद्याच्या शब्दाबाहेर न जाणं, वचन देणं, वचन पाळणे या फार मोठ्या गोष्टी जमतील की नाही याचा नंतर विचार करु. पण थापा मारणे आणि लाडीगोडी लावणे या सवयी पुढच्या आयुष्यात किती वाईट असतात हे लक्षात येतंच जाते. सवयी या जुनाट असतात. त्या जात नाही. कोणाला कशासाठी, किती वेळा, कुठे कुठे आपण थापा मारतो हे ज्याला ही सवय अजिबात नाही त्याला लक्षात येतेच. आपले माणूस म्हणून आपण किती ठिकाणी सोडून देतो, असे आपल्याला वाटते. पण तसे नसते. हळूहळू आपल्याला त्या गोष्टीची चीड येत जाते. ज्याला आदर ही गोष्ट पावाशी खातात की वड्याशी हे नीट माहिती असते त्याला मस्काचस्का नीट लक्षात येतो. आपल्या व्यवसायिक जीवनात प्रगती करायची असेल तर आपण सर्वप्रथम या दोन गोष्टींचा कधीच अंगिकार करायचा नाही. केलेला असेल तर तो सोडून द्यावा. कदाचित काही ठिकाणी या सवयी खपवून घेतल्या जातील ही. पण कुठे तरी यामुळे अडचण येईलच. अनेक वरिष्ठ अधिकारींना खोट्या स्तुतीची सवय असते. खरी गोष्ट कधी कोणाच्या नजरेला आलेलीच नसते. खरे सांगायचे तर कोणी अशा आपसात चर्चा केलेल्या असतात. बर्याच अधिकारींना ते माहीत पण असते. पण सवय झालेली असते, खोट्या स्तुतीची. मग आफिसचा दर्जा घसरतो आहे हे लक्षात येते, त्यांना नाराजी येते पण माणसांना पण थापा मारणे, चलता है, खोटी स्तुती करणे या अंतर्गत वर्षानुवर्षे माणसे टिकवली जातात. आपण जिथे काम करतो तिथे पडताळून पहा. कामाच्या ठिकाणच्या आपल्या सवयी बघा. न बोलवता वरिष्ठांकडे आपले जाण्याचे प्रमाण बघा. लक्षात येईल, ज्याला सामाजिक संस्था म्हणतात, तिथेही परिवारच असतो. चांगली गोष्ट आहे परिवार भावना असेल तर. पण निदान सामाजिक संस्था या संकल्पनेत आपली जबाबदारी आणि आपल्याला एवढे पथ्य पाळता येते. पण परिवार या संकल्पनेत फार मोठी जबाबदारी असते. घेतो का आपण अशा जबाबदाऱ्या? परिवार संकल्पनेत एकाचं नुकसान झालं तर मन अस्वस्थ होतं, काही चूकल़ तर मन शांत राहत नाही..... म्हणजे आपण सामाजिक संस्था पण चालवत नाही, परिवार पण चालवत नाही. मग आपले उत्तरदायित्व कोणाला आहे? साधं आणि सरळ कोणालाच नाही. जीवनात आलेल्या, येणाऱ्या दुःखाला माणसे कारणे विचारतात. पण माझे कधी कुठे काही चूकले का हे क्वचितच स्वतःला विचारतात. दुसऱ्याला कबूली जबाब ही गोष्ट प्रचंड आत्मप्रतिमेला दुखापत असते. पण स्वतःचाच कबूली जबाब शांततेजवळ नेणारा असतो. दुसरा तुम्हाला कधीच सोडणार नाही. पण स्वतःसाठी काय? म्हणून मस्का चस्का आणि थापा मारणे या गोष्टी अंगिकारायच्या की सोडायच्या.....?

Date :- १०/०२/२६

पुढाकार घेणे

समाजात अनेक बुद्धीमंत असतांना समाज मागे कसा काय? असा प्रश्न मनात आल्यावर पुढाकार हा विषय समोर आला. समाजात काही चांगली टुम निघाली की भली माणसे घेतात पुढाकार. त्यांना विषयांचे गांभीर्य समजते. पण घेतलेल्या पुढाकाराचे परिणाम चाखले की भली, सरळसोट माणसे घाबरतात. आदर, सन्मान तर दूर पण पुढाकार घेऊन केलेल्या गोष्टी नीट चालत नाही हे त्यांना लक्षात येते. मग अशी माणसे सामाजिक संस्थांपासून दूरावतात. पण हिचं त्यांची मोठी चूक असते. पडद्यामागचे सूत्रधार बनून आपल्यावर खरं प्रेम, आदर असणाऱ्या मंडळींबरोबर कार्यरत असणे फार महत्वाचे असते. तसे नाही केले तर चूकीच्या गोष्टी किती पुढे येतील याची जाणीव आपण ठेवणार का? पुढाकार म्हणजे पुढे पुढे करणे नव्हे. समाजातील काही माणसे आपल्या नादात जगतात. त्यांना बरेच विषय माहितही नसतात. पण ते योग्य वेळी योग्य मत देतात. अशा माणसांना वेळीच सांभाळणे हा एक प्रकारचा पुढाकारच आहे. बरेचदा सगळे समजून आपण वेगवेगळ्या गोष्टीत अनेकदा गप्प बसतो. ही चूक गोष्ट आहे. पुढाकार समजणाऱ्या व्यक्तींनी घ्यायचा असतो, त्यासाठी सर्वांनी साथ द्यायची असते. बरेचदा बघूया गंमत म्हणून समजत असून काही माणसे गप्प राहतात. आपल्या बाबतीत तर असे घडले होते, बघू काय होते....समज नसल्याचे लक्षण असते. समाजात वावरले की समज शक्ती खूप वाढते हा गैरसमज आहे. जाणकार व्यक्तींच्या सहवासात राहण्याने समज वाढते. प्रत्येक गोष्टीबाबत सगळ्यांची जाणीव, ज्ञान सारखे असेल असे नाही. ती गोष्ट प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक विषयाबाबत वेगळी असते. म्हणून समजले ते मांडणे हे खूप महत्त्वाचे असते. त्याचा स्वीकार किंवा अस्विकार ही किती पुढची गोष्ट आहे. आधी विचारांच्या मांडणीला महत्त्व आहे. मग ते समजून पुढाकाराला महत्त्व आहे. आज माझ्या देशात इतके राजकीय पक्ष बघून माझे मन खूप विष्षण्ण झाले. कोणत्याही विषयावर एकमत न होता भरपूर वेळ घालविण्याची ही पद्धत आहे का? वेळ घालवायला इतक्या छान सामाजिक परंपरा असतांना इतके पक्ष आपल्या उदात्त आणि बुद्धीप्रामाण्यवादी समाजाला शोभनीय आहेत का? माझी राजकीय समज कितीही कमी असली तरी निर्भीडपणे मी फक्त दोनच पक्षांचा समाजातील स्विकार मानते. सत्तारूढ पक्ष आणि विरोधी/त्याहीपेक्षा सूचक पक्ष. ज्याचे काम नीट ऐकणे. आपल्या पक्षात चर्चा करणे, गोष्टी समजून घेणे.....काय बिघडेल या गोष्टींनी? आज जे चालले आहे ते काय फार चांगले चालले आहे? पुढाकाराने मी केवळ लेख नाही तर मी माझ्या भारत देशाच्या

राजकारणासाठी दोनच पक्षांचा पुरस्कार करते. मी माझ्या देशाची नागरिक म्हणून तो पुढाकार घेते. तेच माझे माझ्या देशासाठी महत्त्वपूर्ण मतदान आहे.

Date :- ११/०२/२६

कामातील चोखता आणि उत्तरदायित्व

कामातली व्यावसायिकता आणि संवेदनशीलता/मानवता कशी जपली जाईल? असा प्रश्न मला विविध ठिकाणी काम केल्यानंतर पडला. शिक्षकी पेशा अगदी बालवयोगट ते प्रोफेशनल शिक्षण यात आपण तास घेतला नाही तर तासांवर दुसरे शिक्षक नेमतात. अनेक ठिकाणी कोणी न कोणी आपली जबाबदारी सांभाळतं. या गोष्टीव्दारे जबाबदार माणसाचे एक व्यक्तिमत्त्व घडत असतं. काही जण स्वतःला आणि जबाबदाऱ्या सांभाळण्याच्या थोटात अत्यंत अहंकारी वाटतात. त्यांच्या बरोबर काम करणारी माणसे त्यांना फार घाबरतात. काही माणसे माणसांशी फटकून वागत नाही, पण खूप एकटेपणा अनूभवतात, कारण त्यांच्यापर्यंत कोणी पोहचूच शकत नाही. ते एक चांगले अधिकारी, शिक्षक, आई म्हणून ओळखले जातात. पण कोणीच त्यांना फारसे समजू शकत नाही. अनेक कामात चोख असणाऱ्यांना हाताखाली माणसे कधीच हाताळता येत नाही. त्यांना माणसे कधीच स्विकारता येत नाही. त्यांना फक्त चोख काम आवडते. ते कर्तव्यदक्ष व्यक्ती म्हणून ओळखले जातात, पण लोकांच्या भावना त्यांना त्यांच्या कार्यकाळात कधीच समजत नाही. आपापले कामाचे क्षेत्र हेच महत्वपूर्ण हे त्यांना वाटते. ही गोष्ट दखल घेण्यासारखी आहे. कारण अनेक माणसे एकत्र येऊन काम करतात, तेव्हा ते काम अनेकांना एकत्रित करण्याचे जेवढे महत्त्व आहे, तितकेच त्या सर्वांचे प्रयत्न, त्यांची जबाबदारी, त्यांचे उत्तरदायित्व. जी व्यक्ती प्रमुखत्व सांभाळते, बरेच ठिकाणी आता काय कामापुरते जबाबदारी दिली आहे म्हणून टाकटूक करायची, असे पण होते. या पदांनाच काही अर्थ राहिला नाही असे अनेकांना वाटते. म्हणून हे पद न मिळेल तितके बरे अशी पण भावना अनेकांची होते. कोणावर तरी हक्क गाजवावासा वाटते ही एक आदिम भावना आहे. तर सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे ही नवचळवळ आहे. जिथे काही व्यक्ती मागे राहतात, तिथे अनेक कारणे असतात. बरेचदा ग्रुपमधले काम त्यांना नीट समजलेलेच नसते, बरेचदा असे काम जमेल हा आत्मविश्वासच नसतो, बरेचदा काम करतांना कोणाबरोबर नेमके कामाचा कोणता भाग सोबत करायचा ते लक्षात येत नाही. ते लक्षात आलेच तर इतरांचे मत असते हे आपण नको करायला. अशा अनेक गोष्टी लोकांना सोबत घेऊन काम करतांना असतात. जेव्हा माणसे जबाबदारीचे आणि गोष्टी समजून काम करतात, तेव्हा प्रमुख पदाला काहीच अर्थ राहिलेला नाही, असे नसते. जर

हक्क/अधिकार गाजविणे हा प्रकार नसेल तर प्रमुख पदाला जबाबदारी नेहमीच असते. मागची पिढी असो किंवा कोणी बॉस म्हणणे एवढेच असते, भरपूर ऐकून घ्या, नंतर करा काय हवे ते. कामे करता करता जबाबदारी घेता घेता मन किती घट्ट होते हे कधीच लक्षात येत नाही. असे बरेचदा होते, काही तथ्य आहे का बोलण्यात असे म्हणत म्हणत आपण त्या तथ्य नसलेल्या गोष्टीत सामील होत असतो. अनेकदा एखाद्यासाठी खूप महत्वपूर्ण असलेली गोष्ट लपवून ठेवलेली असते, उघडकीला येत नाही, आणली जात नाही त्यांची कारणे कोणी समजून घेत नाही. पण प्रमुखपद फक्त दिले म्हणून नसते. तर गोष्ट समजते. अनेकांना सांगून सांगून येत नाही. प्रमुख पदाचा हट्ट आणि प्रमुखपद मिळणे किती निराळे असते. हे समजत जातांना खूप वेळ जातो. सामाजिक जाणिवेतून खूप लहान लहान मुले खूप मोठ्या गोष्टी करायला लागतात. चूकीचे कधीच नसते ते. कामातील चोखपणा, उत्तरदायित्व आणि तरी संवेदनशीलता जपत पुढे सरकणे एक प्रवास असतो.

Date:- १२/०२/२६

थाट बाट

समाजात कुठे लग्न सोहळा असतो, कुठे बारसं असतं, कुठे निरोप समारंभ असतो. आता समाजात ते ऐपतीप्रमाणे होत असतं. आता या समारंभात हौशेगवशे सर्वच असतात. यात येतात सर्व स्त्रीया आणि बच्चे कंपनी. समारंभ कसा झाला याच्या चर्चा प्रदीर्घ काळ चालतात. अशा प्रकारच्या समारंभाची ज्यांना सवय असते, त्यांना वेगळे काही वाटतच नाही. पण असे समारंभ जे प्रथमच बघतात त्यांना फार अप्रूप वाटते. बरं तिथे गाडी थांबते असे नाही. तर आपण पण असा कार्यक्रम करावा असे मनसूबे रचायला सुरुवात होते. एखादा कार्यक्रम करतात पण असा. पण होते असे की कार्यक्रमाची तुलना पाहिलेल्या कार्यक्रमाशी होते. मनाला बरे काही वाटत नाही. आपण जेव्हा सचोटीने पैसा कमवितो, तेव्हा त्या पैशातून केलेल्या कोणत्याही कार्यक्रमाचे आपल्याला अपूर्व समाधान मिळायला हवे. ते मिळत नसले तर आपण का, कशासाठी करतो हे पण आपण लक्षात घेत नाही. माणसे कार्यक्रम करतात तर खरे, पण त्या़च्यासारखे झाले नाही म्हणून किती नाराज असतो? हे घडायला नको. आपणच आपल्याच कष्टातून केलेल्या कार्यक्रमाचा एक पैशाचा आनंद आपण घेऊ शकलो नाही तर आपण कमवले तरी काय? ही बाब गाण्याला वन्स मोअर मिळत नाही, किंवा चित्र मनासारखे रेखाटता आले नाही म्हणून पुन्हा काढणे हा प्रकार होत नाही. म्हणजे काही भावना कशा असतात असा विचार आला. पण ते सर्वांसाठी नाही. हा भाग आपला आपण शोधायला पाहिजे. समर्थ रामदास स्वामी म्हणतात जगी सर्व सुखी असा कोण आहे? असे म्हणत

असतांनाच सुखासाठी नवे नवे शोध लागत असतात. पण माणूस परत दुःखी होतो. का? तर मनाची प्रचंड धाव. तीसुद्धा सतत बाहेरची. अमूक मिळाले की सुख अशी व्याख्या खरी आहे. पण आपण ते कुठे वाढवत नेतो आपल्यालाही कळत नाही. ज्या दिवशी प्रत्येकाला समजेल की सचोटीने वागण्यातून जो आनंद होतो, तो कोणत्याही प्रकाराने कधीच होत नाही. माणसाने कधीच विसरू नये कष्ट करून काहीही मिळाले की कष्ट न करता मिळाल्या पेक्षा जास्त असतो- शिक्षक/गुरू सोडून. ते शोधून सापडले नाही की शिकणे जाऊच द्या चिडचिड होते. पण संपत्ती कष्टाची असली की खूप चांगले वाटते. कमी असली आणि दुसऱ्याचे काही बघितले की आनितीकडे झुकते काहींबाबत घडते. हे आपल्याला शिकायचे असते. कष्ट करून सामान्य स्तर परवडेल. पण अनीती नाही. ती सुखाने झोपू देत नाही. त्यापुढे आपण कष्टाने काहीही केले तरी आपण सतत दुसरा काय करतै हे पाहतो. हे ज्ञानाबाबत पण आहे. आपण दुसऱ्याचे घेतो. पण ते तसे नमूद करत नाही. यात बरेचदा असे घडते की तुम्ही काही केलेच नाही, असे म्हणून अनेकांचे शिक्षण, काम पुढे जात नाही. म्हणून काही माणसे घाबरून दुसऱ्याचे नावही नमूद करत नाही, इतकी पुढे जायची घाई असते. मजा म्हणजे आपण तर फारसे पुढे गेलोच नाही, हे नंतर लक्षात येते. आहे की नाही मजा? लग्न, बारसे, निवृत्ती असे कार्यक्रम मात्र सगळ्यांनी प्रामाणिकपणे केले असतील तर त्याचा आनंद जरूर मनात साठवावा. तुलना करत जगू नये. थाट बाट असा असावा.

Date :- १३/०२/२६

संगीत

मला असे वाटायला लागले होते की कोणतेही ज्ञान हे दुःखाच्या जाणीवेत जास्त निर्माण होते किंवा आपण ते वापरतो. आता माझे संगीत याबाबत असे मत आहे की ही एक गोष्ट सुख दुःख निरपेक्ष आहे. सुखात सुध्दा ही गोष्ट हवीशी वाटते आणि दुःखात सुध्दा. फरक हा आहे की प्रत्येक वेळेला नाही. जर आपण दुःखद भावना अनूभवतो आहोत तर संगीत आवडणाऱ्या व्यक्तीला पण त्यावेळेला कधी कधी संगीत आवडतं नाही. इतके की गायन आवडणारी व्यक्ती सुध्दा म्हणते मी यापुढे कधीच गाणार नाही. तर आनंदाच्या क्षणात त्याच व्यक्तीला गाणे ऐकवले तर ती हुरळून जाते, आनंदाने ते ऐकते. सुख दुःखात प्रत्येक वेळी हमखास कामाला येणारे एकच शस्त्र मला सापडले. ते म्हणजे आवडते कर्म. (दुसऱ्याला त्रास देणे सोडून) कोणी म्हणेल माझ्या गायनाने कोणाला त्रास होतो वगैरे. तर मला वाटते तो समोरच्याचा प्रश्न आहे. दुसऱ्याला हेतूपुरस्सर चिडवणे वगैरे काही कर्मात येत नाही. तसे संगीत. आमच्या शिक्षीका बालाजी वाले मॅडमने वर्गात लिहूनच ठेवले

होते, " ऱगीत है ईश्वर की शक्ती, हर स्वर मे बस है राम, रागी जो सुनाये रागिणी रोगी को मिले आराम" आणि हे खरे आहे. कारण एक काळ होता मी खरंच रोगी होते. पण मी संगीत ऐकले, म्हटले की मला खूप बरे वाटायचे, जगण्याची उमेद फुललेल्या फुलासारखी असायची. हिच बाब तत्वज्ञानाची पुस्तके, लेखन मला संजीवनी आणायचे. मग रोग दुरुस्त का नाही होत लवकर? तर स्वतःची ओळख....मी नेमक्या कोणत्या कारणांनी माझ्या आवडी पासून खूप दुर जाते/ जातो? माझ्या आवडीची माणसे, माझ्या आवडीचे विषय .....हे आत्मज्ञान आहे. स्वतःचेच स्वतःबद्दलचे ज्ञान कधीच फुकट मिळत नाही. आपल्याला फार कष्ट घ्यावे लागतात. तेव्हा थोडेसे समजते. तसे संगीत. हा विषय खूप मोठा आहे आणि माझे ज्ञान फार थोडके आहे. पण मी माझा अनूभव नोंदवला. दर वेळीच संगीत आपल्याला खुद्द गायन करणाऱ्या व्यक्तीला पण आवडेलच असे नाही. पण ती वेळ आपल्या दुःखद क्षणांची वेळ आहे, एवढेच सत्य असते. अन्यथा संगीतात जादू आहे हे खोटे नाही. अनेक कमाल गाणी रचली कशी, कमाल गायली कशी हे खरोखरच अद्भुत आहे. तितके समर्पण कलाकार आणि गुरूजनांमध्ये आहे. पण त्याहून आश्चर्याची गोष्ट ही आहे की असे संगीतही ऐकून हे नको आता असे वाटणे. कमाल आहे ना? विचारात पाडतेच हे. कोणती ही गोष्ट की जिथे आवड ही नावड ठरते**?** कारणे असतात.....शोधली तरच दिसतात.....

Date :- १४/०२/२६

प्रेमाचा दिवस

1) पारिजातकाची फुल

लहानपणी छोट्या, छोट्या सुंदर पारिजातकाच्या फुलांचा सडा पडलेला पाहिला. इतकी नाजुक आणि सुंदर फुले बघून मन मोहरुन गेलं. जितके सुंदर, कोमल, तितकेच सुवासिक. पडणाऱ्या सड्या सारखी मोठी झाली, आणि सगळे किती लहान आहे, असे वाटायला लागले. आपल आपल काम करता करता, शाळा/ कालेज यात न शिकवता इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिकवायला लागले. खूप दूरुन आलेली मुले, मुली मला माझे मुलंच वाटायचे. मी विवाहित नव्हते. मी माझ्या परीने त्यांना मला जे माहिती होते, समजायचे ते सर्व सांगत असे. पण मला काळजी कुरतडायची. यांना नोकरी कुठे मिळेल, आता इथून पुढे कुठे जातील? विवाह चांगल्या ठिकाणी होईल का? होऊन मुले नीट राहतील ना? सगळं दूर लोटून मी रोजचं काम पुन्हा करायची. तोपर्यंत लहान मूलाला मी एक दिवस पण सांभाळले नव्हते. ज्या दिवशी माझ्या हातात २ लहान मुले आली, मला समजले

किती कठीण आहे यांना सांभाळणे. थोडंसं कोरडे ज्ञान बाजूला पडत जाते. मी हे काम नीट करणार नाही, अशी खात्री असेल म्हणून की काय बाळांना सांभाळणारी मी एकटी नव्हती. मला समजले मूल एकट्याचे नसतेच कधी. जबाबदारी म्हणून असू शकते. पण त्याचा लळा ते सर्वांना लावते. मला जे शक्य ते मी त्यांच्यासाठी केले. पण आपण मुलांना ओळखूच शकतो, असे मला आजही वाटत नाही. कारण मी तसा कोणताच प्रयत्न केला नाही. कारण मला सतत वाटते, मी तरी स्वतःला कुठे नीट समजते? एक गोष्ट केल्यावर समजते, हे नव्हतेच करायचे. मुले तर किती लहान असतात. आपण सगळे सांभाळतो, त्यांना? आपण सूचना देतो.....सतत, हे खरं, हे नको करु.....मग ते जगतील केव्हा? मला शैक्षणिक संस्था का आवडते हेच मी नाही सांगू शकत.....पण मुलं खूप निरागस असतात, आपण त्यांना सतत शिकवत असतो. शिकवावे जरुर पण फक्त सत्याचे ज्ञान.....जे आपल्यालाच माहीत नाही, ते त्यांना काय सांगणार? जमलंच तर जपावी पारिजातकाची फुलं खास.....माझ्या आणि सर्व शिक्षण स़स्थेतल्या सर्वांसाठी..... त्यांनी खूप समृध्द जीवन जगावं. इकडे तिकडे पळापळ करूनच समृध्द जीवन जगता येतं हा कदाचित आभास आहे. आत्मज्ञान आणि शिस्त समृध्द जीवन जगवते, असं वाटतं, आपण अभ्यास करायचा का?.....

२) इंदधनू आयुष्य

तो काळ, घरात आई, वडील, काका काकू, आजी, आजोबा, भावंडे आहेत. लहान बहिणीला जपणारे तिला समजत नाही म्हणून हसणारे पण तरी तिची काळजी घेणारे भावंडे आहेत. वडील, आजोबा यांच्या सुरक्षितेत काय करते? तर हातावर मेंदी काढते, तिच्या छोट्याश्या हातात पेन / रंग/कुंचला घेऊन चित्र काढणे, पायात घुंगरू बांधून ठेक्यात नाचते, तर मोठ्यांच्या सभेत शिरून मला पण समजते असा आव आणत सूत्रसंचलन करते....पण एक दिवस कोणी जीवनात आले की सगळं गळून पडून फुलले रे क्षण माझेचे गीत रंगते. हे गाणं, त्यांचे गायन मी अप्रतिम म्हणण्याने वेगळे काही होणार का? तर नाही. लोक काळाचा महिमा म्हणतात, कलियुग म्हणतात. पण ही अजरामर गाणी मला खुणावतात. लहान मुलीचे भावविश्व कसे घडते/घडावे आणि पुढे तिने कसे जपावे हे सांगणारे गाणे म्हणजे फुलले रे क्षण माझे. आयुष्यात प्रेमाची व्याख्या प्रत्येकाची वेगळी असेल. पण काहीतरी करणं म्हणजे प्रेम असतं. भावना जपणे म्हणजे तरी काय? लहानग्या बाळाला कोणी हसलं तरी त्याला कळतं, मला ठिक नाही वाटले. तो/ती ते जास्त स्पष्ट नाही करू शकत कारण नाही समजत. पण हा स्वतःचा हिंदोळा समजणं, तो जपत पुढे निघण़ हे आहे फुलले रे क्षण माझे. प्रत्येक स्त्री, प्रत्येक पुरुष वेगळा

आहे. जीवन एक आहे. जीवनाचे भाग – बालपण, यौवन, प्रौढत्व, वार्धक्य. पण ते समजणे वेगळं आहे. आपुलाच संवाद आपुल्याशी. दुसऱ्याशी होतो संवाद, कधी वाद. पण आयुष्य समग्रपणे समजायला लागतं ते प्रौढत्व. आकाशात इंद्रधनुष्य असतं. अशी वेळ येते की समाज कुठल्या दिशेने चालला आहे समजत तर नाही पण जाणवते खूप. करायचे काय? बालपणातच इंद्रधनुष्याचे सर्व रंग एकाच जीवनात काहींच्या उमटायला लागलेले असतात. पण मेंदीचे सूरही खुणावत असतात. व्हॅलेंटाईन स्पेशल लिहावे असे काही ठरलेलेच नव्हते. पण या वर्षी रोज एक लेख लिहूया, असे ठरवले होते. आणि अचानक मनात आले व्हेलेंटाईन डे ला तब्बल १४ लेख, सहज सरळ लिहिता येतील? कोणासाठी खरे ठरतील? लहानशा मुलींचं भावविश्व जरुर जरुर जपा. पूर्वीची संस्कृती टाकाऊ नाही. स्त्रीच्या आणि पुरुषांच्या नात्यांना विविध नावे दिली. ती थोडी माणसे जगतात. काका काकू, मामा मामी, आत्या मामी, वगैरे. वहिनी आणि दिराचं नातं नूसतंच थट्टेचे वगैरे. वहिनी आणि दिराचे नाते किती संवेदनशील असेल याचा विचार करावा. स्त्रीने पुढे ती मोठी होतांना हे सगळे प्रवास तिचे तिने करायचे आहे. या प्रवासात कोणा कोणाची साथ तिला मिळेल हे तिचे तिलाच समजेल. एवढंच आहे की ते तिने लक्षात ठेवायचे आहे. आपल्या जीवन प्रवासात तिने ते लक्षात ठेवले नाही तर तिथून भावना दुखावण्यास सुरूवात होते. संवाद ठेवूनही भावना दुखावल्या तर तो प्रवास योग्य नाही हे तिने समजावं. त्या प्रवासातल्या सुंदर साथीसाठी तिने आयुष्यभर तिच्या मनात जपावीत अशी मोरपिसे आणि असंख्य गाणी. जीवन एकेरी कधीच नसते. रोजच्या जीवनातील नाती इमानेइतबारे निभावलेल्या लोकांना कधीच अपराध भावना नसते. तर नात्यांचे ढोंग जेव्हा आपण करतो तेव्हा अपराध भावना निश्चित येते. नाते म्हणजे निभावणे असते. निभावण्यापेक्षा निर्ढावणे जिथे होते, तिथे थोडीच माणसे काम करतात. म्हणून नाती मोकळी राहत नाही, त्यांच्यात ओढ नसते. व्यवहार जमविलेले नसले की सुध्दा हे होते. म्हणून आयुष्य एकेरी नसते. नोकरीच करत असणारी स्त्री नात्यात वेळ देऊ शकत नाही, तर नोकरीच न करणाऱ्या स्त्रीला ते आयुष्य कसे असेल ते लक्षात येत नाही. नोकरी आणि नाती सांभाळू शकणारं आयुष्य हे इंद्रधनू आयुष्य आहे. तसेच ते तारेवरची कसरत आहे. जर नात्यांचे महत्वचं नसेल सर्वांना तर. मुलीला स्वतःच्या संकल्पना आणि व्यवहार समजले पाहिजे. मग नात्यात कोरडेपणा राहत नाही. नात्यांचे सोंग पण राहत नाही.

३) ती वेळ

लहानपणी शाळेत कशासाठी जातो हे अनेकांना समजत नसते. त्यामुळे वागण्याचा प्रश्न येतोच कुठे? झोप पूर्ण झालेली नसतांना बळेबळे उठून घाबरत घाबरत शाळेत जाणारी अनेक मुले बघितली. निवासातले न समजलेले प्रसंग, कुठे बाहेर बागडले असतील तर तिथले प्रसंग असे काही तरी मेंदूत असते. तसे असतांनाच मॅडमला/सरांना आ/आ किंवा a,b,c,d साधं नाही तर cursive शिकवायचे असते. मुलं, मुली एकत्र शाळा नाही? आश्चर्य आहे. असे म्हणण्याचे दिवस आहेत का हे? अशाच मनस्थितीत ती/तो.....थोडे थोडे समजतं.....पण मनात कशा कशाची प्रचंड भीती असते. शाळेत आणि निवासात मोकळे पण तरीही मर्यादा असलेले वातावरण असले तर ठिक....नाही तर मुलांचे मन फक्त भरकटत असते. इतरांना वाटते मनाला वळण लावायचे काम, दुसऱ्याचे! पण खरी गंमत इथेच आहे. मनाला वळण लावायचे काम स्वतःचे जास्त असते. लहान वयात कोण का आवडेल हे तर्काच्या बाहेर असते. मुळात आवड ही गोष्टच तार्किक नाही. मग १०वी बारावीत किंवा कालेजच्या वयात एखादी मैत्रीण/एखादा मित्र आवडला तर? फक्त मित्र/मैत्रिण म्हणुनच आवडला, का आवडला? घरात लग्नाची बोलणी चालली आहेत पण ती माहितीच नाही किंवा लग्नच ठरलेले आहे ते पण माहित नाही किंवा आपल्या घराची अमूक एक परंपरा आहे- आजी म्हणेल तसे...बाबा म्हणतील तेच....दादा म्हणेल तेच....ताईचा शब्द शेवटचा..... यापैकी कोणत्याच गावाला आपलं वाहन नसेल आणि स्वतःची स्वतःसाठी समज नसेल तर.....आज अनेक जण स्वतःला सांगितील कालेजमध्ये कोणीतरी आवडले होते, काही म्हणतील मागे होते, काही म्हणतील ती वेळच वाईट होती.....काहींच्या आयुष्यावर खोल परिणाम करणारी....काहींचे खूप छान मित्र मंडळ असेल.....कुठे तसे असल्याचा फक्त आभास असेल....त्यातही तो/ती खोटे का होईना जोडले जातील...".ती वेळ" करणार आपण कबूल? एखादा गर्भश्रीमंत नसतो, नसतो फार विद्वान किंवा रूपवान, एखादी नसते खूप कोमल किंवा सुंदर, फार मनमोकळी वगैरे.....पण काहीतरी आवडलं.....घडतं असं.....परिचय झाला की..... व्हॅलेंटाईन डे किती जोरात साजरे होतात, होत असत....माता पिता दिन साजरे होऊन वातावरण निर्माण होईल असे वाटते. पण खरं तर हे आहे की आवड ही असते ही कबूली न देण्यात भलाई असते का? कालेजातली मुले मुली मोठ्या उत्साहात व्हेलेंटाईन डे साजरा करतात तो क्लब डे पण असतो. राहतो हा क्लब आयुष्यभर? सुंदर, हळव्या आठवणींना अर्थशास्त्र आणि सन्मानाची झालर लागली की साधीच परिस्थितीतील क्लब मधली व्यक्ती टाळली जाते. जिच्या सोबत/त्यांच्यासोबत आयुष्य जगायचे आहे का हा प्रश्न मनात आलेला असतो, त्याला खूप वेगळा टर्न मिळालेला असतांनाच अचानक ती/तो समोर जोडीदाराबरोबर प्रगटला/प्रगटली

तर अवघडलेपणा येतो.....कारण खात्री नसते स्वीकार होईल का? कोणत्या काळात जगतात तुम्ही? संमतीशिवाय स्वतःच्या हिमतीवर लग्न केले, लग्न न करताच एकत्र राहिलो, लग्न करून, दुसऱ्या मैत्रिणीबरोबर राहतो..... एका वेळी अनेक मुलींना किंवा मुलांना शेंड्या लावतो.....चांगले प्रोफेसर/मॅडम शाळा/ कालेजात लेक्चरला आले की आता छान सूर जुळत तर होते असे वाटणारे मित्र मैत्रिणी फक्त competitive service circle मधले आहेत समजत जात..... किंवा आपला गाव स्वप्नांचा ही जाणीव होत जाते.....तुम्ही कोणत्या समजात? किंवा समाजातले? ती वेळ आपल्याला सांगते आपण नेमके कोणत्या विचार विश्वातले आहोत..... स्वतःच्या सांस्कृतिक विचारांच्या ओळखीचाच भाग..... सर्वांना स्वतःसाठी निदान समजलेलाच असेल, असे नाही.....ती वेळ किती महत्वाची असते.....प्रत्येकाच्या आयुष्यात. ऐकीवात असलेल्या गोष्टी.....लहान मुलांचे मन घडवणारे.....नवे वळण देणारे..... समृध्द नाती घडवणारे असावे....."**ती वेळ"...**....

४) पुनर्भेट

जीवन उन्हाळा, पावसाळा की हिवाळा विचारू नका हो....जीवनाचा लय, सूर, ताल प्रत्येक बाबतीतला, प्रत्येक वेळी ते ही योग्य वेळी, सतत योग्य व्यक्ती/ आवडत्या व्यक्तींसोबत तुम्हाला घालवता येतो का हो.....सगळे ऋतू लय झकास अशावेळी कर्मयोग सूचूच शकत नाही असे मला जाणवले. कर्मयोगावर येऊ नंतर. आता मी व्हेलेंटाईन स्पेशल सीरीज लिहित आहे. तर पुनर्भेट.....कोणाशी, केव्हा, कधी....कशासाठी? शाळेतला मित्र भेटेल किंवा मैत्रीण भेटेल अशा विचारात ही नसतो कधी कधी आपण. एखादे अत्यंत आवडते सर/मॅडम आपल्याबद्दल खूप चांगला विचार करत असतील किंवा आपलं हित कशात आहे हे आपल्यापेक्षा त्यांना समजत असेल याच्या गावीही नसणारे आपण! त्यांच्या चिंतनात आपण असतो. वर्षोनूवर्ष एकाच शाळेत/कालेजात काम करणाऱ्या शिक्षकांना नीट लक्षात ठेवणारे विद्यार्थी असतात हे शिक्षकांना माहितच नसते. हे सगळे क्षण पुनर्भेटीचे असतात. आपलीच माणसे आपल्याला नव्याने कळत जाणं ही पुनर्भेटच असते. सतत दुखावलं जातं, मीच सतत आणि किती काम करतो/ते याचं ओझं मनावर बाळगत पुन्हा तशा प्रकारे कामं करत राहणं या प्रकारात आपण स्वतःपासून आपल्यावर प्रेम करणाऱ्या माणसांपासून किती दूर जातो हे कळतही नाही. पुनर्भेटीचे क्षण अनेक असतात. पण बुध्दीचा वापर कशासाठी करतो हिच बाब तर आपलं आणि त्याही पेक्षा समाज जीवन उन्नत अवस्थेला आणतं. नाही वाटत? मी ची मला भेटले/लो असंख्य वेळा. कधी घेतला याचा अनूभव? मी कधी चूकत नाही

ही पायरी एखादा गाठेलही फार लहान वयात. पण ज्याने गाठली नाही ही पायरी त्याला अनेक वेळा समजतील पुनर्भेटीचे क्षण. दुसऱ्याने केलेली प्रगती आपली आहे या आनंदात पूर्ण सहभागी असतांनाच आपली पायरी आपल्याला माहीत असणे आणि आपण आपल्या गतीने पुढे जाणे हे सर्व पुनर्भेटीचे क्षण आहेत. सकाळच्या दवबिंदूप्रमाणे मनात साठवलेले अनेक हळवे क्षण..... **पुनर्भेट**.....सगळं टाळावं, हे असं आयुष्यात कधी येऊ नये, असं कधीच घडू नये, असा माणसांचा अनूभव येऊ नये...असे चित्रपट पुन्हा कधी पाहूच नये.....अशी नयेची लिस्ट संपेल? त्यांची पुनर्भेट होते.....अनेकदा आपली चूक असते...कधी काहीच कळत नसतांना अचानक पंख फडफडत उडून जाणाऱ्या पक्षासारखं.....काहीतरी घडतं..... **पुनर्भेट**.....एक चित्र अनेक वेळा काढलेला, एक लेख अनेक वेळा लिहिलेला, आपल्या अपत्यावर केलेले अनेक अंगांनी प्रेम, एक तान, लावलेला सूर अनेक वेळा.....**पुनर्भेट** ही देखील.....

५) काळा दिवस

नकाराची सवय लावतात/लागते काही मुलांना. त्यांना काळा दिवस हे काही बाबतीतले माहित असतात. ते आपल्या पचनी पडतात किंवा पचायला लावतात. कोणतेच आप्शन देत नाही/मिळत नाही. काहींसाठी हे अभ्यासक्रमाबाबत पण होते, जीवन जोडीदाराबाबत होते, खाण्या पिण्यासाठी होते.....कशा बाबतही. काहींना जीवनाची ही काळी बाजूच माहीत असते फक्त. मिळालेले नकार आणि केवळ आज्ञापालन हे काहींसाठी सक्ती असते. याचे होते काय? सामाजिक उत्क्रांतीचा सिद्धांत किंवा सामाजिक घातपात सिध्दांत. भयावह वाटते हे. पण हे सत्य नाकारता येणारच नाही. सगळ्यांना वाटते प्रचंड प्रशासन/शासनाच्या मदतीने समाजाला आपण थोपवू. दडपता येतं सगळं. पण पुढील पिढीवर प्रचंड परिणाम होतो. म्हणून प्राचीन तत्त्ववेत्ते स्व ओळखीला महत्त्व देतात. जिथे आपण कोणाशीच सगळ्यात आधी स्वतःशी बुध्दीबळाचा खेळ खेळत नाही. विचार केला तर काळ खूप मोठा आहे आणि नाही तर खूप छोटा. काळाच्या पडद्याकडे बघाल तर कधी लक्षात येईल जीवनात दुःखद वाटावे असे का घडते. आपल्या आणि इतरांच्या? सगळं जीवन सुखी, मलमल ही बाब वेगळी. पण माझ्या जीवनात जे अपरिहार्य क्षण येतात त्याविषयी.....समजायला लागल्यावर विचार करावा काळा दिवस कोणता, का, कोणामुळे, किती वेळा, कशासाठी? शिक्षक कान पिळतात, घरुन ओरडा खाऊन उपाशी पोटीच आलेलो असतो.....खिशात पैसे नसतात, भूक कासाविस करते....पण कॉंलेजमध्ये सही मिळत नाही....कधी थोड्या मार्कांस्तव होस्टेलला प्रवेश मिळत नाही....मूल सतत आरोप करतं.....अपेक्षेइतके मार्क

कांहीं विषयात का आले नाही.....अपेक्षेप्रमाणे मैत्रीण लागलीच नाही.....भडाभडा मन रितं करून गेली.....त्यांच्यासोबत जीवन जगायचे का असा विचार करतांना पुन्हा कधीच भेटू नको म्हटले.....गाण्याच्या सभेला सूर लागलाच नाही.....नाटक सुरू आहे.....अचानक पुढचे संवाद आठवतच नाही.....त्याने/तिने दिलेला नकार हेच आयुष्यातले काळे दिवस असतात?

६) फक्त तुझ्यासाठी

असं म्हणतात प्रेम माणसाला आंधळं बनवतं. खरं नाही ते. आकर्षण आंधळं बनवतं. खरं प्रेम हे रसरशीत फळासारखं असतं. तुम्ही म्हणाल स्त्री पुरुषात आकर्षणच असतं, आणि त्या वयातलं ते प्रेमच असतं. नाही, तापलेली माती एका थेंबाला दिसू देत नाही. इतकं शोषून घेते. आकर्षण विरहित प्रेम असं असतं. अनूभवायचे आहे तुम्हाला? आपण जगलो तर समजते, आकर्षण एका वयात कधीच संपणारं नसतं. तर खरं प्रेम कधी संपतच नाही, संपतं ते अनाठायी, अवास्तव आकर्षण. असे विविध नात्यातले किती क्षण असतील की फक्त तुझ्यासाठी म्हणून आणि वागून किती नाती आपण जपली? आज पिढी या उंबरठ्यावर आहे की काय बिघडते नाती जपली नाही तर? सततच्या कुरबुरीच तर असतात. तेच ते जूनं ऐकून ऐकून कान विटून जातात. कशाला अशा लोकांसाठी वेळ घालवायचा? जीवन एकदाच मिळते. ते मनसोक्त जगून घेतले पाहिजे. सगळी पिढी या उंबरठ्यावर आलेली आहे. आणि यात असतं प्रमुख फक्त तुझ्यासाठी. काही ठिकाणी ते आईसाठी, आजीसाठी, बहिणीसाठी ही लिस्ट न संपणारी आहे. दवबिंदूसारख्या नात्यात फक्त तुझ्यासाठी दिसतही नाही कधी कधी. पण जाणवतं नक्की. स्त्री पुरुष आकर्षणात इतकी शक्ती असते की अनेक चूकीच्या गोष्टी एका बरोबर व्यक्तींकडून करुन घेऊ शकते. जमले पाहिजे चांगल्या गोष्टी घडवून आणणे. तिथे प्रयत्न लागतात. आकर्षण नैसर्गिक असतं. तिथे प्रयत्न नाही लागत. ऐकीवात होते, पूर्वी मुलींचे लग्न ठरवायला मोठी माणसे चपला झिजवत. ते पण त्यांचे फक्त लेकीसाठी असे. फक्त तुझ्यासाठी हे वळण इतकं जोर धरतो की अनेक एकत्र राहणारे, येणारे माणसं हळूहळू कमी होत जातात. १४ फेब्रुवारीच्या निमित्ताने लक्षात ठेवू फक्त तुझ्यासाठी करतांना स्वतःला तरी विसरु नका. काही जणांचे असे होते की स्वतःचा चेहराच दिसेनासा व्हावा असे काहीसे होते. अनेक जण त्याला म्हणतात, पानी रे पानी तेरा रंग कैसा वगैरे....पण प्रत्येकाची घडवणूक, मूळातला स्वभाव वेगळा असतो. नाही का? कोणत्याही नात्यात अधिन होणे आणि "नाते आपले खास" असे ते जपणे यात खूप अंतर असते नाही का? आत्मपरीक्षण केले तर अधिन होणच जास्त दिसते. बरेचदा तुम्ही अनूभवले असेल आधी

कोणाचा एकाचा दुसऱ्यावरील हक्क जास्त प्रस्थापित झालेला दिसतो, तर नंतरच्या काळात दुसऱ्याचा. जो म्हणेल छे, बहुतांश घरात तिचेच जास्त चालते, किंवा छे, त्याचेच ऐकून घ्यावे लागते. तर जसजसा काळ जातो आणि तुम्ही एकमेकांना छान ओळखू लागतात तुमच्या लक्षात येईल असे काही घडतच नाही, तू तुझे, मी माझे... तरी फक्त तुझ्यासाठी असते बरे का.... दवबिंदू सारखे...इतके हळवे..... तुमच्या हळव्या कातर क्षणांना आयुष्यभर तसेच ठेवत अनेक नाती जपता आली तर जपत..,..खूप पुढे जाण्यासाठी.....

७) विरह

तुम्हाला खरं सांगू, खरया प्रेमात विरह नसतोच. कारण तुम्हाला खात्री असते, काही कुठे जाणार नाही, येईल आपोआप! विरह शरीराला असतो. कुठे शिकलात तुम्ही? मोठ्या शाळेत! प्रेम हे मूल्य आहे आणि जर ते कोणावरही केले तर विरह वाटतो का? वाटतो. सदसद्विवेकबुद्धीला टाळा बसेल इतका विरह वाटतो. पण आपण प्रेम का केले हे आठवले तर तुमच्या लक्षात येईल तुम्ही इतकी छान कामे करायला लागावे की तुमचा आरसा तुम्ही बनाल. काही तरी काय सांगता? विचारून कुठे प्रेम होते का? काही वास्तववादी माणसे तसेही करतात. जी वास्तववादी नाही पण प्रेमात पडली त्यांनी शोधावं असं का घडलं? कारण या काळात तुमचा किती वेळ तुम्ही कसा व्यतीत केला तुम्हाला पण कळत नाही. स्वप्नाळू माणसांनी वेळीच स्वतःला ओळखावं.... फक्त आपला जीवनसाथीदार हेच स्वप्न होतं का? चित्र स्वप्न होतं....लेखन स्वप्न होतं.....गायन स्वप्न होतं.....आजोबांची सेवा स्वप्न होतं.....तो/ती भेटण्यापूवी, आठवतं यातलं काही? ती किंवा तो जीवनात आल्यावर तुमच्या लक्षात येईल काहींचा प्रचंड वेळ फक्त तिला किंवा त्याला विनवण्यात गेला. हे विनवणे आनंददायी नसतं का? असते. प्रेम हे प्रचंड सुरक्षितता प्रदान करणारे असते. पण तुम्ही अनाठायी गोष्टी समोर ठेवल्या तर तुमच्या लक्षात येईल की तरूण मुलांच्या प्रचंड शक्तीचा किती अपव्यय होतो. फक्त मुलेच नाही मुलींचा पण. भावना ही देखील शक्ती आहे. कधी ही लक्षात ठेवा प्रेम सुरक्षा देते. जिथे प्रेम आहे तिथे तुम्हाला सुरक्षितच वाटेल. आकर्षणात सुरक्षितता नसते. प्रेमातली सुरक्षितता अनूभवल्यानंतर तुम्ही तुमच्या बालवयात पाहिलेली छोटी, मोठी स्वप्ने तुम्ही जगाल? आपल्या जीवन साथीदाराला त्यांच्या स्वप्नांची आठवण द्याल? त्याला गरज पडेल तिथे मदत कराल? खऱ्या अर्थाने व्हेलेंटाईन साजरा कराल? विरहातील वेदनेला नवे वळण द्याल?

८) भेद

योग्य वयात एखादी व्यक्ती आवडणे आणि जीवनप्रवास सुरु होणे ही सुरुवात असते. सुरुवातीला सगळं गोड वाटतं त्याचे कारण आकर्षण. आकर्षण एक साम्य आणि अनेक भेद. माणूस म्हणून जन्माला आल्यावर आकर्षणाकडून भेद समजण्याकडे आपला प्रवास व्हायला हवा. दोन व्यक्ती विभिन्न वातावरण भौगोलिक सामाजिक/सांस्कृतिक, पारिवारिक, शैक्षणिक इ.वाढलेले असतात. पालक शिक्षकांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर असतो. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडलेले असते. त्यात नकळतपणे त्यांनी पालकांचे गुण/दोष घेतलेले असतात. यापलीकडे मूळात आपण खूप वेगळे असू शकतो. पण ज्या वातावरणात आपण वाढतो ते घडवते. लक्षात घेऊ किती गुंतागुंतीचे आहे हे. मग भेद लक्षात घ्यायचे कसे? अंथरूण पाहून पाय पसरायचे या संस्कृतीतील मुलीला कोणतेही सुख समोर आले तर ते कोणत्या मार्गाने आले याचा विचार पडतोच, पण एखाद्याला तिची काटकसर/कंजूसी/गबाळं राहणं दिसतं, अन्न वाया घालवू नये या संस्कारात वाढलेल्या मुलाला मुलीने विचार न करता स्वयंपाक करणं चीड आणूच शकतं. आपलं काम करुन अर्थार्जन करत जगणारी स्त्री एक डोईजड बाई आहे असे एखाद्या पुरुषाला वाटू शकते. ज्याला आयुष्यात कुटुंबाची जबाबदारी घेण्याचे वळण लावले/लावायचे आहे तो अशा स्त्रीला पदोपदी अपमान वाटेल असे वागू शकतो. हे आणि असे अनेक भेद आपण लक्षात घेतो का? दोन व्यक्ती़मध्ये किती जमतं/जमत नाही याच्या खुमासदार चर्चा अनेकांना आवडतात/किंवा ते सामाजिक चर्चेचा विषय बनून जातात. यात जी स्त्री काही काम करते/जिचे शिक्षण/नोकरीचा अनूभव आहे तिच्यावर किती कठीण प्रसंग येतो हे कोणाच्याच लक्षात येत नाही. ही गोष्ट पुरुषांसाठी होत नाही. कारण कामाच्या ठिकाणी मदत मिळते. व्यवसायिक तत्वावर काम करणाऱ्या स्त्रीयांचे अजूनही ग्रुप नाही, तिची चटकन गेलेली नोकरी तिला चटकन मिळू शकत नाही. कारण तिच्यावर कोणाची जबाबदारी असते? ती या पैशाचा काय विनियोग करते? पुरुष मिळालेल्या प्रत्येक पैशाचा योग्यच विनियोग करतात? हे सगळे भेद आहे. सत्य हे आहे, आर्थिक नियोजन ज्या पुरुषाला किंवा स्त्रीला माहीत नाही ते दोन्ही पण हातात येणारा पैसा नीट वापरतील याची खात्री नसते. तसेच आर्थिक नियोजन जमेल, आवडेलच याचीही खात्री नाही.चर्चा आणि गप्पा वेगवेगळ्या असतात. गप्पा न थांबणाऱ्या असतात. अशा गप्पांनी मुलांचे/मुलींचे आयुष्याचे नूकसान होते. एका विशिष्ट वयात आपण खूप शिक्षण घेऊ शकतो, नंतरच्या टप्प्यात त्या शिक्षणाचे उपयोजन करू शकतो. उमलत्या वयात आपल्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घेतले पण उपयोजना करता आले नाही तर ते शिक्षणच व्यर्थ असे समजणारे आणि न समजणारे हा मेंदु आहे. शिक्षणाचे उपयोजन आणि हौस म्हणून शिक्षण असा पण भेद आहे. १४

फेब्रुवारीच्या व्हेंलेंटाईनला कोणकोणते भेद समजून घेणार? आपण वेगवेगळे असतो म्हणूनच तर हे भेद असतात. व्यक्ती म्हणून प्रत्येकाचा आदर ठेवला पाहिजे हे मूल्य ज्याला कळते तो/ती प्रत्येक भेद निदान जवळच्या व्यक्तींबाबत समजण्याचा प्रयत्न करेल. निवृत्तीनंतर जो संपर्कात येईल त्याला समजू शकेल. रोजचे जगणे किती गतिमान आहे. कोणाला वेळ आहे या गोष्टी करायला? तर अपेक्षा लादणे, त्या गोंधळात वेळ घालवण्यात जितका वेळ जातो, तितका वेळ जर आपण फक्त दुसऱ्याच्या अस्तित्वाचा आदर करायला शिकलो आणि व्यक्ती म्हणून भेद समजायला लागलो तर प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या जागेवर त्या त्या वेळेला योग्य असते हे लक्षात येईल. त्या व्यक्तीची परिस्थिती, समज, वातावरण, आजूबाजूची माणसे, सवयी या सगळ्या गोष्टी हळूहळू आपल्या लक्षात येत जातात. कधी कधी काही जण आपल्याला खूप आवडतात. कारण त्यांनी परिश्रम करुन स्वतःला घडवलेले असते. आपण माणसांचे चांगले/वाईट असे प्रकार करून टाकतो. खरे तर हे आहे की काही जण स्वतःला घडवायला वेळ देतात, काही तो देत नाही. जाणून घ्यावं खूप जवळच्या व्यक्तींसाठी? कविता सांगते भेद सारे मावळू द्या..... हे मावणारे नसतात. मावळू द्या दुसऱ्याचा अनादर करण्याची वृत्ती. भेद तर कायम असतील. व्यक्ती तितक्या प्रकृती उगीच म्हटले आहे? मला क्रीम असलेला केक सारखा खायला सारखा आवडतो, मला वेफर्स कूरकरे फार आवडतात, मला दुसऱ्याला चिडवल्याशिवाय, उणिवा बघितल्याशिवाय बरेच वाटत नाही, स्वतःचीच परिस्थिती फारशी बरी नसतांनाही दुसऱ्याला मदत करायला हवी असेच मला वाटते, पूजा पाठ केल्याशिवाय मला बरे वाटत नाही, पूजा पाठ मला मूळीच आवडत नाही हे सगळे भेद आहेत. आपल्या जवळच्या व्यक्तींसाठी ते माहित असले तरी पुरे नाही का? ते माहित असले तरच संवाद घडतो. नाही तर तू असे असावेस हा आग्रह बघतो. आपण सर्वच. याला अपवाद तेच असतील ज्याला या सत्याचे ज्ञान आहे, माहिती नाही. समजूयात भेद?

९) सततची नाराजी

सगळा प्रेमाचा गुलकंद खाऊन झाला की गाडी येते मुलांवर. एकदा ती हातात आली की बाई मोठी झालीच समजा! रानात वाढलेली मुलं आणि रानटी झाडं सारखीच असतात. ज्यांना पालकत्वाचा प्रवास करायचा आहे हे ज्यांना ज्यांना समजले आहे, ते तो प्रवास कायम करतील. तुम्हाला नेमका कोणता प्रवास करायचा आहे? अनेक स्त्रीया म्हणतील यात काय आहे? आजी आजोबा आहेत, म्हणून मी करिअर करते, किंवा आर्थिक गरज आहे म्हणून मुलांना आजी आजोबा सांभाळतात. पण मनातून स्त्री अपत्याला आपल्याकडे ओढतच असते. कोणत्या न

कोणत्या मार्गाने ती मुलांचा शोध घेत असते. ती तिच्या अस्तित्वाची गरज असते. याला पुरुष पण अपवाद नाही. तिच्याकडे बघत त्यांनाही वाटते आपण पण कुठे कमी पडू नये. यात मूल खूप मागे पडते. **सततची नाराजी** इथूनच सुरू होते. तुझे की माझे? यात पैसा कमविणारे दोघे असतील तर विचारायलाच नको. यात मुले विचारी, संवेदनशील, आपापल्या विषयात जाणकार होण्याऐवजी ते पटवण्यात वाकबगार होतात. घराण्यातले ते वकील असतात. गोष्टी कानावर पडल्या नाही पडल्या तरी ते इतके संवेदनशील असतात की त्यांना समाजातून परिस्थिती समजते. मुले झाली की सततची नाराजी थांबवूया. ज्याला आपल्या पालकत्वावरचा दुर्दम्य विश्वास आहे त्याच्यावर मुले सोपवून अशा चर्चेतला सहभाग पण थांबवू या. कारण मुले म्हणजे खेळणे नव्हे. अनेकांना ती खेळणीच वाटतात. काय समजते यांना? असे म्हणत आज त्यांना काहीतरी देऊन, अगदी कोणत्याही प्रकारचा शिक्षणक्रम देऊन गप्प बसवले जाते. याचा अर्थ समाजात गोंधळ नाही निर्माण करायचा. तर **शांततेने स्व-अभ्यास करायचा.** जिथे मुलांच्या बाबतीत प्रश्न सुरु होतात, पालकांची नाराजी सुरु होते. कारण स्वतःच्या अनूभवातून मुलांचे चांगले घडावे म्हणून दोघांना आणि जे खरे पालक म्हणून सहभागी आहेत त्यांना प्रयत्न करायचे असतात. ते बाजूला पडून दुसऱ्याच गोष्टी समोर येतात. आणि त्यातली प्रमुख गोष्ट म्हणजे अधिकार. तो अधिकार ज्या दिवशी सोडतो, त्या दिवशी मनाला शांतता लाभते. याचा अर्थ मुलांना पोरकेपणा देणं नव्हे. तर सततचे वाद टाळणे. **हे वाद फक्त अधिकार भावनेतून निर्माण होतात, हे लक्षात घ्यावे.** बरेचदा मुलांच्या बाबतीत अनेक छोट्या पासून मोठे निर्णय घ्यायचे असतात. पालकांपैकी एक जण सतत सोबत असेल तर तो/ती असे निर्णय घेतात. **पण असे का केले या प्रश्नाला त्यांना सतत उत्तर द्यावे लागते.** ते फार वेदनादायी असते.आपण पालक नसून एका कारागृहात आहोत असा भास व्हावा असे अनेकांच्या बाबतीत घडूच शकते. मुलांना देवाघरची फुले म्हटले आहे. याचा अर्थ सुखाच्या दुलयीत लपेटून ठेवले तर अचानक समोर आलेल्या दुःखाला ते सामोरे जावूच शकणार नाही. त्यांना फुलासारखे तर जरुर जपा, पण सबल आणि संवेदनशीलत बनण्यासाठी. **सततची नाराजी फेकून द्या. मुलांबद्दल आपण खूप हळवे असतो, संवेदनशीलता आणि हळवेपणा यात खूप फरक आहे. या विषयाबाबत मी खूप बोलावे असा माझा अधिकार निश्चित नाही. पण आपण अनेक गोष्टी सोडून दिल्याने मुलांचे भवितव्य घडत आहे असे लक्षात आले तर सोडता येतील त्या गोष्टी? सोडता येईल सततची नाराजी?**

१०) चहाच्या कपात

तुमच्या जीवनात वाद किती, संवाद किती? चहाचे कप किती? दारूच्या बाटल्या आणि सिगारेट किती? व्हॅलेंटाईन स्पेशल लिहितांना केक/चाकलेट गुलाबी फुलं यातलं काहीच न देता कोरडी पुस्तके तेवढी लिहिता, वरून त्यावर विचारात पाडतात, हा तुमचा मार्ग कोणता? खरं तर मला समजलं जीवनात संवाद एक ताकद आहे. विसंवाद नाही ठरवले तरी घडतातच. मडक्यातले पाणी क्षणाक्षणाला गळतांना फ्रिज आणि थंड बाटलीचा शोध लागेपर्यंत मडके भरणे, त्याला ओले कापड लावणे, पाणी गार करणे आणि ते गार पाणी प्यायल्यावर घसा सुकत का नाही हा शोध घेणे.....अगदी मजेदार. तसे विसंवादाचे आहे. रोजचे झाले की माणसे कंटाळतात. एखाद्या लेखकाच्या लिखाणाचे प्रचंड फॅन असणारी माणसेच एक दिवस त्यांना जमीनीवर आणतात. त्याचे कारण म्हणजे (आर्थिक कारणे सोडून) फॅन वर्ग पुढचे लिखाण असेच असेल असा अंदाज घेत घेत नंतर टवाळी करायला सुरुवात करतात. लेखक टवाळीवर विचार न करता लेखन सोडणे हा मार्ग पत्करतात.(लेखक किंवा कोणताही कलाकार किंवा कर्म) याचा चहाच्या कपाशी काय संबंध? तर समेवर येताना हे सांगायचे इतरांशी झुंज देताना मला माझ्याच कर्माशी झुंज द्यावी लागते. चहाच्या कपाचा वापर ते वादळ झुजवायला केला तरी किती? दारूचा केला तर किती? रोजचे जीवन जगायला लागले की तो किंवा ती नजरेसमोर पण नको. कारण काय तर काही.....समजत.... नाही. आजच्या व्हॅलेंटाईनला एकत्र या आणि हे समजा असे न समजणारे एकत्र येऊन काही समजते. सगळंच सगळ्यांना समजत नसते. समजले तर जमत नाही वगैरे वगैरे. तर ही वादळे/विसंवाद खर्च मिटतात का चहाच्या कपात/दारुच्या झोकात? कधी न पिणारं पोरगं पिऊ लागलं की आई झालीच अस्वस्थ. संवादाला विसंवादाचं ठिगळ शोभते की झालर! आपलं काम संशोधन! व्हॅलेंटाईनच्या दिवशी प्रत्येक जोडप्याने स्वतःला दिलेले वचन म्हणजे '**आयुष्याच्या कोंदणात आयुष्यालाच जपायचे".**

११) लोणची आणि साखरंबा

हे ही दिवस जातील, बरे दिवस येतील, बाबा आणतील एखादी गाडी, देतील एखादं खेळणं, आजोबा येतील घरी, आजी करेल खाऊ असं बालपण किती रम्य असते. पण लोणची आणि मुरब्बे त्याला काही तयार नसतात लवकर! या वर्षी ठरवले व्हेलेंटाईन स्पेशल बँक टू बँक १४ आर्टिकल. तुमचे काय हो, मुरलेले यात तुम्ही? कोण वाचणार ते कागद! रोजचे जीवनमान कसे चालणार यावर बोला? लोणचे, मुरब्बे विका! मुलांनो मुरलेले असणं म्हणजे खेळी करणं नव्हे. मुरलेले असणं म्हणजे, आला पावसाळा, रेनकोट लागेल, छत्री हवी, आला उन्हाळा

आईस्क्रीम हवं, शांतता आणि आंबे हवेत, हिवाळ्यात काय हवे! **थोडक्यात समज निर्माण होणं म्हणजे मुरलेले असणं.** किती वेगळ्या पद्धतीने आपण लोणचे आणि मुरब्बे घेतो? कोणतंही मन वाचता न येणं किंवा वाचता येणं हा त्या क्षेत्रातील मुरब्बा/लोणचं. पण त्यासाठी योग्य उपाययोजना करणारं संवेदनशील, सशक्त मन म्हणजे गोड लाडू! आपला जावई कसा असावा, गोड लाडू! पण मुलगी तर असते जिलेबी! लाडू आणि जिलेबीचं कसं काय जमावं ते बघा! तिखट मिरची तरी बरी. समोरच्या प्रसंगात बाजूला होणं, जमेल तिथे काम करणं, गुंते निर्माण करण्यापेक्षा कमी होतील, पण पुढच्या पिढीला कार्यक्षम राहण्यासाठी काही असेल, नुसतेच गुळाचे गणपती आणि साखरेच्या गौ्रया मखरात छान दिसतात, डोकं टेकवायला. जगण्यासाठी सतत पुढच्या पिढीला जास्त सुख यापेक्षा योग्य जीवनशैली बरोबर की चूक? लहान वयापासून ज्या मुलांची जीवनशैली योग्य आहे, जीवनाचा स्तर कोणताही असो, त्या स्तरातली ती आनंदी आणि आत्मविश्वास असलेलीच मुले असतील. आनंद आणि आत्मविश्वासाला वेगळे आयाम देताही येतील. पण दुसऱ्याच्या सुखाच्या विचाराने स्वतः जवळचा आनंद निर्माण करण्याची शक्ती ते कधीच हरवणार नाही. मूरलेलं असणं म्हणजे समज निर्माण होणं. मुरलेले असणं म्हणजे कावेबाजपणा खरच नाही. एखाद्याला काही काही गोष्टी समजतच नाही. तो/ती समाजजीवन समजलेच नाही. जे समजलं ते वेगळं असू शकतं. प्रत्येकाची विविध बाबतीतली समज वेगळी असली तरी थोडी जबाबदारी समजणं म्हणजे मूरलेलं असणं. जबाबदाऱ्या देण्यात किंवा घेण्यात नाही. तर समग्र जीवन समजण्यास. दिल्या जबाबदाऱ्या की झाले जबाबदार, मिळाल्या जबाबदाऱ्या की झालं रान मोकळं, असे कधीच नसते. ही बाब लक्षात घेणे म्हणजे लोणचे आणि मुरब्बे. कोणती पण गोष्ट लगेच काही होत नाही. सबूरी कोणाला नसतेच मूळी. या सगळ्या गोष्टी व्यक्तीमत्वात आणणे म्हणजे लोणचे आणि मुरब्बे. दुसऱ्याची उणिव/कमतरता हा आपला सकारात्मक भाग असेल ही सामाजिक जाणीव म्हणजे लोणचे/मुरब्बे नाही. माणसाला पूर्णत्वाकडे नेणारी गोष्ट म्हणजे ज्ञान आणि दैनंदिन गरजा. कुठेतरी कोणासाठी अपूर्णत्व ठेवले म्हणजे गरजेचे सिध्दांत पूर्ण होतील अशी समाजव्यवस्था निकोप नसते. तर गरजा समजून घेत पूर्णत्वाकडे समाजाला नेणारी समाजव्यवस्था परिपूर्ण असते. पुढच्या पिढीतली मुले व्यवस्थां निर्माण करणारे व्हावे. आतापासून तयारीला लागावे. ज्ञानसंपन्न आणि हसतमुख समाजासाठी. लोणचं आणि मुराब्बा प्रकार नीट शिकून जगण्यासाठी. नाहीतर वास्तवातल्या लोणचं, मुराब्बा तर येत नाही पण लागलो किचन क्विीन पद घ्यायला! ही बाब खरच हास्यास्पद ठरते. बरेच क्षण येतात, आपण स्वतःवर मनमूराद हसतो. कारण तेवढेच क्षण आत्मसाक्षात्काराचे असतात. दुसरा हसला

तर ते दुखरे क्षण असतात. विद्याभ्यास करून आत्मसाक्षात्काराचे क्षण जरुर वाढवा. उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्याची बेगमी करा.

१२) नावात काय आहे?

नाव ही ओळख असते. काम करायला लागलो की ती बनत जाते. मग अमक्याचे माणसे, तमक्याचे माणसे असे वर्तुळं तयार होतात. मग त्याच्यापुढे पैसा आणि जबाबदाऱ्या त्या नावामागे येतात. आणि नावातला खरा अर्थ पूर्ण हरवतो. ज्या दिवशी बाळाचं नामकरण होतं ते त्याला स्वतःची ओळख स्वतःला पटावी म्हणून. मग त्यात पालक आले, इतर नाते आले. सगळं आलं. पुढे या बाबी इतक्या किल्ष्ट होतात की त्यात आपण आपली ओळख विसरून इतक्या नावामागे जबाबदाऱ्या येतात. यातून निर्माण होणारा "मी"पणा इतका भयंकर असतो. तो फार वेदना देतो. ज्याला यांच्याशी काही घेणं/देणंच नसतं, त्याला कोणत्याही नामकरणाशी काही संबंध नसतो. त्याचे मत हे असते शेवटी नाते आणि जबाबदाऱ्या महत्वाच्या. या पलिकडे मी नावाबद्दल बोलते. तो एक भावनिक संबंध. माझी अशी समज आहे, की पालक फार लाडाने किंवा काही शास्त्र, तंत्र, मंत्र बघून मुलांचे नाव ठेवतात. यातले शास्त्र/तंत्र/मंत्र बाजूला ठेवले तरी जर प्रेमाने काही नावं ठेवले असेल तर ती हाक सतत कानात घुमत असते. कितीही एकटं वाटलं किंवा कितीही गर्दीत असलो तरी ती हाक कानावर येतच असते. इतक़ नावामागे नातं असतं. कोणी त्याचं अर्थकारण शोधणं, कोणी माणसे शोधतं. नाव आणि प्रसिद्धी ऐकून माणसे गोळा होतात असे आपले मत असेल तर एकेकाळी प्रसिद्ध असलेली माणसे एकाकी जीवन जगताना पाहतच असतो आपण. हे का? तर माणसे जशी येतात, तशी निघूनही जातात. ज्याची जबाबदारीची जाणीव प्रखर असते ते दोन चार येत राहतात. आणि नक्की शोधा, त्यांनी दिलेली हाक अंतकरणात पोहचते की नाही? याचा अर्थ बाकीची माणसे चूकीची असे नव्हे. जीवन आहे, जीवनाला गती आहे, कोणी काय शोधतो, कोणी काही शोधतो. त्या प्रवासात कोणी कुठे पोहचतो, कोणी कुठे. शेवटी नावामागे अर्थकारण थोडे सोडले तर किती प्रेमाने आपले नाव कोणी ठेवले आहे या विचारा पर्यंत आपण येऊन पोहचतो. खरं तर नाव कोणतंही असले तरी अर्थकारण सारखं राहतं. त्याचा अर्थकारणाशी काहीच स़बंध नाही. आता प्रश्न जबाबदारीचा असतो. तर जन्माला आलेल्या बाळाला मुलगी असो की मुलगा अमूक एक जबाबदारी घ्यावी अशी अपेक्षा असते की नाही? बेजबाबदार मुलगे आवडतं नाही की बेजबाबदार मुली. कोणत्या तरी स्वरूपाची जबाबदारी असतेच. कोणाचीच नसली तरी स्वतःची असते. बघा नावात काय आहे? नावात निदान स्वतःची जबाबदारी आहे. लहान मुलगी लहानपणापासूनच जबाबदार असते. ती

शांतताप्रिय असते. तिला दुःख सहन होत नाही. जरा दंगा झाला की ती बाजूला होते. इतकी ती शांतता आणि एकोपा प्रिय असते. ही तिची मला वाटणारी ओळख आहे. ती पण जबाबदार असते. नावातल्या जबाबदाऱ्या, नावातले अर्थकारण, नावातल्या ओळखी सर्व बाजूला राहिले तर मनात येते फक्त आपल्याला लाडाने दिलेला आवाज. इतके आपण कोणाला प्रिय असावे लागते नाही का?

१३) चढती समज

"शरीर आद्यंम खलू धर्म साधनम." ही एक टिका नाही. त्याचबरोबर हे सर्वाथाने खरे पण नाही. शरीराबद्दल सर्व ज्ञान असले तरी शरीर हा प्रेमातला केवढा मोठा अडथळा असतो हे लक्षात येतं. प्रेम हे निराकार आहे. ते अमूर्त आहे. आपण आपल्या बाळाला काहीही देऊन प्रेम व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. त्याला सगळं देऊनही रिकामं वाटतं. असे वाटते, हे आनंदी आहे का? म्हणून प्रेम ही संकल्पना अमूर्त आहे. याचा प्रवास चढता असतो. तो उतरता कधीही नसावा. जशी आपली कोणाबद्दलची समज ही ठाम/पक्की केव्हा होते? त्या व्यक्तीच्या तितके विचारात असतो तेव्हा. याहीपेक्षा जितके सहवासात असतो तितके. मग अति परिचयात अवज्ञा का म्हटले आहे? तर तिथून गृहित धरणे सुरु होते. होऊन जाईल, केले जाईल, जमून जाईल वगैरे. खरे तर आपल्याबद्दल कोणी असा विश्वास बाळगणं हा एक सन्मान असतो. पण कधी कधी अगदी जवळची व्यक्ती आपल्याला ओळखत नाही असे पण वाटून जाते. मी रिलेशनशिप स्पेशेलिस्ट नाही. पण नात्यांचे ब़ंध मानले तर तुम्हाला किती मोठं करतात, आपल्या लक्षात पण येत नाही. जेव्हा त्यातल्या अपेक्षा पण आपण समजू शकतो, आपण थोडे मोठे होतो. आजच्या धकाधकीच्या काळात ते खरेच सोपे नाही. नवरा बायकोचे नाते जवळ किंवा दूर राहून ही १००% अचूक जमत नाही, आई वडीलांबाबत जमत नाही तर इतर नात्यात कसे जमेल? वेळ द्यावा लागतो. आज तेच तर नाही. फक्त वेळ नाही तर समज पण वाढवावी लागते. आज लहान मुलांना किती शिकायचे आहे. किती आव्हाने त्यांच्यासमोर आहे. अशा वेळी लहान मुला़ना जिथे योग्य ठिकाणी पाठिंबा, योग्य मार्गदर्शन, योग्य सवयी, दिनचर्या याबरोबरच पालकांकडून आलेले genom! म्हणजे पालका़कडून आलेलं शरीर – त्याचा अभ्यास. तिला नकारात्मक पध्दतीने घेऊ नये. ती एक संपत्ती आहे. तिचे वाचन, जतन, संवर्धन हे आपले कर्तव्य आहे. आपले शरीर मन त्यात मेंदू पण आला. शरीर वाचणे म्हणजे शरीराचे प्रत्येक आंदोलन वाचता आले पाहिजे. सवयींमधून पण शरीर घडते. उत्तम सवयींचा का पुरस्कार केलेला आहे? आणि सवयी ओरडून किंवा दमदाटी करुन किंवा सततचा आग्रह करून लागत नाही. मे़दूचे काम आहे ते. हे काय व्हे़लेटाईन स्पेशल मध्ये

लिहिता? तर तुमच्या व्हेलेंटाईनला नीट समजण्यासाठी तुम्हाला स्वतःला नीट समजावे लागेल नाही का? परिचयानेसुध्दा फक्त समज वाढते. पण सां़भाळ नाही वाढत. याचे कारण आपण स्वतःला ओळखत नाही. चढता प्रवास कोणता? कशासाठी? दुसऱ्याला ढकलण्यासाठी! तर नाही. जीवनातले अडथळे दूर करत उत्तम कर्म करण्यासाठी. अनेकदा आपल्याला एवढासा ही त्रास होऊ नये म्हणून मुलीला खूप जपले जाते किंवा काही ठिकाणी फार काम करून घेतले जाते, मुलगा असो मुलगी असो, आपण स्वतःला समजतं आळस न जोपासत कृतीशील राहू तर आपण तर आनंदी राहूच पण अनेकांना आनंदी ठेवू. व्हॅलेंटाईनच्या निमित्ताने तुमच्या प्रेमाचा, परिवारीक सुखाचा आलेख सातत्य पूर्ण राहणे आणि समज चढती असणे हे किती आवश्यक आहे. कोणतीही चढती भावना शरीरासाठी चांगली नसते. शरीराच्या श्वासाची वाढलेली प्रचंड गती ताब्यात आणणे खूप कठीण असते. त्या भावनेला वळण लावणे वेळीच गरजेचे असते. नदीकडे बघतांना तिचा आवेग वाढला की ती पात्र फोडते. ते किती नूकसानकारक असते. म्हणून चढती समज. एकत्र राहणारे भाऊ/बहिण वेगळे झाले की समाजात कूजबूज वाढते. पण ती त्यांची पारिवारिक समज असते. आणि ते योग्य आहे. जबाबदार व्यक्ती़ना तुम्हाला अजून समजतच नाही, असे म्हणणे हे योग्य नसते. म्हणून चढती समज.

१४) गोष्टी प्रेमाच्या आणि माता पिता दिन

माणसे एकत्र आली की अनेक गोष्टी घडतात. स्वतंत्र सामाजिक किंवा सांस्कृतिक मानदंड निर्माण पण होतात. याबाबत काही माणसे फार आग्रही असतात. कोणती संस्कृती टिकून राहते? जास्तीत जास्त माणसे जिच्या बाजूने असतात ती. कोणतीच गोष्ट टिकून राहत नाही या मताची मी आहे. निसर्ग परिवर्तनीय आहे. पण काही ऋतूंचे सातत्यपूर्ण कालावधीने येणं/असणं किती हितावह ठरते. तसे परिवर्तन आणि सातत्य यातला शोध प्रत्येक बाबतीत पुढच्या पिढीने घ्यायचा आहे. सगळे टाकून देण्यासारखे किंवा सगळे सतत बदलणारे हितावह नाही. ही गोष्ट मुलांनी लक्षात ठेवायची आहे. आज सगळंच खूप उपलब्ध आहे. हे कोणी निर्माण केले आहे. ती निर्मितीक्षमता लक्षात ठेवायची. माणसे एकत्र आल्यानंतर कोणाविषयी का, कशासाठी बोलतात, हे समजले तर समजून घ्यायचे. बरेचदा आपल्याला नाही समजत. बरेचदा तितकासा वेळ नसतो. गोष्टी प्रेमाच्या तेव्हा घडतात जेव्हा कोणाविषयी प्रेम जाणवते. उगाच दुसऱ्याची निंदा केली की प्रेम हे संपतेच. बरेचदा समोरच्या व्यक्तीला चूकते काय/कुठे/कशासाठी हे सांगून समजत नाही. कारण मनाची धाव खूप बाहेर असते. स्वाध्याय हा प्रकार वाटतो तितका खरच सोपा

नसतो. पण स्वाध्यायी व्यक्तीची नाती कधी तूटतच नाही. मग व्यवहाराचे काय हो? व्यवहार आणि नाती म्हणजे शर्यती नसतात. आपल्या विषयी खरे असले आणि कोणी ते चार चौघात बोलून दाखवले की प्रचंड वाईट वाटते. एकांतात सांगून समजले नाही की माणसे लोकांतात सांगतात. तरी काही जणांना समजत नाही. समज ही व्यक्तीगत बाब आहे. वाटणारे वाईट हे क्षणभर असते. पण झालेला फायदा मोठ्या काळासाठी असतो. गप्पा मारणारी मी अनेक ठिकाणी चूकते. पण जे तत्व समजले, जे तत्व जगले तेच सांगते. दुसऱ्याने बदलावे असे आपल्याला का वाटते? जिथे प्रेम निर्माण होते तिथे कळकळ सुरू होते. गोष्टी प्रेमाच्या अशा असतात. कोणाची हेतूपुरस्सर निंदा हा सांस्कृतिक मानदंड कधीच असू शकत नाही. आणि हे फार सूक्ष्म असते. हेतू बदलावे असा असणे आणि काय करतील ते करोत, सांगून मोकळे होणे यात फरक असतो. त्यांच्याविषयी प्रेम वाटते, त्यांची सतत आठवण येते. माणसांचे कष्ट फुकट जात नाही. आता व्हेलेंटाईन डे "मातृ पितृ" दिन म्हणून ही साजरा करतात. व्हेलेंटाईन डे ला अतिशय चूकीचे वळण लागत असलेले मी स्वतः बघितले आहे. अति तिथे माती असते. म्हणून तरुणांना आदर/मान/सन्मान या गोष्टी जितक्या महत्वाच्या वाटाव्यात त्याच जबाबदारीने प्रेमही साजरे करता यावे.

Date :- १५/०२/२६

विद्वेषाची आग

असूया किंवा ईर्षा ही एक अशी बाब आहे की विशिष्ट/अमूक एक प्रकारची इच्छा पूर्ण झाली नाही तर मनाला प्रचंड वेदना होतात. इच्छा ही भावना तशी नसते. क्लेष याच भावनेने प्रचंड त्रास होतो. हाच त्या दोहोंतला फरक. गरज आणखी वेगळी. मानवी जीवनात गरज पूर्ण न होणं हे नाही ठिक. त्यासाठी चित्ताचा क्षोभ होणं हे त्याहून वाईट. हे कशासाठी? तर संपन्न मानवी जीवन सर्व स्तरातले विद्वेषाशिवाय जगता येऊ शकते का? तर भेदाचे आकलन झाले तर निश्चितच हे घडू शकते. मी आज अनेक विषयांना या निमित्ताने हात घालणार आहे. रंग काळा आणि गोरा, कामाच्या वेगवेगळ्या क्षमता, आकलनाच्या वेगवेगळ्या क्षमता, राहणीमानाच्या वेगवेगळ्या आवडी, कामे करवून घेण्याच्या पद्धती, विवाह संस्काराच्या पध्दती, व्यवहाराच्या पध्दती वगैरे. या सगळ्याचा समग्र विचार सगळ्यांना जमेलच असे नाही. आपण अमूक एखाद्याला अमूक पध्दतीने वाग असे सूचवतांना किती विचार करायला हवा. कारण सांगणाऱ्याची आत्मविश्वासाची पातळी आपण बघत असतो. मग विचार येतो, आत्मविश्वासापेक्षा अनेक वेळा अहंकार असतो. कारण शिकण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींला एकदा सांगून

समजते. किती वेळ लागू शकतो. आपण वाट बघितली तर समजेल शिकण्याची इच्छा असणारी व्यक्ती शिकतेच. माणसांच्या अहंकाराला ठेच पोहचली की विद्वेषाची आग भडकतच जाते. अनेक वेगवेगळे ग्रुप व्यवहारासाठी निर्माण होत जातात. ते सदभावनेने झाले तर ठिक. व्यवहार वाढला, सांभाळायला दिला म्हणून ठिक. क्षणाक्षणाला जवळच्या व्यक्तीशी न पटणे काय असते? तर पटवून न घेणे हा प्रकार तर असतोच पण त्याचबरोबर दुसऱ्या बाबी असतात. आपण समाजात राहताना हा प्रकार किती अनूभवतो. विचारी मनन यावरचे उपाय शोधतात.

Date :- १६/०२/२६

सहजीवनाची ऐशीतैशी

एकत्र सर्वांनी जगणं म्हणजे सहजीवन. हे चांगले, दर्जेदार केव्हा होते? ज्यात कोणाच्या जबाबदाऱ्या काय आहेत हे मिळून ठरवलेले असते. ते सर्वांना मान्य असते. त्यापलीकडे वेळोवेळी एकमेकांबद्दलच्या अपेक्षा व्यक्त होतात. त्यातले होकार, नकार समजून घेतले जातात. बरेच जणांचे म्हणणे असते, तुमच्याबद्दल बाहेर विचारले जाते, तुम्हाला बोलावले कुठेही तर तुम्ही जात नाही. समाजात होणारे सामाजिक कार्यक्रम वेगवेगळ्या कारणांसाठी असतात. कुठे महिलांनी एकत्र येऊन मनमोकळेपणाने वेळ/क्षण एकत्र व्यतीत करायचे असतात. लहान मुलांना सामाजिक क्षणांची किती आवश्यकता असते हे फारसे लक्षात घेतले जात नाही. हे सामाजिक क्षण म्हणजे नेमके काय? तर कपड्यांच्या निवडीपासून, ते बोलणे, खाणे, वागणे इ. यातून स्वतःप्रतीचा बूजलेपणा तर जातोच पण रोजच्या शाळेतील प्रचंड अभ्यासापासून काही क्षण मुक्तता मिळते. बरे वाटते. मुलांचे सामाजिकीकरण म्हणजे उठसूट त्यांना फिरवणे हा अर्थ होत नाही. असे करण्याचे पण खूप तोटे असतात. ते लक्षात येत नाही. बंड, उद्धट, मुले तिथून घडतात. सामाजिकीकरण हे मुलांना अपरिचित व्यक्तींबद्दल जी भीती वाटते, ती कमी होणे, थोडा संवाद साधता येणे यासाठी असते. काही मुलांना इतक्या लोकांबरोबर इतक्या लहान वयात वावरायला मिळते की ओळखींनी मोठ्यांचा विश्वास हस्तगत केला की मोठ्यांच्या अपरोक्ष अनेक चूकीच्या गोष्टी घडत असतात. कारण आपल्याला सगळे समजले असे लहान वयात त्यांना वाटायला लागते. सहजीवनात जबाबदाऱ्या या केवळ कामाप्रती नसतात. तर भावनांची जपणूक हा खूप महत्त्वाचा भाग असतो. सहजीवन हे चार भिंतीतले असो, सहजीवन एक organisation म्हणून असो. भावनांची जपणूक करणाऱ्या बॉसला एकदा विश्वास प्राप्त केला की भावनिक फसवणूक ते कामाची अडवणूक इतक्या बाबींना तोंड द्यावे लागते. तर कामाप्रती विश्वास ठेवला गेला तर कामाची अडवणूक ते आर्थिर्क गडबड दिसते.

कुठेच विश्वास ठेवला नाही तर माणसे सतत काम सोडतात. सोपे आहे का? खरं तर शिक्षणाने माणूस सबलच होत नसेल तर शिक्षण काय उपयोगाचे? अमूक एक शिक्षण घेऊन आपण तमूक एक काम करतो, याचे कारण शिक्षण आणि जीवन जोडलेले नाही. Organisation मध्ये सहजीवन असू शकते, आणि ते फार उत्तम असू शकते याची जाणीवच लोकांना नाही. Organisation मध्ये नेमलेले काम वर्षानूवर्ष करतांना लोक पाट्या टाकणे या प्रकाराकडे येतात. कारण क़ंटाळा. दरवर्षी तेच तर आहे. शाळा/कालेज- दर वर्षी नवी मुले/मुली, डॉक्टरांकडे नवे पेशंट/जूने पेशंट, नवे फार्मसिस्ट/जूने फार्मसिस्ट, वकीलांकडे नवे जूने अशील, लेखकाचे एकसूरी लेखन, वगैरे या गोष्टी सहजीवनात कशा? मी दोन प्रकारच्या सहजीवनाबद्दल बोलते आहे. एक चार भिंतीतले आणि एक organisational पातळीवरचे. Organisational पातळीवरचे सहजीवन जितके चांगले होईल तितके चार भिंतीतले सहजीवन ही चा़गले होईल. जी व्यक्ती खूप जबाबदार असते ती बरेच organisation ला टिकत नाही. ती एक स्पर्धक असते. दुसऱ्यांच्या दृष्टिकोनातून. त्या व्यक्तीला पण जीवन नावाची गोष्ट आहे हे कधीच कोणाला वाटत नाही. अशी माणसे एक नोकरी सोडली, दुसरी पकडली, तिसरी पकडली वगैरे.....त्या़च्याबद्दल ते टिकत नाही ही तक्रार. कामाच्या ठिकाणी त्यांची काय कुचबणा होते ते बरेचदा त्यांना कळत नाही तर बरेचदा इतरांना तसे झाले की बरे वाटते. हे organisational culture म्हणता येईल का? कोणाला ग़मतच वाटेल organisation मध्ये सहजीवन असते ऐकून. तास न तास जिथे तुम्ही काम करतात, ते तुमचं सेकंड होम असते याची जाणीव सगळ्यांना राहिली तर organisation मरणार निश्चित नाही. सलाईनवर जीवंत असणाऱ्या स़ंस्था हे कशामुळे? आपलेपणाची भावना गेल्यामुळे. तसेच कामाप्रती काही समाधान नसल्याने. याचा उपाय म्हणजे लोक संस्था बंद करुन इतर मार्ग शोधतात. जी संस्था उभी करायला प्रचंड कष्ट घ्यावे लागले तिथे संस्कृती निर्माण करण्यापेक्षा संस्था वाढविण्यापेक्षा इतर मार्ग शोधतात. कारण जीवन जलद आहे हे रोजचा आहार सांगतो. मला वाटते जीवन फार संथ असते रोजचा नवीन विचार सुचला तर. सहजीवनात विचार करावा सर्वांगाने, मग समजेल ते कष्टातून फुलते. मुलावर दबाव टाकून ते शिकत नाही, तर शिकल्यासारखे वाटते. शिक्षण हा सहजयोग आहे. म्हणून आवडते शिक्षण. आपण नवीन ज्ञान निर्माण करून स्कोप तयार करतो. पण जूने पण लागेलच हे का विसरतो? सहजीवन दोन पातळ्यांवर – "चार भिंतीतले आणि सामाजिक संस्थेतले". विचार करुया.....

Date :- १७/०२/२६

जिज्ञासेचा प्रवास

जिज्ञासेचा प्रवास चढता असतो. पूर्ण ज्ञान मिळाले की सगळ्याचा कंटाळा असतो! काय आहे, अशी सततची किरकिर असते. फक्त मनोरंजन क्षेत्र तिथे अपवाद ठरते. कारण नवी कल्पना हा एक आशीर्वाद असतो अशी माझी समज आहे. नवा पदार्थ/नवे गाणे/नव्या चाली/नवे चित्रपट इ. याला मोठ्या़चा आशीर्वाद असतो हे विसरून चालत नाही. लहान मुलांना मात्र लवकर लवकर शिकून मोठं व्हायचे असे सगळेच सांगतात. पण मी वेगळे सांगते आहे. तो आत्मज्ञानाचा अभ्यास लवकर लवकर करा. निदान १२ वी पर्यंत. हा जिज्ञासेचा प्रवास सगळ्यात कठीण बरं. कारण इथे चढायची सोय आहे, उतरायची नाही. उतरायला लावले की खूप दुःख होते. बघा अनूभवून. ज्याला स्वयंपाकाची प्रचंड आवड आहे, त्याला लेखन काम द्या (सगळ्या स्त्रीया म्हणतील आम्हाला सगळ्यांनाच आवडतो/ काहींना आवडतं नाही). ज्याला सुचतं आणि नाविन्य आणता येतं, त्याला स्वयंपाक आवडतो/जमतो. ज्याला करुन बघावं आणि तो ते तसे करतो, त्याला ते आवडतं. जगात किती माणसे आहेत. अनेक म्हणतात, जीवनात आम्हाला संधीच मिळाली नाही. खरं असत़ ते. म्हणून शाळा आणि निवास आणि सामाजिक संस्था यांचा खूप मोठा वाटा आयुष्य घडवण्यासाठी असतो. आपल्या मुलांचे आयुष्य चांगले घडावे कोणाला वाटत नाही? सगळेच प्रयत्न करतात. शाळा प्रवेशापासून ते नोकरी/ छोकरी पर्यंत. मग तरी ओंजळी रित्या का वाटतात, अनेकांना. कारण जिज्ञासेचा प्रवास पालकांचा असतो. तो मुलांचा असावा. ज्या मुलांचा तो असतो, ही मुले अशी, कशी? म्हणून टोकराने फळे ओढावी, तशी ती कुठेही ओढली जातात. किंवा बिचारे एकटे असतात! अशांचा ग्रुप असला तर पालकांसाठी कचरा निर्मूलन समिती स्थापन करावी लागते. कारण मूले ऐकत नाही. म्हणून एकात्मिक शिक्षण व्यवस्था. कमी गोंधळ होतात. फळे योग्य वेळी योग्य ठिकाणी जावून बसतात. हा जिज्ञासेचा प्रवास सफल ठरतो. मात्र गुरूपेक्षा सरस ठरलेली मुले गुरूला मागे टाकून हसण्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. कारण गुरूविषयी प्रचंड आदर, श्रध्दा या कमवाव्या लागतात. आपोआप नाही येत. आणि निर्माण झालेली श्रध्दा खरी असेल तर टिकवण्याची आठवण पण राहत नाही. गुरूपद घेतले जात नसते, तर गुरुपद मिळत असते. जिज्ञासा सतत असते. योग्य कृती योग्य वेळी आवश्यक असते. ती समज निर्माण होणे आवश्यक असते.

Date :- १८/०२/२६

सगळं ऑंनलाईन

इंटरनेट जीवनात आले आणि खरच जादू जीवनात आली. सगळंच एका क्लिकवर. मग लहान मुलांना ते मोठ्या माणसांना वाट पाहण्याची, त्यातली गंमत आणि त्याहीपेक्षा त्यातून निर्माण होणारी संयम शक्ती हे सर्व प्रकार बंद झाले. माणसे म्हणतात सुखं बोचू लागली. अति काम हे जसे अयोग्य आहे तसे आँनलाईनमुळे सगळी निरव शांतता भंग करण्याचे प्रयत्न चूकीचे आहेत. प्रत्येक आफिस चालण्याच्या अंतरावर असावे, असे माझे स्वप्न आहे. आफिसच्या वेळा ६ तास/६ दिवस असणे गरजेचे आहे. ८ तास/६ दिवसाच्या कामाच्या वेळां मध्ये ३ तास कितीही तणावजन्य वातावरण ठेवले किंवा कितीही मोकळे वातावरण ठेवले, डोके कामात राहत नाही. त्याऐवजी ५ तास पूर्ण आपले काम आणि १ तास जेवण आणि गप्पा करणे ही झाली सामाजिक शिस्त. ६ तास /६ दिवस या प्रकारात सामान्य कर्मचारी ते वरिष्ठ वर्ग सर्वांचे काम नीट साध्य होईल. यापलिकडे ज्यांना जेव्हा जास्त काम करायचे आहे ते वरिष्ठांच्या संमतीने करावे आणि त्याची नोंद रितसर कामाच्या रजिस्टर मध्ये करावी. हे काम संस्थेसाठी की आर्थिक लाभासाठी हे पण स्पष्ट नमूद करावे. जास्त कामासाठी आलेल्या व्यक्तींवर नजर ठेवण्यासाठी कोणाला नेमावे लागणे हे या कार्यसंस्कृतीचा पण अपमान आहे. ही बाब शाळांसाठी पण लागू आहे. लहान मुलांना शाळेत कोंडून ठेवणे बरे नाही. ७/८ तास चालणाऱ्या शाळा एक भयानक शिक्षा लहान मुलांना असते. १ ली ते ७ वीची शाळा ही ५ तास/६ दिवस असावी. तर ८ वी ते १२ वीची ६ तास /६ दिवस असावी. हिच बाब कालेजसाठी सुध्दा आहे. कला, वाणिज्य, सायन्स महाविद्यालयात शिक्षक नाही, मुले नाही, ही बाब कार्यसंस्कृतीला किती बाधक आहे विचार करावा. प्रोफेशनल कोर्ससाठी सुद्धा हिच बाब लागू आहे. हे एक वळण आहे. वय आणि बुद्धी वाढली म्हणून वळण बिघडवायचे का हा प्रश्न आहे. प्रोफेशनल कोर्सला प्रत्यक्ष काम असते, इतरांना नाही हा समज चूक आहे. कला विद्यार्थी एका वर्षात किती पुस्तके विविध विषयांवर लिहितात? वाणिज्य विभागातील मुले आपले काम करतात? फक्त रोजचे नेमलेले काम केल्याने अनेक गोष्टी सूचतात हे अनूभवाने समजेल. म्हणून वळण ही बाब खूप महत्त्वाची असते. सगळे आँनलाईन करुन मुलांचा आणि कर्मचारींचा संवाद पण आँनलाईन करणे हे ज्यांना योग्य वाटते ते त्यांनी करावे. पण ज्यांना ते योग्य वाटत नाही त्यांनी पायी चालत जाणारे आफिस/ (सामाजिक वाहनांचा वापर करून)आणि कामाचे तास निवडावे. आणि यात पूर्ण एकात्मता असावी. हा लेख आँनलाईन मार्गाला मत देणारा पण आहे आणि आफलाईन कामाच्या महत्वाचे पण प्रतिपादन करणारा आहे. पायी पण चालायचे नाही आणि गाढवावर पण बसू द्यायचे नाही, तर गाढवच डोक्यावर घ्यायचे या मताचा अजिबात नाही. सूज्ञास सांगणे न लगे.

Date :- १९/०२/२६

संकल्पना

संकल्पनेचे मुख्य दोन प्रकार आहेत. एक आपल्या ग्रुपच्या संकल्पना आणि आपल्या संकल्पना. आपल्या संकल्पना नेमक्या काय आहेत हे बरेचदा आपल्यालाच स्पष्ट नसतात. त्यात चूक बरोबर पेक्षाही तो एक प्रवास असतो. कारण काल वाटलेली चूक गोष्ट उद्या बरोबर कशी असते? सत्य कसे काय बदलते? तर सत्य सापडलेलेच नसतांना बरेच जण त्या आविर्भावात असतात. संकल्पना जगण्याचे मूळ आधार असतात. व्यक्तीपरत्वे ते बदलतात. मग समुहाच्या संकल्पना ही एक फार मोठी मिळकत असू शकते. गाठीला बरेच पैसे आहेत, कपडे खरेदीची खूप आवड आहे, विचार करण्याची बरी कूवत आहे, परिस्थिती वेगळी आहे, माणसे विपरीत कसे काय वागतात असे वाटणे खूप स्वाभाविक आहे. स्त्री बाबत विचार परिपक्व दिशेला जाण्यात वेळ लागतो. कारण ती भावनाप्रधानच असते. योग्य विचार असला तरी सोबत माणसे असले की कोणाला काय वाटेल हे वाटतेच. ते लक्षात घेऊनही योग्य ते करण्याकडचा प्रवास लांबचा असतो. एकाच वेळी मनात असंख्य विचार आणि भावना येताना रिमीक्स गोंधळ उडवतेच. संकल्पना स्वच्छ आणि सर्वाभूती चांगल्या असतील तरच त्या समुहात स्विकारल्या जातात. संकल्पनांचे आदान प्रदान म्हणून महत्त्वाचे असते. मी आणि समुह यात समुहाला मी नेहमी चांगला असतो. संकल्पना कशा कशा बद्दल असू शकतात? जीवनाच्या सर्व आयामांविषयी. जेव्हा त्या निदान स्वतःच्या स्वतःला पूर्ण स्पष्ट असतात, दुःखाचे क्षण खूप कमी असतात. समुहाच्या संकल्पना समजायला आपण खूप लहान असतो. जर आपल्याला त्या उशिराने समजल्या तर आपल्याला वाटते, आता काय उपयोग? आपण किती दूर आहे? पण दूर जरी असलो, मुख्य असते आत्मज्ञान. तेच तर नसते. मग क्षणाला होणारे दुःख क्षणाक्षणाला होणाऱ्या ज्ञानापासून दूर ढकलते. लहान वयापासून मुलांना संकल्पनांचा अभ्यास असावा. फार नूकसान किंवा फायद्याच्या निरपेक्ष एक अभ्यास म्हणून. कारण मला कोणती संकल्पना आणि का आवडते, योग्य वाटते हे एक आत्मज्ञानच आहे. आपापल्या संकल्पनांचा अभ्यास करत, जबाबदाऱ्या पूर्ण करत आपण जगलो तर आपण आणि इतर खूप आनंदी राहतील.

Date :- २०/०२/२६

आस्था

जीवनात आस्था हा प्रकार निर्माण होतो. पालक सर्वोच्च सुरक्षा देतात, म्हणून आधी त्यांच्याप्रती निर्माण होते. जीवनात जसे जसे पुढे सरकतो तसे ही भावना पण समग्रपणे समजत जाते. एक दिवस निसर्ग ही गोष्ट समजते. त्यातली विविधता, विपुलता, त्यांचे सौंदर्य, त्याचं आपल्याला निरपेक्षपणे देणं. जीवनाच्या एका टप्प्यावर हे नूसतंच जाणवत राहतं. आधी नकोसा वाटणारा पाऊस आणि नकोसा वाटणारा चिखल जीवनाची समज वाढवतो. या निसर्गाच्या कृतज्ञतेतूनच निर्माण झालेले सण मन मोहरवून टाकतात. आपण प्रत्येकाने सतत कोणती तरी जबाबदारी घेतली तर निसर्गाचा तोल कधीच कळणार नाही याची खोलवर जाणीव निर्माण होते. प्रचंड उष्मांकाने जीव कोमेजतो, तरी पावसाचे दर्शन होत नाही. डोळे आभाळाकडे नजर लावून असतात की आता पूरे, सहन नाही होत. इतकी निसर्गाची कृपा/किमया असते. मनाला होणाऱ्या सर्व संवेदना या वातावरणीय असतात. जडत्व आणि ईशत्वाची अनूभूती घेतच असतो. जीवनात निर्माण होणाऱ्या आस्था या वेगवेगळ्या अनूभव व जाणीवांतून होत असतात. काही म्हणतील आम्हाला असे वाटत नाही. असू शकतं. काहींना ही बाब जाणवेल. चला शोधू या आपल्याला कशा प्रती आणि का आस्था निर्माण होतात किंवा झाल्या/आहेत?

Date :- २१/०२/२६

चूकवू नये असे काही

हा चित्रपट पाहिला का? ते गाणं ऐकलं का? त्यांना भेटलास का? तिला भेटलास का? लहान वयात अशी होणारी धावपळ खूपच छान आणि शक्तीवर्धक असते. मूळात या धावपळीचे कोणतेच प्रयोजन माहीत नसतांना काही लहान मुले सांगितले म्हणून धावतात, तर काही मूले समजले म्हणून धावतात. अशा समजणाऱ्या मुलांना इतर मुलांना काही समजले नाही म्हणून काही मुले लोटून देतात. खरच चूकवू नये असे बरेच काही असते. वयाच्या २५ व्या वर्षांपर्यंत मुलांनी खूप शिकावे. शिक्षण तर निरंतर असते. ज्याला शिकायचे असेल, त्याला. पण शिकून आपण त्यांचे उपयोजन कशासाठी आणि कुठे करतो, ते किती महत्त्वाचे असते? अनेक जण शिक्षणाचा उपयोग इतरांची टिंगल, खोड्या काढण्यासाठी करतात. सवय अशी एकदा जडली की ती काही जाता जात नाही. म्हणून २५ व्या वर्षांपर्यंत विद्याभ्यास ही गोष्ट खरच हितावह आहे. लहान वयात जे आपण चटचट शिकतो, नंतर ते लक्षात राहत नाही. मनाला अनेक प्रलोभने असतात. ते चूकवू नये असे काही नाही मात्र काही वेळा परिस्थिती अशी असते की सगळेच चूकवावे लागते. चूकवावे लागतात मानवी नात्यातले हिशोब! कारण दुखरे मन सतत काहीतरी अजून चूकीचे करते. शांत, सुस्पष्ट मनाला चांगले मार्ग, चांगल्या वाटा

सूचतच असतात. चूकवू नये असे काही बरेच जण अनेकांना सांगतात. पण आपल्याला बरेचदा माझ्यासाठी काय चांगले आहे हेच समजलेले नसते. मग कैची कितीही सांगू देत, अमूक कर, तमूक कर, आपलं काही तरी चाललेले असते. समोरचे आपल्यावर प्रचंड चिडतात, नाराज होतात. पण खरं तर हे असतं की काही जण इतके हरवून जातात की त्यांच्या बर्याच गोष्टी चूकतात. आयुष्यात आपल्या चूकांवरच लक्ष देणारी माणसे पण असतात. ते तसे का करतात, एवढे लक्षात आले की चूकवू नये, हरवू नये अशी माणसे, मित्र मैत्रिणी सगळेच भेटतात. आपण त्यांना चूकवणार का?

Date :- २२/०२/२६

अढळ पद

कशाचे दुःख होईल हे पूर्व अनूभव ठरवत असतात. मग हे दुःखाचे गाठोडे कमी होण्याऐवजी वाढतच जाते. माणूस पुन्हा प्रयत्न करतो की कमी होईल तर बरे. आणि एक दिवस लक्षात येते, अरेच्चा हा प्रकार तर काही संपतच नाही. आपले पूर्व कर्म याला इतके महत्त्व का दिले जाते? तर स्प्रिंग जशी उलगडते तसे आपले मूलभूत गुण समोर येत जातात. स्वस्थ, गुपचूप न बसणाऱ्या व्यक्तीला गुपचूप बैस सांगणे एक शिक्षा असते. पण तसे घडेल का? ते काही तरी शोधून काढते. मला वाटतं दुःखी राहणे ही सुद्धा एक मनोवृत्ती बनत जाते. भोगवाद आणि इहवाद हेच वाद किंवा प्रकार आहेत. पण जेव्हा आपण खूप शिकावे ही प्रचंड प्रेरणा मला असतांना आपण कमी कसे काय शिकतो? असा प्रश्न सतत पडतो/पडायचा. याचे कारण आपण आनंदी नाही राहत, आपण स्वतःच्या प्रश्नांबाबत स्वतःशी संवाद नाही साधत. अशी म्हण आहे, "प्राप्त काल हा विशाल भूदर" प्राप्त परिस्थितीत अनेक गोष्टी असतात. आपल्याला समजले नाही, कोणाचे ऐकले नाही की चूका या होणारच. पण काहींना करायचेच वेगळे असते. ते बरेच जणांना मान्य नसते. याचे कारण समजणे हा अवघड प्रकार असतो. म्हणून एकमत होत नाही. अढळ पद सर्वांना हवे असते. मुलगी, पत्नी किंवा कोणत्या व्यवसायातले. नात्यात असे वाटते, हे हक्क गाजविण्यासाठी असे करतात, व्यवसायात असे वाटते हे पैसा कमविण्यासाठी करतात. चांगला विचार कोण करते हे समजणं किती कठीण असते. अढळ पदांची हिच गोष्ट. ज्या दिवशी आपण कर्म हे अढळ पद मिळवतो त्या दिवशी आपण सर्वात सुखी होतो. रामदास स्वामींच्या प्रश्नाचे उत्तर हे आहे. सुखाचा सदरा वगैरे नसतो. ओरबाडून मिळवलेले सुख तर सुखाच्या व्याख्येत येतच नाही. किती प्रयत्न केला तरी आनंदाचा सदरा अशा ठिकाणी येत नाही. ज्या दिवशी आपल्या शुध्द भावना आणि प्रेरणा समोर येतात, त्या दिवशी सगळे जग

नवीन असतं. नको असलेली कामेसुद्धा करावी लागतात किंवा इतरांची मते असतात. पण खरं असते ते आतून येणाऱ्या प्रेरणा. त्या काही अढळ पदासाठी नसतात. ते थोरा मोठ्यांचे आशीर्वाद पण असतात. जीवनात होणाऱ्या सर्व चूका या आत्मज्ञान नसल्यानेच होतात. ज्या दिवशी हे ज्ञान होते, मला भरपूर शत्रूच आहेत, मित्र, मैत्रिणी, शुभचिंतक कोणी नाही अशांचे पण सगसोयरे त्यांना मिळतात. अशी ही गोष्ट अढळपदाची. जे हवं ते मिळविण्याच्या प्रवासात जे जे हवे आणि जे जे योग्य आहे ते मिळत जाईल यावर विश्वास ठेवणे यातून असंख्य अपेक्षा नसलेली पदेही मिळत जातील.

Date :- २३/०२/२६

कठीण गोष्ट

आयुष्यातली सर्वांत कठीण गोष्ट कोणती? असे कोणी मला विचारले तर मी निसंशक आणि सहज सांगेन स्वतःच्या स्वप्नांसाठी, केलेल्या संकल्पांसाठी, दिलेल्या वचनांसाठी जगणं. या सगळयाच बाबी कठीण आहेत. उजाडलेला दिवस नव्या कल्पना समोर घेऊन येतो. प्रत्येक कल्पना, विचार सत्यात उतरेल का? याचा अभ्यास करणारं मन, शरीर आणि सवयी यात आयुष्याचे तारुण्य जातं. किनाऱ्यावर सतत हळहळ व्यक्त होत असते, काय झाले, काय करत आहेत, असे जगायला हवे होते, तसे करायला हवे होते. यातले सांगणारे सगळेच किनाऱ्यावरचे असतात असे नाही. काहींना खरेच खूप दुःख होते. पण ते आपल्या जवळ नसतात, पण त्यांना आपली माहिती असते. तर आयुष्य असेच असते की वास्तव समजतच नसते, किंवा वास्तवाच्या फार पुढे गाडी धावत असते. मग त्या गाडीला रुळावरून चालवणे, नीट स्टेशनला आणणे सोपे नसते. अनेक स्वप्नाळू मुले वास्तवात स्वप्न आणायला कमी पडतात. स्वप्न वास्तवात आणायचे प्रशिक्षणच नसते. ही मुले इतरांसाठी वेडपट असतात. कारण त्यांना रोजचे जीवन जगणे नीटज्ञजमत नाही. लहान मुलांनी, तरूण वयातल्या मुलांनी स्वतःला समजावे. आपल्याला कोणकोणत्या कल्पना येतात, त्यातल्या सत्यात किती येऊ शकतात, आपण आपल्या पातळीवर काय करू शकतो, सध्याच्या वातावरणात यात काय अडथळे आहेत इ. अनेक मुला मुलींचे अनेक स्वप्न असतात. पण ते पूर्ण करण्यासाठी कधीच मार्ग, त्याहीपेक्षा त्याला लागणारी दुर्दम्य इच्छाशक्ती विझत जाते. विचार, संकल्पना चांगल्या असतात. नसतं कोणाचेही पाठबळ. किंवा तिचं अपेक्षा. बरेचदा आयुष्य यातच जातं, मला कोणी नव्हतं. मला पाठबळ नाही. क्षणाक्षणाला आपलं स्वप्न, संकल्पना, विचारांची माती या एका विचाराने होत जाते. बरीच वास्तववादी माणसे म्हणतील, आम्ही जे करतो, ते पुढे काय घडेल याचा

अंदाज घेऊनच. खरे तर ते अनूभववादी असतात. अनेकांचे आयुष्य पाहिल्यानंतर त्यांना चांगले जनरलायझेशन करता येते. हिच गोष्ट सुंदर संकल्पना/योग्य विचार लक्षात आलेल्यांची या बाबतीत घडले तर? स्वप्न किंवा संकल्पना कधी अनूभव नसतो की त्यांचे जनरलायझेशन होऊ शकेल. स्वप्नाळू माणसाने संशोधनात्मक वृत्ती बाळगली पाहिजे. आपल्या स्वप्नाला सत्याचे ठोस पुरावे हवेत. त्या पुराव्यांच्या आधारे आपण काम करू शकलो पाहिजे. संशोधनात्मक कामे गुंडाळून बाजूला ठेवण्यापूर्वी ओपीनीयन पोल घेतले गेले पाहिजे. किती जणांना समजले, किती जणांना मान्य झाले, प्रत्यक्षात काय केले पाहिजे, कसे करायला पाहिजे. संशोधनात्मक वृत्तीची व्यक्ती स्वतःचे म्हणणे खरे करण्यासाठी कधीच संशोधन करत नाही. तर ती त्यांची जगण्याची गरज असते/तो त्यांचा मार्ग असतो. इतरांना वाटते तास, तास काय चालले आहे? म्हणून जगात सर्वात कठीण गोष्ट स्वतःच्या स्वप्नांसाठी जगणे. यात प्रचंड वेदना आहेत, स्वप्न साकार करण्याचे प्रयत्न आहेत, स्वतःचे स्वप्न इतरांनी जगतांना पाहाणं हा वेगळा भाग तर त्या संकल्पना इतरांनी समजून घेऊन वास्तवात आणून दाखवणे, कधी स्वप्नांची पूर्ण राख रांगोळी होणे. तत्वज्ञानाची पायरी चढतांना समाजासाठी कुतीत आणाव्या अशा संकल्पना कोणी हस्तगत केल्या आणि समाजासाठी अंमलात आणल्या तर हळूहळू वाईट वाटणे कमी होते. कारण मी ला संपवण्याचा प्रवास सुरु असतो. कोणत्याच पातळीवर असलेली स्वप्नं पूर्ण होत नाही तेव्हा कधी वाटते किती अर्थशून्य आयुष्य असते. किंवा आहे. पण हे मनावरचे काळे जाळे फेकून नव्या पिढीला हे असले संदेश देत नाही जगायचे. म्हणून प्रत्येक तुटलेले स्वप्न तुम्ही जगूनच दाखवा म्हणून समाजासाठी संशोधनात्मक कार्यक्रम रचण्यासाठी दिवसाचे किती तास झटतो यांचा हिशोब राहत नाही. पण असे करुन exit घ्यायची की एक दिवस स्वप्न बघणाऱ्याला ते जगताच येईल अशी सामाजिक सोय, खर्या अर्थाने.....माझ्यासाठीचे सर्वात कठीण काम.

२४/०२/२६

मुलांचे वाढदिवस

मुलांचे वाढदिवस प्रत्येक पालकांना एक आनंदाचा दिवस असतो. त्या दिवशी बाळ हातात येऊन एक पुनर्जन्म झालेला असतो. पुनर्जन्म म्हणजे काय? तर आपले बालपण आणि त्यांचे बालपण पुन्हा जगण्याची संधी. त्यातून ग़ंमत अशी की ती मुले आपल्यासाठी सततच लहान राहणार. आपल्या आणि त्यांच्या दृष्टीने ते कितीही मोठे झाले तरी पालकांसाठी मुले सदैव लहान असतात. मुलांचे वाढदिवस वेगवेगळ्या पध्दतीने साजरे होतात. वाढदिवसाला अनेक ठिकाणी मुलांना खेळणी,

पुस्तके भेटवस्तू देतात. प्रेम व्यक्त करण्याचे ते मार्ग आहेत. पण वस्तुस्थिती जाणवते अशी की मुलाला पण खेळण्याचे कोणतेच महत्त्व जाणवणार नाही इतकी खेळणी आलेली असतात. बरेचदा रिटर्न गिफ्ट दिले जाते. काही ठिकाणी यातले काहीच नसते. अनेक घरांत वाढदिवस ही संकल्पना पण नसते. काही घरात बाळाला औक्षण करुन पालक ईश्वराजवळ त्याच्याबद्दल शुभचिंतन करतात. जिथे पऱंपरा नाही, तिथे तरूण मुले कोणतेही अनूकरण करत आनंदाने जगणे एवढीच परंपरा मानतात. ते खरे आहे. जेव्हा आर्थिक नियोजन ही बाब आपल्याला माहित नसते, तेव्हा घरातल्या स्त्रीने हट्ट करून ऋण काढून सण साजरे करणे खरच योग्य नसते. अशावेळी आपल्या मुलांना औक्षण करून ईश्वराजवळ त्याच्या आयुष्यासाठी प्रार्थना हा मार्ग योग्य असतो. पण जेव्हा आपली सुस्थिती असते, तेव्हा मुला/मुलींचे मित्र मैत्रिणी यांना घरी बोलवून घरी वाढदिवस साजरा करणे पालकांसाठी आणि मुला़साठी खूप रम्य अनूभव असतो. यात मुलांना कोणीही भेटवस्तू न आणता आणि कोणतीही भेटवस्तू न देता एकत्र येऊन सहभोजन एवढाच आनंद साजरा करणे मला योग्य वाटले. बरोबरीच्या मुलांनी अगदी पुस्तक सुध्दा भेट देऊ नये असे मला वाटते. मात्र पालकांनी आवर्जून जे जेव्हा जमेल तेव्हा द्यावे. ते आपल्या मुलांसाठी त्यांचे स्वप्न असावे. पालक होण्याच्या प्रवासात आपण किती अपूर्ण असतो, हे मला माझ्या जीवनप्रवासात जाणवले. पालक बनणं ही एक हौस/आस नसून ती एक उच्च प्रतीची जबाबदारी आहे असे वाचले होते. ते जाणवत राहते. एकत्र कुटुंब असले की मुले चांगली घडतात/घडत नाही असे मतप्रवाह आहेत. त्याचे कारण असे की जबाबदारी नेमक़ कोण घेतो की मुले आधार शोधत राहतात? सगळेच जबाबदार असले तरी मुलांचा ओढा कोणाकडे तरी असतो. त्यांची त्यांची कारणे असतात. कधी कधी एकत्र कुटुंबातील मुले खूप अलिप्त असतात. एकत्र कुटुंबात जबाबदाऱ्या ठरवलेल्या असतील आणि त्या कसोशीने पार पाडल्या तर त्या कुटुंबातील मुल सर्वात सुरक्षित आणि आनंदी असेल असे मला वाटते. अशा कुटुंबात मुलांचा वाढदिवस सर्वांचे मत विचारात घेऊन साजरा करायला हवा. कारण घरातील साधनसंपत्ती प्रत्येकाची असते. त्यात काही कमी जास्त झाले तर भावना दुखावतात आणि दुसऱ्या जबाबदाऱ्या पार पाडणे अवघड होते. मुलांना येणाऱ्या खूप भेटवस्तू हे प्रेमाचे आणि त्यांचा आनंदाचा कोष वाढण्याचे लक्षण कधीच नसते. तर त्या दिवशी आपल्या मित्र मैत्रिणींबरोबर आपल्या निवासात त्यांनी खाऊ खाणे, भरपूर खेळ खेळणे, घरातील मोठ्यांचे आशीर्वाद घेणे यातून मुले खूप आनंदी दिसतात. असे क्षण ते पुन्हा पुन्हा आठवतात. प्रेम हे मूल्य आहे. भेटवस्तू हे एक फक्त प्रतिक आहे. प्रेम भेटवस्तूच्या पलिकडे असते. शाळेतील घरी न आलेल्या प्रत्येक मुलाने एकमेकांचे

अभिष्टचिंतन हे प्रेमच आहे, सद्भावनाच आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणावर साजरे होणारे वाढदिवस पालकांनी लक्षात घ्यावे. त्याऐवजी त्यासाठी होणारा थोडा फंड त्यांनी शाळा वा अन्य सामाजिक कामासाठी राखून ठेवावा. बर्याच पालकांना एका वयात आपण काही सामाजिक काम करावे असे वाटते. पण ते करण्यासाठी सद्भावना असतात, पण पुरेसा निधी नसतो. सामाजिक कामासाठी सगळ्यांची मते जुळून येणे हा पहिला निधी असतो. पुढचा निधी वेगळी बाब असते. या दोन्ही गोष्टी हातात हात घालून काम करतात, तेव्हा खूप चांगले चित्र निर्माण होते. अनेक जण म्हणतात पैसा/साधनसंपत्ती सर्वस्व नसते. पण वागतांना आपण तसे वागू शकत नाही. चूकीच्या मार्गाला माणूस पत्नी आणि मुलांच्या सुखासाठी जायला सुरुवात होते. ते जर थांबले नाही तर वेगळे सामाजिक अध:पतन दूर नसते. झालेला किंवा वाटलेला अपमान सहन करणे जितके दुःखद असते, त्याहीपेक्षा मिळणारा सन्मान सांभाळणे/त्यापलीकडे राहणे महाकठीण असते. मोठमोठे हाटेल्स किंवा हाल्सचे काय? तर ज्यांना तिथे शक्य आहे तिथे पण वय वर्ष १२ च्या पुढे. कारण लहान मुले सर्व सारखीच असतात. बालवयात त्यांना समजतच नसतांना त्यांचा फक्त पालकाची इच्छा म्हणून मोठे हॉल आणि हॉंटेलमध्ये होणारे वाढदिवस यातून मुलांना नेमकी काय शिकवण मिळणार? तरूणांनी आपले अनव्हसरी आणि व्हॅलेंटाइन वेगळ्या प्रकारे साजरे करून पालक/गुरूजन यांचे वाढदिवस/सत्कार सोहळा केला तर? समाज नेमका कोणत्या दिशेने जाणार? बालवयातला वाढदिवस पालकांचा आनंद आणि तितकी समज आणि क्षमता पालक म्हणून असणाऱ्यांनी केला तर वेगळे. पालकत्व हा एक प्रवास आहे. साजरी होणारी प्रत्येक गोष्ट आनंदाची आणि समाजहिताची आणि आपली पण समज वाढवणारी असावी. समाजहितात मुलांचे संवेदनशील मन घडणे सुध्दा आले ना? मग ठरवा मुलांचे वाढदिवस कसे साजरे करायचे?

२५/०२/२६

सर्व प्रकारचे कोशंट

माझ्या वाचनात भावनिक बुद्धिमत्ता, भाषिक बुध्दिमत्ता, सामाजिक बुध्दीमत्ता असे अनेक प्रकार आले. बुद्धिमत्तेचे असे प्रकार का केले असावे असा प्रश्न मनात आला. कारण मला ज्ञानाचे थोडे प्रकार माहीत होते. पण यालाच ज्ञान म्हणतात याची जाणीव नव्हती. इतके ज्ञानाचे प्रकार असल्यावर बुध्दिमत्तेचे प्रकार ही बाब मला फारशी योग्य किंवा आवडली नाही. कारण बुध्दीमत्ता एक वरदान आहे, असे माझे मत आहे. शिक्षणाला सर्व बाबींची ओळख, नतर स्वतःला जाणण्याचा अभ्यास आणि नंतर शिक्षणक्रम ही बाब मी माझ्या प्रकाशाची ओळख, स्व-ओळख भाग

१/२ मध्ये नमूद केली. ती मी स्व- अनूभवातून केली. शालेय जीवनात सर्वच मुलांना सगळ्याच बाबी आवडतात आणि येतात असे वाटते, पण ज्या वयात आपण जे तीव्र गतीने करतो, ती आपली आवड असते. म्हणून कोशंट शिकवून आपण बुध्दीमत्तेचे प्रकार करणे फार धोकादायक वाटते. भावनिक बुद्धिमत्ता याबाबत मला ते जास्त ग़भीर वाटते. समाजातील सर्वच बाबतीत लहान गट मोठ्याचा आधार घेत जगतो. जर आपण प्रेम हा शब्द वापरला तर माणसे जबाबदारीने वागतील. आणि भावनिक बुद्धिमत्ता वापरला तर माणसे फक्त काम काढून घेत संबंध जपणे समजतील. म्हणून गुणवत्तेबरोबर नीतीमत्ता जपणे किती महत्त्वाचे आहे. मुलांच्या हातात भावनिक हुशारी बाबतची पुस्तके आली आहेत. खरं तर प्रेम, आदर या भावनांची बाजारात कुठे पुस्तके नसतात. ती जगण्यातून निर्माण होतात. प्रेम, आदर असेल तर शब्दाबाहेर न जाणं ही बाब समजते. याचा अर्थ मानसिक/ वैचारिक गुलामगिरी नव्हे. निर्भीडपणे आपली मतं मांडणे हे तर माणूस म्हणून जगणे आहेच. पण मते मांडून इतरांच्या भावनांचा अनादर करणे ही बाब वेगळी आहे. वाढदिवस कसा साजरा करावा हे मी एका लेखात लिहिले आहे. पण पालक म्हणून मी स्वतः माझ्या मुलांसाठी अनेक गोष्टी केल्या पण वाढदिवसाला आवर्जून त्याला भेटवस्तू दिली नाही. कारण ती बाब माझ्या अनूभवविश्वाच्या बाहेरची होती. एकदा अनूभव मिळून ज्याला ती बाब लगेच लक्षात येते, ती बुध्दीमत्ता निराळी असेल. मला वाढदिवसाला कधीतरी भेट मिळाली पण पालकांकडून नाही. हे कशासाठी? तर बुध्दीमत्तेचे सरसकट प्रकार कधीच नसतात. ती बाब अर्जित असते. फरक इतकाच की जितके आपण स्वतःला ओळखत ज्ञान संपादन करू आणि तितक्याच निर्मळ बुध्दीने समाजासाठी वापर करू, कदाचित अपेक्षाही केली नाही असे प्रेम/अशी माणसे आपल्याला भेटतील. शब्दाबाहेर न जाणं हे दैनंदिन जीवनात पण लागू करणारी माणसे आहेत. अशा वेळी बुध्दीमत्ता निरनिराळ्या ठिकाणी चालणाऱ्या व्यक्तीला समोरच्या व्यक्तीला समजावून समजत नाही. अशा वेळी प्रचंड मोठे सामाजिक नूकसान होण्याची शक्यता असते. शब्द प्रामाण्य जितके महत्त्वाचे आहे तितकेच बुध्दीप्रामाण्य देखील.

२६/०२/२६

कोणत्या दिशेने?

थोडे ज्ञान मिळाले की वाटणारी बाब म्हणजे सिंपल आहे. थोडं पुढे निघालो की वाटणारी बाब, अरे वाटते तितके सोपे नाही, त्यापेक्षा पुढे गेले की बापरे, किती कठीण आहे. ज्या क्षणाला आपल्याला वाटते, बापरे कठीण आहे, त्यादिवशी आपण थोडे खरे ज्ञान मिळवले याची शक्यता असते. याचा अर्थ लहान मुलांना

बापरे, नाही शिकवायचे किंवा फार कठीण आहे बाबा, हे पण नाही शिकवायचे. तर ते त्यांना समजायला हवे. त्या दिशेने त्यांना नेणे हे काम महत्त्वाचे आहे. माणसाला काही कळत नाही तेव्हा तो जाणकारांकडे जातो, कोणते शिक्षण द्यावे यांना? त्यांचे चूक काहीच नसते. कळत नसतांना दाखवलेला मार्गच योग्य असतो. जेव्हा कळतं असते, पण अनेकांना मान्य नसते, तेव्हा त्याची कारणे शोधणे हा मार्ग असतो. निराशेत जगणं हा पर्याय असतो का? मी विविध उद्योग करणारी माणसे बघितली. विविध गोष्टी करुन विविध अनूभव मिळवणे एवढेच काहींचे जीवन असते. हेतू असेल नसेल. पण परिस्थिती सामान्य असतांना आपण निदान एका विषयातली तज्ञता मिळवायला नको का? उदा. एखाद्या स्त्रीला पार्लर हा विषय दिला तर तज्ञता मिळेपर्यंत तिने दुसऱ्याच्या हाताखालील काम करणे योग्य आहे. थोडंसं जमलं की बरेच जण त्यांना वेगळा व्यवसाय करायला परवानगी देतात. पण लक्षात घ्यावे हे जूजबी ज्ञान आहे. पूर्णता अनेक वर्षांच्या सहवासाने येते. म्हणून स्वतःचा लगेच व्यवसाय करण्याऐवजी काही वर्ष तज्ञांच्या हाताखाली काम करावे. यात मग ग्राहक मिळण्यात वेळ जातो. बरोबर आहे. या वर्षात झालेल्या ओळखी आणि निरपेक्ष सेवा आपल्याला जगण्यासाठी नक्की मदत करते. यावर जगून मग विश्वास बाळगावा. ही बाब सर्वच व्यवसायांसाठी आहे. सातत्यपूर्ण शिक्षणाचा नियम शिक्षणसंस्थांना वरदानदायक आहे. व्यवसायात थोडेसे नफ्यावरून भांडण झाले की व्यवसायातील करार सुध्दा संपुष्टात येतात. ज्याला आपले कर्म समजते, पण ज्याला आपला परिवार समजत नाही, त्याला पण कर्म आणि न्याय सिद्धांताने मार्ग सापडेलच. म्हणून आपण ज्याच्याशी करार केला आहे ते करार मोडणे, हे निराळे असते. नवी माणसे शोधणे, नवे ज्ञान मिळवणे, समजणे ही बाब वेगळी. पण व्यवहार मोडणे वेगळे. हे का घडते? व्याप एकाचा वाढत नसतो, प्रत्येकाचा वाढतो एवढी गोष्ट मोठ्या व्यक्तींनी लक्षात घेतली, तर मोठ्या व्यक्तीने आता तू तुझे बघावे हे सांगितल्याशिवाय लहान व्यक्तीने तसे करणे चूकच आहे. बरेचदा आकलनाच्या पातळीवर सर्व समजते पण भावनिक पातळीवर नाही. मग ते कसे घडवावे? तर त्यासाठी स्वतःला दैनंदिन जीवनात रोज वळण लावण्याशिवाय पर्याय नाही. तुमच्या लक्षात येईल, देव/निसर्ग/चांगली माणसे खूप देतात. पण आपल्याला घेण्याची क्षमतादेखील नसते. जेव्हा जेव्हा दुःखद प्रसंग येतात, तेव्हा कधी मदत नसते म्हणून तर कधी आपल्या आकलनाअभावी आपल्याकडून चूकीचे निर्णय, चूकीचे वर्तन घडते. म्हणून कोणत्या दिशेने? सन्मार्ग, आवड, योग्य तिथे अनूभव, ठरवलेला व्यवहार ही बाब आपल्या बाबतीत आपण विकसित करणे श्रेयस्कर असते का?

२७/०२/२६

मेलोड्रामा आणि मेलोडी

मानवी जीवन बरे आणि ठिक ठिक सुरू असतांनाच मेलोड्रामा कोणी तरी केला असे वाटते. कधी कधी ते खरे असते. कधी कधी खोटे. आपण जीवन जगत असतांनाच कधी कोणी थट्टा करते, कधी कोणी समजून घेते, कधी कोणी समजून घेण्याचा आव आणते. यातून मेलोड्रामा घडतो. मग मेलेडी कशी घडते? समजून घेण्यातून. आणि ते सहवासाने पण घडते असे नाही. खूप सहवास असलेली माणसे पण बरेचदा समोरच्याला समजून घेण्यात कमी पडतात. तर अनेकदा विशेष परिचय नसलेली माणसे सहज समजतात. हे असंच घडतं. इथून मेलैडामा आणि मेलोडी टर्न घेत असते. मानवी नात्यात प्रेम कुठे सुरु होतं? जिथे पश्चात्ताप थांबतो. पश्चात्ताप म्हणजे हिशोब दुसऱ्याप्रती सुरु होतात. विचार संपलेले असतात. असे वागलो तर तसे घडले असते वगैरे. सुंदर नाटके ही माणसांच्या वृत्तीचे मनोदर्शन घडवतात. पण ही वृत्ती घडते कशी यांचे कुठेच अभ्यास किंवा अहवाल नसतो. दुःखामुळे दुसऱ्याला सतत पराभूत करण्याची मनोवृत्ती कशी घडली? घडते? तर दुःख निर्मोही प्रेमाकडे कधीच नेत नाही. ते मी पराभूत झाले आणि काही वेळा दुसऱ्याला काही दाखविण्यासाठी काही करते. ते पराभूत मन असते. पण मी कुठे आणि काय चूकलो/ले हे शोधणारे मन कधीच पराभूत नसते. कारण काहीतरी कर्म करत जगणं हा भाग आहे आणि त्यातून वाट काढत पुढे जातांना समजते, अरे! आपल्याला करायचे काय काय होते आणि करत काय होतो? आयुष्यात जेव्हा दुसऱ्यावर विजय प्राप्त करण्याची इच्छा बाळगतो तेव्हा तेव्हा मानवी इतिहासात फक्त मेलोड्रामाच घडतील. पण मला माझ्या चूका मान्य आहेत आणि माझे कर्म करत मी जगतो/ते आहे असे आपण जगू तेव्हा मेलोडीच घडतील. वीजीगिषू ही वृत्ती नसते. तो आशीर्वाद असतो. पुढची पिढी ठरवेल मेलोडी की मेलोड्रामा? मागचे धडे पूर्ण बंद करता येत नाही म्हणून मेलोड्रामा घडतात. दुसऱ्याला शिकवण्यासाठी तितकी जवळीक लागते. नाही तर दुःख आणि अपमान वाटतो. जवळीक आणि शिकून घेण्याची तयारी पण लागते. मानवी समाजात कुरघोडी हा जो प्रकार म्हणतात, तो दुसऱ्याला दाखवणे हा भाग असतो. त्याने काही फार सिध्द होत नाही. कर्मरत हा प्रकार वेगळा असतो.

२८/०२/२६

एका क्षणात परके

मानवी नाती ही म्हटले तर खूप सरळ आणि केले तर खूप गुंतागुंतीची. एकमेकांसाठी काही केल्याने जवळीकता वाढते, सुरक्षितता वाढते. पण याचा अर्थ आपण दुसऱ्यांना नीट ओळखतोच असे नसते. आपापल्या विचार विश्वात सगळेच असतात. लहानपणी खाऊ खाण्याच्या विविध इच्छा असतात, यौवनात वेगवेगळ्या मित्र मैत्रिणींबरोबर वेळ व्यतीत करायचा असतो, वार्धक्यात कोणाची साथ/मदत हवी असते, कोणी आपले ऐकून घ्यावे असे वाटत असते. ज्या लहान मुलांना नीट समजते की संस्कारात वाढलेली मुले मैत्रीतील मर्यादांना नेहमी समजतात. हे ज्या मुलांना समजत नाही किंवा समजून जे चूकीच्या पध्दतीने वागतात ते चूकच करत असतात. त्यांना चूक समजली नाही तर ते कोणाला तरी शिक्षा देत असतात. आपण माणसांपासून जेव्हा दूर असतो, पण पोटतीडकीने काही सांगतो, तो पण जिव्हाळ्याच असतो. ऐकणे, न ऐकणे हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. माणसांना एका क्षणात परके का वाटायला लागते? काही अपेक्षा समजून घ्यायच्या राहिलेल्या असतात. काही जण स्पष्टपणे म्हणणे बोलून दाखवतात. तर काहींसाठी ते अवघड असते. कारण अनेक संमिश्र, न समजणाऱ्या भावना असतात. कधी कधी काहींना अपेक्षा बोलूनच दाखवायच्या नसतात. अशा अनेक गोष्टी. अमूक एक त्या वेळी असे काही बोलले, असा विचार आपण करतो. नंतर भेटतील तेव्हा नीट बोलून घेऊ. पुढच्या वेळी ते विसरून गेलेले असतात. आपण कधी कुठे विचार करतो. घडते असे? विचार विश्व वेगवेगळे असते. सन्मानित आयुष्य मात्र दोन वर्षाच्या कारट्यालासुध्दा हवे असते. स्विकार नाही झाला की अतोनात दुःख होते. परकेपणा देऊन व्यवहार साधता येतो अशी काहींची समज आहे. कोणताच परकेपणा न ठेवता आपुलकीने आपली बाजू मांडणे ही बाब काही भावनिक फसवणूकीत येत नाही. या बाबी समजायला आपण खूप लहान असतो. आयुष्याचे ऋतू समजवतात सगळं. अनेकांना वाटते, आपण काही कुठे चूकलो नाही. पण जितक्या आपल्या प्रेरणा, इच्छा शुद्ध होतात, आपल्या चूका समजत जातात. बरेचदा अगदी लहान वयातली मुले अगदी व्यवहाराने वागतात, तेव्हा वाटते, अरे, समाजात असे पण शिकवले जाते? किंवा हे ही मुले कसे आणि कुठे शिंकली? आणि सतत वेगवेगळ्या लोकांना भेटताना यांना खरच प्रेमाची नाती आहेत माहिती? एका क्षणात परके..... तुमच्या आयुष्यात कोणा कोणाला वाटले असे? तुम्ही दिली अशी वागणूक कोणाला? तुम्हाला दिली अशी वागणूक कोणी? का दिली असेल असे वाटते? असे घडायला नको ना?

२९/०२/२६

मानसिकता बिघडण्याची कारणे

मानसिकता बिघडण्याचे वेगवेगळे स्वरूप असते. ज्यांना सुस्पष्ट समजते आपण काय करायचे त्यांची मानसिकता त्यांनी योग्य पध्दतीने जपली नाही तर त्यांची मानसिकता बिघडण्याला तेच जबाबदार असतात. ते ज्यांना समजले तिथे स्वतःची स्वप्ने साकार होण्यासाठी स्वतःची मानसिकता समजणे हाच उपाय असतो. दुसऱ्याला समजत नाही असे नाहीच. लहान मुलांची मानसिकता बिघडवून नंतर दुरूस्त करणे मला वाटते हा उपाय नसावा. तर ती घडत असतांनाच ते त्यांच्या इप्सित स्थळी पोहचणे हे खरे काम नाही का? मी २३/२५ वर्ष विविध कारणांनी हा विषय मूळीच इच्छा नसतांना संपर्कात आले. मानसशास्त्र विषय मला चूकून ही शिकायचा किंवा समजायचा नव्हता. आजही त्याविषयी लिहिते ते पुस्तकी शिक्षण नसून स्वानूभवातले शिक्षण आहे. अडथळ्यांची शर्यत किंवा फार काही उपलब्ध झाले की मुले खूप चांगले घडतात, असे सार्वत्रिक समज चूकीचे आहेत. तर वेळीच स्वतः बाबत स्वतःला समजणे हे जास्त योग्य. बरीच माणसे एकटे राहणे त्यासाठी स्विकारतात. तर अनेक चूकून एकाकी व्यक्तींना याची कल्पनाच नसते. काहींना सामाजिक समज असते, ती आवड/बुध्दीमत्ता किंवा योग्य प्रशिक्षण हा भाग असू शकतो. पण शैक्षणिक प्रक्रियेत ती मुले जास्त अडथळे अनूभवतात, ज्यांनी स्वतः सर्व निर्णय घेतले आहेत. आणि तरीही ज्यांना नात्यांची आवड आहे पण ती जपली कशी जातात किंवा कशी जपावी हे माहीत नसते. मला खात्री आहे माझ्या जगण्यातून निर्माण झालेल्या गोष्टी ज्यांना त्या आवश्यक आहेत त्यांना त्या उपयुक्त ठरतील. स्वतःची मानसिकता बिघडेल इतके तुम्ही करतातच का काही? तर काही निर्णय घेतांना बरेचदा परिणाम आणि परिस्थिती माहितच नसते. म्हणून मुलांनी निसर्गाचा टिकून राहण्याचा सिध्दांत स्वप्न जगण्यासाठी जरूर करावा. कारण स्वप्नांना वास्तवावर मात करण्याची ताकद फक्त हीच गोष्ट देते. बाकी केवळ आभास असतात. स्वतःची आणि इतरांची मानसिकता जाण्यापेक्षा बिघडणार नाही एवढी दक्षता घेऊया.

०१/०३/२६

सतत स्वतःला

फक्त स्वतःपूरतीच अत्यंत मर्यादित, सुखी, दुःख म्हणजे काय हेच माहित नसणाऱ्या घटकाला पुन्हा स्वतःचे ज्ञान हे एक डेझर्ट आहे. तर सुख दुःखाची थोडी थोडी अनूभुती असणाऱ्यांना ते एक बरे भोजन आहे. तर जे अत्यंत दुःखाची अनूभुती घेतात, त्यांच्यासाठी ते आवश्यक औषध आहे. उपचाराविना पेशंट तडफडतो. हे सर्व समज बालवयात आले की समाजातले जितके स्तर असतील निदान त्यांना त्या वयातली समज असते. अनेकदा मुले शरीराने वाढत असतात,

पण शरीरातला मेंदू? तो पण वाढला तर आपले हक्क डावलले जातील म्हणून तो वाढू दिला जात नाही का? की सगळं काही देऊन तो योग्य वेळी योग्य दिशेने चालत का नाही? हे मला मुलांबाबत प्रश्न पडले. कारण प्रत्येक मुलाची समज समग्र असेलच असे कधीच नसते. पुष्कळ मुलांना पुष्कळ विषय मूळीच आवडत नसतात. म्हणून मी स्वतःचे ज्ञान किंवा आत्मज्ञान हा विषय मांडला. मुलांचा वेळ बरा जातो म्हणून काही तरी उपक्रम कोणत्या दिशेला नेतात किंवा मुलांना नेतात. यातून सामाजिक गोंधळ निर्माण होतील आणि स्वतःचे ज्ञान किंवा आत्मज्ञान हा विषय समाजातील सर्व घटकांना नाही दिला तरी सामाजिक गोंधळ निर्माण होतीलच याचे मला पूर्ण ज्ञान आहे. बरीच मुले सगळ्यांमध्ये जगून अत्यंत स्वतःच्या कोशात का असतात? हे त्यांनाच जास्त माहिती असते. म्हणून आत्मज्ञानाचा स्वतःसाठी आणि इतरांसाठी समाज चांगल्या दिशेने जाईल असाच वापर व्हायला हवा. थोडेसे शिक्षण खूप अहंकार निर्माण करते. जी गोष्ट प्रत्येक क्षणाला शांततेचा भंग करत असते. वातावरणातील शांतता, सलोखा या बाबी तर आहेतच पण चित्ताची शांतता त्याहून आवश्यक बाब. जगातील प्रत्येक मूल जेव्हा ती आत्मसात करेल, समाजाचे चित्र वेगळे असेल.

०२/०३/२६

नोकरी जाण्याची कारणे

हा लेख अनूभवात्मक असून यात आरोप, प्रत्यारोप नसून पुढील पिढीची जगण्याची आव्हाने कामाप्रती असावीत, आणि कामाला लागल्यापासून त्यांचा आलेख त्यांच्या गतीने वाढावा म्हणून आहे. तसेच राजकीय व्यक्ती किंवा मोठी माणसे चूकतात असे दर्शवायचे नाही. तर तरूणांनी निर्भीडपणे विचार मांडून योग्य विचार पुढे नेत काम करावे म्हणून. मोठ्या माणसांना पेचात पाडणे हे तरूणांचे काम नाही. जेव्हा मी नोकरी करायला लागले, तोपर्यंत मला पालकांचे आर्थिक पाठबळ होते. त्यामुळे नोकरी अर्थार्जनासाठी करायची आहे किंवा त्यासाठीच करतात याची जाणीव मला नव्हती. मी ८ वी पासून मला काम मिळावे, पण आधी निवासात म्हणून काहीही काम करायला तयार असायचे. माझे पालक वेळप्रसंगी मला काम देत असत. पुढे नोकरी संदर्भात माझी विशिष्ट मते तयार झाली. ती शिक्षण घेता घेता तयार झाली. ती स्वतःच्या परिस्थिती संदर्भातून झाली. ज्याला आपण स्वतःच्या भाषेत यश म्हणतो, ते मला मिळाले नाही. त्याची विविध कारणे आहेत. तुम्ही हा विषय का लिहित आहात? **तर अनेकदा अतिशय साधारण कारणांसाठी मुले नोकरी सोडतात.** उदाहरणार्थ खूप कंटाळा येतो, कामावर सतत रागावतात, कामाच्या ठिकाणी अपेक्षित पैसा

मिळत नाही वगैरे. मला जूजबी कारणे फारशी माहिती नाही. पण आज मी मोठ्या कारणांविषयी बोलणार आहे. अनेक ठिकाणी काही कर्मचारींना कामाच्या ठिकाणची संस्कृती कळत नाही, अनेक ठिकाणी कामकाजाची वेळ फार असते, अनेक ठिकाणी आपले पालक आणि कामकाजाचे ठिकाण अत्यंत दूर असते, काही ठिकाणी पुढील शिक्षण घेण्यासाठी सुटी दिलीच जात नाही, काही ठिकाणी विशिष्ट शिक्षणच घ्यावे लागेल अशी अट दिली जाते, काही ठिकाणी काम नीट समजवूनच दिले जात नाही, काही ठिकाणी स्त्रीयांना गरज नसतांना उशीरापर्यंत थांबवून घेतले जाते, काही ठिकाणी पुरुष सहकारी काहीच काम किंवा त्यांची समस्या नसतांना वारंवार बोलवितात किंवा थांबवून घेतात, काही ठिकाणी कामाची मूदत इतकी कमी असते की थकवा येणे सुरू होते, काही ठिकाणी कामच चाललेले नसते आणि ती गोष्ट नजरेस पडली आणि काही सूचना दिल्या की आता अजून पुढे अशाच प्रकारे दडपण येईल म्हणून अन्य सहकारी/विद्यार्थी दडपण देतात – शांतता, सहकार्याचा भंग होतो, सामाजिक वाहने यांची उपलब्धता नसते, असली तर वेळा जमत नाही, कामकाजाचे ठिकाण ते निवास बरेच दूर असते, अनेक ठिकाणी विविध समाज घटकांना वेगवेगळ्या वेळी अर्थ सहाय्य वगैरे अशा मला लक्षात आलेल्या अनेक बाबी. ही सगळी कारणे लक्षात घेतली तरी मला काही विषय चिंताजनक वाटतात. ते विषय म्हणजे विशिष्ट शिक्षणाची अट, स्त्रीयांना जास्त वेळ कामावर थाबवून घेणे, काम न समजवता वारंवार रागवणे, कामाप्रती कर्मचारींची क्षमता लक्षात घेऊन मूदत देणे, कोणत्याच कर्मचारीचा फालोअप नसणे, आपल्या संस्थेची कार्यसंस्कृती नवीन कर्मचारींना समजावण्याची सोय नसणे, सामाजिक वाहनांच्या वेळा इ. या सर्व प्रकारात चूकभूल देणे घेणे करत जगणे किंवा चूकभूल देणे घेणे करत नोकरी करणे असे दोन पर्याय समाजात दिसतात. हे सगळे यासाठी की **एकात्मिक शिक्षण व्यवस्थेतील मुले पुढे काम करतांना कामाचे योग्य मानदंड निर्माण करण्याची शक्यता जास्त आहे.** लहान वयातली मुले फक्त काम समजत नाही किंवा पगार वाढला नाही, म्हणून नोकरी सोडतात ही बाब चिंताजनक आहे. एका ठिकाणी दिलेले योगदान संस्था बळकट करते. हे जर प्रत्येक कर्मचारी आणि संस्थेने समजले तर समाज किती सुखावह असेल या कल्पनेने मला बरे वाटते. काम करत शिक्षण घेणाऱ्या लोकांना घाबरविण्याने कामाठिकाणची गुणवत्ता तर बिघडतेच, पण शिक्षण अजून कमी दर्जाचे होते. शिक्षणात आणि कामात मन लागणार नाही अशी सामाजिक व्यवस्था न स्विकारण्याची सोय असावी, असे माझे निवेदन आहे. **भीती किंवा दडपण कोणाला, कशासाठी, कोणत्या परिस्थितीत, याचे भान पुढील पिढीने ठेवले नाही तर काय घडेल?** नोकरी मिळवणे, ती टिकवणे, रचनात्मक कामांमध्ये

सहभाग देणे, भावनांना नूसतेच आव्हान देत कामे करण्यापेक्षा कामांची स्वरुपे ठरवून कामे करणे, पण तरी कामांप्रती/माणसांविषयी सद्भावना असणे, रोगी समाज दुरुस्त करणारे डॉक्टर, फार्मसिस्ट आणि सायकट्रिक निर्माण करण्याबरोबर समुपदेशक आणि कृषी संस्कृतीचे जतन करणारे व्यवस्थापक निर्माण करणे, संशोधक निर्माण करणे हे योग्य नाही का? जबाबदारी शिकणे आणि ती लक्षात ठेवणे एवढे जरी प्रत्येक समाज घटकाने लक्षात ठेवले तर अनेक बाबी सोप्या होतील. यात लहान मुलां़चा आणि पालकांचा सांभाळ याबाबी तरूणांना लक्षात घ्याव्या लागतील. नोकरी सोडणे ते नोकरी निर्माण करणे हा तर मोठ्ठा टप्पा आहे. नोकरीच केली नाही तरी नोकरी निर्माण करणारे असे शक्यच नाही. **बरीच तरूण मुले इतरांच्या गप्पांमध्ये येतात. गप्पा करणाऱ्यांचे विविध उद्देश असूच शकतात. नोकरीच्या ठिकाणाचे प्रमोशन हे पद आणि पैसा या दोन्ही बाबतीतच असेल तर (यात सर्व प्रकारच्या शोधलेल्या वयाच विचार करावा – शारिरीक, मानसिक, अनूभव, वैचारिक, सामाजिक जितके वयाचे प्रकार असतील तितक्यांचा विचार व्हावा) लहान मुले मोठ्यांना पण दूर करू शकतील/मदत करू शकतील एवढी ऊर्जा त्यांच्यात असते. अधिकार ही फक्त जबाबदारी नसते तर एक समज पण असते.**

०३/०२/२६

स्वभाव नावाचं ठिकाण

स्वभाव हा परिस्थितीला दर क्षणाला दिलेला प्रतिसाद, सवयी आणि नंतर आपल्या संकल्पनांनी घडतो. परिस्थितीला दिला जाणारा प्रतिसाद अंगभूत गुण आणि आपल्या पालकां़ची साथ, योग्य ठिकाणी योग्य गोष्टींसाठी योग्य वेळीच प्रशंसा आणि स्वतःविषयी आणि इतरांप्रतीच्या स़कल्पना यातून घडतो. स्वभावात चांगल्या प्रयत्नांनी नक्की बदल घडू शकतो. पण फक्त स्वतःच्या वर्तुळात सामील होण्यासाठी माणसांना घडवणे ही बाब वेगळी, आणि त्यांनी तो प्रयत्न करत स्वतःचे वर्तुळ ओळखणे ही बाब वेगळी. तोपर्यंत इतरांबरोबर जमवत जगणे असते. कारण लहान वयात अगदी ब़ंदिस्त कुटुंबात तुम्ही राहिलात म्हणजे आणि म्हणून तुम्ही ऐकलकोंडे आहात असे नसते. तर फार मोकळ्या कुटुंबात राहिलो म्हणून खूप गोंगाट आवडतो, असे नाही. ते कधी कधी परिस्थितीवर असते. दर क्षणाला आपल्याशी सतत कोणी स्पर्धा करते हे जाणवत राहून आपण मैत्रीपूर्ण हस्तांदोलन कोणाशी करतो, ते कधी कोणाला समजतच नाही. तर कधी अगदी जवळचा मित्र/मैत्रीण आपल्याला आता बोलायचे नाही असे वाटते. प्रत्येक क्षणाला आपला मूड चां़गला ठेवून लोकांपासून अलिप्त राहणारी व्यक्ती एकलकोंडी असते? एखाद्याला

मनमोकळेपणे काही बाबी सांगणारी व्यक्ती उथळ असते? प्रचंड शिस्तप्रिय व्यक्ती कर्दनकाळ असते? आपले शिक्षण कितीही असले तरी विविध परिस्थितीला काही परिस्थितीजन्य मर्यादांमुळे जी व्यक्ती योग्य ते योगदान देऊ शकत नाही ती असहाय्य असते? सगळा काळ निघून गेल्यावर सगळे ठिक झाले म्हणून मिळणारा सन्मान नको असणारी व्यक्ती कडवट असते? स्वभाव समजणे आणि नंतर त्याला पैलू पाडणे ही एक तपश्चर्या आहे. स्वभावाला पैलू पाडता येतात. कोणाला सहवास मिळत नाही पण अत्यंत शिस्तबद्ध असे व्यक्तिमत्व जवळून बघायला मिळणे हा अभ्यास, शिक्षा व, नशीब अशा विविध पध्दतीने विचार करता येणं ही समज, बुध्दीमत्ता, अनूभव देखील स्वभाव घडवते. एखादी व्यक्ती स्वभावाचे औषध स्विकार हे सांगते. स्वभावाचे औषध स्वतःला ओळखत त्याला घडवणे हे असते.

०४/०३/२६

तरंग

मनात उठणारे तरंग रंजक किंवा सत्याचे दर्शन करणारे असले की सगळे आनंदाचे डोही आनंद तरंग असतात. हो, ना? हे घडायला आणि जमायला, अभ्यासेन तु कोन्तेय, विरागेण तु साध्यते. समर्थ रामदास स्वामी किंवा अनेकांनी लिहिलेले लिखाण हे केवळ वेळ घालवणे, नुसतेच मनात आलेले ओतणे वगैरे पूर्णपणे नाही. स्पर्धा परीक्षांच्या दरम्यान अनेक पुस्तके वाचली. प्रत्येक जण तरंग मांडत असतो. पण जसं जसे आपण चिंतन या पध्दतीत जातो, सत्याचे थोडे दर्शन होते. ते विलोभनीय असते. ते सार्वत्रिक असते, ते कालातीत असते. जे निव्वळ तरंग असतात, ते रंजक असू शकतात. माझ्या माहितीतल्या अनेक धर्मात शीख धर्म आणि मुस्लिम धर्म जो मी अजिबात जवळून बघितला नाही, पण हिंदू धर्म ग्रंथ थोडे चाळले, तर फक्त सत्याचे दर्शन करण्याचे आटोकाट प्रयत्न दिसतो. मला वाटते धर्माचे कारणच ते असते. कोणत्या तरी पध्दतीने सुख, आनंद मिळवण्याचा प्रयत्न असतो. धर्म त्याला एक तात्विक अधिष्ठान देतो, इतकेच. अनेक जण अनेक पध्दतीने वेळ घालवतांना दिसतात, पण काही धर्म ग्रंथ, प्रार्थना आपल्याला अनेक गोष्टी सूचवतात हे माझे वैयक्तिक मत आहे. हे सर्व धर्माबाबत शक्य आहे. लहान मुले अभ्यासाची पुस्तके पण श्रध्दायुक्त अंतकरणाने अभ्यासातील तर ते त्यांना माहीत नसलेल्या स़स्थांमध्ये जाऊन बसतील. विनोदाचे अनेक प्रकार आहेत. स्त्री किंवा पुरुषाच्या देहाबाबतीत किंवा तत्सम विनोद लगेच हसवितात. तसेच अशा प्रकारचे विनोद प्रचंड, आणि अजून फार काळ चालतात. पण त्यानंतर आलेली भावनिकता आणि दर्जेदार विनोदातून निर्माण झालेली मानसिकता/भावनिकता तुम्ही अनुभवून बघा. धर्म आणि एकमेकांवर प्रचंड टिका करत आपण जगतो, पण कधी आपण प्रत्येक धर्मगुरू किंवा धार्मिक पुस्तके कधी जगतो? म्हणून तरंगांचा अभ्यास स्वतःचा करावा. इतरां़चा प्रत्येक जण बघून घेईल. आपण दुसऱ्याच्या मनातील तरंगांचा अभ्यास एकेका प्रस्थापित नात्याशिवाय करणे हे चूक आहे.

०५/०३/२६

मागोवा

मागोवा घेणे एक सवय आणि नंतर स्वभाव होतो. माहेरच्या माणसांचा मागोवा घेण्याची सवय स्त्रीला असतेच. अमूक अमूक माहेरची माणसे, असे तिने लक्षात ठेवले, त्यात भाऊ वहिनी, बहिण भावजयी असले तेवढे पण पुरे, पण माहेर मात्र हवं. कुठे गेले असतील, सोडून जातील का, पोहचले असतील का, भाऊ वहिनीचे

नीट आहे ना, मुले बरीच आहेत ना, कसले व्यसन तर नाही, कुठे बडबड करत बसतील का, घरी वेळेत जातील का, मुलांवर चिडचिड होईल का? कितीही मन कामात असलं, तरी जिला माहेर आवडतं नाही अशी एक स्त्री शोधून दाखवावी, एवढी भिस्त असते माहेरच्या लोकांवर. हाडाचे शिक्षक चांगल्या विद्यार्थ्यांचा शोध घेतातच. कुठे असेल तो/ती पोरगं, काम बरे करतो/ते, आपलं ऐकून घ्यायला तो/ती असतो/ते. हाडांचा कलावंत आपला भक्त शोधतो. ज्याला काम मिळत नाही, अन्न नाही तो त्या गोष्टी शोधतो. ज्याला ईश्वर ही संकल्पना थोरा मोठ्यांनी शिकवली आहे, तो/ती वास्तविक पातळीवर ईश्वर नाही हे कितीही सा़गितले तरी तो व्यक्ती त्यावर विश्वास बाळगतो, ज्याने माणूसकी धर्म पत्करला तो समाजातील ऱ़जले गांजले मिळवतो. शेवटी मागोवा ज्याचा घेतो, तेच मिळते काही प्रयत्नशील माणसांना. असेल माझा हरी म्हणणारे शेवटपर्यंत खाटल्यावर बसलेले असतात. हरी काही येत नाही, अशांची खाटलं काही सुटत नाही. विवेकनिष्ठ प्रयत्नवाद सफल होतो. ईश्वरनिष्ठ कामचूकार ठरतात. काही माणसा़ना वाटते, ते किती एकाकी आहेत, आयुष्यात मदत कसलीच नाही, त्यांचा मागोवा घेत कोणी येतं. कधी अशी माणसे असतात, ज्यांना आपले काम होईल तेव्हा तेव्हा मागोवा घेतला जातो. कधी कोणाला पैसे हवे असतात, कोणाला मुले, कधी प्रतिष्ठा, कधी संपत्ती, कधी कुठला सूड. मानवी आयुष्यात मागोवा कशा कशाचा घेतला जातो, बघा. हा तास कधी स़पेल, असे उपाशी पोटी प्रवचन ऐकणारी मुले न म्हणतील तर नवल काय? भरपेट सगळं मिळणाऱ्याला कसलंच नवल राहिले नाही तर चूकीचे ते काय? आपण सर्व अभ्यास करु, कशा कशाचा मागोवा आपण घेत असतो?

०६/०३/२६

स्वय़ंशिस्त

लहानपणी सगळ्याच लहान मुलांचा अनूभव असेल की त्यांना काही do's आणि don't शिकवले जातात. चार भिंतींच्या बाहेर गेलो की हे do's आणि don't guiding principles असतात. कारण यातून कोणत्या तरी सुरक्षिततेचा अनूभव घेतलेला असतो. काही मुलांना प्रचं़ड नाविन्य आणि स्वत़त्रता किंवा काही तरी करून बघण्याची आवड किंवा इच्छा असते. काहीही करु नको सांगितले की ते प्रश्न विचारतात, का? समर्पक उत्तर मिळाले तर आणि तरच ते गूपचूप बसतात. नाही तर नाही. अशी मुले चूकीच्या मार्गाने आपले काम करुन बघतात. अशा मुलांनी स्वयंशिस्त शिकणे फार गरजेचे आहे. आपल्या घरातील do's आणि don't माहित आहे, पण ते पालन का करायचे हे माहीत नाही आणि स्वयंशिस्त देखील नाही. मग इतर आपल्या प्रती ही मुले अशी काय वागतात? असा प्रश्न निर्माण

करतात. इतके मोठे झाले तरी अमूक कळत नाही, किंवा इतके मोठे झाले तरी अमूक करता येत नाही, इतके मोठे झाले तरी नोकरी नाही, समज नाही वगैरे वगैरे. अशा मुलांचे प्रश्न आणि जीवनच वेगळे असू शकते याचा विचार आपल्याला येऊ शकतो का? लहान मुलांमध्ये वर्तनात्मक समस्या इतरांच्या वर्तनाबरोबरच इतर अनेक कारणांमुळे निर्माण झालेल्या असतात. अशा मुलांना स्वयंशिस्त खूप उपकारक असते. कारण आपण इतरांसाठी जोपर्यंत वरदान नसतो, तोपर्यंत आपण एक समस्या असतो. ज्या दिवशी किंवा जेव्हा आपल्याला आपला रस्ता सापडतो तेव्हा त्या रस्त्याने जायची मूभा असेल तर ठीक, नसेल तर फक्त स्वयंशिस्त कामाला येते. पालकांनी ठरवून दिलेले do's and Don't तुम्हाला एक वरदान ठरू शकतं. पण त्यापलीकडे तुमचे प्रश्न असतील किंवा कधी निर्माण होतील तर तुम्हाला तुम्ही लावलेली स्वयंशिस्त एक वरदान ठरावी. तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तुम्हाला मदत करणारी. कारण प्रत्येक वेळेला नवीन प्रश्न निर्माण झाले की काय करावे असा प्रश्न पडतोच ना? तिथे लावलेल्या वळणाबरोबरच स्वयंशिस्त कामा येते. कारण प्रसंग वेगळे, माणसे वेगळी, प्रश्न वेगळे, वेळ वेगळी. मग सारखे काय? आपण एकटे! बघा विचार करून.

०७/०३/२६

जगण्यातली सुसंबद्धता आणि साचा

जगण्यात एक सुसंबद्धता असते. आपण नियमांचे पालन केले, दिनचर्येचे पालन केले, मोठ्यांच्या गोष्टी ऐकून घेतल्या, आपली जबाबदारी ओळखली वगैरे तर समजेल जीवनात किती सुसंबद्धता आहे. एक वय असते ज्यात विविध संवेदनांची वेगाने अनूभूती होत असते. काही समजण्याच्या आत अनेक गोष्टी घडतच असतात. जीवनाला कितीही वेग असला, दिला किंवा आणला गेला तरी जेव्हा आपण सैरावैरा होणं घडू देत नाही, आपल्याला जगण्यातली सुसंबद्धता समजत जाते. अनेकांना अनेक वेगवेगळ्या गोष्टी करून बघायच्या असतात. अशा वेळी शालेय जीवनापासून मुलांच्या धडपड्या वृत्तीला वळण देणं ही त्यांच्या जगण्यातील सुसंबद्धता वाढवते. जगणं हे एकमेकांशी संबंधितच असते. हे समजत ही समग्रता समजत जीवन जगणे हा एक फार मोठा टप्पा असतो. हळूहळू ते समजतच जाते. साध्या सरळ गोष्टी अनेकांना लक्षात येत नाही. कारण अनेक विषयांनी मन व्यग्र असते. विद्यार्थ्यांच्या जीवनातील सुसंबद्धता वाढेल, त्यांच्या जीवनाला आयाम मिळतील, जीवनाची पायाभरणी होईल यासाठी त्यांना आत्मभान जोपासावे लागेल. ही बाब अमूक एक जिंकण्यासाठी नाही. तर जीवनशैली विकसित करणे ही किती मोठी तपश्चर्या आहे हे लक्षात येते. ती ज्याची त्याची असते. एखाद्याचे चांगले

व्यक्तीमत्व दुसऱ्याला प्रभावित करु शकते, तसे इर्षा/व्देष अशा नकारात्मक भावना पण निर्माण करु शकते. प्रभावित होते म्हणजे प्रेरणा मिळणे – सकारात्मकता असणे. आणि अनेक न माहित असलेले नियम/बंधने असे जीवन जगतांना क्लेष/दुःख अनूभवणे. जगण्यातली सुसंबद्धता यातले काहीच निर्माण करत नाही. दुसरा इतक्या प्रतिकूल परिस्थितीत आनंदी का हा विचारसुद्धा आपल्यालाच दुःखी करतो, हे पण आपल्याला समजत नाही. आपण आत्मभान जोपासत जगण्यातील सुसंबद्धता निर्माण करत जगूया. आपल्याला माणसांना आपल्याला अनूसरून साच्यात बसावे असे वाटते. मात्र तसे करून हाती काहीच लागले नाही असे वाटते. याचे कारणच प्रत्येकाचा आपला भाचा आहे, आणि तो समजण्यापेक्षा आपल्याला हवे ते घडणे जीवनातली सुसंबद्धता पण घालवते आणि त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व पण. या पलिकडे जबाबदारी असते तो भाग अजून वेगळा.

०८/०३/२६

पार्टीचा कार्यकर्ता

राजकारणाचा किंवा समाजकारणाचा मला दूरुन किंवा जवळून कुठूनच परिचय नाही. या दोन्ही गोष्टी पावाबरोबर खातात की भाकरीबरोबर हे सुद्धा मला माहित नाही. फक्त सांगोवांगीच्या चर्चा तरूण पिढीचे वर्तमान आणि म्हणूनच भविष्य फक्त आळशीपणा किंवा उन्मादात घालवायला मदत करणारी केंद्रे वाटतात. असे का म्हणतात? टि.व्ही जगात कधी आला हे माहीत नाही. पण माझ्या निवासात तो २००३ साली आला असावा. तेव्हापासून थोडेसे राजकारण, समाजकारण वगैरे अत्यंत अल्प स्वरूपात माहिती झाली. तरीही काहीच समजत नव्हते. आपले ठरवलेले काम करत होते. मीच ठरवलेले होते. सामाजिक परिस्थिती बघून सामाजिक काम काही असते, आणि राजकीय काम काही वेगळे असते अशी आता थोडी जाणीव झाली. देशातील विविध पक्षा़ची थोडी माहिती होती. एका देशासाठी इतक्या पक्षां़ची आवश्यकता खरंच आहे? हा प्रश्न मनात सतत येतो. धाकटपणा/दडपशाही काहीही म्हणा यातून वर येणारही मूल, ज्याला काहीच मिळालेलं नाही, ज्याला सूख कशाशी खातात हे पण माहित नाही ते सुंदर भाषेत राजकारण आणि समाजकारणावर बोलते. हे का घडते? कोणा जाणकारांचा सहवास हे जितके खरे तितकेच ही कोणत्याही वय वर्ष ३५ च्या पुढील व्यक्तीची गरज असते. संधी आणि परिचय झाला तर ३ वर्षाचे मूल जे जमेल ते बोलायला लागते. त्या मुलाचा ऱ़ंग तुम्ही कोणताही तयार करा. समाजातील विविध पक्ष हे समाजात जास्तीत जास्त भांडणे निर्माण करतील एवढेच माझे मत आहे. कारण

परिसर कोणताही असला तरी भावना एकात्मतेची निर्माण करायला विविध पक्ष ती कशी करतील? मूळातच माणसे इतकी वेगळी असतात, एक दुसर्यांसारखा असला तर शपथ. क्षणाक्षणाला मन बदलत असते. त्यातच माणसांना आपण अजून भेद शिकवले, तर समाज किती रसातळाला जाईल याची कल्पना न केलेली बरी. लहान मूल मोठं झालं की आई वडीलांना शिकवू लागतं. बहुतांश पालकांना ते आवडत नाही. कारण तुला अजून समज नाही एवढेच त्यांचे मत असते. म्हणून मोठ्यांचा सल्ला घेऊन कामे करण्याची पध्दत आहे. काही तरूण मुलांना हे माहीत असते, काहींना नाही. विविध पक्ष हे मुलांना हुरुप देण्याचे काम असेलही. पण पुढे मुले हेच शिकतील आणि करतील. पुढच्या पिढीच्या सुखासाठी "**एक पक्ष आणि सूचक पक्ष"** ज्याला सामाजिक प्रश्न समजले तो ते मांडण्याची संधी, सुचलेली उत्तरे मांडण्याची संधी. पुढची पिढी विनाकारण सामाजिक आणि राजकीय बाबतीत बोलणे सोडते की नाही हे प्रात्यक्षिक सांगेल. लहान मुलांना पार्टीचा कार्यकर्ता बनणे असे नूसतेच वाटते, असे वाटते म्हणून आपण हट्ट करुन निरनिराळे पक्षी स्थापणे ही एक मोठी दिशाभूल आहे. आजपासून पुढच्या पिढीसाठी सत्ताधारी पक्षाने सर्वांना अभ्यास देऊन एका सत्ताधारी पक्षाचे आणि एका सूचक पक्षाचे नामकरण करावे. समाजातील विविध घटक देशाचा कार्यकर्ता म्हणून काम जरूर करतील अशी मला आशा वाटते.

०९/०३/२६

आने वाला पल

"**आनेवाला पल, जानेवाला है, हो सकते तो इसमे, जिंदगी बिताले, पल ये जानेवाला है",** मला गीतकार, संगीतकार आणि गायक माहिती नाही. प्रत्येक क्षण जाणारा आहे, म्हणून तो आनंदात व्यतित करुन घेऊया, अशा अर्थाचे गाणे. बालवय हे शिकून घेण्याचेही असते. जीवनशैली विकसित करण्याचे अनेक वर्षांपासून तत्वज्ञ सांगतच आहेत. सगळं करुन मग मुले म्हणतात कंटाळा आला. सतत नाविन्यपूर्णतेची आवड ही गोष्ट खरच गरजेची वाटते. एखादे पुस्तक वाचतांना काय नवीन आहे त्यात? काहीतरी शोधणाऱ्या मनाला नंतर प्रत्येक गोष्टीचा कंटाळा येतो. कंटाळा एक मनोवृत्ती आहे. आणि ती सतत आनंदासाठी काहीही करणे या वृत्तीतून निर्माण होते. तर दिनचर्या तुम्हाला सतत आनंदी ठेवते. खूप व्यस्त असते ही प्रत्येक स्त्रीची/पुरुषाची दिनचर्या असेलच असे नाही. पण बालवयात श्रम करण्याची तयारी असेल तर आपल्या शरीराला, मेंदूला ती सवय लागते. लहान वयात घरकामाची कोणतीच सवय नसलेल्या मुलीला तारुण्यात ते शिकावे लागले तर तिला फार ओशाळवाणे वाटते. आणि अगदी बालवयात तिला

ते करावे लागले तर ऩतर तिचं तिची आवड बनते. आने वाला पल जानेवाला है, हे जास्त स्व-ओळखीबाबत आहे. अनेक माणसे जीवनाच्या वरच्या टप्प्यावर आल्यावर फार एकाकी आणि कंटाळलेली असतात, याची कारणे बरीच कौटुंबिक असतात. तेच ते संवाद पण परिचयाचे होतात, आणि कंटाळा आला असे घडते. प्रेम/समजून घेणे ही एकच संकल्पना अशी आहे की जी आनेवाला पल चांगला व्यतीत करण्याचे बळ देते. शनिवार ,रविवार आला बाहेर गेलेच पाहिजे, weekend मजेत घालवायचा पाहिजे, कारण तोच आनंद उद्या काम करण्यासाठी बळ देणारं आहे. मला वाटतं, कोणाची तरी ही संकल्पना आहे. या पध्दतीचा अंगिकार केल्यावर सगळे अनूभवून झाले की उतार वयात कोणतीच गोष्ट सहन करु न शकणे ही बाब निर्माण होते. जीवनातली शिस्त देखील स्वतःत कडवटपणा निर्माण करते यात कोणतीच शंका नाही. पण तो निर्माण होऊ न देणं हा प्रयत्न असतो. दुसऱ्यांच्या जीवनात शिस्त आणायला आपल्याला खूप आवडतं. म्हणून मुलांना सतत अभ्यास पूर्ण करण्याचा सल्ला आपण देतो. पण स्वतःच्या जीवनातली शिस्त कडवटपणा, रागीटपणा आणते हे तर विसरूनच जातो. कसला राग येतो? आपण स्वतःला विचारतो? अमूक एक ठरवले पण ते पूर्णच केले नाही, मी माझ्यावरच रागावतो/ते. ही बाब कोणती? लेट गो, की पूर्ण प्रयत्न करून ती बाब पूर्ण करायची. आनंदाने जगायला काही ठिकाणी बहाणे लागतात, तर कधी स्वतःची दिनचर्याच अशी असते की ती सतत आनंदी ठेवते. इतरांना वाटते, कसे काय? पण हो, हे खरे आहे. कारण अनेक नवनव्या गोष्टी करुन मग तुम्ही आनंदी का नाही? तर तसा स्वभाव घडला. आने वाला पल खरच जाणार आहे. कोणी खरे वाद/भांडणे करून घालवला तर खरंच क्षण वाया गेले. पण स्वतः आणि इतरांना आनंदी ठेवते गेलो तर जगलो,"आनेवाला पल....."

१०/०३/२६

आनंदाची निर्मिती

सतत हव्यास ठेवला की मनाला तशीच सवय पडते. मग जे हवे ते नाही मिळाले की दुःख होते. आनंदी रहाणे हा स्वभाव असतो. हे कितीही खरे असले तरी सर्वच माणसांच्या काही मूलभूत गरजा किंवा आवडी असतात. त्या पूर्ण झाल्या की ते आनंदी असतात. जीवनात काही लोक श्रेष्ठत्वाची अत्युच्च पातळी गाठू शकतात. धरसोड वृत्ती तज्ञता पण निर्माण करत नाही आणि आनंद पण निर्माण करत नाही. सुखाच्या शोधात फिरता फिरता दुःख कसे काय हाती आले? माणसे विचारात पडतात आणि अजून दुःखी होतात. जीवनात कोणी चालते, कोणी दुखावते, कोणी आभास निर्माण करते, कोणी हरवते, कोणी हसवते, कोणी सतत नाराज करते,

कोणी सतत तू मागेच रहा, मी पुढे जातो/जाते असे म्हणते. उगाच म्हटले आहे का, व्यक्ती तितक्या प्रकृती. माझी दिनचर्या असणं, माझं मित्र मंडळ असणं, सुख दुःखाला कोणीही चालतं असं मी असणं, विशिष्ट आवडलेल्या विषयांचा मी सतत अभ्यास करणं, आनंदाची निर्मिती करेल की नाही? सर्वच लहान मुलांना प्रचंड दंगा करायला आवडतो. मग कधी पडतात, कधी खरचटतं, कधी भळाभळा रक्त वाहतं. यात वरून शेजारी डॉक्टर काका/मामा असले की विचारायचे नाही. आई बळीचा बकरा नेते तिकडे. ते औषध देतात, मलमपट्टी करतात. हे थोडे मोठ़ झाल्यावर कोणा कोणाच्या लक्षात राहिले आहे? एखाद्या दिवशी खेळायला जायला मिळाले म्हणून झालेला प्रचंड आऩद, पडून लागलं, खरचटलं, मित्र मैत्रिणी अजूनच घाबरुन पळून गेले यातले काहीच आठवत नाही. आठवणी धुसर होत जातात. हातात काय पडते तर थोडसं ख़ंबीर झालेलं मन. छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणारं मन. खूप मिळालं की आपण खूप आऩदी असतो असे काही नाही. ती तर पूर्वजांची मेहनत असते. नाही का? त्यांच्या आशीर्वादाने, कष्टाने आपल्याला काही मिळते. जे मिळते त्याचा पण आऩंद खूप असतो. आयुष्य किचकट केले तर किचकट होते. सरळ जगलो तर सरळ, सुलभ असते. आपला फायदा व्हायला हवा होता, अमूक एक गोष्ट आपल्याला मिळाली नाही, ही गोष्ट योग्य नव्हती इ. भांडणात खूप वेळ घालवून आपण किती मनस्ताप विकत घेतो बघा बरे? भांडखोर वृत्ती आणि संस्कृती निर्माण करायला क्षणाचा वेळ लागत नाही. पण खरं प्रेम, आनंद या बाबी निर्माण करायला शोधा पाहू काय लागतं?

११/०३/२६

सामाजिक संस्थांची गरज

खाणारी तोंडे वाढली, माणसांच्या गरजा वाढल्या, माणसांचे एकमेकांशी पटेनासे झाले की माणसे घरातून बाहेर पडतात. विशिष्ट प्रेरणेने उद्दिप्त झालेली माणसे मात्र निराळे काम करूनच दाखवतात. ते दुसऱ्याला दाखविण्यासाठीसुध्दा नसते. तर सामाजिक हित त्यात साधले जाण्याची प्रचड़ इच्छाशक्ती असते. घरात मुलाबाळांना बरेचदा रागावले जाते. दुसऱ्या बाळाने काही केले की आपले मूल काही तसे करू शकत नाही किंवा करत नाही म्हणून सतत रागावले जाते. काही माणसे दुसऱ्याचे प्रचंड कौतूक करतात, पण स्वतःच्या मुलांवर मनातून नाराज असतात. आपल्या मुलांवरील नाराजी जशी बरी नाही, तशीच दुसर्याच्या मुला़प्रती देखील. हा तोल सांभाळणे काही थट्टेबाजीचा खेळ नव्हे. प्रचंड वेदनामय काम म्हणजे आपला आणि दुसर्यांचा तोल सांभाळणे. कोणाची बाजू घेतली तरी त्रास, कोणाची नाही घेतली तरी त्रास. निवासा पासून सामाजिक संस्थेपर्यंत ही रड आहे.

हळूहळू सामाजिक संस्थेतले काम इतके मंदावते की तिथेही माणसे गप्पा करत बसतात. कोणाला वाटते, काय वावगे आहे? बोलणे हे स्वाभाविक आहे, बोलतच राहणे स्वाभाविक नाही. तोंड शिवून सामाजिक संस्थेत बसलेली माणसे निर्जीव, प्रचंड दुःख सहन करणारी/केलेली, तरी दुसऱ्याचे हित बघणारी असतात. इतरांना त्यांचा झालेला किंवा होणारा सन्मान दिसतो. पण त्यामागचे कष्ट समजणे, दिसणे अवघड असते. मान फक्त स्त्रीला लागतो किंवा समाजात पुरुषाला मान दिले की झाले, असे नसते. दोघांनाही ती भावना सारखीच असते. ज्या दिवशी आपण आपले काम पूज्य समजतो, त्या दिवशी कर्तव्यभावना उरते आणि आपले कर्तव्य नसलेल्या गोष्टीबाबत आपण कसा वेळ लागला याचा पश्चात्ताप झाल्याशिवाय राहत नाही. हे निवासात तर पदोपदी घडते. सामाजिक संस्था तर मूळीच अपवाद नसतात. इथे कोणाला काम करायला आवडते? घरचे पाठवतात म्हणून येतो, अनेक जण या भावनेतून तिथे दिवस घालवतात. ज्या दिवशी आपण स्वयंप्रेरणेने कामाला जावू त्या दिवसापासून निदान आपल्याकडून बरे काम होण्याची शक्यता असते. होईलच असे नाही. एखाद्या पदावर एखादी व्यक्ती आहे असे समजले की अनेकांना वाटते हे आपले पण काम करतील. किती आशा बाळगतात माणसे? खरेतर आपल्या सर्वांना लक्षात येईल आपल्याला काम समजलेले नसते. पण आपल्याला सन्मान समजतो. ज्याला अपमान/ओशाळवाणेपणा मिळतो त्यातले काही त्यासाठी काम करतात, तर काही काम समजतात. जाहिर कौतूक हे अनेकांना प्रेरणा राहत नाही तर व्देष असतो. प्रेरणा ही व्देष भावना नसते. प्रेरणा ही आनंद निर्माण करते. व्देष भावना दुःख आणि अशांती निर्माण करते. सामाजिक संस्थेत कामाची संधी म्हणजे खूप निव्वळ.मजा हा भाग नसून जबाबदारी असते. आपल्या जबाबदारीत चूक म्हणजे अनेकांचे नूकसान असते. सामाजिक संस्था हे काही निव्वळ वेळ घालवण्याचे ठिकाण नसते. या भावनेतून कधीच कोणत्या सामाजिक संस्थेत जाऊ नका. कारण आपली भावना कधीच आपले काम मोठे करणार नाही. आपल्याकडून काही नवे घडत नाही म्हणून निराश होऊ नका. करत रहा. एक दिवस चांगले काम आपल्या हातून घडून जाईल. सामाजिक संस्थेला स्वायत्तता मिळवून घेण्यासाठी अनेक जण खूप प्रयत्न करतात. त्यासाठी खूप कारणे असतात. पण सुरक्षा आणि मोठा सन्मान हे कधी विसरू नये. चांगल्या सामाजिक संस्थाची पायाभरणी, उभारणी होऊच शकते. खाण्या पिण्यापासून माणसांना अलिप्त ठेवण्यासाठी सामाजिक संस्था नाहीत. तर आपला दिवस सत्कारणी चालविण्याची ती सामाजिक मंदिरे आहेत. या सामाजिक मंदिरांमध्ये नको तो गोंधळ माजविणे चूकच आहे. शिस्तीचा बडगा आणि स्वयंशिस्त यात खूप फरक आहे नाही का? सामाजिक संस्थांमार्फत आणि

निवासाव्दारे मुलांमध्ये स्वयंशिस्त रूजविणे किती महत्त्वाचे आहे. कठोर शिस्त माणसाच्या भावना कोमेजून टाकते. असं कोणतेच फूल नाही जे बघावेसे वाटत नाही. सुकलेल्या/नसलेल्या भावनाहिन माणसांची किंवा उथळ मनाच्या माणसांचे कारखाने म्हणजे सामाजिक संस्था नव्हेत.

१२/०३/२६

आत्मगौरव आणि श्रेष्ठत्वाची भावना

या मानवी भावना आहेत. जी मुले/मुली आपल्या पालकांनी जे do's आणि don't याचे पालन करतात, तसेच जी मुले आपले आवडीचे कर्म, अभ्यास विषय अभ्यासतात, त्यांना आत्मगौरवाची भावना जरूर येणार. आपल्या जवळची साधनसंपत्ती ही श्रेष्ठत्वाची भावना निर्माण करते. एक दिवस असा येतो आत्मगौरव कमी होत जातो आणि श्रेष्ठत्व मात्र वाढत जाते. आयुष्य रणांगण नसतांना आपण त्याला रणांगण बनवतो. समजून घेतले तर आयुष्य एक रंगभूमी वाटते. एक एक नट/नटी यावी, आपली भूमिका निभावून न्यावी. आयुष्यात श्रेष्ठत्वाची भावना चांगली की आत्मगौरवाची भावना चांगली असे सांगण्यात का अनूभव माझ्या जवळ नाही. पण आपले आवडते खेळ, अभ्यासविषय, गाणी, कलाकार, लेखन हे आपल्यामध्ये काय निर्माण करणार? आत्मगौरवाची भावना. पण तुमचा दादा, तुमची ताई तुमच्यामध्ये काय निर्माण करणार? आपुलकीची भावना. आपल्यापेक्षा कोण आणि का श्रेष्ठ आहे हे तर समजतच जाते. आत्मगौरव म्हणजे अहंता जपणे नव्हे. आत्मगौरव म्हणजे ओशाळवाणेपणा नव्हे. मग मी हे कसे साध्य करणार? जन्मापासूनच आपण ती सोबत घेऊन आलेले असतो. तिचे रूपांतर कसे होते हे पाहणे म्हणजे आयुष्य रंगभूमी की रणांगण हे समजत जाणे. नाटकाची नांदी ऐकली आहे का? आत्मगौरव आणि श्रेष्ठत्वाची भावना कर्मातून निर्माण होते.

१३/०३/२६

प्रथा

समाजात विविध प्रथा असतात. काही ठराविक व्यक्तींना यामागची कारणे माहित असतात. इतर अनेक जण न समजता केवळ अनूकरण करतात. समाज चांगला चालण्यासाठी हे योग्य आहे का? मुले शिक्षण तर घेतात, पण सामाजिक प्रथा समजून घेण्यात मागे पडले तर त्याना ते बरे वाटते का? बरेचदा असे म्हटले जाते. समाजातील अनेक प्रथा या एक मजा गंमत असते. श्रध्दा या माणसांना जीवन जगण्यासाठी एक पाया तयार करतात. अशा प्रथा ज्या माणसांच्या जीवनात श्रध्दाच निर्माण करणार नाही, जर ती एक टिंगल किंवा फसवणूक असेल तर ती गोष्ट

मानवी समाजासाठी योग्य आहे का? सामाजिक स़स्थांमध्येसुध्दा थोडं काही केलं की सत्कार करतात. पैसा संस्थेचा वापरला जातो. त्याऐवजी कमवा आणि शिका योजनेत पैसा वापरला जात नाही. कुठून तरी दुरवरून आलेले शिक्षक किंवा क़पनीत येणारे पाहुणे पुन्हा कधी येणार? या गोष्टीमुळे तसे घडते. भेटवस्तू न देता/आदर सत्कार न करता पाठवणे चां़गले का? हे जितके खरे तितकेच संस्थेतील विद्यार्थींसाठी पैसा असणे गरजेचे नाही का? अशा प्रथां़साठी कोणतीही संस्था कोणत्या फ़ंडची व्यवस्था करते का? आदर सत्कार न करणे किंवा एकाच व्यक्तीचे ठिक ठिकाणी अनेक सत्कार करणे/होणे याचा साक्षीभावाने विचार व्हावा. काही माणसे समाजात इतके काम करतात, त्यांचा कधी कुठे सत्कार होत नाही. निवासात मुलांनी लक्षात घ्यावे. आपल्या मुलांकडून पालकांचा होणारा सत्कार हा सर्वात मोठा सत्कार असतो. सामाजिक संस्थेत मार्गदर्शन हवे असते. मानधनही न घेणाऱ्या लोकांचा जरूर सत्कार व्हावा. विविध सण ही एक प्रथा आहे. ते साजरे करण्याने खूप चांगले सामाजिक वातावरण निर्माण होते. नोकरदार स्त्रीला इतरांच्या मदतीशिवाय सर्व सण साजरे करणे शक्यच नसते. म्हणून जमेल तसे आणि जमेल तितकेच करणे आणि भावनांना आवर घालून निदान काही सण करणे हा नियम स्वतःला स्त्रिया घालू शकतात. नको त्या प्रथा आणि नको ते सण शोधून काढा. स्वतःसाठी. जाहिरपणे नूसतीच टिका किंवा बुध्दी न चालवता अंगिकार करणे यापेक्षा नीट शोधा. समाजाच्या प्रत्येक घटकाचे चांगले होईल. निर्माण झालेल्या प्रथा या आनंदाने जगण्यासाठी आहेत. जर तसे नाही झाले तर त्या प्रथांचा उपयोग तरी काय नाही का? कोणाला काम करायला आवडते? कामच काम असते? खाण्या पिण्याच्या चंगळीपासून कोण दूर राहिलं? प्रथा निव्वळ खाण्यापिण्याची चंगळ समजू नका. त्यात मोठे विचार असतात. इतरांचे धंदे चालविण्याचा मार्ग पण समजू नका. विचार करुन प्रथांचा अंगिकार करा.

१४/०३/२६

पैसे गोळा करायचा धंदा

आपल्या कामाप्रती निष्ठा बाळगणे ही गोष्ट आपण शिकलो तर? समाजात येणारा व्यवसाय हा इतरांची जगण्याची सुविधा केवळ हाच दृष्टिकोन न बाळगता, मला या गोष्टीचा काय उपयोग झाला असे समजले तर? निरनिराळ्या टि.व्ही सिरीयल या जशा मनाला खूप आनंद देणाऱ्या असतात, तसे निरनिराळ्या लेखमाला या मेंदूचे पोषण करणारे आणि जगण्याला विविध दृष्टिकोन निर्माण करणारे, तो क्षण चांगला गेला अशी अनूभूती देणारे आहेत असे अनूभवले तर? मोठमोठ्या मॉल्स मधून खूप कपडे खरेदी करतांनाच घरगूती शिलाई करणाऱ्यांकडून वर्षाला काही कपडे

शिवून घेतले तर? पार्लरचा खर्च ठराविक काळासाठी ठराविक ठिकाणी केला तर? अनेक चित्रपट कोसळत असलेले माहिती असतांनाच चित्रपट निर्मितीचा व्यवसायिक अभ्यासक्रम तयार केला तर? पैसे कमविण्याचा धंदा ही गोष्ट जगण्याची उमेद दर क्षणाला कमी करते असे नाही वाटत? त्याचवेळी अनेक होटेल्समध्ये अन्न वाया जाते, घरचे साधे पोळी भाजीचे अन्न न बनवता, न खाता कोणाला नीट प्रशिक्षण न देता घाईने होटेल्स उघडणे, स्वच्छता, टापटीप न राखली जाता हे पैसे कमविण्याचे ध़दे आहेत ही बाब दुःखद नाही का? काही माणसे कंजूस म्हणून प्रसिद्ध पावतात. तर काही धंदेवाईक म्हणून. आज मला नीट जगता आला तर उद्या नीट जगतात येईल हा आशावाद आहे. उद्याची काही खात्रीच नाही, म्हणून आज नीट जगून घेऊ हा चंगळवादाकडे नेण्याची शक्यता आहे. तर आज नियमबद्ध जगलो तरी उद्याची शाश्वतता नसेल हा निराशावादी आहे. समाजात भिक्षूकी परवडली. भिक्षूकी आणि भिकारी यात फरक आहे. कोणतेच काम न करता कसली आशा बाळगणे हा भिकारीपणा झाला. तर काम करून, कष्ट करून कशाची आशा बाळगणे ही भिक्षूकी होय. देवाची कोणतीही प्रार्थना नियमित न करता, देवाला जाण्याचा हट्ट कामाचा असतो का? मंदिरांना येणारा पैसा समाजाला न समजणे किंवा कधीच त्याचा अहवाल समाजाला न देणे आणि समाजाची श्रध्दा कमी करुन अयोग्य श्रध्दा वाढवणे बरे का? शैक्षणिक स़ंस्थेला म़ंदिर किंवा मदिरागृहांची मदत असते का? सामाजिक कार्यक्रम हे भिकेचे डोहाळे/पैसे कमविण्याचे उद्योग की समुपदेशन उद्योग कमी होतील याची भीती? ज्याला सर्वेपी सुखिन: सन्तुवर विश्वास आहे तो पैसे कमविण्याचा प्रत्येक धंदा चालवून दाखवूनच शकतो ते ही सचोटीने, भिक्षूकी करुन. आहे तुम्हाला विश्वास? मोठे मशिन उपयोगाचे नक्की. पण रिकामे हात, रिकामे डोके .रिकामी मने/ उदास/हताश मने तयार करतात. सुंदर आणि छान बोलणारीच स्त्री स्वागत कक्षाला असते. सौंदर्य नसणारी पण छान बोलणारी आणि वागणारी स्त्री कधीच स्वागत कक्षाला नसते. पैसे कमविण्याचे धंदे की डोके न चालवण्याचे धंदे आपण करतो? मानवी समाज आहे असे वाटते का? स्वागत कक्षातील स्त्रीचे तोंड बघायचे असते की वागणे? काळी सावळी स्त्री जीवनाचे अमूल्य सत्य सांगते तेव्हा वर्ण किती फिका हे सत्य मला समजते. भिक्षुकी हा एकमेव धर्म आता मानवी समाजात उरला पाहिजे. समाजातील नसलेल्या पूरेशा व्यवस्थां बोटचेपे जीवन जगायला भाग पाडायला भाग पाडते. चला आपण बघूया, आपला पेशा आपले आणि किती जणांचे जीवन आनंदी बनवतो?

१५/०३/२६

परिस्थिती आणि ओळख

काही झाले तरी आपण निर्माण केलेली ओळख आपण टिकवू शकलो नाही की आपण प्रचंड अस्वस्थ होतो. आपण आपली ओळख ठेवण्यासाठी सर्व प्रयत्न करतो. यामागे वेगवेगळे हेतू असतात ही. पण सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपल्या आत्मगौरवाला/आत्मप्रतिमेला तडा पोहचते. अमूक एक काळ होता, जेव्हा मी अमूक एक काम करत होतो किंवा होते. पण परिस्थिती बदलली आणि आता मी ते काम करत नाही. ज्ञानाच्या लाटेवर स्वार होता आले तर ठिक. नाही होता आले तर? पुढची पिढी नवनवीन शोधतच असते, करतच असते. पण मागच्या पिढीने जे फार कष्टाने केलेले असते, ते एका क्षणात त्यांना बाजूला, दूर सारावे लागते ते इतके सोपे असते का? नवीन गोष्टींचे कौतूक चूकीचे असते का? नवीन गोष्टींचा अंगिकार चूकीचा आहे का? तंत्रज्ञानाचा वापर करून जर कादंबरी/कथा/कविता लिहिली जात असेल तर माणसाच्या अस्तित्वालाच अर्थ उरला का? मशिनने स्वेटर विणले जाते. गरजेच्या ठिकाणी ते त्वरित वितरीत होणे आवश्यक आहे. पण आईला स्वेटर विणता येत असेल तर तिची माया दूर सारता येईल का? कष्ट करत तिने जीवन जगले असले तरी लेकरासाठी करतांना तिला ते कधीच कमी वाटणार नाही. अमूक एक म्हणून माझा परिचय झाला पण वेळ झाडू मारण्याची आली ती बाब आत्मगौरवाला ठेच पूरवते की "**work is worship"** ची आठवण करून देते? परिस्थिती बदलली आहे, तिला सामोरे जायचे कसे? विचार करण्याची क्षमता कमी होत गेली की हतबलता येते. तरूणांनी अशी परिस्थिती आणणे बरे का? आपली ओळख जपण्यासाठी मी वाट्टेल ते करतो/ते, की मी माझ्या जीवनाचा नियम ठरवला, सत्य शोधले, आणि ते मी करतो/करते. ओळख निर्माण करण्यासाठी काही करणे आणि विहित कर्म करणे यात अंतर असते, नाही का? अन्नाव्दारेच मेंदूचे पोषण होते हे त्रिकालाबाधित सत्य असेलही. पण चांगले विचारही पोषण करतात हे कधी जाणले आपण? सुंदर बंगल्यातून एका साध्या घरात कोणाला राहायला यावे लागले तर ती परिस्थिती. आपली ओळख बनवते ते आपले कर्म आणि भोवतालची माणसे. माणसांना हवे ते मिळाले की सगळेच खूप खूश असतात. पण जीवनात योग्य ते करणे हा मार्ग समजणे लांबचे प्रवास असतात. तुम्हाला बेस्ट सेलर बनायचे होते का? तुम्हाला तुमची ओळख बनवायची होती का? तुम्ही त्यासाठी लिखाण करतात का? या पुस्तकाचे नाव "सूचले ते", असे ठेवले. कारण जे जेव्हा सुचले आणि योग्य वाटले ते लेखन यात केले. तो कर्मयोगाचा एक भाग. आपल्या आत्मसन्मानाला ठेच बसली असे जे आपल्याला वाटते, त्याचे कारण आत्मसन्मान निर्माण झालाच कुठे? जर झाला तर त्याला ठेच

बसेलच कशी? सतत अपमानित वाटेल असे काही झाले तर कुठे तरी काही चूकते हे निश्चित. प्रत्येकाने आपली चूक शोधली तर घडेल का असे? मला वाटते कधीच नाही घडणार. चूका शोधतांना मी बरोबरच आहे, असे वाटणे हीच तर चूक असते. माझी चूक मला समजणे ही बाब आत्मसन्मान निर्माण करते. त्याला ठेच दुसरा पोहोचवतो, असे वाटते. पण ते सत्य नसते. परिस्थिती आणि माणसे दोन्ही खोटी ओळख निर्माण करतात.

१६/०३/२६

दृष्टिकोन

अमूक एका ठिकाणी मला चांगला अनूभव नाही आला. अमूक एक ठिकाणी फारच चांगला आला. त्यांच्या रितीभाती खूप छान आहेत. सगळं मोकळं वातावरण आहे. तिकडे तर खूप खडक वातावरण आहे बाबा. जीवनात आपण सगळेच सगळं आपल्याला जेवढी समज शक्ती असते, तेवढेच समजत असतो. समजशक्तीचा तर दृष्टिकोन बनवते. आपण दुःखी होतो कारण बरेचदा आपल्याला अमूक एक बाब सांगितली जात नाही किंवा सांगून पण समजतं नाही. अनेकदा अनेक ठिकाणी आपल्याला चूका मान्य कराव्या लागतात. प्रामाणिक माणसे मी चूक केलीच नाही असे कधीच म्हणणार नाही. कारण त्यांना माहित असते ही बाब मला कधीच स्वस्थता देणार नाही. अप्रामाणिक माणसे फार त्रास देतात. असा अनेकांचा अनूभव असतो. जीवनाने त्यांना तसेच जगायला शिकवले. अत्यंत प्रामाणिक जीवन जगणारी व्यक्ती एक दिवस स्वतःच्याच प्रामाणिकपणाला कंटाळते, निराश होते, एकाकीपणा अनूभवते. इतर म्हणतात, यांना जीवन कसे जगतात तेच समजले नाही. हे सगळे दृष्टिकोन आहेत की नाही? पण सत्याला कोणता दृष्टिकोन नसतो. ते एकटेच असते. जोपर्यंत आपल्याला त्याचे दर्शन होत नाही तोपर्यंत अनेक दृष्टिकोन निर्माण होणारच आहेत. दृष्टिकोन म्हणजे आपल्याला वाटणारे परिस्थितीजन्य विचार. परिस्थिती बदलली की विचार बदलतात. मग एक दिवस सत्याचे ज्ञान कूतूहल/जिज्ञासा बाळगली तर होतेच. आपले दृष्टिकोन/विचारच आपल्याला सुखी/दुःखी बनवतात असे नाही. तर सत्याचे ज्ञान आणि इतरांचे वर्तन याला जबाबदार असतात. स्वतःला आणि इतरांना दोष देणे थांबवले की काय घडते अनूभवून बघा.

१७/०३/२६

परवड

लहान मुलांची, स्त्रियांची, शेतकरी वर्गाची, कष्टकरी वर्गाची परवड होते, असे वाटते. कष्टाचा काळ दुःख करण्यात घालवला तर तो काळ फार मोठा आहे असेच वाटते. त्यात अडचणी आल्या की अधिकच वाटते. मग कोणत्याही प्रकारचे कष्ट सोडून द्यायचे का? त्याचबरोबर अजून एक गोष्ट असते. जर सोबतचे बहिण भावंडे असतील तर ते सतत आपल्याला सांगतात. बघ, मी कसे केले, किंवा मी किती केले, तू करत नाही. दुसऱ्यामध्ये काही दोष असू शकतात, तर काही उणीवा असू शकतात. प्रचंड शारिरीक कष्ट करणाऱ्या व्यक्तीला दुसऱ्याला शारिरीक थकवा येऊ शकतो हेच समजत नाही. ती गोष्ट त्याच्यासाठी एक परवड असते. त्यात काही उणीवा असल्या तर विचारायलाच नको. अजून समजत नाही का? समजले नाही का? मोठी माणसे ओरडत असतात. कष्टाचे क्षण, दुःखाचे क्षण एक परवड असतांनाच ती मानत गेलो तर कोणतेच काम हातून घडत नाही. बी बियाणे पेरले आणि पाऊस पडलाच नाही तर शेतकऱ्यांची परवड होते. म्हणून अन्न सर्व प्रकारे वाचवणे हे आपले काम आहे. अभ्यास केला नाही, तर काहीच समजत नाही, ती एक परवड असते. मुलांची परवड होते, म्हणून आईचे मन कळवळते. परवड ही बाब मीठासारखी घ्यावी. नको असलेल्या बाबी समोर तर आहेत पण आवड असणाऱ्या गोष्टी करायच्या आहेत. सगळी माणसे धावाधाव करायला लागली, तर साधन संपत्तीवर तणाव येतो. आपल्याला समजत नाही हे. सरकार बेफिकीर आहे, सामान्य माणसाला त्रास आहे. असे आपण म्हणत जातो. पण दिनचर्या पाळणाऱ्या माणसांची कधीच कोणतीच परवड होत नाही. आज्ञापालन करणाऱ्या व्यक्तींची कधीच परवड होत नाही. आपल्या विचारात आपले काम करत राहणाऱ्या व्यक्तीची मात्र परवड होण्याची खूप शक्यता असते. जेव्हा तुम्हाला तुमची ओळख होते, तेव्हा काळजी घेणे सुरू करा. शेतकऱ्यांनी ठरवले, यंदा या वर्षी अमूक इतके अन्न धान्य हवे. त्यासाठी लागणारे खत, पाणीसाठा या सर्व बाबी आणि उत्पन्नाचा अंदाज, तसेच मदतीला असणारी आपली माणसे, आपली अवजारे त्याच्याजवळ बाळगणे, त्याला परवड आणि चिंतेपासून दूर नेईल. दरवर्षी अनेक कला, वाणिज्य शाखेतील मुले, मुली शिक्षण घेऊन बाहेर पडतात. पण अहवाल लेखन ही बाब शिकले तर अनेक सामाजिक संस्थांमध्ये योग्य काम करू शकतील, कविता/काद़ंबरी/कथा लेखन याचा संकल्प करुन लेखन काम करतील. थोडे करावे, पण जर मनापासून कराल तर ते नक्कीच इतरा़ना आवडेल असे काही करू शकाल. अपत्य संगोपन हा प्रकार पण असाच. दुसऱ्याचे मूल स्वतःच्या मुलांप्रमाणे सां़भाळणे हे मोठे आव्हान असते. आपल्या मुलाला दिली एक चापटी तर जातो विसरून. पण दुसऱ्याच्या बाळांबाबत झाले तर मन कळवळते, जर खरे प्रेम केले असेल तर. स्वतःच्या अपत्याबाबत पण घडते. पण विसर लवकर पडतो.

दुसऱ्याच्या बाबतीत जबाबदारी हा भाग असतो. स्वतःच्या मुलांची खूप परवड आपल्याही नकळत आपण करतो. तसे दुसऱ्या बाबतीत नाही घडत. दुसऱ्याचे मूल पण उत्कृष्ट घडवून दाखवणे ते पण परवड न करता हे आव्हानच आहे. सुखाची कल्पना आणि सुखाचा भोग अन्नाचा पण बोचका यावा तसा असतो. ज्याला कधी असे वाटतच नाही, आणि जो कायम फक्त सुखच शोधत बसतो, कष्ट समजत नाही, दुसऱ्याच्या कष्टावरच जगतो, ज्याला ती जाणीवच नाही त्याला परवड ही गोष्ट समजेल तरी का? आपला मानवी समाज एकमेकांवर विसंबून जगतो. शेतकऱ्यांनी पीक काढलेच पाहिजे, म्हशीने/गायीने दूध दिलेच पाहिजे, आईने स्वयंपाक केलाच पाहिजे असे वाटताना स्वच्छता कामगारांनी स्वच्छता केलीच पाहिजे (पण मग त्याला दोन वेळचे पोटभर जेवण मिळाले पाहिजे), लेखकाने लिखाण केलेच पाहिजे, मनोरंजन क्षेत्राने काम केले पाहिजे वगैरे. बघा प्रत्येकाची आऩंददायी परवड सुरू होते की नाही? असे म्हणतात शोधा म्हणजे सापडेल. लेखकाला चाहता वर्ग शोधावा लागेल, चहा विक्रेत्याला चहाचा वर्ग..... कुठे काही चांगले सूचेल आणि परवड ही परवड न राहता एक आनंददायी यात्रा असेल. कष्ट नेहमी दुसऱ्याने करावे, आपण आनंदाने रहावे ही भावना तसेच दुसऱ्याने आऩंदात रहावे आपणच कष्ट करावे या दोन्ही बाबी किती चूकीच्या आहेत. ज्या दिवशी आपला सूर आपल्याला सापडतो, मला क़ंटाळा आला ही गोष्ट सोडून देऊन आपण आपल्या आवडीची कामे करायला लागतो. प्रत्येक काम पैसा म्हणून नाही तर प्रत्येक काम सेवा म्हणून नाही. माणसे करून करून किती काम करतील? कंटाळा येतो तिचं तिची कामे करून. असे म्हणत आपण किती परवड करतो. रोजचंच आहे त्या मुलांचं/पुरुषांचे, खाण्या पिण्याच्या सवयी.....अति लाड आणि परवड बघा बरे? सामाजिक स़स्थांमध्ये काम मिळावे म्हणून माणसे बसून, बसून बूड दुखून येते, पण ही माणसे नक्की काम करतील याची शाश्वती काही कोणाला वाटत नाही, पोरा बाळांची ि़चंता काही सूटत नाही, उंबरे झिजवणे काही थां़बत नाही. ही अशी परवड योग्य की माणसांना समज येणं योग्य? कुठे आणि काय माझे बस्तान बसेल हेच न समजल्यामुळे पृथ्वी प्रदक्षिणा होतच असते. काहीही केले तरी दुसऱ्याची मर्जी संपादन न करता आल्याने परवड काही थां़बत नाही, मर्जी स़ंपादन करण्याच्याच नादात कामाची परवड किती झाली ते काही कळतच नाही. आपली परवड कशा कशा बाबत, का, केव्हा, कोणामुळे, किती काळ, कोण कोणत्या बाबतीत झाली शोधा बरे?

१८/०३/२६

कामांची प्रतिष्ठा

सन्मानित जीवन प्रत्येकाला आवडते. आपण शिक्षण, सर्व कौशल्ये आणि विविध कामांचा विचार करूया. नगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणून काम मिळाले. केवढी मोठी सुरक्षितता मिळाली. बागा, सार्वजनिक ठिकाणे पाहावी तर अस्वस्थता कायम दिसते. दृष्टिकोनाचा फरक मानवी जीवन बदलवू शकतोच. लहानपणापासून बुध्दीजीवी काम थोडे करत कष्टाचे काम पण थोडे करत मी मोठी झाली. याचा अर्थ मी बालमजूर नव्हते. आईचे कष्ट दिसले की मी करते म्हणून करावे कधी. त्यातूनच भांडी कशी घासावी, लादी कशी पुसावी, कपड्यांच्या घड्या कशा घालाव्यात, बाजारहाट कसा करावा, भाजी कशी निवडावी, फ्रिज कसे भरून ठेवावे, कसे स्वच्छ करावे, आपले मेकपचे सामान, अभ्यासाचे साहित्य, कपडे कसे आवरून ठेवावे, आणि अभ्यास साहित्य कसे नीटनेटके ठेवावे हे सगळे शिक्षणातील आले. हे शिकून तर झाले. पण यातले सातत्य? थोडे दिवस कष्ट झाले, कोणाला कशामुळे मिळणारा सन्मान कानावर आला की आपले काम कसे अपमानाचे आहे हे आपल्याला लगेच जाणवते. काम कधीच अपमान करत नाही. माणसे आपुलकीची भावना सोडतात. थोडे समजायला लागले की जितकी भांडणे होतात ती कामे आणि सन्मान, कामे आणि व्यवहार याच गोष्टींवरून होतात. लहान मुले पण तेच शिकतात. आपुलकी ही नावाला पण शिल्लक राहत नाही. अनेक ठिकाणी आपुलकीच्या नावाखाली फक्त व्यवहार असतो. ही एक फार मोठी तारेवरची कसरत आहे. प्रत्येक वेळी व्यवहार जपून तुम्हाला नाते जपता आले तर जीवनात तुम्ही फार मोठेपण कमावले. तो विषय इथे प्रस्तूत नाही. ज्याला जे काम नेमले आहे ते काम तो/ती व्यक्ती प्रामाणिकपणे करत नाही, म्हणून असन्मानित वाटते. कित्येक नगरपालिका, महानगरपालिकेतील माणसे काम करत नाहीत. ही बाब खरच चांगली आहे का? बागेत खेळायला नेलेली मुले घाणीत कशी खेळवायची? गवत कापलेले नसते, डास असतात. झाडे लावलेली असली तर त्यांची कापणी केलेली नसते. कोणी पाहिल, म्हणून साहेबाला परस्पर पार्टीला बोलावणे हे काम चांगले का? कोणाला जेवायला बोलावणे, चहा देणे इतपत कामे थांबत नाही, गरज नसलेल्या भेटवस्तू देणं त्यापण खूप देणं, हा सन्मान असतो का? हे माणसाला/वरिष्ठांना पण अंध:पतनाकडे नेणारे आहे. ज्या वरिष्ठांना खूप भेटवस्तू लागतात, त्यांना ज्यांना द्यायच्या असतील ते देतील. आपल्या कामकाजाबद्दल कोणी बोलू नये म्हणून भेटवस्तू देणे ही बाब किती चूकीची आहे. खरकटी भां़डी स्वच्छ न करता त्यातच साबण फिरवणे ही बाब भांडी कशी घासतात हेच माहित नाही असे दर्शवते. पुसलेल्या लादीवर पाण्याचे ओघळ लादी पुसायची नाही हे दर्शवते. मनालाच न पटलेले लिखाण छापायची घाई नावलौकिकाची आशा दर्शवते. मनाला न पटलेली रांगोळी काढायची म्हणून

काढायची दिसून पडते. अशा कितीतरी गोष्टी दिसतील की कामाची आस्था नाही, कामालाच प्रतिष्ठा नाही. कामचूकारपणा वाढत जातो. अमूक खायला नाही, तमूक खायला नाही, इकडे दृष्टी जाईलच. प्रेमाने न मिळणारी बाब भांडण करुन मिळवली तर त्यात सुख असते? काही माणसे म्हणतील जर असे नाही केले तर ते पण मिळणार नाही. हा मानवतेवरचा अविश्वास असेल. शहरे, गावे चांगली पाहिजे, हे काम तुम्ही करा, मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? आपले काम तेवढे लक्षात ठेवले तर माणसे, गावे आणि शहरे खूप सुखी होतील. द्यायची आपण कामाला प्रतिष्ठा? स्वतःला ओळखत शिक्षण घेतले, त्यात थोडे काम केले, पण लेखन करत आहे, तो पण लहानपणापासूनचा प्रवास आहे. अनेक ठिकाणी आपल्या चूका होतात. म्हणून आपल्याला संरक्षण मिळत नाही. वाईट वाटते. पण आपण चूक होतो हे पण सत्य असते. कामाप्रती प्रतिष्ठा जर आपण शिकलो, कधीच आलेल्या वेळेचे, प्रसंगाचे वाईट वाटणार नाही. मला मागे सरकवून दुसऱ्याला काम मिळाले असे पाहून अनेक माणसे काम सोडतात. कामाच्या ठिकाणची चढाओढ समजत नाही म्हणून काम सोडतात, कामाचे वेतन पुरेसे मिळत नाही म्हणून काम सोडतात. बघा आपल्या कामाची विशेष, खास सबब असल्याशिवाय तुम्ही काम सोडणार का? तुम्ही काम सोडावे म्हणून अनेक प्रयत्न होतात असे तुम्हाला वाटते. पण तसे काहीच नसते, क्वचित असेलही. आणि तसे असेल तर त्या मानवी समाजाला अजून खूप बदलायचे आहे. निव्वळ पैसा कमविण्यासाठी किंवा सन्मान मिळविण्यासाठी पद टिकवायचे शिकू नका. त्या कारणांच्या पुढे जा. कामाविषयीची निष्ठा तुमच्याकडून खूप काही करवून घेईल.

१९/०३/२६

ब्रह्माची संकल्पना

विविध पुस्तकात विविध देवाच्या, ब्रह्म संकल्पना आहेत. जे आहे ते पूर्णपणे खोटे आहे, असे नाही. ब्रह्म सत्यं, जग मिथ्य असे म्हटले आहे. म्हणजे नेमके काय? जीवन मायामय आहे. म्हणजे काय? तर जीवनात आपल्याकडून छोट्या, मोठ्या चूका होतच असतात. खूप वेळा आपण त्या इतरांपासून, तर बरेचदा स्वतःपासून लपवत असतो. ब्रह्म संकल्पना हे मान्य करत नाही. जग हे मायामय आहे, असे का म्हटले आहे? तर ममत्व हे जीवनतत्व खूप मोठे आहे. जे दिसत नाही, पण जे अस्तित्वात असते. अमूक एक केले म्हणजे प्रेम असे कधी समजत नाही. त्याहीपेक्षा प्रेमाचे मूल्य कशातच नाही. माझ्या ईशतत्वाच्या प्रवासात मला निसर्गात ईश्वर आहे, मानवतेत ईश्वर आहे, जबाबदार पणात ईशत्व आहे हे सत्य जाणवले. पण तो निरव शांततेत देखील आहे. देवाची पूजा, उपासना ही बाब मानली तर

थोतांड आणि मानली तर सोसाट्याच्या वादळात टिकून राहिलेल्या गवताच्या पात्यासारखी बाब. सामान्य व्यक्तीला गुंतवून ठेवून आपण मोकळे जगणं हे ब्रह्म तत्व कधीच शिकवत नाही. संसारापासून दूर राहून जगा, असे सुध्दा हे तत्व नाही सांगत. भोग भोगून नाहीच केले हे असेसुद्धा नाही सांगत हे तत्त्व. जग मिथ्या का? जगातली माणसे भ्रंपक, लबाड, फसवी असतील असे म्हणायचे आहे? तर नाही. बदल घडत असतील. परिवर्तन असेल. पण निसर्ग, त्यातली निरव शांतता, काही जीवन तत्व ही कायम असणार आहेत. जगातले सर्व प्रकारचे वाद हे मिथ्या आहेत. लक्षात न घेण्यासारख्या गोष्टी, चूका या बाबी सत्य असतील. पण लक्षात ठेवावे असे वाद हे मिथ्या आहेत. बह्म तत्व चूकीला संरक्षण देणारे कधीच नसते. मग जगात चूकीचे घडत नाही का? घडते ना. ज्या दिवशी प्रत्येकाला उपासनेचा अर्थ कळेल त्या दिवशी प्रत्येक जण आपली चूक बघेल. जगातील धार्मिक ग्रंथ हे वाचक वेधक आहेत. जिथे वाचतांना समाधान लाभले नाही, समजले नाही तो ग्रंथ वाचू नये. पण जे वाचून आपल्याला शांत, समाधान वाटते ते जरूर वाचा. जीवनात व्दैत आहे. म्हणून वाद आहेत. उगीच म्हटलेले नाही "वादे वादेषू जायते" वाद हा शब्दा शब्दाने वाढत असतो. मग " शब्दविण संवादू, व्दिजवीण अनूवादू" उगाच म्हटले आहे? प्रत्येक गोष्टीला कला, विज्ञान या बाबतीत टाकून दिले तर पवित्र ही संकल्पना मोडीत निघालीच समजा. आणि प्रत्येक गोष्ट धर्माला चिकटवली तर प्रयत्नवाद संपलाच समजा. आपण ईश्वर पण जगत नाही आणि प्रयत्नवाद पण जगत नाही. आपण सोयवाद शिकतो. बघा खरे आहे की खोटे? जेव्हा आपण या सर्व बाबी जगू त्या दिवशी आपल्याला संकल्पना थोड्या समजतील.

२०/३/२६

चालून जाईल

मी वरकोहोलिक शब्द शिकत होते. शांतता, सहकार्य आणि काही शिकणे हे ज्याला आवडते, त्याला/तिला गृहीत धरणे बरेचदा घडते. इतरांनी गृहीत धरण्याची अशी व्यक्ती पण बर्याच गोष्टी गृहीत धरते. तुम्हाला वाटेल काय आहे हे? दिनचर्येचे पालन तुम्हाला गुंतवून ठेवते. पण अशा वेळी तुम्हाला नवीन काहीच स्विकारता येत नाही. तितकी जागा तुमच्या नियोजनात नसते. अनेक वेळा अनेक ठिकाणी भटकंती केल्याने नवीन माणसे भेटतात. त्यांची कौशल्ये लक्षात येतात. माणसे त्यानूसार वेगवेगळ्या ठिकाणी नेमली जातात. जिथे जिथे तुम्ही म्हणतात चालून जाईल, कधी तरी तुम्हाला आणि तुमच्यामुळे इतरांना उव्देग येतो. याचे कारण काय? तर तुम्हाला न चालणाऱ्या काही गोष्टी असतात. ज्या तुम्ही कामात असल्याने तुम्हालाच माहिती नसतात. घडले का असे कधी? मी स्वतःविषयी खूप

प्रीसाईज आहे असे म्हणणाऱ्या व्यक्तीने स्व-ओळखीची खूप मोठी पातळी गाठली आहे. पण असे नूसतेच वाटत राहणाऱ्या व्यक्ती अर्धवट आहे. कारण आपले इतरांबाबत जे गैरसमज होतात, ते स्वतःविषयी असणाऱ्या गैरसमजांमूळे जास्त. जेव्हा आपण स्वतःला ओळखत जातो, आपण स्वतःशी थोडे ठिक वागतो. इतरांशी पण वागतो. इतरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात थोडेसे काम करतो. चालून जाईल असे वाटताना काय चालतं नाही हे समजूच शकत नाही. काय घडते आहे लक्षातच येत नाही. का घडते आहे ते पण समजतं नाही. दुसऱ्याचा अति विचार जितका घातक, तितकाच स्वतःचा अति विचार. हे थांबत नाही का? थांबते. तुम्ही स्वतः आणि इतर ही बाब समजतं गेले तर खूप छान गोष्टी घडतात. लहानपणापासून जी मुले/मुली अशाच वातावरणात वाढली आहे ती स्वतःच्या नात्यांसाठी तर छान योगदान देऊच शकतात, पण योग्य वेळी समाजासाठी पण. आत्ममग्न असणे हा स्वभाव नसून ती संवेदनशीलतेची एक पातळी आहे. काही म्हणतील जी स़वेदनशीलता इतरांना उपयुक्त नाही ती काय कामाची? तर संवेदनशील माणसे वेगवेगळ्या पातळ्यांवर वेगवेगळ्या कारणांसाठी काम करू शकतात, ही एक समज आहे. चालून जाईल म्हणताना खरच तसे नसले तर खूप दुःख होते. हे कशासाठी पण लागू आहे. आणि अनेकांसोबत राहताना आपल्याला स्वतःची ओळख होते. त्या सर्वांबद्दल आपण कृतज्ञ असले पाहिजे. विचार करूया, काय चालून जाईल.....

२१/०३/२६

वेळ कसा घालवायचा?

काही़नी आयुष्य म्हणजे वेळ घालवायचा आहे, अशी आयुष्याबद्दल धारणा केलेली असते, दुसऱ्याचे जराही ऐकून घेणे सहन होत नाही, अशांनी सुटका करून घेणे, पळ काढणे हे मार्ग अवल़ंबिलेले असतात, सततची प्रतिकूल परिस्थिती, गुंतून राहण्यासाठी सतत नवनवीन शिकण्याकडे झुकते किंवा जीवनात कडवटपणा येतो, अशा विविध वेळी कसा घालवावा असे माणसे विचारात पडतात. शालेय शिक्षण किंवा पारंपारिक जीवनशैलीतून याची उत्तरे मिळविण्याचा पालक प्रयत्न करतात. रिटायर झालो की अमके करू, तमके करू असे अनेकांनी ठरवलेले असते. काही ते पूर्ण करतात. पण तरी वेळ जातच नाही ही तक्रार असतेच. याचे खरे कारण "कंटाळा" ही सवय आहे, आणि नंतर वृत्ती आहे. तुम्ही सगळ्यांनी या गोष्टीचा अभ्यास केला तर लक्षात येईल अनेक गोष्टी समोर आल्या, करून बघितल्या, अर्धवट करून सोडून दिल्या. पुन्हा पालूपद तेच, कंटाळा आला. यावरचा उपाय म्हणजे भरपूर शापिंग करायची. गरज असलेल्या, नसलेल्या गोष्टी

आणायच्या. हिच बाब माणसांबद्दल पण आहे. काहींना मूळीच माणसांची आवड नसते. पण वेळ जात नाही म्हणून ते कुठेतरी जाऊन बसतात. तिथे पण काहीही बोलून परत यायचे असते. मग आपण वेळ कसा घालवला? काही म्हणतील, काय कंटाळवाणा प्रकार आहे हा. मला खात्री आहे, सुरूवातीला माझी पुस्तके आवर्जून वाचणारी माणसे, प्रतिक्रिया पण न देता/देऊन नंतर वाचन बंद करतील. कारण हे माहितीच आहे असे म्हणता म्हणता, येणारा "क़ंटाळा". तुम्हाला नवल वाटेल वाचून, फक्त वाचनाच्या एका सवयीमुळे आपल्या अनेक वृत्ती/प्रवृत्ती बदलतात. अनेकदा एकाच लेखकाची अनेक पुस्तके वाचावीशी वाटतात. वाचनासाठी सवय जडली की वेळ कसा घालवू हे बरेचदा वाटतच नाही. तात्पुरत्या वेळेत माणसे पूर्ण समजली असे वाटायला किती मोठा अनूभव लागेल. याचा अर्थ मी चांगला/चांगली आणि दुसरे वाईट असे काही नाही, पण आपण माणसांच्या वर्तनाचा विचार करतोच ना? तो करणे सुटण्यासाठी बेजबाबदार वृत्ती किंवा खूप मोठेपणा हेच असते. म्हणून वेळ कसा घालवावा असा प्रश्न निर्माण होऊच नये म्हणून दिनचर्या आणि एकाच जागेवर राहण्याचे पण महत्व. दिनचर्या तर आहे, पण त्यात शनिवार, रविवार आहे. आपण रोज शनिवार/रविवार बाहेर जाऊन काय फारसे मिळवतो? तो नियम तरूणांसाठी ठिक आहे. कारण मस्तीचे ते वय आहे. पण त्या वयाच्या पुढे असलो की दिनचर्या आणि जागा महत्त्वाची ठरते नाही का? हे कशासाठी? आपली स्पेस जपण्यासाठी? आपले वर्तुळ तयार करण्यासाठी? आपले महत्त्व निर्माण करण्यासाठी? तर नाही. ते एक नैमिषारण्य असते. कोणतेच अमिष आपल्याला खुणावत नाही, कंटाळा भावना येते नाही, वेळ कसा घालवावा हा प्रश्न नसतो, कोणाशी कसे जुळवून घ्यावे हे प्रश्न नसतात. आणि यातून काहीतरी थोडीशी नवनिर्मिती होण्याची शक्यता असते. शक्यताच, खात्री मूळीच नाही. जेव्हा वेळ कसा घालवावा हा प्रश्न समोर येतो, तेव्हा सगळं शिकून झालेले असते, समजून झालेले असते, क़ंटाळा या बाबींने जीवनाचा ताबा घेतलेला असतो, पुनरावृत्ती बिल्कूल नकोशी असते, यात आहेच काय ही भावना प्रबळ होत असते.....आपला श्वास जितका सहज येतो आणि जातो तितके सहज जगायला लागलो, प्रयत्न केला तर ' वेळ कसा घालवावा?", असे वाटणे कमी होत जाते. जितके ते कमी होते, उत्तरे मिळत जातात.

२२/०३/२६

एवढे दिवस

जेव्हा परिस्थिती बेताची असते, जवळचे माणूस इतकेच म्हणते, एवढे दिवस. अनेक मुलांना ही गोष्ट समजते. अनेकांना किती वेळा सांगूनही समजत नाही.

यावरचा उपाय अजिबात न सांगणे किंवा खूप सांगत सुटणे असे नसते. एखादी व्यक्ती खूप उन्मत्त, उद्दाम वाटते, पण प्रत्यक्षात ती तशी नसते. एवढे दिवस माणसाला काय बनवतात हे महत्त्वाचे असते. ज्ञानाच्या क्षेत्रातली तीव्र स्पर्धा ही विद्वानांना संवेदनशीलताच नसते असे दाखवणारे असते. द्या, सहानूभूती, उपेक्षा या गोष्टी असतात. जीवनात प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना खर्च एवढे दिवस ही गोष्ट जरुर शिकवावी. नाही काही शिकवले तरी चालेल, पण ही गोष्ट माणसाला खूप काही शिकवते. पालकांचे प्रेम, सुरक्षितता, इतरांप्रती आदर, नियम अनेक गोष्टी. लहान मुलांना नाराज करणे वेगळं आणि त्यांना जीवनरित शिकविणे वेगळं. काही त्याला दुनियादारी म्हणतात. पण तसे नाही. सगळ्याच रिती या जीवनाला वळण लावणाऱ्या नसतात. काहीच असतात. शहाणी, सुजाण माणसे त्या रिती समजतात. त्यांचा अंगिकार करतात.

२३/०३/२६

फजितीची गोष्ट

जीवनात कितीही मोठे झालो तरी काहींना एक सवय जडते, फजिती करण्याची. नंतर ती एक हळूहळू वृत्तीच बनते, हा अजून एक भाग वेगळा. जवळचे नाते हे किती संवेदनशील असते हे जर कोणावर प्रेम केले तर आणि तरच समजते. जी गोष्ट आपल्याला कमकूवत बनवते, कमजोर करते ते प्रेम कसे असेल? म्हणून जवळच्या नात्यात कधीच लगेच मस्करी करायची नसते. जिथे त्या गोष्टीचा अर्थच समजणार नाही तिथे बुध्दीचे तारे कितीही तोडले तर उपयोग तो काय? दुसरी बाब अशाने संवेदनेच्या पातळीवर एखाद्याला कमकूवत करून आपण कोणती स्वतःची प्रगती करतो? किंवा दुसऱ्याची अधोगती करतो? विश्वात्मक शक्तीवर जेव्हा विश्वास असतो, तेव्हा लक्षात येते जीवनात प्रयत्न महत्वाचे आहेत, आणि चांगूलपणा पण महत्वाचा आहे. नाठाळाच्या माथी हाणू काठी, असे म्हटले आहे. माणसाच्या उन्नतीचा मार्ग साम, दाम, दंड आणि भेद याबरोबरच मला जीवनाचे नियम आणि प्रार्थना वाटते. एखादी व्यक्ती किती पुढे गेली, किंवा कशी गेली याचा अभ्यास आपण करतो. बरोबरीच्यांची माहिती ठेवतो. कशासाठी? कारण आपल्याला सोबत आवडते. सोबत जर आवडतं असेल तर तिथे तक्रार, कुरबूर, कुजबूज किंवा धरसोड कशी काय होते? माणसांचे मूळ तत्व हे चांगल्याची आवड आहे. पण त्या आवडीसाठी कशा कशाचे नूकसान झाले याचा हिशोब आपण सोबतच्या व्यक्तींसाठी नक्की करतो. करतो ना? पण हिच गोष्ट आपण मोठ्यासोबत नाही करत. आपण तिथे विनम्रतेने आपल्या चूका कबूल करतो, माफी मागतो. तिथे फजित पावणे वाटलेच तरी आपण यांना आपल्यापेक्षा जास्त

कळते, हे तरी लक्षात घेतो. आपल्या बरोबरीची मुले/मुलीसुद्धा अशीच असू शकतात. सुखाचा शोध हे मानवी जीवन आहे. फजिती, अपमान कसे जीवनात येतात, आणि आपण कसे प्रगल्भ किंवा गाढव तरी असतो, हे सांगणारी बाब म्हणजे फजितीची गोष्ट. बुळबुळीत भावना हे केवळ वेळ घालविण्यासाठी आलेला एकत्र पणा असतो. मैत्रीत तसे नसते. म्हणून तर फजितीची गोष्ट येते. बाजू घेणे, बाजू सावरणे या गोष्टी कितीही केल्या तरी जर एखाद्याची जाणून फजिती केली असेल तर ती जाणीवेच्या पातळीवर नेहमी असते. याचा अर्थ कोणाला न शिकवता सहन कसे करायचे? माणसांचा शिकण्याचा वेग कमी जास्त असतो, शिकण्याची इच्छा असणारा कधी तरी शहाणा होतोच. त्याची फजिती करुन शिकवले तर त्याला शिकण्यात कधीच रस उरत नाही. फिरकी घेणे हा प्रकार फार जवळच्या नात्यात असतो, तो सुध्दा जवळचं माणूस सर्वार्थाने समजले तर. आणि नंतर मनमूराद हसले तर. कशी वाटते फजितीची गोष्ट?

२४/०३/२६

सामाजिक मदत

काय हातात मोबाईल घेतला आहे रे? काय खेळतो आहे रे? तुला प्रत्येक गोष्ट हवी, पण डोक्यात प्रकाश काही पडत नाही. तुझ्या बरोबरीच्या मुलांना नोकरी लागली. तुझे काहीच नाही. लग्न झाले, पोरं बाळे झाली. माझ्या नशीबी कोणतेच सुख नाही. क्षमतेच्या बाहेर काम करून शिणलेलं शरीर आणि मनाला काहीच बोलायचं नसतं. मुलांनी काहीही केले की पालकांना वाटते हा रिकामे उद्योगच करतो आहे. बरोबरीच्या मुलांबरोबर जशा चार चूकीच्या गोष्टी शिकतात, तशाच चार बरोबर गोष्टी पण शिकतच असतात. लहान मुले, तरूण मुले, मुली काही तरी चूकीचे शिकातातच. ते वय तसं असतं. घरात बसून राहणे, अजिबात बाहेर न जाणे, कोणाशी फारसे न बोलणे हा एकलकोंडेपणा नसून सामाजिक वातावरणात समरस न होता येण्याची लक्षणे असतात. इतके सामाजिक वातावरण बदलले आहे. कोणाला ते सहन होते, कोणाला होत नाही. रिकामं पणाचे उद्योग सर्व लहान मुलांनी शोधून काढायचे. काय काय अफलातून कल्पना येतात. कल्पना येते ते सत्यात आणणे यात अंतर असते. ते अंतर म्हणजे सामाजिक मदतीचा अभाव असतो. इतरांना वाटते काय कामे लावली आहे. पण समाज चालवणे ही फार फार कठीण गोष्ट आहे. तरूण मुलांना काहीच माहिती नसतांना दोन प्रकारचे गट तयार होतात, अगदी स्वतःचा फायदा पाहणारे आणि सामाजिक बाबतीत काहीही बडबड करणारे किंवा या मुलांचे करायचे काय असा इतरांना प्रश्न पडावा इतक्या दुष्ट प्रवृत्ती बनतात. इथून सामाजिक काम सुरु होते. सामाजिक काम म्हणजे

नुसत्या लोकांच्या बडबडींचे अन्वयार्थ काढत बसणे नाही. ते तर कधीच निघणार नाही. चांगल्या व्यवस्थांची उभारणी म्हणजे सामाजिक काम. मग या व्यवस्था अशा उभ्या राहतील? एखादा इंजिनिअर एखाद्या प्रकल्पाची मांडणी करतो, तर त्यातल्या त्रूटी दाखवून तो ठेवून दिला जातो. यामागे अनेक कारणे असूच शकतात. पण अनेक त्रुटींपैकी नेमकी अडचण लक्षात आणली तर निदान सत्याचे आकलन होऊन तरूण मुले गप्पं राहतील. सत्य सहन करण्याची शक्ती निर्माण करतील. सामाजिक मदत केवळ कोणाला अन्न देणे वगैरे पर्यंत नसते. तर दुसऱ्याच्या कल्पना समजून घेऊन त्या सत्यात येऊ शकतात का याचा विचार करण़ हे एक विचारव़तांचे सामाजिक काम आहे. बरेचदा सूचलेच कसे, होणारच नाही, आपल्याला कसे सूचले नाही, आपण वेगळे करून बघू इ. अनेक कल्पनांवर विचार मंथन करुन त्यातील कल्पनांवर एकमत करून मग पुढे चालणे ही झाली सामाजिक चळवळ/वळवळ. हा मतदानाचा वेगळा अभिनव प्रयोग. लहान मुलांना बोलत राहून थोडेच त्यांचे व्यक्तिमत्त्व घडणार आहे. ते सुकतात, कोमेजतात, नाराज होतात किंवा वयापेक्षा खूप मोठे होतात. सामाजिक मदतीचे किती प्रकार आहेत बघा. सांस्कृतिक कार्यक्रम, मुलांचे संगोपन, विविध विचारां़वर वैचारिक म़ंथन, विविध समाज घटकांसाठी विविध उपक्रम (योजना नाही, तर सबलीकरण), सबल घटकांचा पुढील कृती कार्यक्रम या सगळ्या गोष्टी सामाजिक मदतीतच येतात, नाही का? चार माणसांनी एकत्र येऊन केलेल्या गप्पा सामाजिक कामे नसतात. मनाचा थकवा जाणारी गोष्ट असते. ती पण जमेल त्याला. सगळ्यांनाच इतरांचे मन न दुखवता या बाबी जमतील असे नाही. करायला गेलो/गेले एक आणि झाले भलतेच असे घडूच शकते. कधी कधी अनेकांची वैचारिक आणि संवेदनांची पातळी खूप वेगळी असते. कोणाला समजते, कोणाला नाही. म्हणून सामाजिक सामिलकी किंवा सामाजिक समरसता हा भाग खूप मोठा आहे. तो समजेल किंवा नाही ते वेगळे. पण विविध पातळ्यांवरील सामाजिक मदत सबलीकरणातून सबलीकरणाकडे असा प्रवास समाजाचा असतो. तुमचे मत काय?

२५/०३/२६

धुडगूस ते स्वयंशिस्त

काय गोंधळ करता आहे रे? जरा गप्प बसा म्हटले तर गप्प बसता येत नाही, दमदाटी करून मुलांना गप्प बसवण्याचा प्रयत्न आपण करतो. जितका तो करतो, तितके ते अजून मस्ती करतात. आणि जितकी करू देतो, ऊर्जा संपली की गुपचूप बसतात. मुलां़च्या विचार विश्वाचा विचार करता येतो का तुम्हाला? एकेक नाही तर साधारण? मस्ती करण़, मस्ती जिरवणे आवडतं त्यांना. पण त्या गोष्टीला वळण

लागलं तर ठीक. नाही तर मुलांचे बालवय आणि तारुण्य वाया जाते. मुलांच्या लक्षात येतंच नसते. म्हणून मुलांना सतत सूचना द्यायच्याच नसतात. त्यांच्या कलाने घ्यायचे असते. त्यांच्याकडून खूप काम करुन घेऊन आपण त्यांना सबल बनवू असे म्हटले तर त्यांचे जीवन त्याप्रमाणे घडेलही. पण तसेच आपल्याला त्यांना घडवायचे आहे, हे आपण का ठरवतो? ते एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असतात. फुकटचे खायला हवे होय? असे म्हणायचे असेल तर सरळ जीवनावश्यक सेवांमध्येच सर्वांनी काम करायचे. मनोरंजन ही जीवनावश्यक बाब आहे, जीवनात मीठा इतके त्याचे महत्त्व आहे ही बाब मला कधीच वाटली नव्हती. पण जीवनाच्या एका टप्प्यावर वाटले वाचनाइतकेच मनोरंजन ही बाब आवश्यक असते. पण वाचनातून त्याचा दर्जा बदलतो. वाचन त्याहून आवश्यक असते. लहान मुलांना वाचणे म्हणजे केवळ त्यांच्या इच्छांचा प्रवास बघायचा का? तर एखादी स्प्रिंग जशी उलगडते तसे स्वतःबद्दल समजतं जाते. हे धुडगूस बंद करते की नाही ते बघा. आपलाच आतला गोंधळ हा परिस्थितीला दिलेल्या सर्व प्रतिक्रियांचा परिपाक असतो. आपल्याला ते जाणवले तर ठिक. नाही तर आपण एकदा चूकीचे वागलो की पुन्हा तसेच वागत राहतो. हे बालवयापासून होते. म्हणून मुलांना दंगा करू नका असे म्हणणे मला योग्य वाटत नाही. ते करणार, पण ते शांत पण होणार. तो आनंद मनात साठवून ते मोठे होणार. दडपशाही त्यांना वेगळे वळण लावते. आणि उन्मत्तपणादेखील. आपण सतत बोलणे टाळले की एकदा बोलून त्यांच्या येते लक्षात. अनेकांना वाटते ही गोष्ट चूक आहे. मुलांना बोलायचे नाही म्हणजे काय? अशाने तर वाया जातील ते. किंवा वाया जातात ते. वाया जाईपर्यंत आपले डोळे बंद असतात का? अनेक आता मुलांना विविध कारणांसाठी रट्टे देतात. संयमशक्तीचा विकास न झाल्याचे लक्षण असते ते. तर अनेक मुले/मुली आई/पालक रट्टे देईपर्यंत धुडगूस घालतात, किंवा चूकीचे वागतात. संयमशक्तीचा विकास मी माझ्या अनूभवातून शिकले. स्पर्धेत भाग घेतला पण तयारीच न करणाऱ्या, आलेल्या पाहुण्यांशी अजिबात न बोलणाऱ्या मुलीला धपाटा घातल्यावर मला वाटले, गरजच नाही. फक्त सांगणे इतकेच काय आहे. खऱ प्रेम असेल तर मुले शिक्षा विसरतात. मुलाचे पण प्रेम असेल तर. एकतर्फी प्रेम पालक आणि मूल नात्यात पण कधीच नसते. मुलांना जबरदस्ती नाही केली तर नूकसान होते, असा आपला समज आहे. त्यांना भान येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते, असे आपल्याला वाटते. सगळंच आपण आणि सभोवतालची माणसे त्याच्याविषयी ठरवुन ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहेत हेच विसरतो. याचा अर्थ मोकाट वर्तनाला थोडच मतदान आहे. मतदान सबलीकरणाकडून सबलीकरणाकडे आहे. घरात मोठी ताई दादाला चार गोष्टी सांगते तर दादाने पण ते ऐकले पाहिजे. मोठा झाला

ताईला सांगतो तर तिने पण ऐकले पाहिजे. मोठ्यांच्या सहनशीलतेची क्षमता संपली की ते मुलांना गोंधळच करू देत नाही. याचा अर्थ मोठ्यांच्या अपरोक्ष वाट्टेल ते करणे किंवा न करणे इथूनच नीतीमत्ता सुरू होते. बालवयातच त्याचे प्रशिक्षण असते. मुलांनो मस्ती किती, कुठे, कोणाकडे, ठरवणार तुम्ही? मोठ्यांनी बोलण्याच्या आतच होईल बंद आवाज? शिकणार स्वयंशिस्त?

२६/०३/२६

सूर्योदय आणि सूर्यास्त

रोज उगवणारा सूर्य आपल्याला रोज कोणा कोणाला काय देतो? झाडाला हरितद्रव्य, माणसां़ना, प्राण्यांना आवश्यक जीवनसत्त्व आणि तेजाची आठवण. सुर्याचे चित्र पाहिले आहे सर्वांनी? त्यांची किरणे सर्वत्र पसरलेली तुम्ही लहान मुले दाखवतात ना चित्रात? पण वास्तवात तसे आहे की नाही याचा शोध पृथ्वीवर फिरावं तर समजेल. इथून दोन पाऊले पुढे जायचे म्हटले आणि सोबत नसली की भीती वाटते. हो ना? मग सुर्याची किरणे तरी कशी कळतील? सुर्याचे चित्र समप्रभा शिकवते. थोड्या थोड्या विषयातले सर्व ज्ञान. रोज उगवणारा सूर्य आजचा दिवस शिकवतो. रोज आपले दर्शन देतो, आपले काम करतो. तो जिथे असतो, तिथेच असतो. पृथ्वी फिरते म्हणून त्यांचे दोन वेळा दर्शन होते. उगवणे आणि मावळणे. खरं तर तो उगवतही नाही आणि मावळतही नाही. त्यांच्यामुळे झाडं उगवतात, प्राणीमात्र स़ंतुष्ट असतात. त्याचा अतिप्रभावपण कोणी सहन करत नाही. लगेच पाऊस आणि हिवाळा, हो ना? पण त्याचे रोजचे दर्शन एक आशावाद शिकवतो. मग सुर्यास्त काय शिकवतो? प्रत्येक गोष्टीला अंत असतो. ज्याचे दर्शन हवे हवेसे वाटते, तो गुडूप होतो आणि अंधार होतो. हाच प्रकार चित्तातले क्लेष, अस्वस्थता, निराशा, नाराजी सगळं नको ते स़ंपविण्याचा सल्ला सूर्यास्त देतो. जो स्वतःच्या जीवनात सुर्योदय आणि सुर्यास्त शिकेल, कदाचित अनेक जीवनात ही संकल्पना येईल.

२७/०३/२६

ध्यायतो विषय

वेळ जात नाही, काय करावे? काही मंडळी लहान मुलांना घडविण्याचे काम हाती घेतात. तर तिथली मुले प्रेम हा विषय हाती घेतात. कमाल आहे ना? परिपूर्णता नसलेला विषय म्हणजे प्रेम. अमूक केले म्हणजे प्रेम, तमूक नाही केले म्हणजे प्रेम नाही, अमूक केले म्हणजे काळजी, तमूक केले नाही म्हणजे काळजी केली नाही. अशा विविध व्याख्या. खरे तर ज्या विषयाचे आपण चिंतन करतो, तो विषय

थोडासा कणभर समजतो. निदान तसे वाटते. लहानपणी कशानेही असुरक्षित वाटते. पण नंतर वेगवेगळ्या चांगल्या लोकांनी सांभाळले की प्रचंड बंडखोरी वाढू शकते. हे खरे की खोटे? म्हणजे काळजी आणि द्वंड या तराजूची दोन पारडे. रंगाचे जे प्रकार असतील ते असोत. पण काळजी सगळ्यांना खात असते. ती सवय आणि नंतर स्वभाव होतो. काळजी घेणे ज्याला जमले तो/ती म्हणेल, आपले सगळे बरोबर घडते. गीता सांगते आपण चिंतन कशा कशाचे करतो? अनेक बाबींचे. जर योग्य गोष्टींचे केले तर ती गोष्ट घडणार, पण मानवी प्रयत्न असले तर. ते जर नसतील तर चिंतनात नंतर फक्त काळजी हा भाग सुरू होतो. जो जितकी करतो/ते, तो/ती त्या वेळेला जागेवर नसतेच. कारण मागचे सगळे क्षण अशाच गोष्टींनी भरलेले असतील, तर त्या व्यक्तीने जीवन अशाच प्रकारे व्यतीत केले. मी घालवले असे म्हणणार नाही. जी बाब प्रेम, काळजीची, तिचं बाब व्देष, इर्षेची. आपले घर हवे, ते छान हवे, आपल्याकडे पुस्तक हवे/अमके हवे इच्छा असणे आपण निदान साधारण असल्याचे लक्षण आहे. पण नाहीच मिळत म्हणून त्या गोष्टीसाठी जळत राहणे ही बाब ध्यायते विषय..... नाही का? कशा कशाला लागू होत असावी ही बाब?

२८/०३/२६

जगण्याचा सूर

एका विशिष्ट रस्त्याने हळूहळू हळूहळू जातो, कोणाचेही चिंतन तसे करत नाही, पण मनात प्रश्नांचे डोंगर, इमारती असतात, त्या सोडवत असतो, गाडी येते, अर्थशून्य जीवनाजवळ. मलाच वाटले का असे? तर गीत तोंडावर येते, "अर्थशून्य भासे मज हा कलह जीवनाचा", कोणी लिहिले, का लिहिले असे वाटताना, "गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी", आठवते. म्हणजे आपल्याला काही जाणवते आहे, तशी माणसे या जगात आहेत. आपण एकटे नाही, असा दिलासा वाटत असतांनाच सापडलेला सूर हरवतो का? माणसाला प्रसन्न राहताच येत नाही. अप्रसन्न वाटावे असे नसतांना सीमेवरून माणसे हलतात कसे? अशा माणसांना कोणी तरी ओळखते, आणि त्यांचे चिंतन करते म्हणून काहीतरी घडते. कर्मयोग आणि त्यावर श्रद्धा असणारी व्यक्ती एखाद्याच्या दृष्टीने एक गाढव असण्यापलिकडे काही नसेल. पण मनाची विविध प्रलोभने, सामाजिक चर्चेचा होणारा त्रास, त्याचवेळेला जाणणारा सूर.....जीवनाचे होणारे दर्शन. कोणाला कोणता सूर कधी सापडेल हे सत्य आहे. पण जाणवणारे निसटते का, हा प्रश्न आहे. कोहम कडूनचा रस्ता सोहमकडे जातो असे सगळे म्हणतात आणि सम का निसटते? जीवनाला अर्थ असतो. तो आपल्या रक्तात असतो. अर्थ दिल्याशिवाय अर्थ प्राप्त होत नाही हे

सत्य आहे पण तो देण्यासाठी असलेला शोधला कुठे जातो? आणि शोधला तरी जगायला का कमी पडतो?

२९/०३/२६

किरकिरेपणा

लहान मूल किरकिर करायला लागले की ते शारिरीक लक्षण आहे हे लक्षात घेऊन आपण त्याला हवे ते योग्य ते खाद्य पुरवतो. पुढे मोठे होतो. स्वतःचा किरकिरेपणा शोधत, त्यावर मात करण्याचा प्रयत्न करतो. अनेकदा इतरांवर आक्रमण करुन आपण स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करतो. हे शारीरिक आणि मानसिक दोन्ही बाबतीत होते. आपले सर्व विचार दुसऱ्यावर लादणे आणि आपले विचार दुसऱ्याला मान्य असते, यात फरक आहे का? जीवनात रोजच प्रश्न पडतात. हे प्रश्न सोडवण्याचा आपण प्रयत्न करतो. किरकिर करती जगणे ही एक सवय आणि नंतर तो स्वभाव बनतो. संयम शक्ती विकसित करणे आणि मूळात संयमी असणे यात फरक असतो. माणसे अनेक कारणांसाठी स़ंयम विकसित करतात. सगळे सुख मिळूनही आपली किरकिर थांबत नाही तेव्हा सुखाची सवय आणि सुखाचा शोध हिच कारणे असतात. यापलीकडे आपल्याला वाटत जाते अमूक एक काम जमावे, अमूक एक कला ज्यांनी वगैरे. पण यातही आपण फक्त दुसऱ्यावर मात करण्यासाठी किंवा दुसर्यांना काही दाखवून देण्यासाठी करत असू तर ते खूपच चूकीचे असते. दाखवण्यासाठी केलेली कृती क्षणिक समाधान देते. ज्या दिवशी या विचार पातळीवर आपण येतो, की मी अमूक एक केले होते, ते ठिक नव्हते, मग आपल्याला खूप हळहळ वाटते. म्हणून किरकिरीचे कारण समजावे. पण अमूक एक कृती केली तर परिणामांचा अंदाज नाही आला तर ती करणे योग्य नाही, नाही का? शरीराला कितीही दिले, तरी त्याला हवेच असते. त्यातूनच म़ेंदूचे पोषण होते हे अगदी सत्य आहे. पण विचार जो आंनंद देतो तो चिरकाल टिकणारा असतो. अन्नातून मिळणारा आनंद क्षणिक असतो. आज अमूक खावेसे वाटले, उद्या तमूक वगैरे हे न संपणारे आहे. याचा अर्थ हे तुम्ही सांगता, तर तुम्हाला आवडत नाही का? तर बालवयापासून अन्न हे पूर्ण ब्रह्म आणि अन्नाला नाव ठेवू नये एवढेच माझे मत होते. किरकिरीने शांत वृत्ती राहत नाही. म्हणून यावर मात करायला बालपणापासून शिका. माणसे दुसऱ्यावर दामदमट करून स्वतःला हवे ते मिळवतात. किंवा जबाबदार वर्तन शिकून, दुसऱ्यावर विजय मिळवण्याचा प्रयत्न करतात. तेवढे करून किरकिर संपली तर मिळवले. नाही तर इतके करूनही किरकिर शिल्लकच असेल तर कधी विचारणार का स्वतःला यांचे कारण काय?

जेव्हा मनाची धाव एखाद्या गोष्टीकडे जाते त्याचे कारण अपूर्णत्व हे असते. चला आपल्या किरकिरीची कारणे शोधूया.

३०/०३/२६

भ्रांत मन

जगात अशी अनेक माणसे आहेत, जे दुसऱ्याचे विचार, भावना ओळखून त्यांना मार्गदर्शन करतात. तर काही स्वतःच्या कामासाठी त्यांना त्यांच्यापासून परावृत्त करतात. नितीमत्ता ही केवळ बोलायची गोष्ट नसून वागायची गोष्ट असते. बरेच जणांना वाटते, आपण कधी चूकतच नाही. तर काहींना सतत आपले काही चूकले का असे वाटत असते. मी काय करावे, असा प्रश्न ज्याला पडतो, त्याला मार्गदर्शन करणारी माणसे नसली आणि त्याची वाट चूकली तर मी आयुष्यात काय कमावले, हे वाटतेच. पण आपली मनस्थिती कोणत्याही बाबतीत कितीही वाईट परिस्थितीत जे व्दिधा होऊ देत नाही अशी माणसे पण जगात असतात. बरेचदा मला माझे समजते, पण आव्हान पेलता येईल का ही भीती असते. परिस्थिती कितीही बदलली, तरी आपण कसे वागणार आहोत, तिथे कोणाची साथ मिळाली, नाही मिळाली तर जीवन जगण्यासाठी आपले वळण बिघडेल का, ते तशा वळणावर जाते आहे असे दिसले की आपण हतबल आहोत असे वाटते का? अनेकांचे उत्तर हो असेल, तर काहींचे उत्तर नाही असेल. आपल्या जीवनात प्रत्येक बाबतीत आपण सुस्पष्ट असणे या इतके सुख कोणते नाही. आणि जो यात दिशाभूल न करता मदत करतो, त्या इतकी चांगली माणसे किंवा मैत्री दुसरी कोणती नाही. दुसऱ्याला दिशाभूल करत आपण जीवनात जास्त मिळवू शकतो हा एक भ्रम असेल असे वाटते. हिच गोष्ट माणसाच्या "मी"पणाची आहे. या "मी"पणामुळे देखील अनेकदा आपले मन भ्रांत असते. "मी" पणा भीतीतून पण विकसित होतो. हा इतक्या मोठ्या प्रमाणात असतो की फक्त आत्मसन्मान/म्हणजेच स्वतःला चांगले वाटावे म्हणून आपण इतका "मी" पणा जपतो की तो विचार विश्वाच्या पलिकडे आहे. जीवनात गरजेपुरते ज्ञान आहे पण फारशी साधनसंपत्तीच नाही, अगदी जवळची माणसे पण नाही हे "मी"पणा असल्याचे पण लक्षण आहे तितकेच "मी"पणा नसल्याचे पण. इतकी "अहंता" ही बाब सूक्ष्म आहे. अहंमन्यता असली की स्वतःला पडणारे प्रश्न कधीच सुटत नाही, जगासाठी खूप नंतर निदान स्वतःसाठी. हे तुम्ही का सांगतात? अहंम पणा सोडल्या शिवाय शांततेचा अनूभव येत नाही. ती एक अशी शांतता जी स्मशान शांतता नसते, पण तुम्हाला स्वतःला बरे वाटणे सुरु होते. जेव्हा भ्रांत मन असते, आणि अशा वेळी तुम्हाला कोणी भेटले तर दुसर्यांबाबतीत तर आपण चूकतोच, पण स्वतःबाबत देखील चूकतो. जीवनात

कोणती मोठी बाब असेल तर ती म्हणजे "गृहीत धरणे". ज्याचे गृहितक हे वास्तवावर आधारित असते, ती व्यक्ती अभ्यासू असते. अशांचे मन भ्रमित कधीच होत नाही.

३१/०३/२६

सन्मान

अनेक घरांत लहान मुलगी किंवा मुलगे मोठे होतात, ते सन्मान मिळून. कधी हा सन्मान खोटा असतो, तर कधी सन्मानाचा अतिरेक असतो. खोटा कसा हे बघू. ताई काय शिकणार? काही शिकायचा प्रयत्न केला तर नंतर जाणवते, अरे हे तर खोटे होते. खरे असते तर चित्र काही तरी वेगळे असते. तर अनेक ठिकाणी ताईला दिलेला मान हा सर्वत्र गैरसमज, बेजबाबदार वर्तन आणि भांडणे घडवून आणते. आणि समर्थांची उक्ती कामाला येते, "जगी सर्व सुखी असा कोण आहे "? कमाल आहे ना? सन्मान ही बाब जीवंतपणीच जाळणारी गोष्ट आहे हे समजते. नाही दिला तरी त्रास, दिला तरी त्रास, नाही मिळाला तरी त्रास, आणि मिळाला तरी त्रास. याचे कारण असे की सन्मानाचा चढता आलेख हवा असे वाटते. मग दुसरे काही करण्यापेक्षा सन्मान मिळेल तेवढीच कृती आपण करतो. मला जीवनात अत्यंत मजेशीर आणि बिनकामाची वाटलेली गोष्ट म्हणजे सन्मान. कारण निव्वळ या एका गोष्टीमुळे जीवन अपूर्ण राहते. खूप शिकायचे राहते. लोक काय म्हणतील, कसे दिसेल, कसे वाटेल ही जीवनशैली असते एखाद्याची. ते सन्मान मिळविण्यासाठी नाही, तर तशाच वातावरणात वाढलेले असतात. दुसरीकडे कोणाचीच पर्वा न करता माणसे वागतात असे वाटते. पण तसे काही चित्र नसते. खरा सन्मान जिथे मिळतो/देतात, ती माणसे गहिवरून येतात. बाकी उपचार असतात. तीशीत कोणाचा सत्कार झाला तर त्याने स्वतःला विचारावे, मी कोणाचा सत्कार केला? आणि ही गोष्ट हवीशी वाटली का? जिचा अत्यंत तिटकारा यावा अशी गोष्ट सन्मानच वाटते मला. कारण उपचार आहे, असे जाणविण्याची पातळी सुरु होते. सत्कार करणाऱ्याला वेगळे वाटतेसुध्दा. पण अनेक ठिकाणी मान आणि अवमान या डोंगरांची चढ उतर केलेल्यांना समजते हा किती कृत्रिम प्रकार आहे. कारण असे सन्मान दिल्यानंतर अवमान कसा काय वाट्याला येतो? किंवा अवमान झाल्यावर मान कसा काय वाट्याला येतो. तो एक खेळ आहे असे वाटणे सुरू होते. सन्मानाची सवय किंचीत ही असुविधा सहन करत नाही. आपण केवळ सन्मान ही गोष्ट लहान मुलांना शिकवायची का? हा एक आलेख असतो हे शिकवायचे का? सन्मानाचे पण प्रकार असतात, हे शिकवायचे का? की त्यांना शिकू द्यायचे. परिस्थितीनूरूप योग्य/अयोग्य हे शिकवायचे? सन्मान मिळाला नाही

तरी चांगले वाटते का? किंवा एकदा मिळून नंतर अपमान झाला तर बरे वाटते का? चिंतन करुया सन्मानाचे प्रकार या विषयावर. सन्मान ही बाबच सांस्कृतिक आहे. संस्कृतीपरत्वे त्याचे प्रकार बदलतात.

०१/०४/२६

टोकन

नावाचे महत्व आणि नावातली जबाबदारी, आवडीने ठेवलेले नाव याचा विचार मनात डोकावला. काळ बदलला आणि वयस्कर थकले की जबाबदाऱ्या आणि म्हणूनच अनेक संकल्पना प्रसंगी परंपरा बदलतात. आपल्यापर्यंत माणसे पोहचली तरी त्रास, नाही पोहचली तरी त्रास. रेफरन्स ही बाब समोर आली. का द्यावे लागतात हे रेफरन्स? विषयातले तज्ञांपर्यंत पोहचण्यासाठी केलेली एक साखळी. यातला धोका हा आहे की रेफरन्स म्हणून नाव दिलेले अनोळखी लोक आणि तज्ञ सर्वच अनोळखी असले तर प्रामाणिक माणसाचे नेमके होते काय? खरं तर जबाबदारीने काम करायला जीवनात काही पर्याय दिसत नाही. आणि बर्याच माणसांना वाटते, माणसे असे निरूद्देशीय कामे काय करतात? अरे, आता खाणे पिणे सर्वत्र उपलब्ध झाले आहे. असे तंत्रज्ञान निघाले आहे की डोके चालवणे सोडा. अरेच्चा! माणसांच्या मेंदूला पर्याय! मजा आहे. जगणं रिमोट कंट्रोल नाही का? मी रेफरन्स बद्दल बोलत होते. खूप मेहनत केलेला चित्रपट बाक्स आफिसवर आदळतो. पैसा, कलाकारांचे श्रम, प्रचंड वेळ याचे मी गणित करत असते. मला वाटते याला पण रिव्हू करायला द्यायला हवे. नाही का? यात संकल्पना चोरी भाग असतो. विचारवंत प्रामाणिकपणे वागले तर किती जण सुखी होतील? नोकरी हवी रेफरन्स, छोकरी हवी रेफरन्स, पीएचडी हवी रेफरन्स! म्हणजे महामार्गामुळे आपण एखाद्या जबाबदार व्यक्तीपर्यंत पोहचू अशी एक आशा असते. एखादा पक्षी जसा वरचेवर दाणे टिपतो, तसे नावे माहिती असतात, पण खात्री नसते. कारण वर्तन आणि कामांचा दर्जा याबाबत नक्की माहिती नसते. रेफरन्सचे महत्त्व आहे. पण त्यात खूप जबाबदारी आहे. रेफरन्स एक टोकन आहे. टोकन दिले की काम होते. हळूहळू हळूहळू काम करण्याची प्रेरणा कमी होत जाते. थकवे आणि कंटाळे वाढतात. आणि फक्त रेफरन्स वाढतात. म्हणून लक्षात ठेवावे रेफरन्स ही जबाबदारी आहे.

०२/०४/२६

वावटळ

मानवी समाजात जी धूळ उडते ती प्रेमप्रकरणे, त्यातल्या बाधा, खरे खोटे प्रकार, माणसांनीच माणसांना दुखावल्याचे प्रकार, एकमेकांविषयी तीव्र व्देष, दुःखद भावना. मला सततच प्रश्न पडतो, अशा दिशेने जाणारा समाज लय भारी म्हणता येतो का? नातं आंबते इतपत आपले चूकते कुठे हे सर्वांनीच पाहायला नको असते का? निवास सोडला की सामाजिक संस्थेत तिचं गती, निवासात गेलो तिचं स्थिती. डोशासारखी नाती आंबवून वर्तुळे तयार करायची आणि पुन्हा त्यात नाती डोशा सारखी आंबणारच नाही असे काही असते का? खरं तर जबाबदाऱ्या पार पाडणे अवघड झाले की सुटसुटीतपणा निर्माण करणे आणि नाती आंबतात म्हणून वेगळे वर्तुळ तयार करणे कोणत्या उन्नतीचे लक्षण असते? सुंदर गाणी, सुंदर चित्रपटे, छान लेख मला माझ्या विचारविश्वातून दाखवते आणि संदेश देते, जगात कुठेतरी काहीतरी चांगले आणि उदात्त आहे म्हणून तर अशी निर्मिती आहे. जगात नवीन येणारी प्रत्येक गोष्ट मला षमजलीच पाहिजे आणि मिळालीच पाहिजे नाहीतर मी आउट ऑफ डेट असेल, असे वाटूच शकते. वावटळी अशाच असतात. त्या लोक एकमेकांबद्दल सतत हेतूपुरस्सर किंवा फारसा विचार न करताच बोलतात, त्यामुळे कित्येक सामाजिक संस्थांमध्ये किंवा निवासाच्या ठिकाणी एक उठला की दुसरा बोलतो ही बाब घडत असते. मानवी मनात संशय पेरला आणि वाढवला की विष तयार होते. असे करून प्रगती करता येते हा मला वाटते एक गैरसमज आहे. माणसांच्या संपूर्ण जीवनाला धक्का बसणे, देणे हे दोन भाग आहेत. समजावून क्रिया झाली तर बरीच माणसे एकमताला येतच नाहीत. मग बळाचा वापर अटळ होतो. दुसरा झोपलेला आहे तोपर्यंत आपण कार्यभाग उरकून घेऊ ही बाब नैसर्गिक आहे. पण दुसऱ्याला कधीतरी जाग येते हे आपण विसरतो. कोणाच्या विचार विश्वाच्या पलिकडे धक्कादायक घटना घडतातही. पण आपला कार्यभाग कधीच संपत नसतो. म्हणून आपला आणि इतरांचा विचार करता येणं आणि जीवनात ही शिकवण घेणं, मिळणं हे शाश्वत विकासाकडे नेणारं चित्र असतं. समाजातली धावपळ अनेकांचे आयुष्य खराब करते. तर उत्तम कार्यक्रम आपले आणि इतरांचे जीवन घडवते. शिक्षण हे जीवन शिक्षणच असते असे नाही. अनेक ज्ञानशाखा आज अस्तित्वात आहे. जीवन शिक्षण पण आवश्यक आहे, पण ते ज्याचे त्यालाच मिळवावे लागते. म्हणून धावपळीचा भाग बनायचे, की समंजस, जबाबदार, संवेदनशील नागरिक व्हायचे आपल्याला ठरवावे लागते. असे बनतांना नेहमी लक्षात ठेवावे, प्रत्येकाची संवेदनेची पातळी निराळी आहे. अनेकांना अनेक गोष्टी जाणवतात. पण योग्य ते घडणे व ते देखील बळाचा वापर न करता, साम़ंजस्याने घडले तर जास्त चांगले असते. कधी करतो आपण असे विचार? अनेकांच्या अनेक/काही चूका हेच सामाजिक भांडवल असते. असते ही योग्य

सामाजिक विकासाची दिशा? असे केल्यानेच आपले भले होईल असे वाटणे खूप अशाश्वत असते. शाश्वत विकास चूकांच्या भांडवलावर नाही तर चांगल्या विचारांच्या भांडवलावर होतो. समाजातील वावड्या ज्या दिवशी बंद होतील, त्या दिवशी प्रत्येकाला स्वतःचा विकास करण्याचे बळ मिळेल, योग्य दिशा आणि शक्ती सुध्दा. माझा विकास म्हणजे काय हेच न समजता केवळ दुसऱ्याचे बघून त्याहीपेक्षा त्याच्याकडचे बघून आपले अस्वस्थ होणे ज्या दिवशी बंद होईल, किंवा तसेच मला हवे आहे हे निश्चित कळेल, त्या दिवशी आपल्या विकासाकडे आपण एक पाऊल टाकलेले असेल. आता ठरवायचे समाजात वावटळ उठवायची की नाही? विविध विचार समोर आणणे हे वावटळ नसते, तर वैचारिक मंथन आवश्यक असते.

०३/०४/२६

केवळ ऐतखाऊ

काय केले लहानपणापासून? तर फक्त बसून खाल्ले, ऐतखाऊ आहे नूसता/नुसती. आईचे/पालकांचे बोलत आपण मोठे होतो. अनेकजण. सांगून समजतच नाही ना? कितीवेळा सांगणार ना? एकदा सांगितले की समजले पाहिजे. निर्लज्ज आणि कोडगे पोरं असतात. सगळं जागेवर पाहिजे त्यांना. आई/पालक सतत याप्रकारे बोलत असतील तर एकतर ते थकलेले आहेत किंवा कंटाळलेले आहेत. न बोलता, न दाखवता शिकवता आले तर ती शिकविण्याची पध्दत आहे. एखाद्यावर खूप प्रेम असले की पण तसे घडते. याला/तिला लवकर लवकर आले पाहिजे, समजले पाहिजे, कोणी नावे ठेवायला नको, आई जर बोलत असेल तर मुले खूप दुखावतात आणि दूर निघून जातात, कधी शरीराने कधी मनाने सुध्दा. बरेचदा पालकांना काही साध्य करायचे असते. कधी ते बरोबर असते. कधी चूक. त्यांच्या अपूर्ण इच्छा ते आपल्याकडून पूर्ण व्हाव्यात अशी पण इच्छा बाळगतात. काही मूले समजतात, काही नाही. अशी मुले ऐतखाऊ म्हणून संबोधली जातात. पालकत्वाच्या प्रवासात चढाई नावाचा प्रकार असतो. तो मी पण आहे किंवा मीच आहे हा प्रकार असतो. ज्या मुलांना अशा बोलणे किंवा वर्तनातून लहान मोठे भेद समजण्याच्या प्रकारातून जावे लागते, अशांचे विचार विश्व आणि भावविश्व फार निराळे असते. कोणासाठी ही मुले रूग्ण असतात, कोणासाठी सहानूभुती. जेव्हा ते सगळं जग बघून येतात, तेव्हा आपण जबाबदारीने वागायला हवे एवढीच असते अनूभूती. बरेचदा जेव्हा काही मुले तसा प्रयत्न करतात, पालकांचे मत असते, आता काय उपयोग? प्रत्येक गोष्टीला तराजूत ठेवण्याची सवय झाली की कशाचेच कौतूक आणि महत्व वाटेनासे होते. मुलांनो १८ वर्षांपर्यंत जे आवडते ते शिकणे हे आपले

काम. तसे तर वय वर्ष २५ पर्यंत, आणि अजून शिकण्याची आवड असेल तर निरंतर शिक्षण, पण १८ व्या वर्षानंतर आपले स्वतंत्र जीवन जगण्याचा प्रयत्न करायला हवा. स्वतंत्रता कोणती? मात्र स्वतंत्रता आणि त्यातून विकसित होणारा उन्माद की जपली जाणारी संवेदनशीलता हे ठरवा तुम्ही.....

०४/०४/२६

स्वातंत्र्याची चव

जेव्हा अनेक गोष्टींचे स्वातंत्र्य मिळते, आपण मिळवतो किंवा स्वातंत्र्यासाठी भांडतो, तेव्हा या स्वतंत्रतेचा उपयोग कशासाठी करतो किंवा केला हा प्रश्न पण जरुर विचारावा. याचे कारण काय? तुम्हाला कोण कोणते स्वातंत्र्य होते? प्रतिप्रश्न बरेचदा सूड बुद्धीने विचारला जातो. तर कधी कधी कुतूहलाने. स्वातंत्र्य आणि जबाबदारी शिकलो की झाले का? आता अजून काय आहे? समग्रपणे, संवेदनशीलतेने विचार करता येतो आपल्याला? त्याचा उपयोग काय? आपण उन्मत्त न होता वेगळे बनतो. स्वातंत्र्य आणि जबाबदारी लक्षात ठेवली की आपण अहंकारी, उन्मत्त बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण स्वतःचा सन्मान जपण्याच्या प्रक्रियेत ही बाब घडते. ती खूप सुक्ष्म पातळीवर असते. समाजात फिरायची मोकळीक मिळाली म्हणजे प्रत्येकालाच प्रत्येक गोष्ट समजेलच असे काही नसते. किंवा समजणारी नाही म्हणून मोकळीक न देणे असेही काही नाही. सुरक्षितता म्हणजे काय, असुरक्षित म्हणजे काय हे पण न समजण्याच्या वयात जर तुम्ही घराबाहेर पडले तर निडर किंवा काही प्रसंगांमुळे खूप घाबरट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बेडरपणा व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनात अडथळा आणतो, तसा घाबरटपणा देखील. एकदा आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आणि फक्त जबाबदारी शिकलो की झाले असे नाही. जाचक बंधनांमध्ये राहिलेल्या व्यक्तीला ज्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत त्यांना समजू शकतो आपण? त्याचे नियम सहन करू शकतो आपण? आपण भांडून हक्क मिळवतो. मला बरेचदा वाटते, संवेदनशील, जबाबदार आणि वयाने मोठी माणसे हक्क आणि जबाबदाऱ्या देत असतील. स्वातंत्र्याचा अमर्याद उपभोग घेतलेल्या व्यक्तींनी बंधनात जगून बघा, असे वगैरे यातून सांगायचे नाही. तर बंधन सुरक्षितता देते पण शिकण्यात पण आपण खूप मागे राहू शकतो, तसेच स्वांतंत्र्य बरंच शिकवते पण कधी कधी असुरक्षित आणि वाईट अनूभव पण येऊच शकतात. ते मनात खोलवर असतील. बंधनात राहून अगदी थोडे पण चांगले शिकलो, चांगले अनूभव घेतले हा भाग आयुष्यच शिकवते. पण आपण घेतलेल्या स्वातंत्र्याने किंवा मिळवलेल्या स्वातंत्र्याने आपण काय शिकलो हे तर जरूर जरूर स्वतःला

विचारावे, फक्त स्वतःसाठी. इतर फक्त बोलत असतात, स्वतःच्या समजशक्तीतून, आपण पण समजतं असतो, स्वतःच्या समजेप्रमाणे आणि सत्य वेगळेच असते..... मजेशीर वाटते? जे सांगितले ते करत आम्ही खूप समृद्ध आयुष्य जगलो असे काहीचे म्हणणे असेल. त्यात चूक किंवा गैर काहीच नाही. स्वातंत्र्याची चव, त्यातले धोके त्यातला आनंद, अडथळे, त्यातून येणारे अनूभव, त्यातून निर्माण होणारी समजशक्ती, त्यातून निर्माण होणारे व्यक्तीमत्व, त्यानंतर केलेले/करत रहाणारे समायोजन, हे सगळे तरूण मुलांना समजावे, नाही सांगितले तर शिकतील आपले आपणच .....असे ज्याला वाटत नाही ती फॉर्मली विचार मांडणारी व्यक्ती.....

०५/०४/२६

मुलांचे व्यक्तिमत्त्व

मुलांचे व्यक्तिमत्त्व आपण घडवितो, तसे प्रयत्न करतो, हट्टी रागीट, लोभस, प्रेमळ, आळशी, उद्योगी, कुरघोडी करणारे, प्रयत्नवादी/जिद्दी, श्रध्दाळू, सुशील, निराशावादी, स्वप्नाळू/कलावंत, घायकूता/उथळ, संयमी, प्रयोगशील, भित्रा/धाडसी, बडबडे/गप्प राहणारे वगैरे. जितके गुण दिसतात किंवा जितके दोष दिसतात तसे व्यक्तिमत्व आकाराला येते. जी मुले ऐकून घेतात, त्यांनाही वाटते, मी पालकांचे अमूक ऐकले म्हणून अमूक घडले. मुले शेवटी फायदा तोट्याचे गणित शिकणारे होतात. कारण जीवनाचा अर्थ ते तसा शिकतात. कितीही शिकवले/शिकण्याची संधी दिली तरी परिस्थितीला प्रतिसाद देण्याची क्षमता रक्तात असते. ती अंगभूत क्षमता इतरांच्या सांगणूकीने जेव्हा घडते त्यात आनंद असतो. पण जेव्हा ती स्वतः शिकतो तेव्हा ती जास्त चांगली असते. याचा अर्थ इतरांची शिकवणूकच नको का? तर ती स्थल, काल मर्यादीत असते. म्हणून इतरांचे ऐकून आपल्याला आपले व्यक्तिमत्त्व घडवता आले पाहिजे. दुसऱ्याला फसवणारे, दुसऱ्याची टर उडवणारे, दुसऱ्याला हसणारे, वगैरे भाग व सांगता कसे विकसित होतात हे आपण लक्षात घ्यावे. एखादा प्रसंगच असा असतो की लहान थोरांना परिस्थितीवश हसू येते. पण ज्यांची संवेदनशीलताच उत्कट आहे त्याला परिस्थितीतले गांभीर्य, तरतम हे लक्षात येते. केवळ संवेदनशीलता उत्कट असून चालत नाही तर तारतम्य पण असावे लागते. खूप अनूभव घेतला की हे निर्माण होते असेही काही नाही. ते समजशक्तीवर पण अवलंबून असते. आपली मुले छान, बुध्दीमान, आणि जगात चमकणारी असावी असे पालकांना वाटणे आणि तसा ते प्रयत्न करणे स्वाभाविक आहे, पण इतर मुलांना जाणवणाऱ्या गोष्टींचा पण विचार झाला तर सामाजिक समतोल किंवा समाजकल्याण विभाग चांगले काम करू शकतो. मुलांची समजशक्ती वाढावी म्हणून विविध खाद्यपदार्थ खायला

घालणे आणि मुलांना आवडते ते खायला देणे याचा तोल सांभाळणे गरजेचे नाही का? काय केले की समजेल असे जेव्हा पालकांना वाटते तेव्हा परिस्थिती त्यांनीच हाताबाहेर जाऊ दिली आहे असा पालकांवर आरोप होतो. पण तसे नसते. मूल हे एक व्यक्तिमत्त्व आणि एक समाजाचा घटक आहे. म्हणून एखादे मूल वेगळे वाटले तर पालकांइतकेच त्या मुलाने स्वतःला समजणे आवश्यक आहे. अनेक पालक म्हणतात, तुझ्यामूळे किती अपमानास्पद परिस्थिती येते. खरच होते तसे. मुलांनी अपमान होईल असे जाणले तर ती चूक आहे. पण परिस्थितीचे परिणाम समजलेच नाही, तर तशी कूवत त्यांच्यात निर्माण नाही झाली. दुसऱ्यासारखे आपले मूल नाही असे वाटणे म्हणजे आपल्या मुलांचा आनंद घेण्याची क्षमता पण आपण दवडणेच नाही का? घरात मूल येते ते अपत्य जन्माचा आनंद देऊनच. रंग कोणताही असो, मूल घरात आले की घर गजबजून जातं. नंतर हेच मूल एक ताप वाटतं. आपल्याविषयी थोडं काही बोललं, आपले ऐकले नाही वगैरे की पालक म्हणून आपली परीक्षा सुरु असते. सर्व गुणसंपन्न मूल हवे असतांनाच सर्व गुणसंपन्न पालक आपण आहोत का, हे आपण कधी स्वतःला विचारतो? मुलांच्या व्यक्तीमत्वातले दोष जरूर कमी व्हावेत. पण गुण हे मुलांनी समजून घेऊन स्वतः वाढवायचे असतात. गुण हे मुलांनी समजून घेऊन स्वतः वाढवायचे असतात. आपले मित्र, मैत्रिणी किती ऱ्पन्न जीवन जगत आहेत हे समजून चित्त शांत नसेल तर अजून आपल्याला मित्र, मैत्रिणी नाहीत असेच समजावे. कारण जिथे मैत्रीत प्रेम आणि शांतता नाही तर तसे व्यक्तिमत्व अजून निर्माण झाले नाही. आणि ही गोष्ट फक्त मैत्री संदर्भातच नसते. कोणत्या कारणास्तव चित्त शांत नाही हे समजणे हा पण अभ्यास आहे. मनाला अमूक एक गोष्ट देऊन त्याला घडवले असे असणे आणि मनाला अमूक एक गोष्ट आठवली, समजली म्हणून ते घडणे, अशा विविध पध्दतीने व्यक्तीमत्व विकास घडतो. असे करतांना व्यक्ती अंतर्गत दोष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ती ओळखणे ही सुद्धा आवश्यकता आहे. समाजात आपण नावे ठेवण्याची कामगिरी करून तसे काही फारसे साध्य करत नाही. असे ऐकीवात आहे, की एक काळ होता जेव्हा एखाद्या विषयावर उघड टिका होत असे पण ती टिका समयोचित आणि व्यक्तीचे जीवन संपन्न होण्यासाठी होत असे. जिथे वैयक्तिक संपर्क शक्य नाही, तिथे वर्तमानपत्र हा आधार होता. खरे तर समाजातील वयाने, अनूभवाने आणि सर्वाथाने मोठ्या व्यक्तींना व्यक्तिमत्त्व घडण्याचे सल्ले आपण देऊ नाही शकत. जर असे असेल तर आपण त्यांच्याशी त्यांच्याबरोबर उघड चर्चा करू शकतो. मुलांचे व्यक्तिमत्त्व सुजाण, संपन्न घडण्यासाठी त्यांनी जरूर प्रयत्न करावेत. कारण वाढलेले वय कधी कधी व्यक्तीमत्वाला आकार द्यायला कमी पडू शकते. कोणीतरी म्हटले आहे खुद को

करो बुलंद इतना खुदा बंदेसे पुछे, बोल तेरी रझा क्या है? असे व्यक्तिमत्व कशासाठी?

०६/०४/२६

आपण जीवन कधी जगणार?

बंधने ही जाचक वाटतात, नकोशी वाटतात. काही मोठी माणसे वेगवेगळ्या कारणांसाठी बंधने घालत असतात. त्यांची कारणे जर त्यांना स्वतःला माहिती असतील, तर ठिक, पण त्यांनाच माहिती नसतील तर ती जाणून घेणं, किंवा ती कारणे शोधणे गरजेचे असते. याचे कारण असे की मूळातच तरूण पिढीला बंधने नकोशी वाटतात. त्यातच जर दबावामुळे किंवा अन्य कारणांनी ती बंधने घातली तरी ते बंड करतात. पण कारणे समजली तर ते कधीच असे वागत नाही. दुसऱ्याला छान जातांना पाहून तसे जगले पाहिजे ही एक स्वाभाविक प्रेरणा आहे. ज्या घरातले पालक सूज्ञ असतात, ते असे कधीच वागत नाही. त्यांना जीवनाचा अर्थ समजलेल्या असतो. त्यांना कुठे स्वतंत्रता द्यावी आणि कुठे बंधने घालावी हे थोडे समजते. पूर्णपणे समजेलच असे नाही. लहान मुलांना वाटतेच, आपण जीवन कधी जगणार? पण बर्या वाईट अनूभवांचे गाठोळे ज्यांच्याकडे आहे ते नीट सांगतात, आपण कधी जगायचे या प्रश्नाचे उत्तर. स्वातंत्र्य ही बाबच अशी आहे की जी एकदा अनूभवली की तिचं पुन्हा पुन्हा हवी असते. हे प्रत्येक गोष्टीचे आहे. जो स्वातंत्र्य आणि ब़धने नीट समजून जगतो त्याला कधीच प्रश्न पडत नाही, आपण कधी जगायचे. कारण आपण जातोच आहे असे त्याला वाटत असते. आपल्या वर्तनातील चूकांमुळे तसेच अपरिपक्व वय अनेकदा जीवन अर्थहिन भासवते. जीवनातला अर्थ स्वतःचा स्वतःला सापडायला वेळ लागतो. आणि सापडल्यावर ही जगता येईलच तसे असे काही नाही. मग ही इतकी थेअरी तरी का मांडायची? बरेचदा कोणाला अशी थेअरीपण माहीत नसते, यासाठी. जेव्हा जेव्हा तीव्रतेने वाटेल, आपण कधी जगणार? तुमचे प्रश्न आधी समजून घ्या, उत्तरे सापडतील, ज्या दिवशी ती जगायला मिळतील, त्या दिवशी जगून घ्या.

०७/०४/२६

हे जीवन आहे का?

कोणाला किती अपत्य आहेत? कोणाच्या प्रेमजीवनातील ताज्या घडामोडी काय? त्यांचे भौगोलिक ठिकाण कोणते? या आणि अशा विविध बाबींची माहिती कूतूहल म्हणून असणे आणि एक अधिकारी म्हणून असणे या किती वेगळ्या बाबी आहेत. खाद्य पदार्थांइतकेच काही महत्त्वाचे या जगात असेल तर प्रेमजीवन. माणसाला

हुरहुर वाटते ती केवळ या एका बाबींमुळे. असे अनेकांचे मत आहे. अपवाद असेलही. आणि खरंतर हे आहे की आदर्श जीवन समोर न येता मुलांच्या आवडीच्या हसीन कथा मात्र समोर येतात. खरं तर प्रेम हसीनच असते. माझ्या मते कोणतेही प्रेम जीवनाला नावे ठेवू नये. तू राम बन मी भानगडी करतो हे पण चूकच नाही का? कोणी आदर्शवादाचा स्विकार करावा किंवा करू नये हे इतर नाही ठरवू शकत. पण जीवनात या अशा चर्चा निव्वळ कुतूहलापोटी चालतात. संपत्ती कितीही असली किंवा पृथ्वी समृद्ध असली तरी अपत्ये किती असावेत हा ज्याचा त्याचा प्रश्न ते संपत्तीची विल्हेवाट हा पण पूर्णपणे ज्याचा त्याचा प्रश्न. भावनेपुढे विद्वत्ता फिकीच पडते. म्हणून तर आदर्शवाद कोरडे राहतात. सगळ्यांच्या बाबतीत नाही. काही ठिकाणी. जीवनाची साथ हिच तर असते. ये रे माझ्या मागल्या? हे जीवन आहे का? हा प्रश्न समजला पाहिजे. आपल्याला गोड चर्चा खूप आवडतात. तसे चित्रपट वगैरे पण आवडतात. पण अगदी अडल्टवर पण त्याचा कसा आणि किती प्रदीर्घ काळ प्रभाव राहतो, लक्षात नाही येणार. म्हणून चर्चा बंद आणि वास्तवात जगणे खूप महत्त्वपूर्ण असते. वास्तव नसते चांगले, असे वाटते, कारण आपला कसलाच अभ्यास नसतो. करायचा ही नसतो. एकतर कोणाला उत्तरे द्यायची असतात, किंवा स्वतःला उत्तरे शोधायची असतात. मग प्रश्न हा आहे, ज्याला प्रश्न पडतो, जिथे पडतो, हे जीवन आहे का? त्याला ते सोडवता येते. सर्व काही एकतर्फी प्रयत्नांवर नसते. समूह शक्तीला महत्व आहे. सगळ्याच ठिकाणी. पण काही ठिकाणी वाटून जाते, अरे हे काय? मग वाटते हे जीवन आहे का? ज्याला ज्याच्या जीवनाचे प्रश्न पडतात, त्याला ते सोडविण्याची आणि जीवन उभे करण्याची समाजव्यवस्था निर्माण व्हावी. कागदोपत्री जीवन जगणाऱ्यांना, खूप स्वप्न बघणाऱ्यांना आणि ती खूप छान असणाऱ्यांना, ती सत्यात उतरवण्यासाठी खूप खूप शुभेच्छा! सगळ्याच बाबतीत प्रश्न पडणाऱ्यांना ते सुटायलाच हवेत प्रयत्नवाद आणि प्रार्थना. ज्याने झोपडीच बांधली ती झोपडीपण किती सुंदर असू शकते हे आंबट चर्चांपेक्षा खूप चांगले असते नाही का? आदर्श प्रेम जीवनाला प्रेरणा देणारे असते. आंबट चर्चा स्त्रीची आणि पुरुषाचीपण शक्ती नष्ट करते. मला वाटतं याची जाणीव समाजात नसावी. कारण चार लोक एकत्र आल्यावर ही चर्चा होते. आणि जर काही ज्ञान मिळविण्यासाठी होत असेल तर "होम मिनिस्टर"सारखे सुंदर कार्यक्रम नाही का? हा भाग प्रेम चर्चांचा. अशाच प्रकारचे विविध विषयांवरील कार्यक्रम हे जीवन आहे का? या प्रश्नाला उत्तरे देतील की नाही? मुलांचे जीवन घडवायचे असेल तर आंबट चर्चा थांबल्या पाहिजेत. आणि योग्य तिचं माहिती मुलांना मिळाली पाहिजे.

०८/०४/२६

खीळ

चांगले काम चालले होते. चांगली खीळ बसली. खीळ हा शब्द कानावर बरेचदा येतो. हाती घेतलेल्या कामाला दुसऱ्यामुळेच खीळ बसली हा आपला समज असतो. अनेकदा आपण सर्वांना सहाय्यभूत होणारे असूनही आपल्याला कोणी ढकलून दिले असे लक्षात येते. आपण चाचपणी करतो, आपण कोणाला पाडून टाकले होते का? कोणाचे हेतूपुरस्सर मन दुखावले होते का, कोणाचे आपल्यामुळे नूकसान होत होते का? ही बाब व्यवसाय करतांना पण लागूच आहे. एकीकडे व्यवसाय सुरू करतांना कुठे तरी मदत घेतो. अपवाद असतील. पण मी फक्त साधारण गोष्टी मांडते आहे. ही मदत देताना कुठे काही अपेक्षा असतात. त्या वेळेवर पूर्ण झाल्या तर ठिक. नाहीतर तिथली बैठक मोडली आणि नवे व्यवहार सुरू झाले. तिथल्या पण अपेक्षा पूर्ण झाल्या तर ठिक, नाहीतर पुन्हा अडचण. आपण किती वाढावे हे दुसरे ठरवतात असे आपल्याला बर्याचदा वाटते. तथ्य असेलही. पण आपली मते/विचार योग्य असतील तर योग्य ते घडेल हा विश्वास खूप महत्वाचा असतो. आपण सतत मी किती अयशस्वी किंवा प्रसिद्ध नाही असा पण विचार करतच असतो. किंवा मलाच सतत अडथळे का येतात? मला वाटते ते पूर्ण का होत नाही? आपलं वाटणं बरेचदा अस्पष्ट, अंधूक असते. मला अशावेळी आजी आजोबा आणि नातवंडांचे किंवा चांगले शिक्षक विद्यार्थ्यांचे नाते आठवते. खूप वर्ष झाले/किंवा आपण खूप विचारात मग्न असलो की चेहरे धूसर होतात, पण हळूहळू आठवायला लागते. आयुष्याच्या चढत्या काळात कोणाशी असलेला वैरभाव आयुष्याच्या उतारात जाणवतो, त्यांची कारणे स्वतःचा अभ्यास केला तर समजतात. पण माझ्या सर्व गोष्टींना बसणारी खीळ माझ्यातच दडलेली असते, असे क्वचितच वाटते. दुसऱ्यांनी साथ दिली नाही, मदत मिळाली नाही, शिक्षण मिळाले नाही, इतरांनी काय केले नाही, दिले नाही याचा पाढा आपण वाचत जगत असतो. हे ज्या दिवशी बंद होते, कदाचित त्या दिवशी जगणे थोडेसे सुरू होते. मला वाटते, कोणत्याही व्यावसायिकांच्या बाबतीत हे खरे आहे. रोज उठून व्यवहाराच्या गोष्टी करतांना आपण कसे व्यवसायात जम बसवला असे वाटते आपल्याला. पण कुठे कुठे खीळ बसते हे नाही दिसत. जगण्यासाठी कोणतेही काम करत परिस्थिती ठिक करतांना समजते जी खीळ बसते ते अस्पष्ट दिसते म्हणून. जाणवते पण स्वतःवर विश्वास बसत नाही म्हणून. मी हे करू शकतो/करू शकते हा आत्मविश्वास येतो कोठून? दोरी जबरदस्तीने नाही. व्यवहारात पूर्ण अयशस्वी असणारी व्यक्तीला खीळ बसलेली दिसते. त्याची कारणे ज्याची त्याने शोधावी.....

०९/०४/२६

तुझं सगुणं म्हणू.....

भक्त ईश्वराला म्हणतात, स्वतःच्या अस्तित्वासाठी का होईना, पण मला तुझ्या दर्शनाची आस लागलेली आहे. पण तू कुठे दिसतच नाही. बघ माझा जीव कासावीस होऊन, मी स्वतःला विसरत जातो. पण तुलाच माझी आठवण असते. तुला माझ्या उध्दाराची काळजी असते. होय ना? मग तू सगूण रूपात मला दर्शन देतोस. मला जसे जमते तशी मी कधी भक्ती करतो, कधी अल्लडपणे वागतो, कधी पूर्ण विसरुन जातो. तुझे निराकार रूप आहे, पण तू गुणातीत नाही याची पूसटशीही मला जाणीव नसते. तुझे जे रूप आहे, तेच माझ्यासाठी तुझी खूण, आठवण असते. देवा दुःखात, काही हवे असले की तुझी आठवण का येते? तू देत असलेल्या सुखात तुझाच विसर कसा पडतो? तू निराकार असलास तरी तू अद्वैत आहेस, याची मला जाणीव आहे. तुझ अस्तित्व एकरूपच आहे. आणि मला ते समजते. हे निराकार रूप बघता बघता झालाच परिचय तर तुझ्या संपूर्ण स्वरुपाचे मला दर्शन होईल. तू आकार नसलेला आहेस, पण तू गुण रहित नाही. तर तू आकार असलेला, गुण असलेला पण हे ज्याच्याजवळ कमी आहेत त्यांच्यावरही जास्त माया करणारा आहेस. ईश्वराचा शोध फक्त एकाकीपणातच लागतो. काही तरी अगम्य आपल्याला हवे असते, असे शोध तेव्हाच लागतात. इतर वेळी आपल्या आनंदातच असतो आपण. सुखाच्या शोधात असतो. त्याचे संपूर्ण स्वरुपातील आशीर्वाद राहोत. भक्त म्हणतो, "हे ची दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा." विसर पडला जरी तरी तू पाठीशी सतत रहा. माझी वाट न चूकण्यासाठी.